अहवाल क्रमांक : १५६

# पंचायती राज समिती

## (२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या बुलडाणा जिल्हा परिषदेच्या सन २००८-२००९ व सन २०११-२०१२ च्या लेख्यांवरील लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदाबाबत**

## बारावा अहवाल

सत्यमेव जयते

(हा अहवाल दिनांक मार्च, २०१८ रोजी विधानसभेस / विधानपरिषदेस सादर करण्यात आला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई/नागपूर.
२०१८

# पंचायती राज समिती

## (२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या बुलडाणा जिल्हा परिषदेच्या सन २००८-२००९ व सन २०११-२०१२ च्या लेख्यांवरील लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदाबाबत**

## बारावा अहवाल

## पंचायती राज समिती
## (सन २०१७-२०१८)

**समिती प्रमुख**

१. श्री. सुधीर पारवे, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.
३. श्री. चरण वाघमारे, वि.स.स.
४. श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
५. ॲड. राहुल कुल, वि.स.स.
६. श्री. आर.टी.देशमुख, वि.स.स.
७. डॉ. देवराव होळी, वि.स.स.
८. डॉ. सुरेश खाडे, वि.स.स.
९. डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.
१०. श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.
११. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१२. श्री. किशोर पाटील, वि.स.स.
१३. श्री. राजेश क्षीरसागर, वि.स.स.
१४. श्री. तुकाराम काते, वि.स.स.
१५. श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.
१६. श्री. भारत भालके , वि.स.स.
१७. प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
१८. श्री. दिलीप सोपल, वि.स.स.
१९. श्री. राहुल मोटे, वि.स.स.
२०. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
२१. श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.
२२. प्रा. डॉ. तानाजी सावंत, वि.प.स.
२३. श्री. विक्रम काळे, वि.प.स.
२४. श्री. सतीश चव्हाण, वि.प.स.
२५. श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

२६. श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.
२७. श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.
२८. श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव
(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(४) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी
(५) श्री. ह.वि.तामोरे, कक्ष अधिकारी

**पंचायती राज समिती**
**(सन २०१५-२०१६)**

**कार्यकारी समिती प्रमुख**

१. *श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. अनिल गोटे, वि.स.स.
३. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
४. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
५. श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.
६. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.
७. श्री. समीर कुणावार, वि.स.स.
८. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.
९. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.
१०. श्री. अनिल बाबर, वि.स.स.
११. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१२. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.
१३. श्री. राजाभाऊ वाजे वि.स.स.
१४. ॲड. के. सी. पाडवी, वि.स.स.
१५. श्री. बसवराज पाटील, वि.स.स.
१६. श्री. अमित झनक, वि.स.स.
१७. श्री. राहुल मोटे, वि.स.स.
१८. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
१९. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
२०. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.
२१. श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.
२२. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.
२३. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.
२४. **रिक्त
२५. **रिक्त

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव
(३) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

* सन २०१५-२०१६ या वर्षासाठी गठीत करण्यात आलेल्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या पंचायती राज समितीवर मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६ रोजीपासून श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स. यांची "कार्यकारी समिती प्रमुख " म्हणून नामनियुक्ती केली आहे.

** सन्माननीय समिती प्रमुख श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स. व श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांचा दिनांक ८ जुलै, २०१६ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त

## पंचायती राज समिती
## (सन २०१५-२०१६)

**समिती प्रमुख**

१. श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.
३. श्री. अनिल गोटे, वि.स.स.
४. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
५. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
६. श्री. आर.टी.देशमुख, वि.स.स.
७. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.
८. श्री. समीर कुणावार, वि.स.स.
९. श्री. राजेंद्र नजरधाने, वि.स.स.
१०. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.
११. श्री. अनिल बाबर, वि.स.स.
१२. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१३. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.
१४. श्री. राजाभाऊ वाजे वि.स.स.
१५. ॲड. के.सी.पाडवी, वि.स.स.
१६. श्री. बसवराज पाटील, वि.स.स.
१७. श्री. अमित झनक, वि.स.स.
१८. श्री. राहुल मोटे, वि.स.स.
१९. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
२०. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
२१. श्री. पांडुरंग फुंडकर; वि.प.स.
२२. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.
२३. श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.
२४. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.
२५. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव
(३) श्री. प्रदीप मयेकर, अवर सचिव (समिती)
(४) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

**प्रस्तावना**

मी, पंचायती राज समितीचा 'समिती प्रमुख' या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरुन पंचायती राज समितीचा बारावा अहवाल सादर करीत आहे.

सन २०१७-२०१८ करिता समिती दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

शासनाच्या विविध कामकाजाचा वाढलेला व्याप (Enormous range and complexity) लक्षात घेता विधानमंडळाला उपलब्ध वेळेत आपली कर्तव्ये पुरेशा क्षमतेने बजावता येणे अशक्य झाले आहे. शासन यंत्रणेकडे उक्त किचकट प्रशासकीय कामासाठी सक्षम व तज्ज्ञ प्रशासक यंत्रणा उपलब्ध असते. संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण असे (effective meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन (Executive) राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी (Tone of administration) मा.सभापती, विधानपरिषद व मा.अध्यक्ष, विधानसभा यांनी दोन्ही सभागृहाच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या पंचायती राज समितीचे गठन दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी केले. समिती पध्दतीचे वैशिष्ट असे की, सभागृहात पक्षीय ध्येयधोरणांचा सदस्यांवर प्रभाव पडतो. त्याउलट संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये विधानमंडळाची ही समिती फार मोठ्या मोलाचे कार्य पार पाडीत आहे. ही समिती विधानमंडळाची निर्मिती असून ती सहाजिकच विधानमंडळास दुय्यम आहे. या समितीला सर्व अधिकार विधानमंडळापासूनच प्राप्त झालेले आहेत. (They derive authority from the Lesgislature) या समितीला "Mini Legislature" सभागृहाची छोटी प्रतिकृती संबोधली जाते. शासनाने राबविलेल्या योजनांच्या अंमलबजावणीला पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी व प्रशासनावर सातत्याने नियंत्रण व प्रभावीपणे पहारा ठेवण्याचे महत्वाचे काम विधानमंडळाच्या या समितीद्वारे केले जाते. समितीचे कामकाज पक्षविरहीत तत्त्वावर (irrespective of party affiliation) चालत असल्यामुळे समिती समोरील बाबी पक्षीय अभिनिवेशरहीत पद्धतीने (Non-Party Basis) विचारात घेण्यात येतात त्यामुळे एखाद्या विषयाचा अभ्यास अत्यंत नि:पक्षपातीपणे व तपशिलात जाऊन केला जातो परिणामी त्यास पूर्ण न्याय मिळतो. शासनाचे एखादे धोरण वा योजना याची आखणी कशी करावी याबाबत समिती सल्ला देऊ शकणार नाही, तथापि शासनाने अंमलात आणलेल्या धोरणांची वा योजनेची फलश्रुती अपेक्षेप्रमाणे होत नसेल वा होणार नसेल तर ही बाब संबंधित समिती सभागृहाच्या नजरेस आणून त्या धोरणात वा योजनेत बदल करण्यासंबंधी शासनास सुचविण्याचे काम करते. समिती पध्दतीचा हा एक विशेष फायदा आहे.

विधिमंडळाप्रती शासनाची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची आहे. संसदीय लोकशाहीमध्ये शासन हे प्रत्येक बाबतीत विधानमंडळाला सर्वतोपरी जबाबदार असते आणि शासनाच्या संपूर्ण प्रशासनावर विधीमंडळाचे नियंत्रण हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे.

समितीचे अधिकार, कार्यकक्षा, प्रशासनावर ठेवावयाचे नियंत्रण, शासनाचे समितीप्रती व विधानमंडळाप्रती असलेले उत्तरदायित्व या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास समितीचे अधिकार निश्चित व निर्विवादपणे सर्वश्रेष्ठ आहेत. परंतु, योजना राबविण्यापूर्वी वा एखादे धोरण आखण्यापूर्वी प्रशासन यंत्रणेने मंत्रिमंडळाला दिलेल्या सल्ल्याची तपासणी करणे निश्चितच समितीच्या कार्यकक्षेबाहेरील होईल. मात्र योजना अस्तित्वात आल्यानंतर व त्यावर आर्थिक तरतूद करण्यात आल्यानंतर समिती या प्रकरणी संपूर्णपणे व तपशीलवार छाननी करण्यास समर्थ ठरेल. ही योजना अगदी अनावश्यक आहे काय, त्यावर अपेक्षेपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे काय ? योजनेची उद्दीष्टे साध्य झाली आहेत काय ? योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे किंवा कसे, इतकेच काय एखादी योजना

आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यास ती बंद करण्यात यावी व त्याऐवजी दुसरी एखादी योजना आखण्यात यावी या मर्यादेपर्यंत सुध्दा समिती शिफारस करू शकते व त्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व माहिती समितीला मागविण्याचा अधिकार आहे.

समित्यांचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी मा.सदस्यांनी समितीच्या कामात जास्तीत जास्त सहभाग घेणे जरुरीचे आहे. या अहवालात नमूद बाबीसंदर्भात समितीने एक एक प्रश्न हाती घेऊन त्या प्रत्येक प्रश्नावर समाधानकारकरितीने साक्षीपुरावा गोळा केला, तसेच मा. समिती सदस्यांनी आळीपाळीने प्रश्न विचारुन संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती मिळविण्याच्या विनिर्दिष्ट पद्धतीचे पालनसुध्दा भेटीच्या वेळी केलेले आहे. एका सदस्यांनी त्यांचा मुद्दा पूर्ण केल्यानंतरच दुसऱ्या सदस्यांनी माहिती विचारण्याची पध्दत जोपासली आहे. या पध्दतीने समितीचे कामकाज सुव्यवस्थित पद्धतीने चालविण्याचा या समितीने प्रयत्न केलेला आहे.

समितीला तिच्याकडे सोपविण्यात आलेल्या विषयावरील मुद्दे तयार करुन आणि त्यांच्या विनिर्दिष्ट क्रमाने त्यांचे परिक्षण करुन विषयाशी संबंधित नियम किंवा कार्यपद्धतीमधील त्रुटी आणि उणिवा शोधून काढतेवेळी समितीचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व विधायक होता. केलेल्या चुका सुधारण्यासाठी किंवा प्रशासकीय पद्धतीत सुधारणा घडविण्याच्यादृष्टीने समितीने अनेक बाबतीत सुधारणात्मक उपाय सुचविलेले आहेत, चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी देखील समितीने उपाययोजना सुचविलेल्या आहेत. शासनाच्या प्रतिनिधीप्रती सदस्यांचे वर्तन संयमी आणि सौजन्यशील ठेऊन कोणताही साक्षीदार काही वस्तुस्थिती लपवित असल्याबद्दल दोषी असल्याचे किंवा असहकार दर्शवित असल्याचे आढळून आल्यानंतर समितीने संबंधितांविरुद्ध कारवाईदेखील सुचविली आहे. समितीची बैठक बोलविणे आणि साक्षीदारांना साक्षीसाठी बोलविणे यासंबंधीच्या इतर किरकोळ मुद्दयांच्या बाबतीत साक्षीदारांना पुरेसा वेळ देऊन व नोटीस देऊन बोलविण्यात आलेले आहे. थोडक्यात, समिती पध्दती ही अत्यंत उपयुक्त व परिणामकारक असून संसदीय कामकाज प्रणालीमध्ये या पध्दतीचे स्थान व महत्व अनन्यसाधारण असेच आहे. संसदीय शासन प्रणाली अधिकाधिक वृध्दिंगत करण्याच्या दृष्टीने या महत्त्वपूर्ण अशा संसदीय समितीच्या कामकाजाचा स्तर उत्तरोत्तर उंचावत नेणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

राज्यात समिती जिल्हा परिषदांना भेटी देत असताना समितीला अनेक चांगल्या संकल्पना व राबविलेल्या योजना आढळून आल्या आहेत. त्याचप्रमाणे काही बाबतीत प्रचंड अनियमितता व गैरव्यवहाराची प्रकरणेदेखील आढळून आली आहेत. समितीने चांगल्या बाबींना समर्थन देऊन संबंधितांना प्रोत्साहन दिले. तद्वतच काही अनियमितता किंवा गैरव्यवहाराच्या प्रकरणात समितीने कठोरपणे निर्णय देखील घेतले आहेत. असे करीत असताना दोषारोपित व्यक्तीवर कारवाई करताना नैसर्गिक न्यायाची पायमल्ली होऊ नये अशा प्रकारच्या सूचना देखील प्रशासनास केल्या आहेत. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन न देणे अशी असंख्य प्रकरणे समितीला आढळून आली. अशा प्रकरणी समितीने कोणताही मुलाहिजा न ठेवता संबंधितांवर मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाईदेखील प्रस्तावित केली आहे. या माध्यमातून शासनखाती दंडाची रक्कम जमा होत असताना संबंधित कर्मचाऱ्यांना जरबदेखील बसविण्याचे काम समितीने केले आहे.

या समितीने ज्या ज्या जिल्ह्यांना भेटी दिल्या आहेत त्या त्या जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांना भेटी देऊन उक्त पंचायत समित्यांच्या प्रशासनिक अहवालावर सखोल चर्चा करुन ज्या बाबतीत दोष आहेत त्या सुधारुन घेण्याबाबत त्यांना उपयुक्त सूचना केल्या आहेत. तसेच पंचायत समित्यांच्या क्षेत्रातील विविध कामांना भेटी देऊन त्याची पाहणी करणे, शालेय पोषण आहार, पुरक पोषण आहार, सार्वजनिक आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे, पशु वैद्यकीय दवाखाने, रस्ते, जलसिंचनाची कामे, पाणी पुरवठ्याची कामे इत्यादींना भेटी देऊन त्याबाबतही चुकांचे निरसन करुन काही चांगल्या बाबींचे समर्थन करुन संबंधितांना प्रोत्साहित देखील केले आहे. या अहवालात अशा अनेक बाबींचा उहापोह केला आहे.

सन २००८-२००९ व २०११-२०१२ या वर्षाच्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन व सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात सन २०१५-२०१६ साठी गठीत झालेल्या समितीने बुलडाणा जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली. समितीने बुलडाणा

जिल्हा परिषदेस दिनांक १८, १९ व २० जानेवारी, २०१६ रोजी भेट देऊन श्रीमती दिपा मुधोळ, मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली.

सन २०१७-२०१८ करिता गठीत झालेल्या समितीने बुलडाणा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्यांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक १४ व १५ नोव्हेंबर, २०१७ रोजी जिल्हा परिषद, बुलडाणा संदर्भात मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या/प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचेवेळी श्री. श्यामलाल गोयल, अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, डॉ.प्रदीप व्यास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्री. नंद कुमार, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री. विजय कुमार, प्रधान सचिव, कृषी व पणन (कृषी) विभाग, श्री. असिमकुमार गुप्ता, सचिव, ग्रामविकास व जलसंधारण (ग्रामविकास) विभाग, श्रीमती विनिता वेद सिंगल, सचिव, महिला व बालविकास विभाग, श्री. अ.अ.सगणे, सचिव (बांधकाम), सार्वजनिक बांधकाम विभाग, श्री.दिनेश वाघमारे, सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, श्री.जे.पी. गुप्ता, सचिव, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग, श्री.र.प्र.आटे, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री.वि.सी. वखारे, सह सचिव, ग्रामविकास व जलसंधारण (जलसंधारण) विभाग, श्री.ना.भा.रिंगणे, उप सचिव, ग्रामविकास व जलसंधारण (ग्रामविकास) विभाग, श्री.संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास व जलसंधारण (ग्रामविकास) विभाग, श्री.प्रकाश वळवी, उप सचिव, ग्रामविकास व जलसंधारण (ग्रामविकास) विभाग, श्री. य.टे. पाडवी, उप सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, श्रीमती सु.मो. महाडीक, उप सचिव, वित्त विभाग, श्री.मिलिंद शंभरकर, आयुक्त, समाजकल्याण विभाग, डॉ.विपिन शर्मा, आयुक्त, शिक्षण, श्री.राजेंद्र गोधवे, सहसंचालक, आयुक्त शिक्षण कार्यालय, पुणे, डॉ. सतीश उमरीकर, संचालक, पाणी पुरवठा व स्वच्छता, तसेच श्री.प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक लेखा निधी संचालनालय, नवी मुंबई यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

लेख्यांवरील लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या बुलडाणा जिल्हा परिषदेच्या कामकाजाची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्यांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०१७-२०१८ साठी नव्याने गठीत झालेल्या समितीने दिनांक २७ मार्च, २०१८ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन संमत केला.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २७ मार्च, २०१८.

**सुधीर पारवे**
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती.

**अनुक्रमणिका**


| अ.क्र. (१) | प्रकरण क्रमांक (२) | विषय (३) | परिच्छेद क्रमांक (४) | पृष्ठ क्रमांक (५) |
|---|---|---|---|---|
| (१) | एक | लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध न करुन देणेबाबत (सन २००८-०९) | ३.३८३ ते ३.३८८ | १ |
| (२) | दोन | विशेष घटक योजनेअंतर्गत शेळी वाटप योजनेतील अनियमिततेबाबत (सन २००८-०९) | ३.७४९/१० | १५ |
| (३) | तीन | अंगणवाडी मुला-मुलींकरीता मनी पाटी खरेदीबाबत (सन २००८-०९) | ३.९१८/३.९१९/३.९२०/३.९२१ | २१ |
| (४) | चार | पाणीपट्टी थकबाकी वसुली (सन २००८-०९) | ४.३४९ | २७ |
| (५) | पाच | बुलडाणा जिल्हा परिषदेमधील अपहार/अफरातफर व इतर नियमबाह्य बाबी (सन २०११-१२) | ४.३९८/५.२९/५.५० | ३३ |
| (६) | सहा | जिल्हा परिषद हायस्कुल व प्राथमिक शाळा इमारती भाड्याने देण्याबाबत (सन २०११-१२) | ३.१२७ | ४६ |
| (७) | सात | शालेय पोषण आहार धान्यादी किराणा मालाची अदायगी १०% रक्कम राखून न ठेवता संपूर्ण रक्कम अदा करणेबाबत (सन २०११-१२) | ३.१२८ | ५१ |
| (८) | आठ | जलंब-खेर्डा शेगांव रस्ता बांधकामातील अनियमितता (सन २०११-१२) | ३.२४९ | ५६ |
| (९) | नऊ | श्री. क्षेत्र रामलिंग संस्थान माटरगांव येथील भक्त निवास स्थानातील बांधकामातील अनियमितता (सन २०११-१२) | ३.२५० | ६१ |
| (१०) | दहा | सन २०१०-११ या वर्षात जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी (सन २०११-१२) | ३.८१५/२४ | ६४ |
| (११) | अकरा | सन २०१०-११ या वर्षात जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी (मागासवर्गीय मुलांच्या वसतीगृहाबाबत) (सन २०११-१२) | ३.८१५ (३०) | ६७ |
| (१२) | बारा | बांधकामाच्या ठिकाणी पाहणी न करता १०० टक्के तपासणी व काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र देणेबाबत (पंचायत समिती, मेहकर) (सन २०११-१२) | ४.८१ | ७२ |
| | | **परिशिष्ट** समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त | | ७५ |

## प्रकरण एक

## जिल्हा परिषद, बुलडाणा

### लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध न करुन देणेबाबत

**(परिच्छेद ३.३८३ ते ३.३८८) (सन २००८-२००९)**

मौजे आडोळ, तालुका जळगाव-जामोद कोल्हापुरी बंधारा विशेष दुरुस्ती खर्च :-

जिल्हा परिषद बुलडाणा २००८-२००९ (परिच्छेद क्र. ४) सदर कामावर तिसरे धावते देयकानुसार एकूण रुपये २,५३,०१२ एवढा खर्च झाला आहे. याबाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत :-

(१) सदर कामावर एकूण ६१७ बॅग सिमेंटचा वापर झाल्याचे दर्शविले आहे. तथापि, सिमेंट खाजगी खरेदी केले असल्याने ते योग्य असल्याबाबत शासकीय प्रयोगशाळेचा चाचणी अहवाल नस्ती सोबत नाही.

(२) लेखा संहिता नियम १५७ (१) नुसार प्रदानाची नोंद कंत्राटदाराचे नोंदवहीत घेण्यात आली नाही.

(३) लेखा संहिता नियम १४८ (१) नुसार कंत्राटदाराने कामाची मूळ मुदत संपण्यापुर्वी १५ दिवस अगोदर अर्ज सादर करणे आवश्यक असतांना, त्याप्रमाणे कार्यवाही झाली नाही, असे असतांना वेळोवेळी एकूण ७ मुदतवाढी विनादंड मंजुर केलेल्या आहेत.

(४) सदर कामाच्या अंदाजपत्रकातील बाब क्र.४ नुसार अंदाजपत्रकीय परिमाणापेक्षा १२५ टक्के अधिक रुपये ९,९६३/- ने जादा खर्च झाला आहे. निविदा कलम ३८ (२) नुसार जादा खर्चास सक्षम प्राधिका-याची मंजुरी नसल्याने सदर रक्कम वसूल पात्र ठरते.

(५) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्र. झेडपीए/१०९९/प्र.क्र.२०८४/३३ दिनांक २४.११.१९९९ नुसार निविदा मंजुरी संबंधी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचा सल्ला घेण्यात आला नाही.

(६) सदर कामावर वापरलेल्या गौण खनिजाबाबत रॉयल्टी भरणा केल्याच्या अधिकृत पोच पावत्या कंत्राटदाराने सादर न केल्याने याबाबत खात्री होत नाही.

(७) कोल्हापुरी बंधा-याला लोखंडी गेट बसविल्यानंतर त्याचा चाचणी अहवाल घेण्यात आला नाही.

(८) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ मधील नियम १३७ अन्वये कंत्राटदाराकडे उपलब्ध असलेल्या यंत्र सामूग्रीचा अहवाल प्राप्त केल्याचे आढळले नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, बुलडाणा यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) सदर कामाकरिता प्रयोगशाळेच्या साहित्याची चाचणी केल्याचे दिसून आले नाही. तथापि, प्रत्यक्ष काम सुरु असताना आय.एस.आय.मार्कचे सिमेंट वापरल्याचे त्यावेळेच्या उप विभागीय अधिकारी यांनी प्रमाणित केले आहे.

(२) लेखा संहिता नियम १५७ (१) नुसार प्रदानाची नोंद कंत्राटदाराचे खाते नोंदवहीत घेण्यात आली नाही, तथापि, आता खाते नोंदवहीत नोंदी घेण्यात आल्या आहेत.

(३) सदर कामाच्या कार्यान्वितीसाठी ब-१ करारनाम्यानुसार काम दि. ९.२.२००७ ते ९.५.२००७ पर्यंत पुर्ण होणे अपेक्षित होते, परंतु ते काम न झाल्यामुळे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेश क्र. ५३३ दिनांक १६.२.२००८ नुसार, दिनांक १०.५.२००७ ते दि. ३१.०३.२००८ पर्यंत विनादंडात्मक मुदतवाढ देण्यात आली आहे.

(४) चलन क्र. दिनांक १५.१२.२०१५ अन्वये रु. ९९६३/- वसूल करण्यात आले असून शासन खाती भरणा केले आहे.

(५) निविदा मंजुरी बाबतची संचिका अभिप्रायासाठी वित्त विभागाकडे सादर केली होती. संचिकेवर लेखाधिकारी यांचे पर्यंत अभिप्राय पोहचविण्याचे आहेत. तथापी तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी रजेवर असल्यामुळे संचिका मंजुरीसाठी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे सादर केली व त्यास अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांची निविदा स्विकृतीस मंजुरी दिली.

(६) सदर कामावर वापरलेल्या गौण खनिजाबाबत तिसरे धावते देयकातून रु. ३८०९/- ची कपात करण्यात आली आहे.

(७) लोखंडी गेट बसविल्यानंतर चाचणी अहवाल घेण्यात आला नाही, तथापि, लोखंडी गेट सुस्थितीत असल्याचे प्रमाणपत्र त्यावेळेच्या उप विभागीय अधिकारी यांनी दिलेले आहे.

(८) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ मधील नियम १३७ अन्वये कंत्राटदाराकडे उपलब्ध असलेल्या यंत्र सामग्रीचा अहवाल प्राप्त असून दप्तरी उपलब्ध आहे.

**मौजे रत्नापूर, तालुका मेहकर येथील गाव तलावाचे बांधकामाबाबत :-**

**(परिच्छेद ३.३८४ ) (सन २००८-२००९)**

जिल्हा परिषद, बुलढाणा सन २००८-२००९ (परिच्छेद क्र. ७) : सदर कामाची निविदा अध्यक्ष, भाग्यश्री मजुर कामगार सहकारी संस्था, भोरटेक यांची मंजुरी घेऊन त्यांना प्रमाणक क्रमांक ३६८४, दिनांक ३१/३/२००९ अन्वये रुपये २,२७,९८७/- चे प्रदान केले आहे. याबाबत खालील प्रमाणे आक्षेप आहेत :-

(१) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्र. १०१९/प्र.क्र. २०८४/३३ दिनांक २४.११.१९९९ नुसार निविदा मंजुरी बाबत वित्तिय सल्लागार म्हणून मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचा सल्ला घेण्यात आला नाही.

(२) ग्रामविकास व जल संधारण विभाग शासन परिपत्रक क्र.सिमेंट/साहित्य/१०१९/प्र.क्र.५९/३५, दिनांक ३०.९.२००० नुसार बांधकामातील साहित्य वापरण्यापुर्वी त्याचा शासकीय प्रयोग शाळेकडील चाचणी अहवाल प्राप्त केल्याचे आढळले नाही.

(३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ मधील नियम १३७ अन्वये कंत्राटदाराकडे उपलब्ध यंत्र सामग्रीची माहिती घेणे आवश्यक असताना, ती घेण्यात आली नाही.

(४) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक पंरास/१००२/ प्र.क्र.१६/३८ दिनांक ३१/१/२००१ अन्वये निविदा प्रक्रिया सुरु करण्यापुर्वी भूसंपादनाची कार्यवाही करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही झाली नाही.

(५) महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग यांची अधिसुचना क्रमांक गौखनि १०/२००६ प्र.क्र.५७/ख-३ दिनांक १५.१२.२००६ अन्वये गौण खनिजावर स्वामित्व धनाची आकारणी रुपये ३५.३४ प्रति घन मीटर या दराने आकारणी करावयाची असताना त्याऐवजी रुपये १७.६७ या दराने केल्याने, कमी कपात केलेली एकूण रक्कम रुपये २,०९,३१७ वसूल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, बुलडाणा यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) महाराष्ट्र शासन परिपत्रक झेडपीए १०९९/प्र.क्र.२०८४/३३ ग्रामविकास व जलसंधारण विभाग मंत्रालय, मुंबई २४.११.१९९९ नुसार मुख्य लेखा व वित्त अधिकारी जि.प.बुलढाणा यांनी वित्तीय सल्लागार या नात्याने मंजुरी घेण्यात आली आहे. नस्ती दप्तरी उपलब्ध आहे.

(२) प्रत्यक्ष काम सुरु असतांना आय.एस.आय. मार्कचे सिमेंट वापरल्याचे त्यावेळेच्या उप विभागीय अधिकारी यांनी प्रमाणित केले आहे.

(३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ मधील नियम १३७ अन्वये कंत्राटदाराकडे उपलब्ध यंत्र सामग्रीचा अहवाल प्राप्त असून दप्तरी उपलब्ध आहे.

(४) निविदा प्रक्रिया सुरु करण्यापुर्वी संबंधित लाभार्थी शेतक-यांची संमतीपत्रे प्राप्त करण्यात आली होती. सद्यस्थितीत संयुक्त मोजणी झाली असून सदर प्रकरण अंतिम निवाडयासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे आहे.

(५) सदर गाव तलावाचे अंदाजपत्रक हे सन २००५-०६ चे दरसुची नुसार मंजुर झालेले असल्याने व सन २००५-०६ चे दर सुचीतील गौण खनिजाचा दर रु. १७.६७ प्रती घन मीटर होता. त्या दराने गाढण खजिन स्वामित्व धनाची वसूली केली आहे.

**पाझर तलाव खर्चातील अनियमितता :-**

**(परिच्छेद ३.३८५) (सन २००८-२००९) (परिच्छेद क्र. ९ व १०)**

उपरोक्त दोन्ही पाझर तलाव बांधकामावर लेखा परिक्षण वित्तीय खर्च अखेर एकूण रुपये ८,८७,७१८/- खर्च नोंदविले असून याबाबत खालील प्रमाणे आक्षेप आहेत :-

(१) मौजे पांग्री-२ येथील कामास दिनांक २८.११.२००३ ला प्रशासकीय मंजुरी देण्यात आली असून ती ५ वर्षापर्यंत वैध राहते. प्रशासकिय मान्यतेस ५ वर्षापेक्षा अधिक कालावधी झाल्याने लेखा संहिता नियम १०३ चे उल्लंघन करणारी आहे.

(२) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग मंत्रालय, मुंबई परिपत्रक झेडपीए १०९९/प्र.क्र.२०८४/३३ दिनांक २४.११.१९९९ नुसार मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद बुलढाणा यांची वित्तीय सल्लागार या नात्याने मंजुरी घेतल्याचे दिसुन आले नाही.

(३) मौजे मोहिदेपुर, तालुका जळगाव-जामोद येथील पाझर तलावाचे करारनामा शासन राजपत्र दिनांक २७.४.२००६ मधील महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ अन्वये मुंबई नियम १९५८ मध्ये सुधारणा केल्याप्रमाणे रुपये १० लाखापर्यंत कामाकरिता रुपये १००/- च्या मुद्रांक पेपर व त्यावरील प्रत्येक लाखासाठी रुपये १००/- च्या प्रमाणे रुपये १,४००/- वर करारनामा करणे आवश्यक असतांना रुपये १००/- मुद्रांक पेपरवर करारनामा केला आहे.

(४) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्र. सिमेंट/साहित्य/ १०९९/प्र.क्र.५९/३५ दिनांक ३०.१.२००० नुसार बांधकामासाठी साहित्य वापरण्यापुर्वी माती, मुरुम, खडक इत्यादिची गुणवत्ता चाचणी घेतलेली नाही.

(५) निविदेतील कलम ३८ (२) नुसार १२५ टक्के पेक्षा जास्त परिमाणासाठी अथवा रुपये ५००/- (जे जास्त असेल ते) पेक्षा जास्त होणा-या खर्चासाठी सुधारित तांत्रिक मंजुरी घेणे आवश्यक असतांनाही एकूण ६ बाबींवर १२५ टक्केपेक्षा ज्यादा रक्कम खर्च मंजुरी विना केला आहे.

(६) महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग यांची अधिसुचना क्रमांक गौखानि १०/२००६ प्र.क्र.५७/(ख (३), दिनांक १५.१२.२००६ अन्वये प्रति घ.मि. रुपये ३५.३४ या दराने गौण खनिजावर स्वामित्व धनाची वसुली करणे आवश्यक आहे. त्यानुसार मौजे पांग्री २ पाझर तलावात ३२१.०३ घ.मी. चे रु. ३५.३४ दराने रुपये ११,३४५/- वसूल करणे आवश्यक असताना रुपये ५,६६३/- वसूल करुन रुपये ५६७३/- कमी वसूल केले. तसेच मौजे मोहिदेपुर पाझर तलाव बांधकाम वापर ९३१७.८० घ.मी. गौण खनिजावर प्रति घ.मी. रुपये ३५.३४ दराने रुपये ३,२९,२९१/-वसूल न करता रुपये १,६४,६४६/- वसूल करुन रुपये १,६४,२४५/- कमी वसूल केली या प्रमाणे दोन्ही कामावर एकूण १,७०,३१८/- रुपये कमी वसूली केली आहे.

(७) मौजे पांग्री २ पाझर तलावाचे मोजमाप पुस्तक क्रमांक ५८७ वारंवार मागणी करुन सुध्दा संबंधित उपअभियंता यांनी लेखा परिक्षणास उपलब्ध केले नाही.

(८) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ मधील नियम १४८ (२) नुसार कामाची मूळ मुदत संपण्यापूर्वी १५ दिवस अगोदर मुदतवाढीचा अर्ज सादर केला असताना कंत्राटदाराकडून नुकसान भरपाई सुध्दा वसूल केली नाही.

(९) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम १६८ (१) नुसार कामाचे मुल्यांकन केल्याचे आढळून आले नाही.

(१०) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक व्हीपीएस १०९९/१००२//प्र.क्र.५४/०८ दिनांक २०/५/१९९९ नुसार कामाच्या ठिकाणी लोखंडी फलक ५X४ फुट आकाराचा लावुन त्यावर ऑईल पेंटने कामाचा तपशिल नमूद करणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, बुलडाणा यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) मौजे पांग्री-२ येथील कामास दि. २८.११.२००३ ला प्रशासकीय मंजूरी देण्यात आली असून ती ५ वर्षापर्यंत वैध राहते. प्रशासकीय मान्यतेस ५ वर्षापेक्षा अधिक कालावधी झाल्याने कार्योत्तर सुधारित प्रशासकीय मान्यता घेण्याबाबतची संचिका मंजूरीस्तव सादर केली आहे.

(२) महाराष्ट्र शासन परिपत्रक दिनांक २४.११.१९९९ अन्वये निविदा मंजूरी करिता मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचा सल्ला घेतलेला आहे.

(३) कंत्राटदाराकडून रुपये १३००/- वसूल करण्यात आले असून चलन दि. ७.९.२०१५ अन्वये शासन खाती भरणा करण्यात आली आहे.

(४) उप विभागीय अधिकारी मौजे पांग्री येथील पाझर तलाव आजपर्यंत संचय पातळीपर्यंत भरत असल्याबाबत प्रमाणित केले आहे. तसेच मौजे मोहिदेपुर येथील प्रत्यक्ष काम सुरु असतांना आय.एस.आय.मार्कचे सिमेंट वापरल्याचे त्यावेळेच्या उप विभागीय अधिकारी यांनी प्रमाणित केले आहे.

(५) सदर कामाचे बाब क्र. २ व ७ मध्ये परिमाणात १२५ टक्के जास्त वाढ झाल्यामुळे मौजे मोहिडेपुर पाझर तलावाचे कामास कलम ३८ (२) अन्वये प्रस्तावास मंजुरी घेण्यात आली आहे.

(६) सदर कामाचे अंदाजपत्रक हे सन २००५-०६ चे दरसुची नुसार मंजुर झालेले असल्याने व सन २००५-०६ चे दर सुचीतील दर हे गौण खनिजाचा दर रु. १७.६७ प्रति घनमीटर त्या दराचे गौण खनिज स्वामित्व धनाची वसुली केली आहे.

(७) मौजे पांग्री-२ येथील पाझर तलावाचे कामाची मोजमाप पुस्तिका क्रमांक ५८७ ही नसुन मोजमाप पुस्तिका क्र. ५३३ व ५९१ ही आहे. व सदर मुळ मोजमाप पुस्तिका दप्तरी उपलब्ध आहे.

(८) संबंधितांचे मुदतवाढीचा अर्ज मुदत संपण्यापुर्वी १५ दिवस अगोदर दि. १४.१.२००८ रोजी कार्यालयास सादर केला होता. त्यानुसार संबंधितास मुदतवाढ प्रदान करण्यात आली.

(९) लेखा संहिता १९६८ चे नियम १६८ (१) नुसार कामाचे मुल्यांकन मोजमाप पुस्तिका ५२० मध्ये पान क्र. ७१ वर केलेले आहे. सदर मोजमाप पुस्तिका दप्तरी उपलब्ध आहे.

(१०) सदर कामाच्या व मूळ अंदाजपत्रकामध्ये लोखंडी फलकाचा समावेश नसल्याने फलक लावता आला नाही.

**पाझर तलाव जामठी खर्चातील अनियमितता :-**

**(परिच्छेद ३.३८६) (सन २००८-२००९) (परिच्छेद क्र.११)**

सदर कामाचे मूळ अंदाजपत्रक रुपये ५९,६१,६४२/- एवढे असून कामावर एकूण रुपये १५,१७,३२४/- एवढा खर्च झाला आहे. याबाबत खालील प्रमाणे आक्षेप आहेत :-

(१) जागा क्षेत्राचे भरावासाठी योग्य ती माती वापरल्याबाबत गुणवत्ता नियंत्रक प्रयोग शाळेकडुन चाचणी अहवाल प्राप्त केला नाही.

(२) शासन परिपत्रक पाटबंधारे विभाग क्रमांक इजीएस/१०८५/६४९/लापा-२, दिनांक १०.१०.१९८५ नुसार दबाई केलेल्या माती कामातून १० टक्के पोकळी वजा न करता ५ टक्के पोकळी वजा केल्याने जादा प्रदानाची वसुली होणे आवश्यक आहे.

(३) लेखा संहिता १९६८ मधील नियम १३७ नुसार कंत्राटदाराकडे उपलब्ध यंत्र सामग्रीचा अहवाल निविदेसोबत सादर करणे आवश्यक असताना, त्याप्रमाणे कार्यवाही झाली नाही.

(४) कामाचे आदेशानुसार काम १८ महिन्यांत पुर्ण करावयाचे होते. तथापि, लेखा परिक्षणाचे तारखेपर्यंत काम अपुर्ण होते. पुढील कालावधीचे मुदतवाढीसाठीचे अभिलेख नस्तीमध्ये आढळले नाही.

(५) कंत्राटदाराचे देयकातुन १ टक्का कामगार विमा रक्कम रुपये १५,१७३/-वसुली न केल्याने वसुली करणे आवश्यक आहे.

(६) संचालक, भुविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय यांचे दिनांक १६.१०.१९९९ चे पत्रान्वये गौण खनिजाविषयी जिल्हाधिकारी यांचे स्वामित्व धन मोकळे केल्याचे प्रमाणपत्र घेणे आवश्यक असताना, तसे अभिलेख सादर केले नाही. त्यामुळे रॉयल्टीची रक्कम संबंधित ठेकेदाराकडून वसूल करणे आवश्यक आहे.

(७) लेखा संहिता नियम १६६ (अ) अन्वये मोजमाप नोंदवहीत कामाची मापे नोंदविताना मापे नोंदविल्याचा दिनांक नमुद केला नाही. तसेच काम सुरु करणेपुर्वी कामाचे फोटो काढणे आवश्यक असताना तसे अभिलेख नस्ती मध्ये आढळले नाही.

(८) महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग यांचेकडील दिनांक २४.११.१९९९ चे परिपत्रकानुसार निविदा मंजुरी विषयी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचा सल्ला घेतला नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, बुलडाणा यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) जागा क्षेत्रासाठी योग्य ती काळी माती वापरण्यात आली आहे. कार्यरत उप विभागीय अधिकारी यांनी मौजे जामठी येथील पाझर तलाव आजपर्यंत संचय पातळीपर्यंत भरत असल्याबाबत प्रमाणित केले आहे.

(२) सदर काम ब-१ करारनाम्यावरील नियमित लेखाशिर्षाअंतर्गतचे काम असल्यामुळे अटी व शर्तीनुसार केवळ २% संकुचन घट वजा करावी लागते. त्यानुसार देयक अदा करण्यात आले आहे. आक्षेपामधील परिपत्रक हे रोहयो अंतर्गत कामाकरिता व कालव्याच्या कामाकरिता निर्गमित झालेले आहे.

(३) कंत्राटदाराकडे उपलब्ध यंत्र सामुग्रीचा अहवाल निविदेसोबत लावण्यात आला होता. सदर अहवाल दप्तरी उपलब्ध आहे.

(४) सदर कामाची मुदत १८ महिने होती. सदरचे काम दिनांक १२ जानेवारी, २००८ रोजी सुरु करण्यात आले त्याच प्रमाणे दि. २७ मे, २००९ रोजी काम पुर्ण झाल्यामुळे मुदतवाढ घेण्याची आवश्यकता नाही. पुर्णत्वाचे प्रमाणपत्र दप्तरी उपलब्ध आहे.

(५) कंत्राटदाराचे देयकातुन १% कामगार विमा रक्कम रुपये १५,१७३/- देयकातुन वसूल करण्यात आली आहे.

(६) कंत्राटदाराचे देयकातुन नियमाप्रमाणे रॉयल्टी चार्जेस कपात करण्यात आलेली आहे.

(७) मोजमाप पुस्तिकांमध्ये नोंदवितांना मापे नोंदविण्याची तारीख नोंदविलेली आहे व तसेच काम सुरु करण्यापुर्वी व काम सुरु झाल्यानंतर फोटो काढण्यात आले आहे.

(८) महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक दिनांक २४.११.१९९९ चे परिपत्रकानुसार निविदा मंजुरी करिता मुख्य लेखा वित्त अधिकारी यांचा सल्ला घेतलेला आहे.

**मौजे घाटनांद्रा येथील पाझर तलाव कामावर केलेल्या खर्चाबाबत :-**

**(परिच्छेद ३.३८७) (सन २००८-२००९) (परिच्छेद क्र. १२ )**

मौजे घाटनांद्रा-२ येथील पाझर तलावावर रुपये १,४८,३७६/- खर्च केल्याचे आढळून आले असून याबाबत खालील प्रमाणे आक्षेप आहेत :-

(१) महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.पीडब्ल्यूबी/एम/१०८६/ सी.आर/ २४९/ निविदा-२, दिनांक ५.११.१९८६ अन्वये बी-१ निविदा ५ टक्के पेक्षा जादा दराची स्विकारता येत नसतांना ३३.२० टक्के जादा दराची निविदा स्विकारली आहे.

(२) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक पंरास/१००२/प्र.क्र.१६/३८ दिनांक ३१.१.२००१ अन्वये निविदा प्रक्रिया सुरु करण्यापुर्वी भुसंपादनाची कार्यवाही केली नाही.

(३) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक परास/१०८८/सी.आर/२०४१/२६ दिनांक १४.०९/१९८८ अन्वये जिल्हा परिषद पंचायत समितीचे मालकीची जमिनी शिवाय इतर जमिनीवर मालकीकरण न घेताच बांधकाम केले.

(४) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ मधील नियम क्र. १३८ नुसार कामाच्या निविदा सुचना सार्वजनिक ठिकाणी प्रादेशिक भाषेमध्ये व इंग्रजी भाषेमध्ये लावण्यात आल्याचे नस्तीवरुन दिसुन आले नाही.

(५) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक सिमेंट/साहित्य/१०९९/प्र.क्र.५९/३५ दिनांक ३०.१.२००० नुसार बांधकामावरील साहित्य वापरण्यापुर्वी गुणवत्ता नियंत्रक विभागाकडुन साहित्याची चाचणी करण्यात आली नाही.

(६) बिलातुन विक्रीकर रुपये २,९६७/- ठेव रु.२,९६७/- व जी.आय.एस. १ टक्के रुपये १,४८३/- असे एकूण रुपये ७,४१७/- कमी कपात केली असून उक्त रक्कम वसूल करणे आवश्यक आहे.

(७) काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र उपलब्ध केले नाही.

(८) कामाची मूळ मुदत १२ महिने दिनांक ११.१.२००९ पर्यंत होती, परंतु विहीत मुदतीत काम पुर्ण झाले किंवा मुदतवाढ दिल्याबाबतची कार्यवाही लेखापरिक्षणास आढळुन आले नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, बुलढाणा यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र. पीडब्ल्युबी/एम/१०८६/ सी.आर./२४९/निविदा-२, दिनांक ५.११.१९८६ अन्वये बी-१ निविदा ५% पेक्षा जास्त दराची स्विकारता येत नाही. सदर प्रकरणी अंदाजपत्रक हे जुन्या दराने मंजुर केले आहे. त्यामुळे शेडयुल बी मध्ये जुने दर आहेत. सदर दराचे प्रचलित दरांशी तुलना केली असता सदर निविदा जरी ३३.२० टक्के जादा दराची दिसत असली तरी प्रचलित दरानुसार ती ५ टक्के पेक्षा कमी दराची आहे.

(२) सदर प्रकरणी संबंधित लाभार्थी शेतक-यांचे संमती पत्र प्राप्त झाल्यानंतर निविदा प्रक्रिया सुरु करण्यात आली. सद्यस्थितीत अंतिम निवाडा झालेला असून लाभार्थी शेतक-याला भुसंपादनाचा मोबदला देण्यात आला आहे.

(३) खाजगी जमीन संपादित करण्यात आली आहे. या कास्तकाराच्या जमिनीवर बांधकाम करण्यापुर्वी कास्तकाराचे संमतीपत्र घेण्यात आले आहे.

(४) कामाची निविदा सुचना सार्वजनिक ठिकाणी प्रादेशिक भाषेमध्ये दैनिक हितवाद, नागपुर व दैनिक विश्वविजेता, बुलढाणा या पेपर मध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे.

(५) याबाबत तत्कालीन उप विभागीय अभियंता यांनी सिमेंट आय.एस.आय. मार्कचे वापरण्यात आल्याचे प्रमाणित केलेले आहे. तथापि, सदर पाझर तलाव पुर्ण संचय पातळीपर्यंत भरत आलेला असल्याबाबतचे कार्यरत उप विभागीय अभियंता यांनी प्रमाणित केलेले आहे.

(६) अंतिम बिलातुन विक्रीकर रुपये २,९६८/- ठेव रु. २,९६८/- वसूल करण्यात आलेले आहे व जी.आय.एस.१ टक्के रुपये १,४८३/- डि.डि क्र. १३१७०८, दिनांक २७.११.२०१५ अन्वये विमा संचालक, शासकीय विमा निधी, मुंबई येथे भरणा केलेला आहे.

(७) काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्राची प्रत दप्तरी उपलब्ध आहे.

(८) काम दिनांक २४.१२.२००८ ला पुर्ण झाले असून ते मूळ मुदतीत झाले आहे. पुर्णत्वाचे प्रमाणपत्र उपलब्ध आहे.

**रिंगणवाडी गाव तलाव ता.संग्रामपुर येथील पोल हलविणे खर्चाबाबत :-**

**(परिच्छेद ३.३८८) ( सन २००८-२००९ ) (परिच्छेद क्र. २१ )**

रिंगणवाडी गाव तलाव बुडित क्षेत्रातील जमिनी वरील विदयुत वाहिनी हलविणे यावर रुपये ९९,०१८/- खर्च केले असून याबाबत खालील प्रमाणे आक्षेप आहेत :-

(१) उप विभागीय अधिकारी, सिंचन विभाग, खामगांव यांनी पत्र क्रमांक ७८५, दिनांक १०.८.२००८ अन्वये महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी, शेगांव यांच्याशी केलेल्या पत्र व्यवहारानुसार गाव तलावाचे काम मंजुर झाल्यानंतर आणि बुडीत क्षेत्रातील जमीन संपादन केल्यानंतर विद्युत खात्यामार्फत वाहिनी टाकण्यात आली, परंतु सिंचन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र न घेता देयक क्रमांक ६४३, दिनांक ४.४.२००८ अन्वये रु.८९,०१८/- चे देयक कार्यकारी अभियंता, सिंचन विभाग, जिल्हा परिषद, बुलढाणा यांना सादर केल्याचे दिसुन आले.

(२) कार्यकारी अभियंता, सिंचन विभाग, बुलढाणा यांनी अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य, विद्युत कंपनी यांना पत्र क्रमांक ४४, दिनांक ६.१.२००९ नुसार संबंधित उप अभियंता यांना वीज मंडळाकडुन स्वखर्चाने विद्युत वाहिनी हटविण्यास कळविले असताना त्याप्रमाणे कार्यवाही न करता उलट रुपये १९,०१८/- चे देयक सादर करुन नियमबाहय निधीची मागणी केली व सिंचन विभागाने प्र.क्र.८८०६५७, दिनांक १६.३.२००९ अन्वये रुपये ९९,०१८/- प्रदान केले, परंतु सदरहु खर्च संबंधित कामावरील नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, बुलडाणा यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) जिल्हाधिकारी, बुलडाणा यांची दि. ६.९.२००९ चे आढावा सभेत गाव तलावाचे काम ३१.३.२००९ पर्यंत पुर्ण करणेबाबत सुचित केले होते. गाव तलावाचे काम लवकरात लवकर पुर्ण करणे गरजेचे होते व बुडीत क्षेत्रातुन गेलेली विद्युत वाहिनी हटविणे आवश्यक असल्याने सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, शेगांव यांनी संयुक्त पाहणी करुन विद्युत वाहिनी हटविण्याची रक्कम रु. ९९,०१८/- चे देयक या कार्यालयास सादर केले, त्यानुसार जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचे आदेशानुसार देयक पारित करण्यात आले.

(२) जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, मानव विकास समिती, बुलढाणा यांचे पत्र क्रमांक कावि/ जिमाविस/३१/२००९ दिनांक २५.०२.२००९ अन्वये विद्युत वाहिनी हटविणेसाठी उपलब्ध निधीमधुन खर्च करुन काम त्वरित पुर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्यामुळे उप अभियंता वीजमंडळ रुपये ९९,०१८/- अदा करण्यात आले आहे. सदरचा खर्च हा कामावरच करण्यात आला आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

बुलडाणा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २० जानेवारी, २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी सन २००८-२००९ व सन २०११-२०१२ च्या लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालातील ज्या परिच्छेदांमध्ये "अभिलेख लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेले नाहीत" या संदर्भात आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत अशा प्रकरणात महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार दंडाची कार्यवाही तसेच दोषींवर एक वेतनवाढ रोखून त्याबाबतची नोंद त्यांचे सेवापुस्तकात घेण्याचे समितीने निदेश दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

लेखापरिक्षणास कागदपत्रे उपलब्ध न करुन देणेबाबत :

(१) एखाद्या कामासाठी शासनाकडून निधी प्राप्त झाल्यानंतर तो त्याच कामावर खर्च झाला किंवा कसे याबाबतची मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीच्या निदेशानुसार चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले ?

(२) सन २००८-०९ व सन २०११-१२ या अहवाल वर्षात लेखा परिक्षणास कागदपत्र उपलब्ध करुन दिले नसल्याप्रकरणी संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांचेवर समितीच्या निदेशानुसार महाराष्ट्र स्थानिक लेखा परिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ अनुसार दंडाची व एक वेतनवाढ राखून तशी नोंद संबंधितांचे सेवा पुस्तिकेमध्ये घेण्याची कारवाई केली आहे काय, त्यानुसार प्रकरण व परिच्छेद निहाय दोन्ही अहवाल वर्षाची माहिती समितीस सादर करण्यात यावी.

(३) भविष्यात लेखा परिक्षणास अभिलेख उपलब्ध न करुन देणे असे आक्षेप वारंवार उपस्थित होवू नयेत याबाबत काटेकोर अंमलबजावणी करण्यासंदर्भात मंत्रालयीन विभागाकडून कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे.

**(सन २०११-१२) सदरहू परिच्छेदात लेखा परिक्षणात कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यात आली नाहीत.**

**परिच्छेद क्र.** ३५१/२४, ३५२/२६, ३.४१७/१६ ३.६५०/५, ३.६५१/६, ३.६५३/२०, ३.७२३/२, ३.८१२(३७)१३, ३.८१२(३८)५६, ३.८१२(४०)२८, ३.८१२(४१),२३, ३.८१२(४२),१६, ४.३९३(७३)२०, ४.३९४(६७)५३, ४.३९८(२२)/२८, ४.३९८(२३)२१, ५.५०(२)/४

**(सन २००८-२००९) सदरहू परिच्छेदात लेखा परिक्षणात कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यात आली नाहीत.**

**परिच्छेद क्र.** ३.२३८/५, ३.२४०/२२, ३.२४१/३०, ३.२४२/३३, ३.३८४/७, ३.३८५/९, ३.३८८/२१, ३.६८२/४, ३.७४८/८, ३.७४९/१०, ३.७५०/११, ३.८४२/५, ३.९७९/२, ३.१०३७(४५)/३, ३.१०३७(४६),३५, ३.१०३७(४६)/३५, ३.१०३७(४७)२, ४.६७/१२, ४.७१/२६, ४.१२२(१३), ४.१२३/१०, ४.१२४/७, ४.१२५/८, ४.१२६/८, ४.१४४/१५, ४.१५६/७, ४.२७०/५, ४.२७१/९, ४.२७२/६, ४.२७३/४, ४.२७४/६, ४.२७४/७, ४.२७५/६, ४.२७६/८, ४.२७७/१०, ४.३४७(७०)१९,४.३४७(७१)/३८, ४.३४७(७२)५, ५.२२/८, ५.३३(४)५, ५.३३(४)४

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) होय, चौकशी करण्यात आली, महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनियम १९५८ चे कलम १३९ अन्वये आणि शासन परिपत्रकानूसार गट विकास अधिकारी व विस्तार अधिकारी (पं) यांचेकडुन वेळोवेळी ग्राम पंचायत अभिलेख्यांची तपासणी करण्यात येत आहे. शासनाकडून परिच्छेदांमध्ये नमुद असलेल्या कामांसाठी प्राप्त झालेल्या निधीतून सदर खर्च नियमानूसार करण्यात आलेला आहे.

(२) सन २००८-०९ व २०११-१२ या अहवाल वर्षात लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन दिले नसल्यासंबंधीच्या प्रश्न भाग-३ मध्ये नमूद केलेल्या एकूण ५९ परिच्छेदांच्या अनुषंगाने संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर समितीच्या निर्देशानुसार महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम १९३० च्या कलम ७ ला अनुसरुन सन २००८-०९ मधील प्रकरणांसदर्भात रु. १००/- आणि सन २०११-१२ मधील प्रकरणांसदर्भात रु. २५,०००/- इतकी दंडाची शास्ती तसेच एक वेतनवाढ रोखण्याची कारवाई करुन तशी नोंद संबंधितांचे सेवा पुस्तिकेमध्ये घेण्याची कारवाई करण्यात आली आहे. प्रकरण व परिच्छेद निहाय दोन्ही अहवाल वर्षाची माहिती सोबत जोडली आहे.

(३) महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम १९३० च्या कलम १० (४) नुसार प्रत्येक वर्षी स्थानिक निधी लेखा शाखेकडुन लेखा परिक्षण करण्यात येते.

(ii) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्र. लेखाप-२०१३(७/१३),/वित्त ८, दि. ११.२.२०१३ अन्वये अंमलबजावणी करण्यात येत आहे.

(iii) खातेप्रमुख, गटविकास अधिकारी व विस्तार अधिकारी (पं) यांच्या आढावा बैठकी मध्ये वेळोवेळी निर्देश देण्यात आलेले आहे.

(iv) या कार्यालयाचे पत्रक.बुजिप/ग्रापं/लेप-१/९३५/१७, दिनांक ८.५.२०१७ व पत्र क्र. बुजिप/ग्रापं/लेप-१/१३५०/१७, दि. १९/६/२०१७ नुसार भविष्यात लेखा परिक्षणास अभिलेख उपलब्ध करुन न दिल्यास रु. २५,०००/- पर्यंतचे दंड करण्यात येईल याबाबत निर्देश देण्यात आलेले आहे.

(v) १४ वा वित्त आयोग अंतर्गत performance Grant मिळणेसाठी ग्रामपंचायतचे लेखा परिक्षण झालेले असणे हा निकष असल्याने ग्रामपंचायतचे लेखा परिक्षण नियमितपणे होत आहे.

(vi) लेखापरिक्षणाबाबत शासनाकडून प्राप्त शासन निर्णय व परिपत्रके संबंधित संस्था/कार्यालय यांना निर्गमित करुन लेखापरिक्षणास अभिलेखे उपलब्ध करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत. लेखा परिक्षणास अभिलेखे उपलब्ध न केल्यास स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम १९३० चे कलम ७ नुसार दंडाचे कार्यवाही करण्याबाबत अवगत करण्यात आलेले आहे.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात ग्रामविकास विभागाकडून खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**ग्राम विकास विभागाचे अभिप्राय : (वित्त ७)(१) व (२)**

जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी शासन सहमत आहे.

(१) लेखापरिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन देण्याबाबत नोडल अधिका-यांची कर्तव्य व जबाबदा-या तसेच लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध न करुन देणा-या अधिकारी/कर्मचारी यांच्यावर स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम १९३० चा सुधारणा अधिनियम २०११ च्या कलम ८ अन्वये दंडात्मक कारवाई करण्याबाबत सुचना शासन परिपत्रक पंरास २०१५/प्रक्र २८/वित्त ७/ दि. ३० मार्च, २०१६ निर्गमित करण्यात आले आहे.

| अ. क्र. | परिच्छेद क्रमांक | वर्ष | विभाग/पंचायत समितीचे नांव | जबाबदार अधिकारी | दंडाची रक्कम रुपये | वसूल झालेली रक्कम रुपये | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **१** | **३.२५१/२४** | **२०११/१२** | **बांधकाम विभाग** | **-** | **-** | **-** | सदर लेखा आक्षेप हा कंत्राटदाराकडे व्हॅट क्रमांक नसणे तसेच साहित्याचा चाचणी अहवाल सादर न करणे याबाबतचा आहे. कंत्राटदाराकडे व्हॅट क्रमांक असून सदरील काम विद्युतीकरणाचे रु. ५००००/- चे आतील असून वापरले गेलेले साहीत्य हे ISI मार्कचे असल्याची खात्री करण्यात आली आहे. सदर साहित्य हे इलेक्ट्रीकचे असून त्याच्या चाचणी अहवालाची आवश्यकता नाही. त्यामुळे चाचणी अहवाल घेण्यात आला नसल्यामुळे तो लेखा परिक्षणास उपलब्ध झाला नाही. सबब. मा. समितीने दिलेल्या निर्देशानुसार कारवाई करता आलेली नाही. |
| २ | ३.२५२/२६ | २०११/१२ | बांधकाम विभाग | श्री.व्ही.पी.मोरे<br>क.अ. श्री.हरकळ, तत्कालीन निविदा लिपिक | १०००/-<br>१०००/- | १०००/-<br>१०००/- | लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध न करुन दिल्यामुळे श्री. व्ही.पी.मोरे, क.अ. व श्री. हरकळ,क.स. यांना प्रत्येकी रु. १०००/- द्रव्यदंड व एक वार्षिक वेतनवाढ वर्षाकरिता रोखण्यात आलेली आहे. |
| ३ | ३.४१७/१६ | २०११/१२ | ग्रामिण पाणी पुरवठा | श्री.एस.जे.महानकर, शाखा अभियंता<br>श्री. डी.एस.वाघ, का.अ. | ५०००/-<br>२५०००/- | ५०००/- | श्री.एस.जे.महानकर, शाखा अभियंता, यांनी लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन न दिल्याबाबत त्यांचेवर रु. ५०००/- दंडाची शास्ती करण्यात आली आहे. श्री. वाघ तत्कालीन का.अ. यांनी सदर प्रकरणी योग्य ती कार्यवाही वेळीच करुन घेतल्यामुळे त्यांचेवर दंडाची व वेतनवाढ रोखण्याची कारवाई करणेबाबत त्यांचे प्रशासकीय विभागास कळविण्यात आलेले आहे. |
| ४ | ३.६५०/५ | २०११/१२ | समाजकल्याण | १.श्री.डी.जे.देशमुख, क.स.<br>२.श्री.जी.बी.दंदाले क.स.<br>३.श्री.जे.एम.भिलावेकर वि.अ.(प)<br>४.श्री.ए.जी.राठोड वि.अ.(प)<br>५.श्री.ए.एम.खन क.स. | ५००/-<br>५००/-<br>५००/-<br>५००/-<br>५००/- | ५००/-<br>५००/-<br>५००/-<br>५००/-<br>५००/- | श्री. ए.एम.खान क.स. स्वेच्छा सेवानिवृत्त झालेले असल्याने एक वार्षिक वेतन वाढ थोपविण्याची कारवाई करता आली नाही परंतु त्यांचेविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. तसेच उर्वरित चार कर्मचा-यांची एक वार्षिक वेतनवाढ तात्पुरती रोखून ५००/- प्रत्येकी याप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. |
| ५ | ३.६५१/६ | २०११/१२ | समाजकल्याण | १.श्री.डी.जे.देशमुख, क.स.<br>२.श्री.जी.बी.दंदाले क.स.<br>३.श्री.जे.एम.भिलावेकर वि.अ.(प)<br>४.श्री.ए.जी.राठोड वि.अ.(प)<br>५.श्री.ए.एम.खान क.स. | ५००/-<br>५००/-<br>५००/-<br>५००/-<br>५००/- | ५००/-<br>५००/-<br>५००/-<br>५००/-<br>५००/- | श्री. ए.एम.खान क.स. स्वेच्छा सेवानिवृत्त झालेले असल्याने एक वार्षिक वेतन वाढ थोपविण्याची कारवाई करता आली नाही परंतु त्यांचेविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. तसेच उर्वरित चार कर्मचा-यांची एक वार्षिक वेतनवाढ तात्पुरती रोखून ५००/- प्रत्येकी याप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. |
| ६ | ३.६५३/२० | २०११/१२ | समाजकल्याण | - | - | - | लेखापरिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन न देण्याबाबतचा परिच्छेद नाही. त्यामुळे जबाबदारी निश्चित करण्यात आली नाही. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | ३.७२३/२ | २०११/१२ | महिला व बालकल्याण | - | - | - | लेखापरिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन न देण्याबाबतचा परिच्छेद नाही. त्यामुळे जबाबदारी निश्चित करण्यात आली नाही. |
| ८ | ३.८१२(३७)/१३ | २०११/१२ | शिक्षण विभाग | श्री.आर.ई.गणेशकर, ततत्का कप्रअ व श्री.आर.एल.भुसारी व.स. | ५०००/-<br>५०००/- | -<br>- | मूळ आक्षेप हा न्यायालयीन दाव्यांची नोंदवही व इ.क्लास जमिनीच्या हर्रासीबाबत अदयावत विवरणपत्र न दाखविणेसंदर्भात आहे. त्याअनुषंगाने संबधितांविरुध्द एक वेतनवाढ थांबविण्याची प्रशासकीय कारवाई करण्यात आली आहे. तसेच दंडात्मक कारवराई करण्यात आली आहे. |
| ९ | ३.८१२(३८)/५६ | २०११/१२ | बांधकाम विभाग | श्री.आर.एस.मोरे, वस | १००००/- | १००००/- | दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. संबंधीत कर्मचारी यांच्या मूळ सेवापुस्तकात नोंद घेण्यात आलेली आहे. तसेच एक वार्षिक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरुपात रोखण्यात आलेली आहे. |
| १० | ३.८१२(३९)/१८ | २०११/१२ | ग्रामिण पाणी पुरवठा | श्री.डी.एस.वाघ, का.अ. | - | - | संबंधितांची एक वेतनवाढ बंद करुन त्याची नोंद त्यांच्या मूळ सेवापुस्तिकेत घेण्यात यावी असे त्यांचे प्रशासकीय विभाग प्रमुखास या कार्यालयाचे पत्र क्र १३८८ दि. २९/०८/२०१६ नुसार कळविण्यात आले आहे. तसेच दंडाचीसुध्दा कारवाई करणेबाबत या कार्यालयाचे पत्र क्र. १८४१ दि. ११/७/२०१७ नुसार कळविण्यात आलेले आहे. |
| ११ | ३.८१२(४०)/२८ | २०११/१२ | ग्रामीण पाणी पुंरवठा | उक्त १० प्रमाणे | - | - | उक्त १० प्रमाणे |
| १२ | ३.८१२(४१)/२३ | २०११/१२ | आरोग्य विभाग | श्री. आर.एस.मोरे, वस | १००००/- | १००००/- | दंडात्मक कारवराई करण्यात आली आहे. संबंधीत कर्मचारी यांच्या मूळ सेवापुस्तकात नोंद घेण्यात आलेली आहे. तसेच एक वार्षिक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरुपात रोखण्यात आलेली आहे. |
| १३ | ३.८१२(४२)/१६ | २०११/१२ | महिला व बालकल्याण | श्री.आर.पी.पळसकर, वि.अ.(सां.)<br>श्री.बी.पी.अंभोरे,क.स.<br>श्री.डी.पी.सुरळकर, क.स.<br>श्री.जी.पी.पाटील, क.स. | ५०००/-<br>५०००/-<br>५०००/-<br>५०००/- | ५०००/-<br>५०००/- | सदर प्रकरणी जिल्हा परिषद सेस मधुन व शासकीय योजनेतुन वैयक्तिक लाभाच्या योजना राबविताना प्रकल्प कार्यालय, बुलडाणा, चिखली, मोताळा, जळगांव जामोद व शेगांव येथिल साठा नोंदवही लेखापरिक्षणास उपलबध करुन न दिल्यामुळे संबंधितांवर रु. ५०००/- दंडाची कारवाई करण्यात आली आहे. तसेच एक वार्षिक वेतनवाढ एका वर्षाकरिता थोपविण्यात आली आहे. |
| १४ | ३.३९३(७३)/२० | २०११/१२ | पं.स.लोणार | श्री.ए.एस.पावडे, शाअ | २५०००/- | - | आदेश क्र. २१३२ दि. १६.९.१६ नुसार एक वार्षिक वेतनवाढ रोखण्यात आली आहे. श्री. पावडे यांच्या वेतनातून दरमहा रु. २४०००/- इतकी रक्कमेची वसूली अन्य प्रकरणी करण्यात येत असून, प्रस्तावित रु. २५,०००/- ची वसूली यथावकाश करण्यात येईल. |
| १५ | ३.३९४(६७)/५३ | २०११/१२ | पं.स.खामगांव | - | - | - | लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन न देण्याबाबत परिच्छेद नाही. सदर परिच्छेद हा अपूर्ण कामाची विवरणपत्रे लेखा परिक्षणासाठी मागविण्यात आली होती. तो दर्शवुन त्याचवेळी मान्यसुध्दा करण्यात आला आहे. त्यामुळे कारवाई केलेली नाही. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १६ | ४.३९८(२२)/२८ | २०११.१२ | पं.स.शेगांव | श्री.व्ही.एस.पवार, स्था.अ. | २५०००/- | २५०००/- | सदर प्रकरणी जबाबदार श्री.व्ही.एस.पवार दंडात्मक कारवाई करुन सेवापुस्तिकेत नोंद घेण्यात आली आहे. |
| १७ | ४.३९८(२३)/२१ | २०११.१२ | पं.स.मलकापुर | श्री. आर.जी.तायडे वि.अ. | ५००/- | ५००/- | सदर आक्षेप हा नमुना नंबर ३३ वरील नोंदी लेखापरिक्षणासाठी दर्शविण्यात आल्या नव्हत्या यासंदर्भात आहे. सद्यःस्थितीत सर्व नोंदी आहेत. संबंधिताने वेळीच कागदपत्रे उपलब्ध करुन दिली नाही म्हणून दंडात्क कारवाई केली आहे. |
| १८ | ५.५०(२)/४ | २०११/१२ | पं.स.मेहकर | श्री.एन.वाय.हिरगुडे ग्रा.से.<br>कु.एन.ए.राठोड, ग्रा.स. | १००/- | १००/- | श्री.एन.वाय.हिरगुडे सेवानिवृत्त झालेले असल्यामुळे त्यांची वेतनवाढ रोखण्याची कारवाई करता येत नाही. कु.एन.ए.राठोड यांची एक वेतनवाढ रोखुन नोंद घेण्यासाठी गट विकास अधिकारी, पं.स. दिग्रस जि.प. यवतमाळ यांना कळविले आहे. तसेच त्यांचेविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे. |
| १९ | ३.२३८/५ | २००८/०९ | बांधकाम विभाग | श्री.बी.आर.जाधव, क.अ.<br>श्री.व्ही.पी.मोरे, क.अ. | ५००/- | ५००/- | सदर प्रकरणी जबाबदार श्री.बी.आर.जाधव, क.अ. हे सेवानिवृत्त झाल्यामुळे त्यांची वेतनवाढ रोखण्याची कारवाई करता येत नाही. मात्र त्यांना ताकीद देण्यात आली आहे. श्री.व्ही.पी.मोरे,क.अ यांची एक वेतनवाढ रोखुन सेवापुस्तकात नोंद घेण्यात आली आहे. |
| २० | ३.२४०/२२ | २००८/०९ | बांधकाम विभाग | श्री.बी.ओ.मानस्कर, से.नि.क.अ.<br>श्री.आर.टी.नावकर, से.नि.क.अ. | २००/-<br>१००/- | २००/-<br>१००/- | या प्रकरणी श्री. बी. ओ. मानस्कर, से. नि. क. अ. व श्री. आर. टी. नावकर हे सेवानिवृत्त झाल्यामुळे त्यांची वेतनवाढ रोखण्याची कारवाई करता येत नाही. मात्र श्री बी.ओ.मानस्कर यांना रु. २००/- व श्री. आर.टी. नावकर यांना रु. १००/- द्रव्यदंड व ताकीद देण्यात आली आहे. |
| २१ | ३.२४१/३० | २००८/०९ | बांधकाम विभाग | श्री.संजय देशपांडे, क.अ.लेखा<br>श्री.जे.पी.राऊत | १००/-<br>१००/- | १००/-<br>१००/- | श्री.संजय देशपांडे, क.स.लेखा व श्री.जे.पी.राऊत क.अ. यांचेवर दंडात्मक कारवाई करुन एक वार्षिक वेतनवाढ एक वर्षाकरिता रोखण्यात आली आहे. |
| २२ | ३.२४२/३३ | २००८/०९ | बांधकाम विभाग | श्री.जे.एस.हरकुट, क.अ.<br>श्री.आर.टी.नावकर, से.नि.क.अ. | २००/-<br>१००/- | २००/-<br>१००/- | श्री. आर.टी.नावकर हे सेवानिवृत झाल्यामुळे त्यांची वेतनवाढ रोखण्याची कारवाई करता येत नाही. श्री.हरकुट,क.अ. यांचे विरुध्द दंडात्मक कारवाई करुन एक वार्षिक वेतनवाढ एक वर्षाकरिता रोखण्यात आली आहे. |
| २३ | ३.३८४/७ | २००८/०९ | सिंचन विभाग | - | - | - | सदर प्रकरणी हे अभिलेख करुन देण्यासंदर्भात नसुन गावतलाव बांधतांना भुसंपादनाच्या संदर्भातील आक्षेप आहे. भुसंपदानाची कारवाई करण्यात आली असून चाचणी अहवाल नसणे संदर्भात आक्षेप होता तो उपलब्ध आहे. |
| २४ | ३.३८५/९ | २००८/०९ | सिंचन विभाग | श्री.शकील अहमद शा.अ. | - | - | सदर आक्षेप हा लेखापरिक्षणास मोजमाप पुस्तिका उपलब्ध करुन देण्यासंदर्भात आहे. संबंधित शा.अ. मयत झालेले आहे. त्यामुळे त्यांचेवर कारवाई करता आली नाही परंतु सद्यःस्थितीत मोजमाप पुस्तिका क्र. ५८७ पान क्र. ८१ ते ९५ जि.प.कडे उपलब्ध आहे. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २५ | ३.३८६/११ | २००८/०९ | सिंचन विभाग | श्री.शकील अहमद | - | - | सदर आक्षेप हा लेखापरिक्षणास चाचणी अहवाल, मोजमाप पुस्तिका लेखापरिक्षणास उपलब्ध न करुन देणेसंदर्भात आहे.संबधित शाखा अभियंता मयत झालेले आहे. त्यामुळे त्यांचेवर कारवाई करता आली नाही. |
| २६ | ३.३८८/२१ | २००८/०९ | सिंचन विभाग | - | - | - | लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन न देण्याबाबत परिच्छेद नाही. हा आक्षेप कामाव्यतिरिक्त बाबींवर खर्च करण्यासंदर्भात आहे. परंतु रिंगणवाडी गावतलाव तयार करताना विदयुत पोल काढण्यासाठी जिल्हाधिकारी यांचे सुचनेनुसार रु. ९९०१८/- चे देयक विदयुत वितरण कंपनीला अदा करण्यात आले आहे. व सदरील खर्च हा कामाचे संदर्भात आहे. |
| २७ | ३.६८२/४ | २००८/०९ | कृषि विभाग | श्री.आय.टी.इंगळे, वि.अ.कृषी | १०००/- | १०००/- | सदर प्रकरणी श्री. इंगळे, वि.अ.(कृषि) यांचेवर दंडात्मक कारवाई करुन सेवापुस्तकात नोंद घेण्यात आली आहे. तसेच त्याची एक वार्षिक वेतनवाढ एका वर्षाकरिता थोपविण्यात आली आहे. |
| २८ | ३.७४८/८ | २००८/०९ | पशुसंवर्धन | - | - | - | सदर लेखा आक्षेप हा लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलबध करुन न देण्याबाबत नाही. प्रकरणी योजना राबविताना आक्षेप असल्यामुळे कारवाई करण्यात आली नाही. |
| २९ | ३.७४९/१० | २००८/०९ | पशुसंवर्धन | - | - | - | सदर आक्षेप हा लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलबध करुन न देण्याबाबत नाही. प्रकरणी योजना राबविताना आक्षेप असल्यामुळे कारवाई करण्यात आली नाही. |
| ३० | ३.७५०/११ | २००८.०९ | पशुसंवर्धन | - | - | - | सदर आक्षेप हा लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलबध करुन न देण्याबाबत नाही. प्रकरणी योजना राबविताना आक्षेप असल्यामुळे कारवाई करण्यात आली नाही. |
| ३१ | ३.८४२/५ | २००८/०९ | समाजकल्याण | - | - | - | सदर आक्षेप हा लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलबध करुन न देणे बाबत नसुन लाभार्थ्यांना वेळीच साहीत्य वाटप न करणेसंदर्भात आहे. सद्यस्थितीत लाभार्थ्यांना मंजुर यादी प्रमाणे साहित्य वाटप करण्यात आले आहे त्यामुळे कारवाई करण्यात आली नाही. |
| ३२ | ३.९७९/२ | २००८/०९ | एबाविसे/ म.बा.क. | - | - | - | सदर लेखा आक्षेप हा लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलबध करुन न देणेबाबत नसुन योजना व्यवस्थित न राबविणेसंदर्भात आहे. योजना नियमानुसार राबविण्यात आली आहे. त्यामुळे कारवाई करण्यात आली नाही. |
| ३३ | ३.१०३७(४५)/३ | २००८-०९ | साप्रवि | एकूण ५० ग्रामसेकव | ८५००/- | ८५००/- | आदेश क्रमांक १८१ दि. १४/१/२०१७ या आदेशान्वये एकूण ४६ दोषी कर्मचा-यांची एक वार्षिक वेतनवाढ बंद करण्यात आली. व आदेश क्रमांक १६७८ दिनांक १९/१०/२०१६ या आदेशान्वये ५० कर्मचा-यांविरुध्द दंडात्मक कारवाई केली आहे. (प्रति ग्रामपंचायत निहाय १०० रु.दंड आकारणी) |
| ३४ | ३.१०३७(४६)/३५ | २००८-०९ | शिक्षण विभाग | श्री.अशोक दाभाडे, से.नि.क.अ. | १००/- | १००/- | श्री.दाभाडे यांनी लेखापरिक्षणास १० उपप्रमाणके रु. १९२६२१/- चे लेखा परिक्षणास उपलब्ध करुन दिली नाही. सदर |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | प्रमाणके सद्यस्थितीत उपलब्ध आहे. श्री. दाभाडे हे सेवानिवृत्त झाल्यामुळे केवळ दंडात्मक कारवाई करता आली. वेतनवाढ थोपविण्यासंदर्भात कारवाई करता आली नाही. |
| ३५ | ३.१०३७ (४७)/२ | २००८/०९ | बांधकाम विभाग | श्री.एम.एच.राठोड, क.अ. | २८००/- | २८००/- | एकूण २८ प्रकरणी श्री. एम.एव.राठोड यांनी लेखा परिक्षणास कागदपत्रें उपलब्ध न करुन दिल्यामुळे दोन वार्षिक वेतनवाढी कायमस्वरुपी बंद केल्या असून, प्रत्येक प्रकरणी रु. १००/- याप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. |
| ३६ | ४३६७/१२ | २००८/०९ | प.स.नांदुरा | - | - | - | सदर आक्षेप हा कागदपत्रे लेखापरिक्षणास उपलबध करुन न देणे संदर्भात नसून योजना राबविताना आलेल्या उणिवांबाबत आहे. सदर उणिवा वेळीच दूर करण्यात आल्या आहेत.त्यामुळे कारवाई करण्यात आली नाही. |
| ३७ | ४.७१/२६ | २००८/०९ | पं.स.लोणार | - | - | - | सदर आक्षेप हा कागदपत्रे लेखापरिक्षणास उपलबध करुन न देणे संदर्भात नसून योजना राबविताना आलेल्या उणिवांबाबत आहे. सदर उणिवा वेळीच दूर करण्यात आल्या आहेत. त्यामुळे कारवाई करण्यात आली नाही. |
| ३८ | ४.१२२/१३ | २००८/०९ | पं.स.जळगांव | - | - | - | सदर आक्षेप हा सरसकट लेखापरिक्षणास उपलबध करुन न देणे संदर्भात नसून योजना राबविताना आलेल्या उणिवांबाबत आहे. सदर उणिवा वेळीच दूर करण्यात आल्या आहेत. त्यामुळे कारवाई करण्यात आली नाही. |
| ३९ | ४.१२३/१० | २००८/०९ | पं.स.मेहकर | श्री.जी.एन.कावरखे. ग्रा.से. | १००/- | १००/- | सदर प्रकरणी श्री.जी.एन. कावरख यांचेवर रू.१००/- दंड व एक वार्षिक वेतनवाढ रोखून संबधितांचे सेवापुस्तिकेत नोंद घेण्यात आली आहे. |
| ४० | ४.१२४/७ | २००८/०९ | पं.स.चिखली | श्री.पी.के.मोरे, ग्रामसेवक | ३१०/- | ३१०/- | सदर लेखा आक्षेप हा कागदपत्र लेखा परिक्षणास उपलब्ध करून देण्यासंदर्भात नसून १२ व्या वित्त आयोगाचे काम करतांना विलंबाने करणे संदर्भात आहे. विलंबाची जबाबदारी म्हणून श्री.पी.के.मोरे यांचेवर रू.३१०/- दंडाची कारवाई करण्यात आली आहे. |
| ४१ | ४.१२५/८ | २००८/०९ | पं.स.देऊळगांव राजा | श्री.एस.एस.बाजड<br>श्री.एम.डी.वायाळ<br>श्रीव्ही.वाय.गिते<br>सर्व ग्रा.से. | प्रत्येकी १००/- | ३००/- | लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून न दिल्यामुळे ग्रामपंचायत सचिव १.श्री.बाजाड २.श्री.वायाळ ३.श्री.गिते यांचेवर दंडत्मक कारवाई करून वेतनवाढ थांबविण्याची कारवाई करण्यात आली आहे. |
| ४२ | ४.१२६/८ | २००८/०९ | पं.स.सिंदखेड राजा | श्री.आर.आय.पंडरे (ठाकुर) व<br>श्री.आर.एस.मानतकर ग्रामसेवक | १००/-<br>१००/- | १००/-<br>१००/- | सदर लेखा आक्षेप हा लेखा परिक्षणास चाचणी अहवाल व कामाचा फोटो लेखा परिक्षणास उपलब्ध न करून देण्यासंदर्भात आहे.प्रकरणी दंडात्मक कारवाई करून एक वार्षिक वेतनवाढ एका वर्षाकरीता थोपविण्यात आली आहे. |
| ४३ | ४.१४४/१५ | २००८/०९ | पं.स.मेहकर | श्री.जे.व्ही.नरवाडे<br>से.नि.शा.अ.<br>श्री.डी.एल.सुरुशे<br>से.नि.स्था.स.सहा. | १००/-<br>१००/- | १००/-<br>१००/- | सदर प्रकरणी श्री.जे.व्ही.नरवाडे, सेवानिवृत्त शाखा अभियंता व श्री.डी.एल.सुरशे, सेवानिवृत्त स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांनी लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध न |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | करून दिल्यामुळे प्रत्येकी १०० रूपये दंड लावून तो वसूल करण्यात आला आहे.दोन्ही कर्मचारी सेवानिवृत्त असल्यामुळे वेतनवाढ थांबविता आली नाही. |
| ४४ | ४.१५६/७ | २००८/०९ | पं.स.नांदुरा | - | - | - | सदर आक्षेप हा लेखा परिक्षणास अभिलेखे उपलब्ध करून न देणेसंदर्भात नसून नौसर्गिक आपत्ती मध्ये पाणीपुरवठा होत असतांना पाणीपुरवठा व स्वच्छता समिती स्थापन करण्यासंदर्भात आहे.वैयक्तीक जबाबदारी निश्चित करता येत नसल्यामुळे कारवाई करण्यात आली नाही. |
| ४५ | ४.२७०/५ | २००८/०९ | पं.स.जळगांव | श्री.एस.के.गोरे, शा.अ. | १००/- | १००/- | सदर प्रकरणी श्री गोरे शा.अ.यांचेवर दंडात्मक कारवाई करून आदेश क्र.५११९ दि.१४/१०/१६ नुसार एक वार्षिक वेतनवाढ थोपविण्यात आली आहे. |
| ४६ | ४.२७९/९ | २००८/०९ | पं.स.जळगांव | श्री.एस.के.गोरे, शा.अ.<br>श्री.बुरजे, शा.अ. | २००/-<br>३००/- | २००/-<br>३००/- | सदर प्रकरणी श्री.गोरे, व श्री.बुरजे, शा.अ.यांचेवर दंडात्मक कारवाई करून आदेश क्र.५११९ दि.१४/१०/१६ व ६०८१<br>दि. २२/१२/२०१६ नुसार एक वार्षिक वेतनवाढ थोपविण्यात आली आहे. |
| ४७ | ४.२७२/६ | २००८/०९ | पं.स.चिखली | एकूण १३ ग्रामसेवक | १३००/- | १३००/- | सदर प्रकरणी एकूण १३ ग्रामसेवकांची एक वार्षिक वेतनवाढ थोपविण्यात आली आहे.तसेच रू.१००/- याप्रमाणे त्याच्याकडून वसूली करण्यात आली आहे. |
| ४८ | ४.२७३/४ | २००८/०९ | पं.स.मातोळा | - | - | - | सदर लेखा आक्षेप हा लेखा परिक्षणाचे वेळी शिलाई मशिन योजना राबवितांना करण्यात आलेल्या चुकांच्या संदर्भात आहे. याप्रकरणी आक्षेप वेळीच काढण्यात आले असल्यामुळे कारवाई करण्यात आली नाही. |
| ४९ | ४.२७४/६ | २००८/०९ | पं.स.मातोळा | - | - | - | सदर लेखा आक्षेप हा लेखा परिक्षणाचे वेळी सरसकट कागदपत्रे उपलब्ध करून न देणेसंदर्भात नसून लेखापरिक्षणाचे वेळी दलीतवस्तीचे कामासंदर्भात काही आक्षेप आहेत.त्यांची पुर्तता वेळीच करण्यात आली असल्यामुळे कारवाई करण्यात आली नाही. |
| ५० | ४.२७४/७ | २००८/०९ | पं.स.मातोळा | - | - | - | सदर लेखा आक्षेप हा लेखा परिक्षणाचे वेळी सरसकट कागदपत्रे उपलब्ध करून न देणेसंदर्भात नसून लेखापरिक्षणाचे वेळी दलीतवस्तीचे कामासंदर्भात काही आक्षेप आहेत.त्यांची पुर्तता वेळीच करण्यात आली असल्यामुळे कारवाई करण्यात आली नाही. |
| ५१ | ४.२७५/६ | २००८/०९ | पं.स.लोणार | श्री.बि.एन.पठाण,शा.अ.<br>श्री.आर.एम.कुळसंगे, शा.अ. | १००/-<br>१००/- | १००/-<br>१००/- | सदर प्रकरणी श्री.बी.एन.पठाण व श्री.आर.एम.कुळसंगे यांचेवर दंडात्मक कारवाई करून एक वार्षिक वेतनवाढ थांबवून सेवापुस्तकात नोंद घेण्यात आली आहे. |
| ५२ | ४.२७६/८ | २००८/०९ | पं.स.लोणार | श्री.आर.एम.कुळसंगे, शा.अ.<br>श्री.ए.एस.पावडे, शा.अ. | १००/-<br>१००/- | १००/-<br>१००/- | सदर प्रकरणी श्री.पावडे व श्री आर.एम.कुळसंगे यांचेवरदंडात्मक कारवाई करून एक वार्षिक वेतनवाढ थांबवून सेवापुस्तकात नोंद घेण्यात आली आहे. |
| ५३ | ४.२७७/१० | २००८/०९ | पं.स.लोणार | श्री.डी.एन.पठाण, शा.अ. | १००/- | १००/- | सदर प्रकरणी श्री.पठाण शाखा अभियंता यांचेवरदंडात्मक कारवाई करून एक वार्षिक वेतनवाढ थांबवून सेवापुस्तकात नोंद घेण्यात आली आहे. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५४ | ४.३४७(७०)/१९ | २००८/+०९ | पं.स.बुलढाणा | श्री.बि.ओ.बोर्डे<br>से.नि.गशिअ<br>श्री.इंगळे, लिपीक(मयत) | १००/- | १००/- | सदर प्रकरणी शाळांना वाटप केलेल्या अनुदानाची नस्ती लेखा परिक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाही.त्यामुळे विद्यार्थी संख्या,शिक्षक संख्या यानुसार अनुदानाची खात्री करता आली नाही.असा आक्षेप आहे.सदर प्रकरणी गट शिक्षणाधिकारी श्री.बोर्डे हे सेवानिवृत्त झाल्यामुळे व श्री.इंगळे हे मयत झाल्यामुळे वेतनवाढ थोपविण्याची कारवाई करता आली नाही.मात्र दंडात्मक कारवाई केली आहे.सद्यस्थितीत केंद्रप्रमुख यांचे अहवाल नस्तीमध्ये उपलब्ध आहे. |
| ५५ | ४.३४७(७१)/३८ | २००८/०९ | पं.स.खामगांव | श्री.एम.एस.अरवट,<br>शाअ | २४००/- | २४००/- | एकूण २४ प्रकरणी श्री.अरवट शाखा अभियंता यांचेवर दंडात्मक कारवाई करून एक वार्षिक वेतनवाढ थांबवून सेवापुस्तकात नोंद घेण्यात आली आहे. |
| ५६ | ४.३४७(७२)/५ | २००८/०९ | पं.स.सि.राजा | श्री. आर.एस.बुधे,<br>श्री.एस.ए.नागरे,<br>श्री.जे.के.टाकळगर,<br>श्री.टी.जी.चौधरी सर्व ग्रामसेवक | प्रत्येकी १००/- | प्रत्येकी १००/- | सदर प्रकरणी नमुद ५ ग्रामसेवकांनी लेखापरिक्षणास कागदपत्रे सादर न केल्यामुळे त्यांचेवर दंडात्मक कारवाई करून संबधितांची एक वार्षिक वेतनवाढ थोपविण्यात आली आहे.तशी सेवापुस्तकात घेण्यात आली आहे. |
| ५७ | ५.२२/८ | २००८/०९ | पं.स.मेहकर | श्री.एम.पी.वानखेडे<br>ग्रामसेवक | १००/- | १००/- | सदर प्रकरणी ग्रामसेवक श्री.एम.पी. वानखेडे, लेखापरिक्षणास कागदपत्रे सादर न केल्यामुळे त्यांचेवर दंडात्मक कारवाई करून संबधितांची एक वार्षिक वेतनवाढ थोपविण्यात आली आहे.तशी सेवापुस्तकात घेण्यात आली आहे. |
| ५८ | ५.३३(४)/५ | २००८/०९ | पं.स.नांदुरा | श्री.आर.एस.खंडारे<br>ग्रा.से | १००/- | १००/- | सदर प्रकरणी पंचायत समिती नांदुरा अंतर्गत जवळा बा.ग्रामपंचायतचे अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध न करून दिल्यामुळे वसुलपात्र रक्कम रू.११६२४६ पैकी १०,०००/- ते कार्यरत असतांना वसूल करण्यात आले आहे.व उर्वरीत कुटूंब निवृत्ती वेतनातून दरमहा रू.३००० कपात करण्यात येत आहे. |
| ५९ | ५.३३(४)/४ | २००८/०९ | पं.स.जळगांव | श्री.जी.एम.भिलावेकर<br>ग्रासे | १००/- | १००/- | सदर प्रकरणी पंचायत समिती जळगांव जा.अंतर्गत ग्रामपंचायत मांडवा येथिल अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध करून न दिल्यामुळे ग्रामसेवक श्री.जी.एम.भिलावेकर, यांचेवर दंडात्मक कारवाई करून वेतनवाढ थोपविण्यात आली आहे.व तशी नोंद सेवापुस्तकात घेण्यात आली आहे. |

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने बुलढाणा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक १५ नोव्हेंबर २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, लेखापरिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन न देणे याबाबत दंडवारी केलेली आहे. असे लक्षात येत आहे की, अशी बरीच प्रकरणे वाढायला लागलेली आहेत. लेखापरिक्षणाच्यावेळी रेकॉर्ड उपलब्ध करुन देत नाहीत. तर आता समितीने विचारणा केल्यावर रेकॉर्ड घेऊन येतात ते तपासणी करणे समितीला शक्य होत नसते त्यासंदर्भात समिती असे सुचविते की, जिल्हापरिषदेने दिलेल्या कागदपत्रांतर्गत लेखापरीक्षण करुन समितीला आणि लेखापरिक्षणाला पाठवून द्यावे समितीला वाटते की काही गंभीर असेल तर लेखापरिक्षणास ते ही घेऊ ही प्रकरणे वाढायला लागली आहेत. पुढील ऑडिट करता येत नाही. कॅफोकडे इंटरनल ऑडिट सिस्टम आहे. त्यामध्ये काही फ्रॉड असले तर डिटेक्ट होईल असे परिपत्रक काढण्यात येईल. असे कधी घडू नये ते मिळाले नाही तर शिक्षा करा. परिपत्रकात असे नमूद करण्यात येईल. पुढील तीन महिन्याच्या आत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कागदपत्र मिळालेले नाही, त्या कागदपत्रांची तपासणी कॅफोकडून करुन घ्यावी. तीन महिन्यांच्या आत कॅफोने आपला प्राथमिक अहवाल सादर करुन त्याप्रकारचे परिपत्रकामध्ये पुढील तीन महिन्यात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तपासणी तीन महिन्यांमध्ये करुन घ्यावी त्यानंतर कागदपत्रे मिळाली नाहीत तर निलंबित करण्याची कारवाई करा वैगरे अशा अन्य काही गंभीर कारवाई करण्यात यावी. याचा काही गैरवापर होता कामा नये. दोन्ही विभागाने समन्वय साधुन कल्याणकारी राज्याच्या या योजना ग्रामीण भागापर्यंत शेवटच्या माणसापर्यंत पोहोचल्या पाहिजे. याकरिता प्रकर्षाने ज्या काही सूचना दिलेल्या आहेत, त्यांची अंमलबजावणी झाली पाहिजे. सर्व लोकांनान्याय मिळालापाहिजे. शासन गतिमान होण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत. ज्या ज्या सूचना दिलेल्या आहेत त्यांचे अनुपालन करुन समितीला माहिती कळविण्यात यावी. यावर समितीने असे निदेश दिले की, दंडात्मक कारवाई केलेली आहे. मात्र असे लक्षात येते की, अशी बरीच प्रकरणे वाढायला लागली आहेत. लेखापरिक्षणाच्या वेळी रेकॉर्ड दाखविले जात नाही. तर ते आता रेकॉर्ड घेवून येतात. ते आता तपासणे शक्य होत नाही. तर आता सूचविण्यात येते की, आपण दिलेल्या कागदपत्रांचे अंतर्गत लेखापरीक्षण करुन त्याचा अहवाल समितीला व संचालकांना पाठवून द्यावा. अहवालामध्ये काही गंभीर असेलतर त्याचे पुन्हा लेखापरिक्षण करण्यात येईल. इंटरनल ऑडिट सिस्टिम आहे. यामध्ये काही फ्रॉड असेल तर डिटेक्ट होईल. तीन महिन्याच्या आत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना जी कागदपत्रे मिळालेली आहेत. त्या कागदपत्रांची तपासणी मुख्य लेखा व वित्त अधिकारींकडून करुन घ्यावी. तीन महिन्याचा आत मुख्य लेखा व वित्त अधिका-यांनी आपला प्राथमिक अहवाल सादर करावा. तीन महिन्यानंतर कागदपत्रे मिळाली नाही तर संबंधितांना निलंबित करावे, वा अन्य काही गंभीर कारवाई करण्यात यावी. अशा प्रकारचे परिपत्रक काढण्यात यावे.

## अभिप्राय व शिफारशी

सन २००८-२००९ आणि सन २०११-२०१२ या वर्षाच्या लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालावर समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकाऱ्यांची साक्ष घेतली. सदर दोन्ही अहवाल वर्षातील "लेखापरिक्षेस अभिलेख उपलब्ध करुन दिले नसणे" या समान आक्षेपावर समितीने संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्यावर महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियमातील कलम ७ अन्वये दंडात्मक कारवाई करुन त्यांच्या सेवापुस्तकात नोंद घेऊन त्यांची वेतनवाढ थांबविण्याबाबत निदेश देऊन तत्संबंधीत अहवाल सादर करण्याचे समितीने निदेश दिले.

**विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी समितीस प्राप्त झालेल्या माहितीवरुन असे दिसून येते की, सन २००८-२००९ व सन २०११-२०१२ या अहवाल वर्षातील ५९ परिच्छेदांच्या अनुषंगाने संबंधित अधिकारी/ कर्मचारी महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियमाच्या कलम ७ नुसार दंडीत झालेले आहेत, सन २००८-०९ मधील प्रकरणासंदर्भात रु. १००/- आणि सन २०१२-१३ मधील प्रकरणासंदर्भात रु. २५,०००/- इतकी दंडाची शास्ती तसेच एक वेतनवाढ रोखण्याची कारवाई करुन तशी नोंद संबंधितांचे सेवा पुस्तिकेमध्ये घेण्याची कारवाई करण्यात आली आहे. याबाबत समिती समाधान व्यक्त करते.**

## प्रकरण दोन

## जिल्हा परिषद, बुलडाणा

### विशेष घटक योजनेअंतर्गत शेळी वाटप योजनेतील अनियमिततेबाबत

**(परिच्छेद ३.७४९/१०) (सन २००८-०९)**

जिल्हा परिषद, बुलडाणा, सन २००८-०९ (परिच्छेद क्र. ९) :- सन २००८-०९ हया वित्तीय वर्षाकरिता रुपये २५ लाख तरतुद वाटप अधिक २५ लाख लोक हिस्सा (बँक कर्ज) मधुन अनुसुचित जाती/नवबौध्द लाभार्थ्यांना शेळयांचे गट वाटप करण्यात आले याबाबत खालील आक्षेप आहेत.

(१) महाराष्ट्र शासन, समाजकल्याण व महिला बालविकास यांचे अ.शा.पत्र क्र.संकिर्ण १०.२००३ प्र.क्र. ५४/पदुम ४, दिनांक २८.०२.२००३ नुसार ३३ टक्के महिलांचा सहभागाची निवड करण्यात आली नाही.

(२) एकूण ८ प्रकरणाबाबत दिलेला लाभ योग्य असल्याबाबत खात्री होणे आवश्यक आहे.

(३) मा.उपआयुक्त, पशुसंवर्धन (नियोजन व अंदाज) आयुक्तालय, पुणे यांचे पत्र क्र fyp-११-/१०८CR, ३९९ ७१७-८६२ पं.स.-६, दिनांक २८.४.२००८ नुसार अनुसुचित जाती/नवबौध्द लाभार्थीना शेळयांचे वाटप करणे आवश्यक असतांना निवड यादीची पडताळणी केली असता यामध्ये इतर जातीच्या लाभार्थ्यांचा समावेश आढळून आला आहे.

(४) हया कार्यालयाचे अर्धसमास पत्र क्र.०५, दिनांक १२.०७.२०१० अन्वये अर्ज सादर करण्याबाबत पत्र दिले असता ३२ लाभार्थ्यांचे अर्ज सादर करण्यात आले नाही. त्यामुळे महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग आदेश क्र. १०८९/प्र.क्र.५५५, दिनांक ५.७.१९९० अन्वये एकाच कुटूंबातील एकापेक्षा जास्त व्यक्तींना लाभ देण्यात येऊ नये निर्देश असताना एकाच कुटूंबातील दोन लाभार्थ्यांना लाभ दिला नसल्याची लेखा परिक्षणास सत्यता पडताळता करता आली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, बुलडाणा यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) समाज कल्याण महिला व बालविकास, महाराष्ट्र शासन यांचे अ.शा.पत्र क्र.संकिर्ण १०.२००३/प्र.क्र.५४/पदुम ४ दिनांक २८.०२.२००३ नुसार ३३ टक्के महिलांचा सहभागाची निवड करण्यात आली नाही. कारण महिला लाभार्थी न मिळाल्यामुळे व योजनेवरील संपूर्ण खर्च होणे आवश्यक असल्यामुळे योजनेवर खर्च करण्यात आला आहे.

(२) मूळ लेखा परिक्षणा परिच्छेदाचे यादी नुसार आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे -१ यांचे कार्यालयाचे पत्र क्रमांक एसडिएस-१८/१४२८/५५०/१२४५/२००८ पंचायत समिती १३ पुणे-१ दि. ६.६.०८ च्या मार्गदर्शक सुचनेमधील मुद्दा क्र.१ नुसार दि. १ मे २००१ नंतर संतती झाली असेल किंवा होईल तर असे लाभार्थी उपरोक्त योजनेस लाभ मिळविण्यास पात्र राहणार नाही. अपवाद दारिद्रय रेषेखालील लाभ मिळविण्याकरिता छोटे कुटुंब या अटीमुळे ज्या ठिकाणी दारिद्रय रेषेखालील लाभार्थी उपलब्ध होत नसेल त्या ठिकाणी छोटे कुटुंब ही अट संबंधित योजनांना लागु करण्यात येवू नये अशा स्पष्ट सुचना असल्यामुळे मूळ लेखा परिक्षणाचे परिच्छेदाचे यादीनुसार एकूण ८ प्रकरणांना लाभ देण्यात आलेला असून तो योग्य आहे.

(३) मा.उपआयुक्त, पशुसंवर्धन (नियोजन व अंदाज) आयुक्तालय, पुणे यांचे पत्र क्र fyp-११-/१०८CR, ३९९ ७१७-८६२ पं.स.-६, दिनांक २८.४.२००८ नुसार अनुसुचित जाती/नवबौध्द लाभार्थ्यांना त्यांचे जातीचे प्रमाणपत्राची पडताळणी करुनच शेळयांचे गट वाटप करण्यात आलेले आहे. .इतर जातीच्या लाभार्थ्यांना योजनेचा लाभ दिलेला नाही.

(४) मूळ परिच्छेदात नमुद केल्यानुसार एकूण ३२ लाभार्थ्यांचे अर्ज लेखा परिक्षणासाठी दप्तरी उपलब्ध नव्हते. कारण सदरहू अर्ज हे बँकेचे अर्थसयहाय्य मिळणे करिता बँकेकडे पाठविण्यात आलेले होते. इत:परही सदर लाभार्थ्यांच्या अर्जाची दुय्यम प्रत लेखा परिक्षणाकरिता दप्तरी उपलब्ध आहे. तसेच या योजनेअंतर्गत मूळ परिच्छेदात नमुद यादीतील अ.क्र. ३९४ ज्ञानदेव तोताराम तायडे व अ.क्र.३९५ भाऊराव तोताराम तायडे हे दोन्ही कुटूंब विभक्त असल्याबाबत विभागाने खात्री केली आहे. एकाच कुटूंबातील सभासदांना लाभ दिलेला नाही, याची विभागाने खात्री केलेली आहे.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

बुलडाणा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २० जानेवारी, २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, महाराष्ट्र शासन, समाज कल्याण व महिला बाल कल्याण विभागाचे अर्धशासकीय पत्र दिनांक २८.२.२००३ नुसार ३३ टक्के महिला लाभार्थी उपलब्ध होण्याकरिता खात्याने कोणते प्रयत्न केले, तसेच, या योजने अंतर्गत लाभ दिलेले ८ लाभार्थी दारिद्र्य रेषेखालील नाहीत. असे असतानाही या लाभार्थ्यांना नियमबाह्य लाभ कोणत्या प्राधिकारान्वये देण्यात आला, यावर जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी समितीस विदित केले की, ३३ टक्के महिलांचा सहभाग असणे आवश्यक आहे असे विभागाचे पत्र आहे. आपण लाभार्थ्यांकडून अर्ज मागवितो. संबंधित पशुधन विकास अधिकारी पंचायत समितीकडे अर्ज पाठवितात. परंतु, महिला लाभार्थी मिळाले नाहीत. त्यामुळे त्याच प्रवर्गातील पुरुष लाभार्थ्यांना योजनेचा लाभ दिलेला आहे. यावर समितीने पुढे विचारणा केली की, म्हणजे नियमानुसार लाभ देण्यात आलेला नाही. आपण परित्यक्त्या, विधवा, निराधार महिलांना लाभ द्यावयास पाहिजे होता. अधिकाऱ्यांना जर काही अडचणी आल्या तर त्यांनी त्यातून सकारात्मक मार्ग काढून

लाभार्थ्यांना लाभ दिला पाहिजे. परित्यक्त्या, विधवा, निराधार महिलांना लाभ मिळाला पाहिजे, असे शासनाचे धोरण आहे. आपण या धोरणाची पूर्तता केलेली नाही. नियमाचे पालन केलेले नसल्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई केली पाहिजे. ३३ टक्के महिला उपलब्ध होत नसतील तर त्याच प्रवर्गातील पुरुष लाभार्थ्यांना लाभ द्यावा असा आपण सोईचा अर्थ काढलेला आहे, हे चुकीचे आहे. शासन निर्णयानुसार कार्यवाही झालेली नसल्यामुळे तत्कालीन अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करावी. तत्कालीन अधिकारी कोण होते, यावर तत्कालीन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी समितीस विदित केले की, सन २००८-०९ मध्ये २७१ लाभार्थ्यांना शेळी गटाचा लाभ दिलेला आहे. एकूण ५७२ अर्ज प्राप्त झाले होते. आपण ते सर्व अर्ज बँकेकडे पाठविले होते. महिला लाभार्थ्यांचे जेवढे अर्ज प्राप्त झाले होते ते सर्व अर्ज आपण मंजूर केलेले आहेत. परंतु, त्यावेळी महिलांचे तेवढे अर्ज प्राप्त झाले नव्हते. आपल्याला ३१ मार्च पर्यंत तरतूद खर्च करावयाची होती. आपण सर्व प्रकरणे बँकेमार्फत मंजूर केलेली आहेत. यावर समितीने पुढे विचारणा केली की, ३१ मार्च पर्यंत निधी खर्च करावयाचा होता म्हणून आपण घाईगडबडीत अर्ज मंजूर केले. सदर योजनेसाठी निधी प्राप्त होणार आहे याची आपल्याला कल्पना होती. मग आपण अगोदरच कार्यवाही का सुरु केली नाही जिल्ह्यात विधवा, परित्यक्त्या, निराधार महिला नाहीत काय, यावर तत्कालीन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी समितीस विदित केले की, ज्या महिलांचे अर्ज प्राप्त झाले होते त्या सर्व महिलांना लाभ दिलेला आहे. आपण सर्व पंचायत समित्यांमध्ये फलक लावले होते. एकूण ५७२ अर्ज प्राप्त झाले होते. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, ज्यावेळी प्रक्रिया सुरु झाली त्यावेळी आपल्या लक्षात यावयास पाहिजे होते की, महिलांचे कमी अर्ज प्राप्त झालेले आहेत. महिलांचे अर्ज प्राप्त व्हावेत यासाठी आपण प्रयत्न करावयास पाहिजे होते. यावर तत्कालीन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी समितीस विदित केले की, पंचायत समितीला सांगून अर्ज मागविण्यात आले होते. यावर समितीने पुढे विचारणा केली की, महिलांचे अर्ज प्राप्त झाले नाहीत. परंतु, समितीला हे उत्तर योग्य वाटत नाही. शेळी गट वाटप योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांकडून अर्ज प्राप्त होत नाहीत काय, वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती काय, यावर तत्कालीन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी समितीस नकारार्थी उत्तर दिले. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, एकूण ५७२ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी किती महिलांना योजनेचा लाभ दिलेला आहे, आपल्याला ३३ टक्के प्रमाणे ४८ महिलांना योजनेचा लाभ द्यावयाचा होता. आपण ३९ महिलांना लाभ दिलेला आहे. दारिद्र्य रेषेखालील ८ महिला उमेदवार मिळाल्या नाहीत. म्हणून आपण नियमबाह्यपणे पुरुष लाभार्थ्यांना लाभ देऊन योजनेचे उद्दिष्ट पूर्ण केलेले आहे. हे सर्व उघड होईल म्हणून ऑडिटच्या वेळी कागदपत्रे दाखविण्यात आली नाहीत, हे बरोबर आहे काय, यावर तत्कालीन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी समितीस विदित केले की, ३९ महिलांना योजनेचा लाभ दिलेला आहे. यावर समितीने पुढे विचारणा केली की, एकूण ५७२ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी किती लाभार्थ्यांना लाभ द्यावयाचा होता, आपण ४९८ लाभार्थ्यांची शिफारस केली होती काय, ३३ टक्के प्रमाणे किती महिला लाभार्थ्यांना लाभ द्यावयाचा होता, यावर तत्कालीन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी समितीस विदित केले की, २७१ लाभार्थ्यांना लाभ द्यावयाचा होता. बँकेकडे ५७२ अर्ज पाठविण्यात आले होते. उत्तर देताना चूक झालेली आहे. दुधाळ जनावरे गट वाटपाचे २७१ लाभार्थ्यांचे उद्दिष्ट होते आणि शेळी गट वाटपाचे १२७ लाभार्थ्यांचे उद्दिष्ट होते. ४८ महिलांना लाभ द्यावयाचा होता. यावर समितीने अशी विचारणा केली की, शेळी गट वाटप योजनेच्या संदर्भात ऑडिट ऑब्जेशन आहे. आक्षेपात दुधाळ जनावरे वाटपाच्या संदर्भात उल्लेख नाही. विशेष घटक योजने अंतर्गत शेळी गट वाटप योजनेतील अनियमितता असा आक्षेप आहे. मग दुधाळ जनावरे वाटपाचा विषय कसा काय आला, यावर तत्कालीन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी समितीस विदित केले की, शेळी गट वाटप योजनेचे ५७२ अर्ज बँकेकडे पाठविण्यात आले होते. त्यापैकी १२७ अर्ज मंजूर करण्यात आले होते. यावर जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी समितीस विदित केले की, १२७ पैकी ४८ महिलांना योजनेचा लाभ द्यावयास पाहिजे होता. ११३ पुरुषांना आणि १४ महिलांना योजनेचा लाभ दिलेला आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, महिलांसाठी जी तरतूद केली होती ती महिलांकरिताच खर्च करावयास पाहिजे होती. अनुदान खर्च करावयाचे आहे म्हणून महिलांचे हक्क डावलून पुरुषांना लाभ द्यावयाचा काय, हे नियमानुसार झालेले नाही. महिलांसाठी राखीव असलेल्या मतदारसंघात महिलांचा उमेदवारी अर्ज प्राप्त झाला नाही तर फेर निवडणूक घेतली जाते. त्या मतदारसंघात पुरुष उमेदवारांचा अर्ज स्वीकारला जात नाही. बेकायदेशीरपणे काम केलेले असल्यामुळे लेखापरीक्षणाच्या वेळी कागदपत्रे दाखविली जात नाहीत. काल समितीने पंचायत समित्यांना भेट दिली. पंचायत समिती स्तरावर अपंगांच्या कल्याणासाठी ३ टक्के तरतूद केली नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. जिल्हा परिषदेने देखील महिला उमेदवार उपलब्ध असताना त्यांना लाभ दिलेला नसल्याचे दिसून येते. पंचायत समितीने महिलांच्या कल्याणकारी योजनांवर निधी खर्च करावयास पाहिजे. परंतु, काल समितीच्या असे निदर्शनास आले की, महिलांच्या कल्याणकारी योजनांवर निधी खर्च न करता तो निधी इतर योजनांवर खर्च केला जातो. शासनाकडून महिलांच्या कल्याणासाठी निधी दिला जातो. तो निधी विशिष्ट घटकासाठी खर्च होत नसेल, आपल्या अधिकारात तो निधी दुसरीकडे खर्च केला जात असेल तर ते बरोबर नाही. शासन निर्णयाचे पालन न करता मनमानी कारभार सुरु आहे असे समितीला वाटते. शासन निर्णयाचे पालन केलेले नसल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी या विषयाची चौकशी करुन, संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन समितीला अहवाल सादर करावा. महिलांच्या कल्याणासाठी किंवा विशिष्ट घटकासाठी आलेला निधी त्या घटकावरच खर्च करावयास पाहिजे. भविष्यात असे होऊ नये म्हणून आपण हा विषय सचिवांच्या साक्षीसाठी घेऊ. समितीला याबाबत शिफारस करता येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) सदर योजनेत महिलांना लाभ देण्याबाबत शासनाच्या मार्गदर्शक सूचना असतानाही महिलांच्या कल्याणकारी योजनेवर निधी खर्च न करतता तो निधी इतर योजनांवर खर्च करणे, शासन निर्णयाचे पालन न करता गैरकारभार सुरु असल्याचे समितीच्या

निदर्शनास आले. याप्रकरणी विभागाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे व संबंधितांवर कोणत्या प्रकारची जबाबदारी निश्चित करण्यात आली. भविष्यात अशा प्रकारे निधीचा अपव्यय होणार नाही याबाबत विभागामार्फत कोणती दक्षता घेतली आहे वा घेण्यात येत आहे ?

(२) वैयक्तिक लाभाच्या योजनेची व्यापक प्रसिध्दी करुनही एकूण लाभार्थ्यांच्या ३३ % म्हणजेच ४८ राखीव महिला लाभार्थी आवश्यक असताना केवळ ३९ महिलांनी अर्ज दाखल केलेले दिसुन येते. त्यातील ३९ पैकी ब-याच महिलांकडे जातीचे प्रमाणपत्र इ. कागदोपत्रीपुरावा नसल्यामुळे महिला लाभार्थीना लाभ मिळालेला नाही. तथापि, महाराष्ट्र शासन समाजकल्याण व बालविकास यांचे अ.शा.पत्र दिनांकित २८-२-२००३ नुसार तसेच शासनाने जे ३३ % महिला आरक्षणाचे धोरण अमलात आणलेले आहे त्याचा उद्देश सफल होण्याकरिता अधिकाधिक महिला शासनाच्या वैयक्तिक लाभाच्या योजनेत सभागी व्हाव्यात यासाठी शासन कोणकोणत्या उपाययोजना हाती घेत आहे ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) होय, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे. विशेष घटक योजनेअंतर्गत सन २००८-०९ चा प्राप्त निधी हा शेळी गट वाटप करणे याच योजनेवर खर्च करण्यात आलेला असून इतर योजनेवर खर्च करण्यात आलेला नाही.

सन २००८-०९ मध्ये सदरहू योजनेअंतर्गत तालुका स्तरावरुन अर्ज मागविण्यात आले होते. त्यानुषगांने ४२८ पुरुष व ७० स्त्रियांचे असे एकूण ४९८ अर्ज प्राप्त झालेले होते. प्राप्त सर्व अर्ज बँकेचे वित्तीय सहाय्य मिळणेकरिता बँकेकडे पाठविण्यात आले होते. सदर योजनेकरिता एकुण उद्दिष्ट १७९ होते पैकी ३३ टक्के महिलांसाठी म्हणजे ५९ महिलांना लाभ देणे अपेक्षित होते. परंतु बँकेने मंजुर केलेल्या एकूण १९ महिलांना सदरहू योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे व उर्वरित १६० पुरुष लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे.

पुढील आर्थिक वर्षामध्ये सन २००९-१० पासुन सन २०१६-१७ पर्यंत ३३ टक्केपेक्षा जास्त महिला लाभार्थ्यांना लाभ देण्यात येवून शासनाच्या मार्गदर्शक सुचनांचे पालन करण्यात आले आहे.

(२) ३३ टक्के महिला आरक्षणाचे धोरण सफल होण्याकरीता वर्तमानपत्रात योजनेची व्यापक प्रसिध्दी देण्यात येते तसेच पंचायत समिती व ग्रामपंचायत यांचेमार्फतही प्रसिध्दी देण्यात येवून धोरण यशस्वी होण्याची दक्षता घेण्यात येते.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात ग्रामविकास विभागाकडून खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**कृषी व पदुम (पशुसंवर्धन विभागाचे अभिप्राय)**

होय, विभागाने चौकशी केलेली असून सन २००७-०८ मध्ये विशेष घटक योजनेअंतर्गत शेळी गट वाटप योजनेकरिता प्राप्त झालेला निधी पशुसंवर्धन विभागाकडून अन्य कोणत्याही योजनेवर खर्च करण्यात आलेला नाही.

योजना राबविण्याचे अनुषंगाने आयुक्त पशुसंवर्धन कार्यालयाच्या स्वतरावरुन दि. ०६.०६.२००८ रोजी मार्गदर्शक योजना निर्गमित करण्यात आलेल्या असून त्याअन्वये योजनेमध्ये ३३ टक्के महिला लाभार्थी असणे आवश्यक आहे. महिला लाभार्थीना प्राधान्याने लाभ देण्याबाबत व व्यापक प्रसिध्दी देण्याच्या सुचना आयुक्त पशुसंवर्धन कार्यालयाच्या स्तरावरुन देण्यात आलेल्या आहेत.

**महिला व बालविकास विभागाचे अभिप्राय :-**

जिल्हा परिषद बुलडाणा यांचे अभिप्रायाशी सहमत आहे.

**चौकशी अहवाल**

सदरहू योजना ही बँकेचे अर्थसहाय्य ५० टक्के व ५० टक्के शासकीय अनुदान देवून राबविण्यात आलेली आहे. मा. आयुक्त पशुसंवर्धन म.रा.पुणे -१ यांचे मार्गदर्शक सुचना पत्र क्रमांक एसडिएस १८/१४२८/५४९/१२४४/२००८/प्र.स-१३ दिनांक २९.५.२००८ नुसार सदरहु योजना वैयक्तिक व कौटुंबिक लाभाची योजना होती.

याबाबत डॉ एस.एम.चव्हाण, तत्कालीन जिल्हा पशुसवंर्धन अधिकारी, जि.प.बुलडाणा तथा सद्या कार्यरत जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त जिल्हा चंद्रपूर यांना या कार्यालयाचे पत्र क्रमांक/बुजिप/पसवि/कप्रअ/२११०/२०१६ दि. ४.६.२०१६ नुसार दिनांक १२.७.२०१६ रोजी चौकशी करीता या कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. तसेच दूरध्वनीव्दारे सुध्दा याबाबत डॉ.चव्हाण यांचेशी संपर्क साधण्यात आलेला आहे. तेव्हा संबधीताने याप्रकरणाबाबत त्यांचे पत्र क्रमांक जिनागो/जिपसअ/कार्यासन-२/वशी/३५५/१६ दि. ४.४.२०१६ व्दारे क्षमापन या कार्यालयास कळविले आहे. पात्र क्षमापनानुसार विशेष घटक योजने अंतर्गत शेळी गट वाटप योजनेची व्यापक प्रसिध्दी १३ पंचायत समिती अंतर्गत सर्व ग्रामपंचायत स्तरावरुन देण्यात आली होती. तसेच आवश्यक असणा-या कागदपत्रांची माहिती देण्यात आली होती. त्यानुसार मोठया प्रमाणावर अर्ज प्राप्त झाले होते. प्राप्त अर्जाची तपासणी करुन पात्र लाभार्थ्यांना जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, बुलडाणा यांचे अध्यक्षतेखाली समितीने मंजुरी देवून सर्व पात्र अर्ज संबंधित बँकेत कर्ज प्रकरण मंजुरी करीता सादर करण्यात आले. बॅकेने ५० टक्के लाभार्थी हिस्सा कर्ज रुपाने मंजुर करुन अनुदान मागणीचे प्रस्ताव या कार्यालयास सादर केले

होते. समितीमार्फत महिलांचे सर्व प्राप्त अर्जांना मंजुरी प्रदान करण्यात आली होती. कर्ज मंजूर प्रक्रियेमध्ये बँकेच्या असे लक्षात आले की ब-याच महिला लाभार्थ्यांकडे जातीचे प्रमाणपत्र उपलब्ध होत नाही. तसेच कर्ज प्रकरण मंजुरीसाठी महिला लाभार्थ्यांने इतर कागदपत्रांची पुर्तता वेळीच केली नाही त्यामुळे बँकेचे मंजुरी प्रक्रियेनुसार आलेल्या अर्जामधील महिलांशी बँकेने कर्ज मंजुरी बाबत मुलाखती घेतल्या असता अल्प प्रमाणात महिला लाभार्थी पात्र ठरल्या.

योजेनची व्यापक प्रसिध्दी देवूनही व पशुसंवर्धन विभागामार्फत पूर्ण प्रयत्न करुनही ३३ टक्के महिला लाभार्थ्यांना लाभ देता आला नाही.

त्याचप्रमाणे चौकशी अंती तसेच कार्यालयात सद्यःस्थितीत उपलब्ध असलेल्या दस्तऐवजावरुन असे निदर्शनास येते की, संदर्भाकित योजना ही पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पंचायत समिती यांचे स्तरावर राबविण्यात आली व जिल्हाभरातून उपलब्ध झालेल्या एकूण ५७२ एवढया अर्जापैकी पुरुष संवर्गातील २३२ व स्त्री संवर्गातील ३९ लाभार्थ्यांची निवड करण्यात आली होती. विशेष घटक योजने अंतर्गत शेळी गट वाटप ही योजना बँकेचे अर्थसहाय्य ५० टक्के व ५० टक्के शासकीय अनुदान देवून तालुकास्तरीय खरेदी समिती मार्फत राबविण्यात आलेली आहे. मा. आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे मार्गदर्शक सूचना पत्र क्र.एसडीएस १८/१४२८/५४९/१२४४/२००८/पं.स.-१३, दिनांक २९ मे, २००८ नुसार सदरहू योजना वैयक्तिक व कौटुंबिक लाभाची असल्यामुळे ज्या कुटूंबामध्ये सदर योजनेचा लाभ देण्यात आला, त्या कुटुंबियांतील महिलांना सदर योजनेचा अप्रत्यक्ष लाभ होतो, तसेच दारिद्रय रेषेखालील पात्र महिला लाभार्थी यांचे अर्ज प्राप्त न झाल्यामुळे उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करुन महिला लाभार्थी यांना लाभ दिलेला आहे.

**चौकशी अहवालाचा अभिप्राय :-**

सदर योजने अंतर्गत महिलांना जाणीवपूर्वक लाभापासून वंचित ठेवल्याचे दिसून येत नाही, त्यामुळे सदर प्रकरणी कोणतीही अनियमितता झालेली नसून कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही असे मत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने बुलडाणा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक १४ नोव्हेंबर, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की सदर योजनेत महिलांना लाभ देणेबाबत शासनाच्या मार्गदर्शक सूचना असतानाही महिलांच्या कल्याणकारी योजनेवर खर्च न करता निधी इतर योजनांवर खर्च करणे, शासनाच्या नियमाचे पालन न करता गैरकारभार सुरु असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. या प्रकरणी विभागाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय निष्पन्न झाले, संबंधितांवर कोणती कारवाई केली. भविष्यात अशा प्रकारे निधीचा अपव्यय होणार नाही, याबाबत विभागामार्फत कोणती दक्षता घेण्यात आली आहे, यावर सचिव, पदुम विभाग यांनी समितीस विदित केले की, पशुसंवर्धन विभागाची वस्तुस्थिती अशी आहे की, प्रकरणांची एकूण संख्या १७९ होती. ३३ टक्के महिला म्हणजे ५९ महिलांना लाभ द्यावयाचा होता परंतु बँकेकडून अंतिमतः १९ महिलांची प्रकरणे मंजूर झाली आहेत. शेळी वाटप योजनेमध्ये उर्वरित निधी पुरुष गटांना देण्यात आला आहे. हा फरक झालेला आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, महिलांची प्रकरणे कमी मंजूर करण्यामागे काय कारण आहे. शासन निर्णयामध्ये महिलांना १० टक्के लाभ देणे बंधनकारक आहे. पण या प्रकरणी शासन निर्णयाचे उल्लंघन झाले नाही का, संबंधितावर कोणती कारवाई केली आहे, यावर सचिव, पशुसंवर्धन विभाग यांनी समितीस विदित केले की, महिलांच्या ऐवजी पुरुषांना लाभ दिलेला आहे. त्यामुळे हेतू साध्य झाला नाही. अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई केलेली नाही. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की १० टक्के गटांना शेळी मेंढी गट वाटप करायचे होते. यावर सचिव, पशुसंवर्धन विभाग यांनी समितीस विदित केले की, त्या योजनेत अर्ज कमी आले होते. दुस-या योजनेत हे करावे लागले असते. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, शासनाच्या कल्याणकारी योजना खालपर्यंत पोहचवणे, जनतेमध्ये जनजागृती करणे, गावामध्ये माहिती देणे आवश्यक असते. अर्ज कमी आले असतील किंवा बँकेने कमी प्रकरणे मंजूर केली असतील तर कोठे तरी कमतरता आहे. महिलांना पुरुषांच्या बरोबरीने शासन स्थान देत आहे. महिलांना का वंचित ठेवले जात आहे. यावर सचिव, पदुम विभाग यांनी समितीस विदित केले की, जिल्हा परिषद, बुलडाणा यांनी या वर्षी जरी कमी प्रकरणे मंजूर झाली तरी पुढील वर्षी त्यांनी महिलांची जास्त प्रकरणे मंजूर करुन तो बॅकलॉग भरुन काढण्याचा प्रयत्न केला आहे. आपणास अपेक्षा होती की, पहिल्या वर्षी कमी प्रकरणे मंजूर झाली आहे. पहिल्या वर्षी जनजागृती नव्हती. घ्येयाप्रमाणे अपेक्षा होती की, ४७-४८ महिला अर्ज करतील परंतु फक्त ३९ महिलांनी अर्ज केला त्यातील फक्त १९ महिला कागदोपत्री पात्र झाल्या आहेत. २००८-२००९ मध्ये ११ टक्के काम झाले. २००९-२०१० मध्ये ४८.९४ टक्के काम झाले. २०१०-२०११ मध्ये ४२ टक्के काम झाले, २०११-२०१२ मध्ये ४४ टक्के काम झाले. यावर समितीने पुढे विचारणा केली की, जर पुढे टारगेट पुर्ण केले असेल तर याबाबतची माहिती पुस्तिकेत देणे आवश्यक होते. शासनाच्या निर्णयाचे उल्लंघन झाले आहे. आक्षेप आला म्हणून अधिका-यांनी पूर्तता केलेली आहे. आक्षेप निघाला नसता तर हे असेच चालू राहिले असते. शासन निर्णयाची अंमलबजावणी केली जात नाही. त्या अधिका-यांवर कारवाई अपेक्षित होती ती झालेली नाही. पहिल्या वर्षी ३३ टक्के ऐवजी ११ टक्के काम झाले. हे मान्य आहे समितीची बैठक सन २०१६ मध्ये झाली परंतु यामध्ये सुमारे ५० टक्क्यांपर्यत काम झालेले आहे. पहिल्या वर्षी ३३ टक्के टारगेट दिले असले पाहिजे. त्यावेळी महिला मिळत नव्हत्या असे नाही परंतु जनजागृती नव्हती हा मुद्दा

आहे. पुढील वर्षी लाभार्थ्यांचे अर्ज पंचायत समितीमार्फत मागविण्यात येत होते. सीडीपीओ मार्फत अर्ज मागविताना तेथेच अर्जाची छाननी होते अर्जाचे सर्व कागदपत्रे बरोबर असतील तरच तो जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाकडे येतो. यावर सचिव, पदुम विभाग यांनी समितीस विदित केले की, ही योजना एचडीएचओची होती. या योजनेमध्ये महिलांचा ३३ टक्के सहभाग पाहिजे असा नियम होता. यावर समितीने पुढे विचारणा केली की, यामध्ये जातीच्या दाखल्याचा उल्लेख नव्हता का, या सर्व महिला खुल्या प्रवर्गातील होत्या. लाभार्थी मिळाले नाहीत हे बरोबर नसुन केवळ ती महिला आहे हे तपासणी करणे आवश्यक होते. हा विषय महिला व बालकल्याण विभागाशी संबंधित असून समाजकल्याण विभागाच्या संदर्भात लाभार्थ्यांकडून जात प्रमाणपत्राची मागणी केली जाते परंतु महिला व समाजकल्याण विभागात एससीप योजना आहे किंवा ओटीसीपी असल्यास जात प्रमाणपत्राची मागणी केली जाते. परंतु खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी त्याची आवश्यकता नसते. या संदर्भात अर्जाची छाननी करुन पाठविणे ही सीडीपीओंची जबाबदारी आहे. यावर सचिव, सामाजिक न्याय विभाग यांनी समितीस विदित केले की, हा एससीपीसंबंधीचा विषय होता. पहिल्या वर्षी आपल्याला व्यवस्थितपणे अर्ज मिळालेले नाहीत सर्व अर्ज बँकाकडे पाठविलेले होते. त्यात बँकांचा सुध्दा २० टक्क्यांचा सहभाग होता. परंतु छाननी मधून तेवढे अर्ज कमी मिळाले. योग्य प्रमाणात अर्ज मिळाले नाहीत ही वस्तुस्थिती आहे. यावर समितीने पुढे विचारणा केली की, विभागाने एससीपी असल्यासंबंधी समितीला सांगितले. एससीपीचे असल्यामुळे लाभार्थी मागासवर्गीय महिला होत्या. त्याकरिता शासन निर्णय बंधनकारक असताना देखील विभागाकडून शासन निर्णयाचे उल्लंघन झाले, परिणामी मागासवर्गीय महिलांना योजनेपासून वंचित ठेवण्याचे विभागाकडून काम झालेले आहे, यासंदर्भात संबधित अधिका-यांनी व्यवस्थितपणे कामे न केल्यामुळे त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली, यावर सचिव महिला व बालविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, सदर योजनेत कमीत कमी ३३ टक्के महिला लाभार्थी असणे अत्यावश्यक आहे. परंतु एखादया कारणामुळे तेवढया प्रमाणात महिला लाभार्थी न मिळाल्यास त्याकरिता दोन पर्याय असतात त्यातील पहिला पर्याय असा आहे की, त्यावर्षीचा असलेला एससीपीचा निधी वाया जाऊ नये यासाठी तेवढे उद्दिष्ट पुरुष लाभार्थ्यांमधून पूर्ण करावे किंवा दुसरा पर्याय ठराविक लाभार्थ्यांना लाभ देत असताना त्यातून ३३ टक्के महिला लाभार्थी पूर्ण होऊ शकतील. एससीपीमध्ये योजना आल्यानंतर लाभार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात आले होते. सर्व लाभार्थ्यांची निवड ही निकषाचे पालन करुन करण्यात आली होती. तसेच लाभार्थ्यांमध्ये ३३ टक्के महिला लाभार्थी असणे अत्यावश्यक असल्यासंबंधी शासनाच्या मार्गदर्शक सूचना सुध्दा आहेत. यासंदर्भात महिला लाभार्थ्यांकडून आलेल्या अर्जाची छाननी केल्यानंतर जे अर्ज पात्र ठरविण्यात आले होते. यावर समितीने पुढे विचारणा केली की, कोणत्या त्रुटी झालेल्या आहेत त्याबाबत समितीला माहिती देण्यात यावी. लाभार्थी पात्र ठरल्यानंतरच बँकेकडे प्रस्ताव द्यावयाचा असल्याने त्यात २० टक्के बँक फायनल करु शकते परंतु महिला लाभार्थ्यांकडून जात प्रमाणपत्र न मिळाल्यामुळे ३३ टक्के महिला लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ देता आला नाही. यावर सचिव, सामाजिक न्याय विभाग यांनी समितीस विदित केले की, त्यासंबंधी इत्यादी आणखी सुध्दा कारणे असु शकतील. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमध्ये मागासवर्गाकरिता असलेल्या योजनांकरिता कोणतीही तरतूद नाही. पंचायत समित्यांमध्ये मागासवर्गाच्या संदर्भात २० टक्के तसेच महिला व बालविकास विभागाच्या संदर्भात १० टक्के तरतूद केल्याशिवाय बजेटला मान्यता देता येत नाही. अशा परिस्थितीत जिल्हा परिषदेत व पंचायत समित्यांमध्ये मोठी अनियमितता झाली आहे. अशाप्रकारे महिला व बालविकास विभागासाठी १० टक्के आणि मागासवर्गाकरिता असलेल्या योजनांकरिता २० टक्के तरतूद करणे बंधनकारक आहे. हा निधी सेसचा नसला तरी ही बाब बंधनकारक आहे. यावर सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी समितीस माहिती दिली की, ३३ टक्के आरक्षणाच्या योजनेतील ही बाब आहे. हा निधी सेसचा नाही. सेसमध्ये परसेंटेज आहे. त्याशिवाय बजेट मंजूर होऊ शकत नाही. ही एससीपीची योजना आहे. या योजनेत असे नमूद होते की, जे लाभार्थी असतील त्यात ३३ टक्के महिला लाभार्थी असल्या पाहिजेत. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, हा गंभीर गुन्हा आहे. एससीपीचा निधी डीपीसीमार्फत जिल्हा परिषदेकडे येत असोत या संदर्भात समाजकल्याण विभागाकडून योजना तयार केली जाते व सदर योजनेसाठी कोणते लाभार्थी पात्रहोऊ शकतात याबाबत शासन स्तरावर मापदंड तयार होतो. परंत सदर योजनेवरील निधी दुस-या योजनेकडे वळविला. सदर अधिकार कोणत्याही खाते प्रमुखाला नाही. लेखी स्पष्टीकरणात असे नमूद आहे की, महिलांच्या कल्याणकारी योजनांवर निधी खर्च न करता तो इतर योजनांवर खर्च करणे. हा विशेष घटक संदर्भातील विषय असल्यामुळे एका योजनेचा निधी दुस-या योजनेकडे वळवू शकत नाही. ही बाब कार्यवृतात लेखी स्वरुपात आहे त्यात असे नमूद केले आहे की, सदर योजनेत महिलांना लाभ देण्याबाबत शासनाच्या मार्गदर्शक सूचना असतांनाही महिलांच्या कल्याणकारी योजनांकरिता तो निधी खर्च न करता तो इतर योजनांवर खर्च केला आहे. यावर सचिव, महिला व बाल विकास विभाग यांनी समितीला विदित केले की, सदर योजनेचा निधी दुस-या योजनेकडे वळविण्यात आलेला नाही तसेच सदर निधी डीपीडीसीच्या मान्यतेशिवाय दुस-या योजनेकडे वळविता सुध्दा येत नाही. परंतु यात एससीपीची एक योजना आहे. त्या योजनेकरिता लाभार्थ्यांचे निकष दिलेले आहेत सदर निकष पूर्ण करणा-या लाभार्थ्यांकडे कमीत कमी ३३ टक्के महिला लाभार्थी असल्या पाहिजेत असे सदर योजनेचे स्वरुप आहे.

**अभिप्राय व शिफारशी**

सन २००८-०९ या वित्तीय वर्षाकरिता रु. २५ लाख तरतूद वाटप आणि लोक हिस्सा (बँक कर्ज) रुपये २५ लाख या योजनेतून अनुसूचित जाती/नवबौध्द लाभार्थ्यांना शेळयांचे गट वाटप शासनाच्या समाजकल्याण व महिला बालविकास यांचे दिनांक २८.२.२००३ च्या पत्रान्वये ३३ टक्के महिला लाभार्थ्यांची निवड करण्यात न येणे, सदरहू योजनेत ५७९ अर्जापैकी पुरुष संवर्ग २३२ व स्त्री संवर्ग ३९ यांची निवड करण्यात आल्यामुळे गरीब महिला लाभार्थी शासनाच्या योजनेपासून वंचित राहून त्यांना उदरनिर्वाहाच्या साधनांपासून उपेक्षित ठेवल्याचे दिसते.

आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्यांच्या दिनांक ६.६.२००८ च्या मार्गदर्शक सूचनेनुसार दिनांक १ मे, २००१ नंतर संतती झाली असेल किंवा होईल तर दारिद्रय रेषेखालील लाभ मिळविण्यास असे लाभार्थी पात्र राहणार नाहीत. तसेच ज्या ठिकाणी दारिद्रय रेषेखालील लाभार्थी उपलब्ध होत नसतील त्याठिकाणी छोटे कुटूंब ही अट संबंधित योजनांना लागू करण्यात येऊ नये अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत.

उपायुक्त, पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे यांच्या दिनांक २८.४.२००८ च्या पत्रानुसार अनुसुचित जाती/नवबौध्द लाभार्थ्यांच्या जातीच्या प्रमाणपत्राची पडताळणी करुन शेळयांचे गट वाटप करणे संयुक्तीक राहील, तसेच इतर जातीच्या लाभार्थ्यांना सदरहू योजनेचा लाभ देण्यात येऊ नये. अशा सूचना होत्या. लेखा परिक्षणासाठी ३२ लाभार्थ्यांचे अर्ज दिनांक १२.७.२०१० अन्वये सादर करण्याबाबत पत्र दिले असता बँकेकडे पाठविण्यात आल्याचे कारण सांगण्यात आले आहे. या योजनेंतर्गत अनु क्रमांक ३९४ व ३९५ ही दोन्ही कुटुंबे विभक्त असल्याबाबतची कागदपत्रे दिसून आले नाहीत.

शासनाच्या मार्गदर्शक सूचना असतांनाही महिलांच्या कल्याणकारी योजनेवर खर्च न करता निधी इतर योजनांवर खर्च करणे, शासनाच्या नियमांचे पालन न करता गैरकारभार सुरु असल्याचे समितीच्या निदर्शनास आले असता त्यावर पशुसवंर्धन अधिकारी यांनी समितीस माहिती दिली की, एकूण १७९ प्रकरणांपैकी ३३ टक्के लाभार्थ्यांतून ५९ महिलांना लाभ द्यावयाचा असतांना बँकेकडून केवळ १९ महिलांचीच प्रकरणे आवश्यक त्या कागदपत्रांच्या उपलब्धतेनुसार मंजूर करण्यात आली. तसेच शेळी गट वाटप योजनेतील उर्वरित निधी पुरुष गटांना वितरित करण्यात आल्याने संबंधित अधिकारी शेवटच्या घटकांपर्यंत म्हणजे लाभार्थ्यांपर्यंत पोहचलेले नाहीत असे सकृतदर्शनी आढळून येते. शासनाच्या नियमाप्रमाणे महिलांना पंचायत समितीच्या उपकरातून (सेस) १० टक्के लाभ देणे बंधनकारक असतांना त्याचा मूळ हेतू साध्य झालेला नसून महिलांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळण्यापासून वंचित ठेवल्याचे निदर्शनास आले, लाभार्थ्यांची निवड करतांना जगजागृतीचा अभाव दिसून आला, लाभार्थ्यांची निवड, निकषाचे पालन, महिला लाभार्थ्यांकडून जात प्रमाणपत्र न मिळाल्यामुळे ३३ टक्के महिला लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देता आलेला नाही.

**विशेष घटक योजनेअंतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द समाजातील लाभार्थ्यांना शेळयांचे गट वाटप या कार्यक्रमाखाली शासनाकडून पर्याप्त निधी प्राप्त झालेला असताना तसेच सदर निधी जिल्हा नियोजन समितीच्या मान्यतेशिवाय इतर योजनांकरीता वर्ग करता येत नसतानाही त्यातील काही रक्कम इतर योजनांसाठी वापरणे तसेच उक्त योजनेत ३३ टक्के महिलांचा समावेश असणे बंधनकारक असताना एकूण १७९ प्रकरणांपैकी ३३% लाभार्थ्यांतून ५९ महिलांना सदर योजनेचा लाभ द्यावयाचा असताना आवश्यक त्या कागदपत्रांअभावी केवळ १९ महिलांचीच प्रकरणे बँकेकडून मंजूर करण्यात येणे या बाबी जिल्हा परिषदेच्या संबंधित अधिकाऱ्यांचा अक्षम्य निष्काळजीपणा दर्शविणारा असून त्यामुळे शेवटच्या लाभार्थ्यांपर्यंत पोहचण्यास त्यांना अपयश आल्याने या योजनेची फलश्रुती होऊ शकली नाही. अत: याप्रकरणी जबाबदार असलेल्या सर्व संबंधितांवर शासनाने उचित कार्यवाही करुन त्याबाबतची माहिती समितीस तीन महिन्यांच्या कालावधीत कळविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

## प्रकरण तीन

## जिल्हा परिषद, बुलडाणा

### अंगणवाडीतील मुलांमुलींकरीता मनी पाटी खरेदीबाबत

### ९० टक्के अनुदानावर लेडीज सायकल पुरविणे योजनेतील अनियमितता

### ९० टक्के अनुदानावर शिलाई मशिन पुरविणे योजनेतील अनियमितता

### अंगणवाडी मुलामुलींकरीता मानोरा ससा गोल खरेदी बाबत

**(परिच्छेद ३.९१८/ ३.९१९/ ३.९२०/३.९२१) (सन २००८-२००९)**

**परिच्छेद ३.९१८ : अंगणवाडीतील मुलांमुलींकरीता मनी पाटी खरेदीबाबत**

संचालक, स्थानिक निधी लेखा यांचे जिल्हा परिषद, बुलडाणा, सन २००८-०९ (परिच्छेद क्र.२) अनुसुचित जाती उपाययोजना (शासकीय क्षेत्र) याबाबत खालील प्रमाणे आक्षेप आहेत :-

(१) पंचायत समिती खामगांव व जळगांव जामोद येथील साठा नोंदवहीची पडताळणी केली असता येथे साहित्य पुरवठा झाला नसतांनाही कंत्राटदारास रुपये २,११,२८०/- इतक्या रक्कमेचे जादा प्रदान केले आहे.

(२) उशिराने साहित्य पुरविल्या बद्दल कंत्राटदाराचे देयकातुन दंड वसूल केला नाही. दंडाची रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.

(३) सर्वच पंचायत समितींना साहित्य प्राप्त झाल्याचा दिनांक नमुद नसल्याने पुरवठा धारकाने विहित मुदतीत पुरवठा केल्याची खात्री होत नाही.

(४) नमुना तपासणीसाठी पत्र क्र. २३६ दिनांक ३१.३.२००९ रोजी आयटीआय अहमदनगर यांना या पत्राव्दारे देण्यात आला असतांना याच दिवशी नमुना तपासणी करुन अहमदनगर येथुन बुलडाणा येथे अहवाल सादर केला आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, बुलडाणा यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) पंचायत समिती खामगांव व जळगांव जामोद येथे अंगणवाडीतील मुलामुलींकरिता मनीपाटी साहित्य प्राप्त झाल्याबाबतच्या साठापंजी मध्ये नोंद आहे. पंचायत स्तरावर माल पोहोच केल्याचे पोच पावत्या उपलब्ध आहे.

(२) पुरवठादाराने साहित्य उशिराने पुरवठा केल्यामुळे संबंधित पुरवठाधारकांकडुन दंडाची वसुली करण्याकरिता, व्यवस्थापक, महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, मुंबई यांना या कार्यालयाचे पत्र क्र. बुजिप/मबाक/लेखा/१३१०/२०१५ दि. १६.११.२०१५ तसेच पत्र क्र. बुजिप/मबाक/लेखा/ १२९०/२०१५ अन्वये दंडाची रक्कम भरणा करणेबाबत सुचित करण्यात आले आहे.

(३) प्रकल्प स्तरावर साहित्य प्राप्त झाल्याचे डिलीव्हरी चलन नस्तीस उपलब्ध असून साठा नोंदवहीवर साहित्य प्राप्त झाल्याचा दिनांक नमुद केला आहे.

(४) नमुना तपासणीसाठी पत्र क्र. २३६/दि.३१/०३/२००९ अन्वये तपासाणी अहवाल मागविण्यात आला नसुन आय.टी.आय. अहमदनगर यांना या कार्यालयाचे पत्र क्र.बुजिप/मबाक/३१३/२००९ दि. २६.३.२००९ अन्वये मनीपाटी नमुना पुरवठा आदेशाप्रमाणे आहे किंवा नाही यांचा तपासणी अहवाल मागविला होता. प्राचार्य, आयटीआय, अहमदनगर यांनी मनीपाटी तपासणी अहवाल क्र.औप्रसअ/पिओटीएस/०९/१११५ दि. २६.३.२००९ अन्वये सादर केलेला आहे. प्राचार्य, आय.टी.आय, अहमदनगर यांनी दि. २६.३.२००९ चा संदर्भ देऊन तपासणी अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे.

**३.९१९ : ९० टक्के अनुदानावर लेडीज सायकल पुरविणे योजनेतील अनियमितता :-**

**जिल्हा परिषद, बुलडाणा, सन २००८-०९ (परिच्छेद क्र.६) याबाबत खालील आक्षेप आहेत.**

(१) पुरवठा धारकाने साहित्य पुरवठा न केल्याने १११ लाभार्थी लाभापासुन वंचित राहिले.

(२) पुरवठा धारकाने सायकल/पुरवठा न केल्याने त्याचे नांव शासनास कळवुन काळया यादीत टाकण्याची शिफारस करण्यात आली नाही.

(३) स्थानिक निविदा प्रसिध्दी दिली असती तर लाभार्थी लाभापासुन वंचित राहिले नसते.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, बुलडाणा यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) मिना एन्टरप्राईजेस, नाशिक यांना पुरवठा आदेश क्र.२२२/०९, दि.२.३.०९ अन्वये देण्यात आला होता. पुरवठा धारकास पुरवठा अनुदेश देऊन सुध्दा मालाचा पुरवठा केला नाही. सदर वर्षातील अनुशेष हा पुढील वर्षी खर्ची करण्यात येऊन लाभार्थींना लाभ दिला आहे.

(२) मे. मिना एन्टरप्राईजेस, नाशिक यांना पुरवठा आदेश देवुन सुध्दा मालाचा पुरवठा केला नसल्यामुळे त्यांचे नांव काळया यादीत टाकण्याबाबत शासनास या कार्यालयाचे पत्र क्र.बुजिप/मबाक/लेखा/१४७३/१० दि. ३१.१२.२०१० अन्वये कळविण्यात आले आहे.

(३) शासनाचे दरकरार उपलब्ध असल्यामुळे स्थानिक निविदा प्रसिध्दी देऊन खरेदी करण्यात आलेली नाही.

**परिच्छेद क्रमांक ३.९२० : ९० टक्के अनुदानावर शिलाई मशिन पुरविणेचे योजनेतील अनियमितता :-**

**जिल्हा परिषद, बुलढाणा, सन २००८-०९ (परिच्छेद क्र.६) याबाबत खालील आक्षेप आहेत :-**

(१) पुरवठा धारकाने साहित्य पुरवठा न केल्याने १११ लाभार्थी लाभापासुन वंचित राहिले.

(२) पुरवठा धारकाने सायकल/पुरवठा न केल्याने त्याचे नांव शासनास कळवुन काळया यादीत टाकण्याची शिफारस करण्यात आली नाही.

(३) स्थानिक निविदा प्रसिध्दी दिली असती तर लाभार्थी लाभापासुन वंचित राहिले नसते.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, बुलडाणा यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) मे.ए.झेड एन्टरप्राईजेस नांदेड यांना पुरवठा आदेश क्र.२२२/०९ दि.२.३.०९ अन्वये साहित्य पुरवठा करणेबाबत पुरवठा आदेश देण्यात आलेला होता. पुरवठा धारकास पुरवठा अनुदेश देऊन सुध्दा मालाचा पुरवठा केला नाही. सदर वर्षातील अनुशेष हा पुढील वर्षी खर्ची करण्यात येऊन लाभार्थींना लाभ दिला आहे.

(२) मे.ए. एन्टरप्राईजेस नांदेड यांना पुरवठा आदेश देवुन सुध्दा मालाचा पुरवठा केला नसल्यामुळे त्यांचे नांव काळया यादीत टाकण्याबाबत शासनास या कार्यालयाचे पत्र क्र.बुजिप/ मबाक/लेखा/१४७४/१० दि. ३१.१२.२०१० अन्वये कळविण्यात आले आहे.

(३) संचालक, उद्योग विकास आयुक्त, मुंबई यांचे दरकरार परिपत्रक क्र. एसपीसी/ रेट/ सिविंगमशीन/०३/२००८-०९/ सि-४७३३ दि. ३.११.२००८ अन्वये शासनाचे दरकरार उपलब्ध असल्यामुळे स्थानिक निविदा प्रसिध्दी देऊन खरेदी करण्यात आलेली नाही.

**परिच्छेद क्रमांक : ३.९२१ : अंगणवाडीतील मुला मुलीं करिता मानोरा ससा गोल खरेदी बाबत**

**जिल्हा परिषद, सन २००८-०९ (परिच्छेद क्र.८) याबाबत खालील आक्षेप आहेत :-**

(१) विशेष घटक योजने अंतर्गत या योजनेसाठी रुपये २५ लक्ष अनुदान प्राप्त झाले असतांना व दर कराराप्रमाणे मानोरा ससाचे दर रुपये ११०/- माहीत असतांना या अनुदानातुन एकुण २२७२७ नग खरेदी करता आले असते परंतु २१४६० नग कसे खरेदी केले त्यामुळे रुपये १,३९,४००/- इतके अनुदान अखर्चित राहिले आहे.

(२) सर्वच पंचायत समितीना साहित्य प्राप्त झाल्याचे डिलेव्हरी चलनावर साहित्य प्राप्त झाल्याचे दिनांक नमुद नसल्याने पुरवठा धारकांनी विहीत मुदतीत पुरवठा केल्याची लेखापरिक्षणास सत्यता पडताळणी आली नाही.

(३) नमुना तपासणीसाठी पत्र क्र. २३६ दिनांक ३१.३.२००९ रोजी आयटीआय, अहमदनगर यांना या पत्राव्दारे देण्यात आला असतांना त्याच दिवशी नमुना तपासणी करुन अहमदनगर येथुन बुलडाणा येथे अहवाल सादर केला आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, बुलडाणा यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) सन २००८-०९ मध्ये विशेष घटक योजनेअंतर्गत रु. २५ लक्ष तरतुद प्राप्त झाली होती. प्राप्त झालेल्या तरतुदी मधुन प्रकल्प निहाय अंगणवाडीतील मुलांमुलींकरिता मागणीनुसार मनोरा ससा खरेदी करण्यात आला आहे. मागणीनुसार मनोरा ससा खरेदी करण्यात आल्यामुळे निधी अखर्चित राहिला आहे.

(२) प्रकल्प स्तरावर साहित्य प्राप्त झाल्याचे डिलीव्हरी चलॉन नस्तीस उपलब्ध असून साठा नोंदवहीवर साहित्य प्रपात झाल्याचा दिनांक नमुद केला आहे.

(३) पुरवठा केलेल्या मनोरा ससा नमुना तपासणीसाठी प्राचार्य आयटीआय, अहमदनगर यांना या कार्यालयाचे पत्र क्र. ३१५/२००९ दि. २६.३.२००९ पाठविण्यात आला होता. औद्योगिक प्रशिक्षण संस्था अहमदनगर यांचे तपासणी अहवाल पत्र क्र.औप्रसंअ/पिओटीएस/०९/१११६ दि. २६.३.०९ अन्वये तपासणी अहवाल प्राप्त झाला आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

बुलडाणा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १८ ते २० जानेवारी, २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, पंचायत समिती, खामगांव व जळगांव जामोद यांच्याकडील साठा नोंदवहीमध्ये लेखा परिक्षणास साहित्य प्राप्तीची नोंद आढळून आली नाही. ही नोंद साठा नोंदवही मध्ये कोणत्या दिनांकास घेण्यात आली व पंचायत समिती देऊळगांव राजा यांना साहित्य विलंबाने पुरवठा झालेले असतानाही पुरवठ्याच्या अटी व शर्तीनुसार दंडात्मक कारवाई का करण्यात आली नाही, यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (बा.क.) यांनी समितीस विदित

केले की, उक्त दोन्ही ग्रामपंचायतीच्या अंगणवाडीतील मुला-मुलींना मनी पाटी साहित्याचा पुरवठा केला असून त्याच्या प्रती उपलब्ध आहेत. तसेच जळगांव जामोद येथे पुरवठादाराने माल उशिरा दिल्यामुळे त्यांच्याकडून रु.१०,५६४/- इतका दंड वसूल केला आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, लेखा परीक्षणाच्या वेळी साठा नोंदवहीमध्ये साहित्य प्राप्तीची नोंद नव्हती. साठा नोंदवही मध्ये केव्हापासून नोंदी घेतल्या आहेत, यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (बा.क.) यांनी समितीस विदित केले की, जळगांव जामोद पंचायत समितीच्या नोंदवही मध्ये दि.१२/३/२००९ व खामगांव पंचायत समितीच्या नोंदवहीमध्ये दि. २३/३/२००९ रोजी नोंदी घेतल्या आहेत. तसेच ज्या पुरवठादाराने उशिराने मालाचा पुरवठा केला त्याच्याकडून दंड सुध्दा वसूल केला आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, आय.टी.आय. अहमदनगर यांनी पाटीचा नमुना ज्या दिनांकास तपासणीसाठी पाठविला त्याच दिवशी तपासणी अहवाल प्राप्त होणे कसे शक्य आहे, पाटीची तपासणी करणे ही साधी बाब आहे. प्रयोग शाळेमध्ये पाटीची तांत्रिक तपासणी करावयाची नव्हती.

९० टक्के अनुदानावर लेडिज सायकल पुरविणे योजनेतील अनियमितता संदर्भात समितीने अशी विचारणा केली की, मे. मिना एंटरप्राईजेस, नाशिक यांनी लेडिज सायकल पुरवठा न केल्याने त्यांना काळ्या यादीत टाकण्याबाबतची शिफारस दि.३१/१२/२०१० रोजी जवळपास २ वर्षे विलंबाने करण्याचे कारण काय, लेडिज सायकल खरेदीस माहे नोव्हेंबर, २००८ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळालेली असताना तांत्रिक मान्यता मात्र माहे फेब्रुवारी, २००९ अखेर घेण्यात आली आहे, या विलंबास कोण जबाबदार आहे, यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (बा.क.) यांनी समितीस विदित केले की, पुरवठादारास आदेश देऊन सुध्दा त्याने साहित्याचा पुरवठा केला नाही. त्यामुळे सदर वर्षातील अनुशेष पुढील वर्षी दूर करण्यात आला. पुरवठादाराने विहित मुदतीत पुरवठा न केल्यामुळे सदर पुरवठादाराचे नाव काळ्या यादीत टाकण्यात आले आहे.

९० टक्के अनुदानावर शिलाई मशिन पुरविण्याच्या योजनेतील अनियमितते संदर्भात साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, या परिच्छेदाच्या अनुषंगाने सुध्दा विहित मुदतीत पुरवठा न केल्यामुळे प्रशासनाने संबंधित ठेकेदाराला काळ्या यादीत टाकलेले आहे. ठेकेदाराला काळ्या यादीत टाकले म्हणजे विषय संपत नाही. ९० टक्के अनुदानावर शिलाई मशिन पुरविण्यासाठी जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण समितीने दि.१०/११/२००८ रोजी प्रशासकीय मान्यता दिली. त्यानंतर उप मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी दि.२६/२/२००९ रोजी तांत्रिक मान्यता दिली. याचाच अर्थ प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर तब्बल ४ महिने विलंबाने तांत्रिक मान्यता देण्यात आली. ही गंभीर बाब आहे. प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर तांत्रिक मान्यता देण्यास ४ महिन्यांचा विलंब का लागला, यावर तत्कालीन उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, मागणी पत्राची नस्ती उशिरा गेल्यामुळे तांत्रिक मान्यता घेण्यास विलंब झाला. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर जिल्हा परिषद स्तरावरुनच तांत्रिक मान्यता घ्यावयाची होती. त्यामुळे विलंब लागण्याची गरज नव्हती. यावर समितीने पुढे विचारणा केली की, जिल्हा परिषदेतील विशिष्ट अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या चुकीमुळे महिला लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळाला नाही. यावर तत्कालीन उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, पुरवठा आदेश त्याच वित्तीय वर्षात दिले होते. परंतु पुरवठा विलंबाने प्राप्त झाला. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, तांत्रिक मान्यता ४ महिन्यांनी घेण्याचे संयुक्तिक कारण काय आहे, दि.२६/२/२००९ रोजी तांत्रिक मान्यता घेतली आणि पुरवठा आदेश दि.२/३/२००९ रोजी दिले. जिल्हा परिषदेने तांत्रिक मान्यता लवकर दिली असती तर लवकर पुरवठा होऊ शकला असता. यावर समितीने पुढे असे मत व्यक्त केले की, समितीचे स्पष्ट मत आहे की, अधिकाऱ्यांच्या दिरंगाईमुळे लाभार्थी लाभापासून वंचित राहिले. यावर तत्कालीन उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, पुरवठा आदेश विहित मुदतीत दिला. परंतु पुरवठादाराने विहित मुदतीत साहित्य पुरवठा केला नाही. पुरवठा आदेश दिल्यानंतर एक महिन्यात पुरवठा करावयाचा होता. यावर समितीने पुढे असे मत व्यक्त केले की, प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर तांत्रिक मान्यता घेण्यास ४ महिने विलंब का लागला एवढ्यापुरताच हा विषय आहे. त्यामुळे आपण इतर माहिती न देता स्पेसिफिक माहिती द्यावी. यावर समितीने असे निदेश दिले की, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी परिच्छेद क्र.३.९१८ ते ३.९२१ या मुद्यांची सखोल चौकशी करुन, ज्या प्रकरणी अनियमितता झाली असेल त्या प्रकरणी संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन, या बाबतचा अहवाल समितीकडे सादर करावा.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

**(१) अंगणवाडीतील मुला-मुलींकरीता मनीपाटी खरेदीबाबत- परिच्छेद क्रमांक ३.९१८**
**(२) ९० टक्के अनुदानावर लेडिज सायकल पुरविणे योजनेतील अनियमितता-परिच्छेद क्रमांक ३.९१९**
**(३) ९० टक्के अनुदानावर शिलाई मशिन पुरविणे योजनेतील अनियमितता- परिच्छेद क्रमांक ३.९२०**
**(४) अंगणवाडी मुला मुलींकरीता मानोरा ससा गोल खरेदी बाबत- परिच्छेद क्रमांक ३.९२१**

(१) वरील चारही आक्षेपांतील प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सखोल चौकशी करुन ज्या प्रकरणांत अनियमितता झाली असेल त्या प्रकरणांत संबधितांवर जबाबदारी निश्चित करुन याबाबतचा अहवाल सादर करण्याचे निदेश समितीने दिलेले होते. त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आलेली आहे,

(२) वरील लेडिज सायकल व शिलाई मशिन पुरवठादारास काळया यादीत टाकण्यात आले आहे काय, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत.

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) उपरोक्त चारही योजनांची मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशान्वये सखोल चौकशी केली असता या योजना राबविण्याच्या पक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची अनियमितता झालेली नाही.

(२) परंतू लेडिज सायकल व शिलाई मशिन या योजनांचा पुरवठा आदेश देऊन ही सदरच्या पुरवठादाराने मालाचा पुरवठा न केल्याने जा.क्र.बुजिप/मबाक/लेखा/१४७३/२०१० दिनांक ३१/१२/२०१० व जा.क्र.बुजिप/ मबाक/लेखा/१४७४/२०१० दिनांक ३१/१२/२०१० नुसार साहित्याचा पुरवठा न करणा-या पुरवठादारांना काळया यादीत टाकण्यात आलेले आहे.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात महिला व बाल विकास विभागाकडून खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**महिला व बाल विकास विभागाचे अभिप्राय :-**

जिल्हा परिषद, बुलढाणा यांचे अभिप्रायाशी सहमत आहे.

जिल्हा परिषद स्तरावर कार्यवाही करण्यात आलेली आहे.

**चौकशी अहवाल**

**परिच्छेद ३.९१८**

(१) महिला व बाल कल्याण, जिल्हा परिषद, बुलडाणा यांचे विषय समिती सभा दि. ०९/०१/२००९ मध्ये ठराव क्र. ४ अन्वये सन २००८-०९ या आर्थिक वर्षामध्ये अंगणवाडीतील सर्वसाधारण ३ ते ६ वर्ष वयोगटातील मुला-मुलींकरीता मनि पाटी, खरेदी बाबतचा ठराव घेण्यात आलेला आहे.

(२) दि. ०९/०१/२००९ रोजीच्या ठराव क्र. ४ नुसार सन २००८-०९ या आर्थिक वर्षामध्ये अंगणवाडीततील सर्वसाधारण ३ ते ६ वर्षे वयोगटातील मुला-मुलींकरीता मनीपाटी २६X२२ सेमी एका बाजूस, ब्लॅकबोर्ड दुस-या बाजूस १० खांब व त्यात प्रत्येकी १ पासून १० पर्यंत मनी व सोबत छोटे डस्टर खरेदी बाबत तांत्रिक मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे.

(३) तांत्रिक मान्यतेनुसार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बुलढाणा यांचे आदेश क्र. १८४ दि. ११/०२/२०१२ नग क्र.२२५ दि.०२/०३/०९ अन्वये ६५७ नग व क्र. १८३ दि ११/०२/२००९ अन्वये १३१५ पुरवठा करण्याचे आदेश व्यवस्थापक, महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, मुंबई यांना अटी व शर्तीचे अधीन राहुन वितरीत करण्यात आलेले आहे.

(४) प्राचार्य,औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बुलडाणा यांना पत्र क्र. २५७ दि. ०९/०३/२००९ अन्वये मनी पाटी नमुना तपासणी करुन देणेबाबत विनंती केली असता त्यांचे पत्र क्र.१७८८ दि. २५/०३/२००९ अन्वये मनीपाटी व मनोरा ससा (गोल) हा प्लॅस्टिकचा असल्यामुळे या संस्थेत प्लास्टीक प्रोसेसिंग ट्रेड उपलब्ध नसल्याने तपासणी करणे शक्य नाही असे कळविल्यामुळे कार्यालयीन पत्र क्र. ३१३ दि. २६/०३/२००९ अन्वये प्राचार्य औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अहमदनगर यांच्या मार्फत सदर साहित्य नमुना तपासणीसाठी पाठविले असता त्यांनी तपासणी करुन माहे २००९ अन्वये तपासणी अहवाल खास दुतास सादर केलेला असल्यामुळे त्याच तारखेस प्राप्त झाले आहे.

(५) पंचायत समिती, खामगांव व जळगाव-जामोद येथे अंगणवाडीतील सर्वसाधारण ३ ते ६ वर्ष वयोगटातील मुलां-मुलींकरिता मनीपाटी साहित्य प्राप्त झाल्याच्या नोंदी असून डिलेव्हरी चलान उपलब्ध आहेत. पुरवठादाराने साहित्य पुरवठा उशिराने केल्यामुळे सदरची रक्कम भरण्याकरिता व्यवस्थापक, महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, मुंबई यांना पत्र क्र. १३१०, दिनांक १२/०१/२००० अन्वये शासन खाती भरणा करण्यात आलेली आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.९१९**

(१) महिला व बाल कल्याण, जिल्हा परिषद, बुलडाणा यांचे विषय समिती सभा दि. ३०.१२.२००८ मध्ये ठराव क्र. ४ अन्वये सन २००८-०९ या आर्थिक वर्षामध्ये ९० % अनुदानावर शाळेत शिकणा-या मुलींना लेडिज सायकल पुरविणे योजनेतील खरेदी बाबतचा ठराव घेण्यात आलेला आहे.

(२) दि. ३०/१२/२००८ रोजीच्या ठराव क्र. ४ नुसार सन २००८-०९ या आर्थिक वर्षामध्ये ग्रामीण भागातील ९०% अनुदानावर शाळेत शिकणा-या मुलींना लेडिज सायकल पुरविणे योजनेतील खरेदी बाबत तांत्रिक मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे.

(३) तांत्रिक मान्यतेनुसार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. बुलडाणा यांचे आदेश क्र. २२१ दि. ०२/०३/०९ अन्वये मिना एंटरप्रायसेस, पिंपळगांव वसवंत, नाशिक यांना अटी व शर्तीचे अधीन राहुन साहित्य पुरवठा करण्याचे आदेश पारित करण्यात आलेले आहे.

(४) परंतु सदर पुरवठादाराने सन २००८-०९ या आर्थिक वर्षामध्ये ९०% अनुदानावर शाळेत शिकणा-या मुलींना लेडिज सायकल पुरवठा न केल्यामुळे त्यांचे नाव काळया यादीत टाकण्याबाबत मा. सहसंचालक, उद्योग विकास आयुक्त, महाराष्ट्र शासन, ई यांना पत्र क्र. १४७३, दि. ३१/१२/२०१० अन्वये कळविण्यात आलेले आहे.

(५) शाळेत शिकणा-या मुलींना लेडिज सायकल पुरविणे योजनेतील पुरवठा सन २००८-०९ या आर्थिक वर्षामध्ये पुरवठादारास न झाल्यामुळे सदर योजना ही सन २००९-१० या आर्थिक वर्षामध्ये राबविण्यात आलेली आहे.

**परिच्छेद क्र. ३.९२०**

(१) महिला व बाल कल्याण, जिल्हा परिषद, बुलडाणा यांचे विषय समिती सभा दि. १०/०९/२०१८ मध्ये ठराव क्र. ४ अन्वये सन २००८-०९ या आर्थिक वर्षामध्ये ९०% अनुदानावर शिलाई मशिन खरेदी बाबतचा ठराव घेण्यात आलेला आहे.

(२) दि. १०/०९/२००८ रोजीच्या ठराव क्र. ४ नुसार सन २००८-०९ या आर्थिक वर्षामध्ये ग्रामीण भागातील आर्थिकदृष्टया कमकुवत महिलांना मोफत शिलाई मशिन खरेदी बाबत तांत्रिक मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे.

(३) तांत्रिक मंजुरी नुसार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. बुलढाणा यांचे आदेश क्र. २२२ दि. ०२/०३/२००९ अन्वे ए.झेड एंटरप्रायसेस, नांदेड यांना अटी व शर्तीचे अधिन राहुन साहित्य पुरवठा करण्याचे आदेश पारित करण्यात आलेले आहे.

(४) परंतु सदर पुरवठादाराने सन २००८-०९ या आर्थिक वर्षामध्ये शिलाई मशिनचा पुरवठा न केल्यामुळे त्यांचे नाव काळया यादीत टाकण्याबाबत मा. सहसंचालक उद्योग, विकास आयुक्त, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना पत्र क्र. १४७४ दि. ३१/१२/२०१० अन्वये कळविण्यात आलेले आहे.

(५) शिलाई मशिनचा पुरवठा सन २००८-०९ या आर्थिक वर्षामध्ये पुरवठादाराकडून न झाल्यामुळे सदर योजना ही सन २००९-१० या आर्थिक वर्षामध्ये राबविण्यात आलेली आहे.

पंचायती राज समिती परिच्छेद क्र. ३.९२० सन २००८-०९ मधील ९०% अनुदानावर शिलाई मशिन पुरविणेबाबत योजनेतील अनियमितता बाबतीत चौकशी उपरोक्त प्रमाणे करण्यात आलेली असून सदर खरेदी मध्ये कोणत्याही प्रकारची अनियमितता झालेली नसल्याचे स्पष्ट मत आहे. करीता चौकशी अहवाल मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांना सादर केला आहे.

**परिच्छेद ३.९२१**

(१) महिला व बाल कल्याण, जिल्हा परिषद, बुलडाणा यांचे विषय समिती सभा दि. ०९/०१/२००९ मध्ये ठराव क्र. ४ (२) अन्वये सन २००८-०९ या आर्थिक वर्षामध्ये अंगणवाडीतील सर्वसाधारण ३ ते ६ वर्ष वयोगटातील मुलां-मुलींकरिता मनोरा, ससा, गोल खरेदी बाबतचा ठराव घेण्यात आलेला आहे.

(२) दि.०९/०१/२००९ रोजीच्या ठराव क्र. ४ (२) नुसार सन २००८-०९ या आर्थिक वर्षामध्ये अंगणवाडीतील सर्वसाधारण ३ ते ६ वयोगटातील मुला-मुलींकरीता मनोरा, ससा, गोल खरेदीबाबत तांत्रिक मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे.

(३) तांत्रिक मंजुरी नुसार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांचे आदेश क्र. २२७ दि. ०२/०३/२००९ अन्वये २१,४६० नग पुरवठा करण्याचे आदेश व्यवस्थापक महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, मुंबई यांना अटी व शर्तीचे अधीन राहून पारीत करण्यात आलेले आहे.

(४) प्राप्त साहित्य, प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बुलढाणा यांना पत्र क्र. ३७२, दि. २५/०३/२००९ अन्वये मनोरा, ससा, गोल नमुना तपासणी करुन देणे बाबत विनंती केली असता त्याचे पत्र क्र. १७८८, दि. २५/०३/२००९ अन्वये मनोरा ससा (गोल) हा प्लास्टिकचा असल्यमुळे या संस्थेत प्लास्टीक प्रोसेसिंग ट्रेड उपलब्ध नसल्यामुळे तपासणी करणे शक्य नाही असे कळविल्यामुळे कार्यालयीन पत्र क्र. ३१३ दि. २६/०३/२००९ अन्वये प्राचार्य औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अहमदनगर यांना खास दुतामार्फत सदर साहित्य नमुना तपासणीसाठी पाठविले असता त्यांनी तपासणी करुन त्यांचे पत्र क्र. १११५ दि. २६/०३/२००९ अन्वये तपासणी अहवाल खास दुतास सादर केलेला असल्यामुळे त्याच तारखेस प्राप्त झालेला आहे.

(५) अंगणवाडीतील सर्वसाधारण ३ ते ६ वर्ष वयोगटातील मुला-मुलींकरीता मनोरा, ससा, गोल साहित्य एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्पाच्या मागणीनुसार खरेदी केल्यामुळे रु. १,३९,४००/- रक्कम शिल्लक राहिली असून ती पुढील वर्षात खर्च करण्यात आलेली आहे. साहित्य प्राप्त झाल्याच्या नोंदी साठा पंजीस असून डिलेव्हरी चलान उपलब्ध आहेत.

पंचायती राज समिती परिच्छेद क्र. ३.९२१ सन २००८-०९ मधील अंगणवाडीतील मुला मुलींकरीता मनोरा, ससा, गोल खरेदी बाबत अनियमितता झाल्याचे बाबतीत चौकशी उपरोक्त प्रमाणे करण्यात आलेली असून सदर खरेदी मध्ये कोणकोणत्या प्रकारची अनियमितता झालेली नसल्याचे स्पष्ट मत आहे. करीता चौकशी अहवाल मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांना सविनय सादर.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने बुलडाणा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक १४ नोव्हेंबर, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, (१) अंगणवाडीतील मुला-मुलींकरिता मनी पेटी खरेदी-परिच्छेद क्रमांक ३.९१८ (२) ९० टक्के अनुदान लेडील सायकल पुरविणे योजनेतील अनियमितता परिच्छेद क्रमांक ३.९१९ (३) ९० टक्के अनुदान- शिलाई मशिन्स पुरविणे योजनेतील अनियमितता-परिच्छेद क्र. ३.९२० (४) अंगणवाडी मुला-मुलींकरिता मनोरा ससा (गोल) खरेदी-प्र.क्र.३.९२१

वरील चारही प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सखोल चौकशी करुन ज्या प्रकरणी अनियमितता झाली असेल त्याप्रकरणी संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन त्याबाबत अहवाल सादर करण्याचे निर्देश समितीने दिले होते. याबाबत कोणती कारवाई करण्यात आली, यावर सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, ही चारही प्रकरणे खरेदीची होती. मनीपाटी आणि मानोरा ससा (गोल) खरेदी झालेली आहे. ते सामान प्राप्त झाले असून त्याचे वाटप झालेले आहे. सायकल आणि शिलाई मशिनची खरेदी आर.सी.वर होती. आपण त्या पुरवठाधारकास फक्त जिल्हयापुरते काळया यादीत टाकले. एमएसआयडीसीला शासनाने नियुक्त केलेले आहे. यावर सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, पुरवठाधारकाने पुरवठा केलेला नसल्यामुळे त्याने शासनाची दिशाभूल केलेली आहे याबाबत त्या पुरवठाधारकास कळविण्यात येईल. यावर सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, तीन हजार कोटी रुपयांचे अंदाजपत्रक होते. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, तीन हजार कोटी रुपये खर्च होत आहेत. बालकांसाठी अ ब व क दर्जा आहे. तो दर्जा कमी व्हायला पाहिजे हा आपला मुख्य उद्देश आहे. यासंदर्भात माहिती घेऊन समितीला अहवाल सादर करण्यात यावा.

### अभिप्राय व शिफारशी

पंचायत समिती खामगांव व जळगांव जामोद येथील साठा नोंदवहीची पडताळणी केली असता येथे साहित्य पुरवठा झाला नसतांनाही कंत्राटदारास रुपये २,११,२८०/- इतक्या रक्कमेचे जादा प्रदान केले आहे. उशिराने साहित्य पुरविल्याबद्दल कंत्राटदाराचे देयकातून दंडाची रक्कम वसूल होणे आवश्यक होते. सर्वच पंचायत समितींचा साहित्य प्राप्त झाल्याचा दिनांक नमुद नसल्याने पुरवठा धारकाने विहित मुदतीत पुरवठा केल्याची खात्री होत नाही. नमुना तपासणीसाठी पत्र क्र. २३६ दिनांक ३१.३.२००९ रोजी प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अहमदनगर यांना या पत्राव्दारे देण्यात आला असतांना याच दिवशी नमुना तपासणी करुन अहमदनगर येथुन बुलढाणा येथे अहवाल सादर केला ही आक्षेपार्ह बाब आहे.

पंचायत समिती खामगांव व जळगांव-जामोद यांच्याकडील साठा नोंदवही मध्ये लेखा परिक्षणास साहित्य प्राप्तीची नोंद आढळून आली नाही. साहित्य विलंबाने पुरवठा केल्याने अटी व शर्तीनुसार दंडात्मक कारवाई करण्यात आली नाही. दोन्ही ग्राम पंचायतीच्या अंगणवाडीतील मुला-मुलींना मनी पाटी साहित्याचा पुरवठा केला असून त्याच्या प्रती जिल्हापरिषदेकडे उपलब्ध आहेत. तसेच जळगांव जामोद येथे पुरवठादाराने माल उशिरा दिल्यामुळे त्यांच्याकडून रुपये १०,५६४/- इतका दंड वसूल केला आहे.

९० टक्के अनुदानावर लेडिज सायकल पुरविणे योजनेतील अनियमितेत मे. मिना एंटरप्राईजेस, नाशिक यांनी लेडिज सायकल पुरवठा न केल्याने त्यांना काळ्या यादीत टाकण्याबाबतची शिफारस दि.३१/१२/२०१० रोजी जवळपास २ वर्षे विलंबाने करण्यात आली.

९० टक्के अनुदानावर शिलाई मशिन पुरविणे या योजनेतील अनियमिततेबाबत विहित मुदतीत साहित्याचा पुरवठा न केल्यामुळे प्रशासनाने संबंधित ठेकेदाराला काळ्या यादीत टाकलेले आहे. दि.२६/२/२००९ रोजी तांत्रिक मान्यता मिळाल्यानंतर ४ महिने विलंबाने प्रशासकीय मान्यता देण्यात आली, ही गंभीर बाब आहे. **जिल्हा परिषदेतील विशिष्ट अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या चुकी व दिरंगाईमुळे लाभार्थी लाभापासून वंचित राहिल्याने महिला लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळाला नाही. सदरहू प्रकरणी सखोल चौकशी करुन त्याबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन या बाबतचा अहवाल दोन महिन्यात समितीकडे सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

मुद्दा क्र. ३.९१८ मधील साठा नोंदवही पडताळणीत कंत्राटदाराने मालाचा पुरवठा साहित्य विलंबाने पुरविल्याने रुपये २,११,२८०/- रक्कमेची दंड वसूली करण्यात आली आहे.

सदरहू प्रकरणी कंत्राटदारास काम देताना शासनाच्या अटी व शर्ती यांच्या अधिन राहून करारपत्र करण्यात येत असल्याने संबंधित कर्मचारी व अधिकारी यांनी जबाबदारीने काम केल्यास अनियमितता होणार नाही. तसेच एखाद्या चुकीमुळे शासनाचा बहुमुल्य वेळ सुध्दा वाया जात असतो. शासनाने अंगणवाडीतील मुलांना मनी पाटी, महिलांना सायकली व शिलाई मशिन आणि मानोरा ससा गोल या योजनेचा लाभ लाभार्थ्यांना वेळेत मिळणे आवश्यक होते.

**अत: प्रस्तुत प्रकरणी साहित्य वेळेवर उपलब्ध न झाल्याने त्याचा विद्यार्थ्यांना लाभ देता आला नाही ही बाब निश्चितच गंभीर स्वरुपाची असल्याने सदर प्रकरणी जबाबदार असलेल्या सर्व संबंधितांवर नियमाप्रमाणे कारवाई करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांत पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

## प्रकरण चार

## जिल्हा परिषद, बुलडाणा

## पाणीपट्टी थकबाकी वसूली

**(परिच्छेद ४.३४९) (सन २००८-२००९)**

जिल्हा परिषद बुलडाणा सन २००८-०९ (परिच्छेद क्रमांक ४.३४९) याबाबत खालील प्रमाणे आक्षेप आहेत :-

पंचायत समित्यांच्या हद्दीमध्ये असलेल्या पाणी पुरवठा व प्रादेशिक योजनांमधुन कुपनलिका विहीरीतुन तसेच विद्युत पंप व हातपंपाच्या सहाय्याने ग्रामपंचायतींना पाणीपुरवठा केला जातो. हा पाणीपुरवठा लोकसंख्या व कुटूंब यांच्या संख्येवर आधारित असतो. सन २००८-०९ च्या लेखा परिक्षणात सदर पंचायत समित्यांच्या पाणी पुरवठा योजनाबाबतच्या हिशोबाच्या नोंदवहया तपासल्या असता दिनांक ३१ मार्च, २००९ अखेर ब-याच रकमा वसुली अभावी थकित असलेल्या दिसुन आल्या. सदर वसूली ग्राम पंचायतीकडुन पंचायत समित्यांनी वेळच्या वेळी करणे आवश्यक होते. वसूली न केल्यामुळे थकबाकीच्या रकमा वर्षा गणिक वाढत जाऊन ग्राम पंचायती कडुन रक्कम वसूल करणे कठीण जाते. वसुली बाबत पंचायत समित्या विशेष प्रयत्न करताना दिसत नाहीत असे लेखा परिक्षणात आढळून आले आहे. दिनांक ३१ मार्च, २००९ अखेर खालील १३ पंचायत समित्यांकडे रक्कम रुपये १८,४३,४५,८७९/- इतकी पाणीपट्टीची थकीत वसुली आहे. उदाहरणादाखल खालील पंचायत समित्यांचे आक्षेप एकत्रित करुन तक्त्यामध्ये दर्शविले आहेत.

| अ.क्र. | जिल्हयाचे नांव | पं.स.चे नाव | लेखापरिक्षण अहवालातील परि.क्र. | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| १३ | बुलडाणा | पं.स. मोताळा | ३९ | ४४,९१,६९५/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, बुलडाणा यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सन २००८-२००९ अखेर रुपये ४४,९१,६९५/- थकबाकी दर्शविण्यात आली आहे. परंतु प्रत्यक्षात थकबाकीची रक्कम रुपये २८,७०,९५६/- असून रक्कम वसुलीची कार्यवाही सुरु आहे.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

बुलडाणा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १८ ते २० जानेवारी, २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, पंचायत समिती अंतर्गत ग्रामपंचायतीची एकूण पाणीपट्टी थकबाकी रू.४४,९१,६९५/-वसुलीची सद्यस्थिती काय आहे, यावर गट विकास अधिकारी, मोताळा यांनी समितीस विदित केले की, वसुली २१ टक्के आहे. या आर्थिक वर्षी कॅम्प लावून वसुली करणार आहोत. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, परि.क्र.४.३५१ संग्रामपूर, ४.३५२ बुलडाणा, ४.३५२ नांदुरा, ४.३५२, संग्रामपूर, ४.३५२, जळगाव जामोद, ४.३५२, शेगाव, ४.३५२ खामगाव, ३.३५२ मेहकर, ४.३५२ मलकापूर, ४.३५२ चिखली, ४.३५२ देऊळगाव राजा, ४.३५२ मोताळा, ४.३५२ लोणार, हे सर्व परिच्छेद ग्राम पंचायती कडील अपहारा संबंधातील आहेत. या सर्व प्रकरणांना माननीय समिती प्रमुखांनी यापूर्वी दिलेला निर्णय लागू होईल. यावर समितीने असे निदेश दिले की, हा विषय अत्यंत गंभीर आहे. याची सखोल चौकशी करून व्याजासह अपहारित रक्कम संबंधितांकडून वसूल करावी. या विषयासंबंधी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात येईल. वसुली केलेली सर्व प्रकरणे बंद केली आहेत. जी प्रकरणे सुरू आहे त्यांची किती वसुली आहे यासंबंधातील माहिती समितीला देण्यात येईल. तसेच परि.क्र.४.३५२ : जिल्हा ग्रामविकास निधी कर्ज व अंशदान वसुलीबाबत विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात येईल. परि.क्र.४.३५२ (४) संग्रामपूर, ४.३५२ (६) बुलढाणा, ४.३५२ (६) संग्रामपूर, चिखली, सिंदखेडराजा, ४.३५२ (७) संग्रामपूर, ४.३५२ (८) जळगाव जामोद, ४.३५२ (९) परि.नांदुरा, हे सर्व परिच्छेद वसुली संबंधातील आहेत. या सर्व परिच्छेदांना माननीय समिती प्रमुखांनी यापूर्वी दिलेला निदेश लागू असून सखोल चौकशी करून त्याप्रमाणे कार्यवाही करावी. तसेच, परि.क्र.५.२२, आरेगाव ता.मेहकर, ५.३३ जवळाबाजार, ता.नांदुरा, ५.३३ मांडवा, ता.जळगाव जामोद या परिच्छेदांसंबंधी माननीय समिती प्रमुखांनी यापूर्वी दिलेल्या निदेशाप्रमाणे सखोल चौकशी करून कारवाई करावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला पाठवून द्यावा.

तसेच समितीला तिन्ही पंचायत समिती क्षेत्रात एक बाब आढळून आली की, अनेक भागात लोकांना क्षारयुक्त पाणी प्यावे लागते. पूर्वी ज्या ठिकाणी विहिरी घेतल्या होत्या तेथून ५ कि.मी. पर्यंत कोणत्याही प्रकारे वाळूचा उपसा करावयास नको असा नियम आहे. तरी सुध्दा त्या परिसरात वाळूचा उपसा होत असल्यामुळे आता पूर्वीप्रमाणे पाण्याचे फिल्टरेशन होत नाही. परिणामी, त्या भागातील लोकांना शुध्द पाणी मिळत नाही. त्यामुळे त्या भागात क्षारयुक्त पाण्याऐवजी गोडे पाणी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टिकोनातून योग्य ती कार्यवाही करावयास पाहिजे. समितीला कालच्या दौऱ्यात प्रत्येक शाळांमध्ये वॉटर फिल्टरेशन प्लांट बसविल्याचे निदर्शनास आले. परंतु त्यातील बहुतेक प्लांट कार्यान्वित नाहीत. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांनी त्या शाळांना भेटी दिल्या तर तेथील वस्तुस्थिती त्यांच्या निदर्शनास येईल व त्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करता येईल.

अनेक ठिकाणी पाणी पुरवठा योजना पूर्ण झाल्याचे सांगण्यात येते. परंतु वस्तुस्थिती मात्र वेगळी असते. गावात गेल्यानंतर पाणी पुरवठा योजना हस्तांतरित करुन सुध्दा त्यांना पाणी मिळत नसल्याचे निदर्शनास येते.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

**पाणीपट्टी वसुली थकबाकीबाबत :-**

(१) संग्रामपूर, बुलडाणा, नांदूरा, जळगांव-जामोद, शेगांव, खामगांव, मेहकर, मलकापूर, चिखली, देऊळगांव राजा, मोताळा व लोणार या पंचायत समिति अंतर्गत ग्राम पंचायती कडील थकीत पाणीपट्टी वसुली करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली. तसेच प्रस्तुत सर्व प्रकरणांत चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास त्यानुसार अपहारित रक्कम व्याजासहित तातडीने वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे,

(२) ग्रामीण पाणी पुरवठा योजना सुरळीत चालाव्यात याकरिता थकीत पाणीपट्टी वसूली करिता शासनाकडून कोणत्या उपाययोजना करण्यात येत आहेत,

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

पंचायत समिती संग्रामपुर, बुलडाणा, नांदुरा, जळगाव जामोद, शेगांव, खामगांव, मेहकर, मलकापुर, चिखली, देऊळगांव, राजा, मोताळा व लोणार अंतर्गत ग्राम पंचायती कडील पाणीपट्टी वसुली संदर्भात खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात आली.

(१) पाणीपट्टीधारक खातेदारांना बील फॉर्म मागणी नोटीस देवुन व कॅम्प लावुन थकित पाणीपट्टी वसुली करण्यात आली आहे.

(२) ग्रामपंचायत स्तरावर अधिकारी व कर्मचारी यांचे पथक नेमून विशेष वसुली शिबिरांचे आयोजन करण्यात येते.

(३) खाते प्रमुख व गट विकास अधिकारी यांचे समन्वय सभेत तसेच ग्राम सेवक सभेत नियमितपणे पाणीपट्टी वसुली बाबत आढावा घेण्यात येतो.

(४) १४ व्या वित्त आयोगाअंतर्गत परफॉर्मन्स ग्रॅन्ट मिळणेसाठी ग्राम पंचायतचे उत्पन्नात वाढ होणे आवश्यक आहे त्यामुळे पाणी पट्टी वसुली होण्यास मदत होत आहे.

ग्राम पंचायतीची थकित पाणीपट्टी कर वसुली पुढील आर्थिक वर्षामध्ये वर्ग करण्यात येत असून त्यानुसार पाणीपट्टीधारकांकडुन वाढीव कर वसुली करण्यात येते, त्यामुळे थकित पाणीपट्टी वसुलीमध्ये अपहार होत नाही. यासंदर्भात पंचायत समिती निहाय थकित पाणीपट्टी वसुली व करण्यात आलेल्या कार्यवाहीचा तपशिल सादर करण्यात येत आहे.

ग्रामीण पाणी पुरवठा योजना सुरळीत चालाव्यात या करिता उक्त १ ते ४ प्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच शासनाने वसुली होण्याचे दृष्टीने काही नाविन्यपुर्ण योजना सुरु केल्या आहेत. जसे पर्यावरण संतुलीत ग्राम समृध्द योजना smart ग्राम इत्यादी.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाकडून खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्तीबाबत तसेच पाणीपट्टी वसूलीबाबत दिनांक १७ ऑक्टोबर, २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये खालीलप्रमाणे सुधारित मार्गदर्शक सुचना संबंधितांना देण्यात आलेल्या आहेत :-

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या धोरणानुसार योजनेची निवड, आखणी व अंमलबजावणी ही संबंधित गावाच्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने करावयाची असून योजनेच्या देखभाल दुरुस्तीवरील १०० % खर्च संबंधित लाभार्थ्यांनी करावयाचा आहे. सदर देखभाल दुरुस्तीमध्ये शासन यंत्रणेचा सहभाग हा सहाय्यकर्त्याचा राहणार आहे. सदर ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची १००% देखभाल दुरुस्ती ग्रामस्थांनीच स्वखर्चाने करावयाची असून त्याकरिता पाणीपट्टीव्दारे निधी उपलब्ध व्हावा. यासाठी पाणीपट्टीवरील कमाल मर्यादा काढून टाकण्यात आलेली आहे. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या वार्षिक देखभाल दुरुस्ती खर्चाचा अंदाज घेऊन त्यानुषंगाने पाणीपट्टीची आकारणी करणे. आकारलेल्या पाणीपट्टीची जास्तीत जास्त वसुली होईल यासाठी प्रयत्न करणे ही संबंधित जिल्हापरिषद/ग्रामपंचायतीची जबाबदारी आहे. जेणेकरुन सदर योजना स्वयंसंतुलित होतील.

**पाणीपट्टी वसुली थकबाकीबाबत विस्तृत विवरण :-**

| अ. क्र. | पंचायत समितीचे नाव | सन २००८-०९ ची पाणीपट्टी थकबाकी | सन २००८-०९ ची पाणीपट्टी थकबाकी वसुलीबाबत सद्यस्थिती |
|---|---|---|---|
| १ | मोताळा | २८,७०,९५६/- | सन २०००८-०९ अखेर रु. ४४,९१,६९५/- थकबाकी दर्शविली होती. प्रत्यक्षात थकबाकीची रक्कम रु. २८७०९५६/- असून ती सद्यस्थितीत पुर्ण वसूल झाली आहे. |
| २ | संग्रामपुर | ३६,३५,२३७/- | सन २०००८-०९ वित्तीय वर्षाअखेर पाणीपट्टी कराची रक्कम रु. ३६,३५,२३७/- पुढील आर्थिक वर्षात १०० % वसुली करण्यात आली. |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | बुलढाणा | ३४,१४,३००/- | सन २०००८-०९ अखेर थकित रक्कम रु. ३४१४३००/- पुढील वर्षात वसूल करण्यात आलेली आहे. |
| ४ | नांदुरा | ४२,५३,२४४/- | सन २०००८-०९ अखेर थकित रक्कम रु. ४२५३२४४/- दि. ३१.०३.२०१७ पर्यंत पुर्णत: करण्यात आलेली आहे. |
| ५ | जळगांव-जामोद | ९,००,३५४/- | सन २०००८-०९ करिता थकित असलेली रक्कम रु. ९००३५४/- संद्यस्थितीत १०० टक्के वसूल करण्यात आलेली आहे. |
| ६ | शेगाव | ८,५३,४०१/- | सन २०००८-०९ करिता थकित असलेली रक्कम रु. ८५३४०१/- सन २०१२-१३ मध्ये वसूल करण्यात आलेली ाहे. |
| ७ | खामगांव | १३,३०,९७०/- | सन २०००८-०९ अखेर थकित रक्कम रु. १३३०९७०/- पुढील वर्षात वसुली केली. |
| ८ | मेहकर | १५,२३,८५२ | सन २०००८-०९ करिता थकित असलेली रक्कम रु. १५२३८५२/- संद्यस्थितीत १०० टक्के वसूल करण्यात आलेली आहे. |
| १० | चिखली | ३७,४६,५८०/- | थकित रक्कम रु. ३७४६५८०/- पुढील वर्षात वसूल करण्यात आलेली आहे. |
| ११ | सिंदखेड राजा | १४,६२,७१२/- | थकित रक्कम रु. १४६२७१२/- सद्यस्थिती १००% वसूल करण्यात आलेली आहे. |
| १२ | लोणार | ९,६९,३०६/- | थकित रक्कम रु. ९६९३०६/- पुढील वर्षात पुर्णपणे वसूल करण्यात आलेली आहे. |

**चौकशी अहवाल**

मौजे मांडवा येथील सन १९९८-९९ ते २००६-२००७ या कालावधीतील ग्राम पंचायत अभिलेखे उपलब्ध नसणे याबाबतची चौकशी केली असता जवाहर ग्राम समृध्दी योजनेची सन १९९९-२००० पासुन ते १७/६/२००२ या कालावधीतील रोकड वही व प्रमाणके सचिव यांनी उपलब्ध केली नाही असे नमूद असून सदर कालावधीतील खर्च रक्कम रु. २,१५,६९०/- एवढी आहे. परंतु तत्कालीन सचिव श्री.एस.एस.खरात (सेवा निवृत्त) यांनी रु. २,१५,६९०/- योजनेतील कामावर खर्च केला असून याबाबतचे अभिलेखे ग्राम पंचायती मध्ये रोकडवही/प्रमाणके/मोजमाप पुस्तिका/पुर्णत्वाचे प्रमाणपत्र उपलब्ध असून वरील प्रमाणे खर्चाचे मुल्यांकन रु. २,७८,३६३/- एवढे दिसुन येत आहे. मोजमाप पुस्तिका क्र. १३६ पान नं. ४४ ते ७७ वर नोंद आढळून आली आहे.

अभिप्राय :- तत्कालीन सचिव, श्री.एस.एस.खरात (सेवानिवृत्त) यांनी सन १९९९ ते २००० पासुन ते दिनांक १७.०६.२००२ या कालावधीतील अभिलेखे लेखा परिक्षणास उपलब्ध करुन न दिल्याचे प्रथम दर्शनी दिसून येत असल्याने व सदर सचिव दोषी असल्यामुळे त्यांचेविरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे गरजेचे आहे. परंतु सदर सचिव सेवानिवृत असल्याने त्यांचे विरुध्द प्रशासकिय कार्यवाही करता येत नसल्याने त्यांना दोषी बाबत द्रव्यदंड करण्यात यावा असे मत आहे. तसेच वरील प्रमाणे खर्च केलेल्या रक्कमेचे मुल्यांकन प्राप्त असल्याने रक्कम वसूल पात्र ठरत नाही. तसेच आज रोजी संपूर्ण अभिलेखे ग्राम पंचायती मध्ये उपलब्ध असल्याचे दिसून आले आहे. करिता अभिप्राय देण्यात येत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने बुलडाणा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक १५ नोव्हेंबर, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, संग्रामपूर, बुलढाणा, नांदुरा, जळगांव-जामोद, शेगाव, मेहकर, मलकापूर, चिखली, खामगांव, देऊळगाव राजा, मोताळा व लोणार या पंचायत समिती अंतर्गत ग्राम पंचायती कडील स्थगित पाणीपट्टी वसुली करण्यासंबंधात कोणती कारवाई करण्यात आली आहे. तसेच प्रस्तुत सर्व प्रकरणामध्ये चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, अपहारित रक्कम व्याजासहित तातडीने वसूल करण्यासंबंधी कोणती कारवाई करण्यात आली आहे, यावर सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीस विदित केले की, या संबंधात विभागामार्फत ग्राम पंचायतीना सूचना देण्यात आल्या आहेत. बुलढाणा जिल्हयात पाणीपट्टी वसुलीचे प्रमाण ६० टक्क्यांवरुन ७० टक्क्यांपर्यंत गेले आहे. जिल्हा परिषदेने ब-याच ग्रामसेवकांविरुध्द प्रशासकीय कारवाई केली आहे. त्यात त्यांना रुपये ५००/- रुपये १०००/- रुपये २०००/- इतका दंड आकारला आहे. त्यांनी पाणीपट्टीसह जे विविध प्रकारचे कर आहेत ते वसूल

करण्यासाठी नियोजन केले नाही तर त्यांच्याविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात येते. मागील २-३ महिन्यांचा आढावा घेतला असता ग्रामस्थांना कर वेळेवर भरण्यासाठी उद्युक्त करण्यासाठी काही तरी इन्सेटीव्ह दिला पाहिजे. तसेच जे टॅक्स वेळेवर भरत नाहीत त्यांच्याविरुध्द दंडात्मक कारवाई केली पाहिजे. अशा प्रकारची योजना राबविली तर ग्रामीण भागातील लोक कर भरतील शहरी भागामध्ये अशा प्रकारची तरतूद आहे, पण ग्रामीण भागामध्ये ही तरतूद नाही. यासंबंधात ग्रामविकास विभागाच्या सचिवांशी चर्चा करण्यात येईल. वेळेवर टॅक्स भरण्यासाठी अशा प्रकारची तरतूद करण्यात आली तर वसुली देखील जास्त होईल. आता टॅक्स वसुलीसाठी प्रयत्नशील आहोत. लोक पाणीपट्टी वेळेवर भरत नाही ही वस्तुस्थिती आहे. लोकांनी पाणीपट्टी न भरल्यामुळे पाणी पुरवठा योजनेचा वीज पुरवठा खंडित करण्यात आलेला आहे. त्यामुळे या योजना देखील बंद पडलेल्या आहेत. यासंबंधात विभागाने ठोस निर्णय घेणे गरजेचे आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, पाणीपट्टी वसुलीमध्ये आणि पाणी पुरवठा योजनेमध्ये मोठया प्रमाणावर अनियमितता संपूर्ण महाराष्ट्रात आहे.

भारत निर्माण योजना, जलस्वराज्य योजना, अशा ज्या योजना आहेत त्या मोठया प्रमाणावर प्रलंबित आहेत. त्या योजनेची अंमलबजावणी झालेली नाही. मुख्यमंत्री पेयजल योजना आता राज्य स्तरावरुन होणे आवश्यक आहे. पण त्या आपल्या स्तरावरुन होत नाही या सबंधात शासन निर्णय आहे. पण त्याची ख-या अर्थाने अंमलबजावणी होत नाही. खालची यंत्रणा काम करीत नाही. विभाग सूचना देखील देत नाही. पिण्याचे पाणी हे सर्वात महत्वाचे आहे. त्यापासून आपण सर्वांना वंचित ठेवत आहोत. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, ग्रामसेवकांना रुपये ५००/- ते रुपये १०००/- दंड लावलेला आहे. जी गावे नियमित बिले भरतात त्यांनाच पाणी पुरवठा करु शकतो अशा प्रकारची सिस्टिम विभाग राबविणार आहात काय, पैसे भरुन देखील त्यांना पाणी मिळत नाही. आमच्या गावावरुन त्या गावाला पाणी जाते हे पैसे न भरणा-या गावाला माहित असते. पुढील गावाने पैसे भरले की, आपल्याला पाणी मिळेल अशी त्यांची वृत्ती असते. त्यामुळे जे गाव पाणीपट्टीचे देयक अदा करते त्या गावाला पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी सिस्टिम केली पाहिजे.

एखाद दुस-या गावाने देयके न भरल्यामुळे संपूर्ण पाणी पुरवठा योजनाच बंद पडते, त्यामुळे आपण जे गाव पाणीपट्टी भरते त्यांना पाणी पुरवठा करण्यासाठी शासन विशेष योजना राबविणार आहे काय, यावर सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीस विदित केले की, असे पाहण्यात आले आहे की, रिजनल वॉटर स्कीममध्ये काही गावे पाणीपट्टी भरत नाही. जास्त गावे पाणीपट्टी भरत नसतील तर ती योजनाच बंद पडते. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, दोन गावांनी पैसे भरले नाहीत तरी इतरांना माहिती आहे की, आपण पैसा भरला नाही तर आपल्याला पाणी मिळणार आहे, त्यामुळे ते पैसा भरत नाहीत. त्यामुळे एमएसईबीचा पाणीपट्टीचा बोजा पैसा न भरणारी गावे वगळून इतर गावांवर पडतो,

त्यासाठी विभागातर्फे काही सिस्टिम राबविणार आहात काय, वॉल्व लॉक करणे, पैसे न भरणा-यांचे पाणी बंद करणे असे काही करावे. ब-याच ठिकाणी असा प्रकार घडतो. यावर सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीस विदित केले की, ज्या गावांनी पैसा दिला नाही, पाणीपट्टी दिली नाही त्यांना आपण पाणी देतच नाही. टेक्निकल सिस्टिम आहे. ज्याव्दारे आपण त्यांचे पाणी बंद करु शकतो. परंतु उर्वरित जी गावे पाणीपट्टी देतात त्यांच्या पाण्याचा जो खर्च आहे तो वाढतो. कारण मोटार मोठी बसविलेली असते त्यामुळे सुध्दा त्या बंद पडतात. त्याबद्दल विभागाने बराच सखोल अभ्यास केला आहे. ज्या योजना बंद आहेत त्यांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी मुख्यमंत्री पेयजल योजनेमार्फत आम्ही आराखडाही तयार केलेला आहे. त्यापैकी काही योजनांना मंजुरी देखील दिलेली आहे. ज्या योजना अजिबात चालू शकत नाहीत, ज्या बाबतीत ग्रामस्थांनी होकार दिलेला नाही. विभागाने ग्रामस्थांना सांगितले की, तुम्ही पाणीपट्टी भरणार असे लेखी लिहून देण्यात यावे ब-याच लोकांनी तसे लिहून दिले नाही.

प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेमध्ये काही गावांनी स्वतंत्र योजना करुन घेतली आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, प्रादेशिक आणि गावांच्या किती टक्के योजना बंद आहेत, ग्रामस्थांना पाणी मिळत नाही. यापूर्वी सांगितल्याप्रमाणे एक दोन गावांनी पैसे न भरल्याबद्दल उर्वरित गावांनी भुर्दंड का सहन करावा, याबद्दल विभागाची नेमकी भूमिका काय आहे, योजना काय करायची याबद्दल जिल्हा परिषदेचा रोल काय आहे, विभाग ग्राम पंचायतीला दंड आकारुन मोकळे होतात. जिल्हापरिषद कशाप्रकारे मॉनिटर करते, पाणीपट्टीच्या संदर्भात विभागाचे मॉनिटरायझेशन काय असणार आहे, यावर सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीला विदित केले की, जिल्हा परिषदेने देखभाल व दुरुस्ती फंड निर्माण केलेला आहे. त्यात जिल्हा परिषदेला स्वत:चा हिस्सा द्यायचा असतो. ब-याच ठिकाणी चांगल्या पध्दतीने काम चालू आहे. बऱ्याच ठिकाणी योजना बंद देखील आहेत. कदाचित ५०:५० प्रमाण असू शकेल. परंतु मोठया प्रमाणात योजना बंद आहेत. यासाठी ठोस उपाययोजना करण्यासाठी निर्णय घेण्याची आवश्यकता आहे असे विभागाला वाटते.

यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, या ठिकाणी ग्राम विकास विभाग आणि पाणी पुरवठा विभागांचे सचिव उपस्थित आहेत. बुलडाणा जिल्हयात उंद्री येथे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना आहे. त्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेतील प्रत्येक गावांनी ग्रामसभेमध्ये ठराव घेतला आहे की, आम्हाला या प्रादेशिक योजनेमध्ये सहभागी व्हायचे नाही. आम्हाला आमची स्वतंत्र पाणी पुरवठा योजना द्यावी असा ठराव दिलेला असताना देखील आपला विभाग त्या योजनेच्या दुरुस्तीसाठी १.५ कोटी रुपये मंजूर करुन सुध्दा त्याची प्रक्रिया जवळपास पूर्ण झालेली नाही. एकाही गावाला त्या योजनेमध्ये सहभागी व्हायचे नाही, पुन्हा त्या योजनेवर दुरुस्तीसाठी खर्च केल्यामुळे जास्तीत जास्त सहा महिने फायदा होईल. पुन्हा ती योजना बंद पडेल.

समितीने अशी विचारणा केली की, जर आपल्याला भविष्यात विभागीय योजना पूर्ण करावयाच्या असतील व त्या योजना विभाग चालविणार असेल त्या काही प्रमाणात यशस्वी होऊ शकतील. ग्रामस्थांना वीज देयक भरणे. देखभाल करणे शक्य होत नाही. राज्याच्या दृष्टीने या योजना करीत असताना सुस्पष्ट धोरण आखण्याची आवश्यकता आहे. योजना मंजूर झाल्यानंतर कॉस्ट रिव्हाईज किंवा रिव्हाईज अंदाजपत्रक करुन घेत असल्यामुळे शासनाचे कोटयावधी रुपयांचे यात नुकसान होत आहे. ही संपूर्ण योजना बदलण्याची नितांत आवश्यकता निर्माण झालेली आहे. जिल्हयामध्ये जेवढया योजना आहेत त्यापैकी ८० टक्के योजना सध्या बंद आहेत. १० योजना पूर्ण झाल्या तरी पाणी उपलब्ध नाही. प्रचंड मोठा भ्रष्टाचार पाणी पुरवठा योजनेमध्ये आहे. आपल्यासारख्या विभागीय सचिवांसाठी ही चिंतनीय बाब आहे. यावर सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीस विदित केले की, य बाबतीत विभागाला ठोस निर्णय घ्यायचा आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, या ठिकाणी ग्रामविकास विभागाचे सचिव देखील उपस्थित आहेत. बुलढाणा जिल्हयामध्ये पंचायती राज समितीने दौरा केल्यानंतर त्यांना ज्या काही मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या त्या आधारे त्यांनी वसुली केलेली आहे. १२ तालुक्यांच्या पंचायत समिती मार्फत आपण वसुली केल्याचे दिसून येते. काही प्रमाणात असलेली थकबाकी देखील तातडीने वसूल झाली पाहिजे याची दक्षता आपल्या स्तरावरुन घेतली गेली पाहिजे. ८० टक्के योजना विविध कारणांमुळे प्रलंबित आहेत किंवा बंद पडलेल्या आहेत. त्या जलस्वराज्य, भारत निर्माण किंवा राष्ट्रीय पेयजल योजनेतील असतील. मागील काळात शासन निर्णय झाला की, या संदर्भात गाव पातळीवर समिती स्थापन करण्यात यावी. त्याकरिता ५० टक्के निधी तत्काळ दिला गेला. आपल्या विभागातील तांत्रिक अधिकारी योग्य मार्गदर्शन करण्यास कमी पडतात.

जिल्हा परिषदेमध्ये कार्यकारी अभियंता ते उप अभियंता, सहाय्यक अभियंत्यांपासून ग्रामसेवकापर्यंत यंत्रणा आहे त्यामध्ये मोठया प्रमाणात अनियमितता झालेल्या आहेत. वेळेवर वसुली न झाल्यामुळे वीज पुरवठा खंडित करण्यात आलेला आहे. काही ठिकाणी वसुली योग्य प्रकारे होत असली तरी राज्यातील ब-याच ठिकाणच्या योजना प्रलंबित आहेत. याकरिता सचिव महोदयांनी एकत्र बसून शासन स्तरावर राज्याचे धोरण आखले पाहिजे. त्यानंतर ते इम्प्लीमेंट करण्याकरिता आपण पुढे आले पाहिजे आणि पुनर्विलोकन करता आले पाहिजे. पण ते पुनर्विलोकन होत नाही म्हणून शासन स्तरावर ख-या अर्थाने कनिष्ठ पातळीपर्यंत ती यंत्रणा कार्यरत राहत नाही. त्या गावातील शेवटच्या घटकापर्यंत पाणी किंवा राज्याच्या कल्याणकारी योजना पोहोचत नाहीत. याकरिता वरिष्ठ स्तरापासून त्याची मनमिळवणी होणे गरजेचे आहे, कारण कनिष्ठ पातळीवरील माणसाची जिल्हानिहाय मनमिळवणी झाली पाहिजे.

जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठयाचा मुख्य अधिकारी हा कनिष्ठ पातळीपर्यंत जात नाही किंवा पंचायत समिती मध्ये पुनर्विलोकन करीत नाही. पाणी पुरावठा अधिका-याची महिन्यातून किमान एक भेट देणे आवश्यक असते, परंतु त्यांनी भेटी दिलेल्या नाहीत. जिल्हयामध्ये अनियमितता मोठया प्रमाणात असल्यामुळे आपण पाणी पुरवठा खात्याचे प्रमुख या नात्याने याचे तात्काळ पुनर्विलोकन करुन तशा पध्दतीचे निर्देश निर्गमित करणे आणि ते इम्प्लीमेंट झाले की नाही हे पाहणे आपली जबाबदारी आहे. पाणी पुरवठयाच्या संदर्भात कल्याणकारी राज्य गतिमान करण्यासाठी विभागाने दक्षता घेऊन जी काही वसूली शिल्लक असेल ती जमा केली पाहिजे.

ज्या दिवशी लेखा परिक्षण झाले आणि त्यामध्ये त्यांच्याकडून काय वसूल करायचे हे निश्चित झाले तर ते कोणत्या वर्षी झालेले आहे. यावर सचिव पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीस विदित केले की, सन २००८-०९ आणि सन २०११-२०१२ या दोन्ही वर्षाचे लेखा परिक्षण नंतर झालेले आहे. सन २००८-०९ सालचे लेखा परिक्षण माहे डिसेंबर, २००९ रोजी झाले असेल आणि सन २०११-१२ चे लेखा परिक्षण डिसेंबर, २०१२ रोजी झाले. यावर समितीने अशी विचारणा केली की, त्यावेळेस हे पैसे वसूल करण्याचे निदेश दिल्यानंतर त्याची वसूली झाली. पंचायती राज समिती जिल्हा परिषदेस भेट देण्यास येणार असल्याचे समजल्यानंतर संबंधित अधिकारी/कर्मचारी वसूली काम सुरु करतात आणि थकित रक्कमा काही अंशी जमा करण्यात येतात. लेखा परिक्षकांनी सांगितल्यावर त्याच्यावर कारवाई का केली नाही, विभागाच्या सचिवांनी खात्याचे प्रमुख म्हणून त्याचा रिव्हीव्ह घेतला पाहिजे. लेखा परिक्षणाचा परिच्छेद निघाल्यानंतर त्यांची वसुली झाली पाहिजे. एवढया वर्षाचे जे पैसे आपण वसूल केले किंवा त्याचे व्याज गेले यासंदर्भात वेळेत सर्व केले असते तर हा प्रश्न उपस्थित झाला नसता. यावर सचिव, पाणी पुरवठा विभाग यांनी समितीस विदित केले की, यामध्ये व्याजाची तरतूद नाही. यावर समितीने पुढे विचारणा केली की, व्याजाची तरतूद नसेल तर मग हे पैसे कधी पण भरायचे, पैसे भरण्याची काही तरतूद आहे किंवा नाही यांचा खुलासा करावा.

**अभिप्राय व शिफारशी**

**परिच्छेद क्रमांक ४.३५९ :** पाणी पट्टी : पंचायत समिती थकित वसूली करताना विशेष प्रयत्न करताना दिसत नसल्याचे लेखा परिक्षणात आढळून आले आहे. दिनांक ३१ मार्च, २००९ अखेर १३ पंचायत समिती कडून पाणीपट्टी रक्कम थकित वसूली करणे आवश्यक आहे. वरील अपहारित पाणीपट्टीची रक्कम वसूली करणे हा अत्यंत गंभीर मुद्दा असल्याने याची सखोल चौकशी करुन व्याजासह अपहारित रक्कम संबंधितांकडून वसूल करावी असे समितीने भेटीच्या वेळी निदेशित केलेले होते.

शाळांमध्ये पाण्याची शुध्दीकरण यंत्रे बसविल्याचे निदर्शनास आले, परंतु त्यातील बहुतेक यंत्रे कार्यान्वित नाहीत. अनेक ठिकाणी पाणी पुरवठा योजना पूर्ण झाल्याचे सांगण्यात येते, परंतु योजना हस्तांतरित करुन सुध्दा पिण्याचे पाणी ग्रामस्थांना मिळत नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. ग्रामस्थांनी पाणीपट्टी न भरल्याने योजना बंद अवस्थेत आहेत. भारत निर्माण योजना, जल स्वराज्य योजना

प्रलंबित असून त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी झालेली नाही. थकित पाणीपट्टी वसूली बाबत ग्रामसेवकांना रुपये ५०० ते १०००/- रक्कमेचा दंड केलेला आहे.

उंद्री येथील प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेत सहभागी व्हायचे नाही असे ग्रामस्थांनी ग्राम सभेमध्ये ठराव पारित केला आहे. सदरहू पेयजल योजनेत रुपये १.५० कोटीची रक्कम मंजूर केली होती, तरीही ८० टक्के योजना विविध कारणास्तव बंद आहेत. योजनेची अंमलबजावणी चांगल्याप्रकारे करावयाची असल्यास गाव पातळीवर समिती स्थापन करण्याची आवश्यकता असून पाणी पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी महिन्यातून एकदा भेट देऊन त्या योजनेचा आढावा घेऊन योजना कार्यान्वित राहण्याबाबत प्रयत्नशिल राहणे आवश्यक असल्याचे समितीचे मत आहे.

लेखा परिक्षण झाल्यानंतर आणि पंचायती राज समिती जिल्हयाला भेटी देण्यास येणार असल्याचे समजल्यानंतर संबंधित अधिकारी/कर्मचारी वसूलीचे काम करतात आणि थकित रक्कम काही अंशा जमा करण्यात येते याबाबत समितीने तीव्र नाराजी व्यक्त करते.

पाणीपट्टी थकबाकी वसूली बाबत कामात निष्काळजीपणा किंवा चुकीचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना अभय मिळते असे समितीला प्रकर्षाने जाणवते. सर्व संबंधित प्रशासकीय विभागाने वेळीच कार्यवाही केल्यास अशा अनिष्ट बाबींना मोठया प्रमाणात आळा बसेल व त्यायोगे राज्यात विविध कल्याणकारी योजना राबविण्यामध्ये गती येऊन शासनाच्या धोरणाची निश्चितच फलनिष्पत्ती होईल असे समितीचे मत आहे.

**जी गावे नियमित पाणी पट्टी भरणा करतात त्यांनाच पाणी पुरवठा होईल अशी उपाययोजना करणे आवश्यक आहे. एका गावावरुन दुसऱ्या गावाला पाणी जाते हे पाणीपट्टी न भरणाऱ्या गावाला माहित असते. पुढील गावाने पाणीपट्टी भरली की आपल्याला आपसूकच पाणी मिळते अशी त्या गावातील लोकांची धारणा होवून ते पाणीपट्टी थकीत ठेवतात, म्हणून जे गाव पाणीपट्टी देयक अदा करते त्या गावालाच पाणी उपलब्ध करुन देण्यासंदर्भात विभागाने निर्णय घ्यावा व तद्नुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यांत पाठवावा अशी समितीची शिफारस आहे.**

**प्रकरण पाच**

**जिल्हा परिषद, बुलढाणा**

**बुलढाणा जिल्हा परिषदेमधील अपहार/अफरातफर व इतर नियमबाहय बाबी**

**(परिच्छेद ४.३९८/५.२९/५.५० (२) (सन २०११-२०१२)**

**४.३९८ (४) सन २००९-१० वर्षात पंचायत समित्यांमध्ये झालेल्या इतर नियमबाहय बाबी :-**

| अ.क्र. | नियमबाहय बाबींचे स्वरुप | जि.प. चे नांव | पं.स.चे नाव | लेखापरिक्षण अहवालातील परि.क्र. | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| ४ | नोंदवहयांबाबत | बुलडाणा | मलकापूर | ७ | १४,५१,८३२/- |

जिल्हा परिषद बुलढाणा अंतर्गत पंचायत समिती मलकापूर येथे सन २०११-१२ अखेर नोंदवहीमध्ये रक्कम रुपये १४,५१,८३२/- रुपयांच्या रक्कमेबाबत खुलासा करण्यात आलेला नाही ? **उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, बुलढाणा यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सन २०११-२०१२ अखेर प्रलंबित एकूण रु. १४,५१,८३२/- ठेव रक्कमेपैकी रु. ५,४५,४६३/- एवढया रक्कमा प्रदान करण्यात आलेल्या आहेत व रु. ४८,६७६/- एवढया रक्कमेच्या ठेवी व्यपगत करण्यात आलेल्या आहेत. उर्वरित रु. ८,५७,६९३/- एवढया रक्कमेचे प्रदान माहे जुलै, २०१२ पासुन जिल्हा केंद्रीय सहकारी बँक बुलढाणा बंद पडल्यामुळे करता आले नाही. उपरोक्त रुपये ८,५७,६९३/- प्रलंबित ठेवीबाबत योग्य ती कार्यवाही जिल्हा केंद्रीय सहकारी बँकेचे व्यवहार सुरु झाल्यावर विनाविलंब करण्यात येईल.

**४.३९८(६) सन २००९-१० वर्षात पंचायत समित्यांमध्ये झालेल्या इतर नियमबाहय बाबी :-**

| अ.क्र. | नियमबाहय बाबींचे स्वरुप | जि.प. चे नांव | पं.स.चे नाव | लेखापरिक्षण अहवालातील परि.क्र. | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| ६ | ठेवी व्यपगत न केलेबाबत | बुलडाणा | चिखली | ५२ | ४५,१६,६०६ |
| ६ | ठेवी व्यपगत न केलेबाबत | बुलडाणा | देऊळगांव राजा | ४९ | ३३,२५,०१२/- |
| ६ | ठेवी व्यपगत न केलेबाबत | बुलडाणा | लोणार | ४० | १८,७३,७०८/- |
| ६ | ठेवी व्यपगत न केलेबाबत | बुलडाणा | सिंदखेडराजा | ३९ | ३३,०५,५८४/- |

जिल्हा परिषद बुलडाणा अंतर्गत सन २००९-१० वर्षात पंचायत समिती चिखली येथे लेखा परिक्षण अहवालातील परि क्र. ५२ नुसार रक्कम रु. ४५,१६,६०६/- पंचायत समिती देऊळगांव राजा येथे लेखा परिक्षण अहवालातील परि. क्र. ४९ नुसार रक्कम रु. ३३,२५,०१२/-, पंचायत समिती लोणार येथे लेखा परिक्षण अहवालातील परि. क्र.४० नुसार रक्कम रु. १८,७३,७०८/-, पंचायत समिती सिंदखेड राजा येथे लेखा परिक्षण अहवालातील परि.क्र. ३९ नुसार रक्कम रु. ३३,०५,५८४/- ठेवी व्यपगत करण्यात आल्या आहेत याबातचा खुलासा करण्यात यावा ?

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, बुलडाणा यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

तीन वर्षावरील प्रलंबित ठेवी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम २१९ नुसार तीन वर्षावरील व्यपगत करण्यास पात्र प्रलंबित ठेवी सन २००५-०६ ते सन २०१०-११ पर्यंतच्या संपूर्ण ठेवी रु. ५,३१,१९४/- व्यपगत करण्यात आल्या आहेत.

लेखा आक्षेपात दर्शविलेली रक्कम रु ३३,२५,०१२/- माहे मार्च, २०१२ पर्यंत प्रलंबित आहे. सदर प्रलंबित रक्कमेमधुन रु. ३,००५,०२६/- समायोजित करण्यात आले असून रु. ३,१९,९८६/- एवढी रक्कम प्रलंबित आहे.

लेखा आक्षेपात दर्शविलेल्या प्रलंबित ठेवी रु. १८,७३,७०८/- पैकी तीन वर्षावरील म्हणजे माहे मार्च, २००९ पर्यंत प्रलंबित ठेवी १,२७,८३०/- एवढया प्रलंबित होत्या. हया तीन वर्षापेक्षा जास्त प्रलंबित रु. १,२७,८३०/- च्या रक्कमा कार्यालयीन आदेश क्र. ९५७/१३ दिनांक ३०.३.२०१३ नुसार व्यपगत करुन मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि.प., बुलढाणा यांचेकडे पाठविलेले आहे.

माहे ३१ मार्च, २०१२ अखेर व्यपगत न केलेल्या ठेवी रु ३३,०५,५८४/- पैकी मार्च २०१५ अखेर पर्यंत रु. २३,१४,६८१/- चे प्रदान करण्यात आले आहे. उर्वरित रु. ९,९०,९०३/- चे लेखा संहिता १९६८ चे नियम २१९ नुसार व्यपगत करण्यात आले आहे.

**४.३९८(११) सन २००९-१० वर्षात पंचायत समित्यांमध्ये झालेल्या इतर नियमबाहय बाबी :-**

| अ.क्र. | नियमबाहय बाबींचे स्वरुप | जि.प. चे नांव | पं.स.चे नाव | लेखापरिक्षण अहवालातील परि.क्र. | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| ११ | अपहार/अफरातफर प्रकरणे | बुलडाणा | बुलडाणा | ३७ | २,९३,५३६/- |
| ११ | अपहार/अफरातफर प्रकरणे | बुलडाणा | नांदुरा | ४० | ७६,२९६/- |
| ११ | अपहार/अफरातफर प्रकरणे | बुलडाणा | जळगांव जामोद | २९ | १०,४८८/- |
| ११ | अपहार/अफरातफर प्रकरणे | बुलडाणा | जळगांव जामोद | ३६ | ३,२८,९३३/- |
| ११ | अपहार/अफरातफर प्रकरणे | बुलडाणा | मेहकर | २८ | ३९,४६,६८२/- |
| ११ | अपहार/अफरातफर प्रकरणे | बुलडाणा | मलकापुर | १५ | ५,५३,८१८ |
| ११ | अपहार/अफरातफर प्रकरणे | बुलडाणा | लोणार | ३३ | ४६,३३,०२८/- |

जिल्हा परिषद बुलडाणा अंतर्गत सन २००९-१० वर्षात पंचायत समिती नांदुरा येथे लेखा परिक्षण अहवालातील परि क्र. ४० नुसार रक्कम रु.७६,२९६ /- पंचायत समिती जळगाव जामोद येथे लेखा परिक्षण अहवालातील परि. क्र. २९ नुसार रक्कम रु. १०,४८८/-, पंचायत समिती जळगांव जामोद येथे लेखा परिक्षण अहवालातील परि. क्र.३६ नुसार रक्कम रु. ३,२८,९३३/-, पंचायत समिती मेहकर येथे लेखा परिक्षण अहवालातील परि.क्र. २८ नुसार रक्कम रु. ३९,४६,६८२/- पंचायत समिती मलकापूर येथे लेखा परिक्षण अहवालातील परि क्र. १५ नुसार रक्कम रु.५,५३,८१८/- पंचायत समिती लोणार येथे लेखा परिक्षण अहवालातील परि क्र. ३३ नुसार रक्कम रु.४६,३३,०२८/- इतक्या रक्कमेची अपहार/अफरातफर प्रकरणे लेखा परिक्षणात निदर्शनास आली आहेत ?

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, बुलडाणा यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

परिच्छेद क्रमांक ३७ मध्ये नमुद सामान्य निधीची ०७ व योजना निधीची ०९ प्रकरणे असे एकूण १६ प्रकरणे प्रलंबित होती. सदर १६ प्रकरणात संशयित रक्कम रुपये २,९३,५३६/- एवढी प्रलंबित होती.

तथापी १६ प्रकरणात अंतिम चौकशी अहवालानुसार रुपये २,५७,०९५/- एवढी रक्कम वसूल पात्र निश्चित झालेली आहे.

१६ प्रकरणात वसुलपात्र निश्चित झालेली रक्कम रुपये २,५७,०९५/- संबंधितांकडुन १०० टक्के वसूल करण्यात आलेली असून १६ प्रकरणे नस्तीबध्द झालेली आहेत.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, बुलडाणा यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

**सदर परिच्छेदात गुंतलेली रक्कम रु. ७६,२९६/-**

| अ.क्र. | योजनेचे नाव | एकूण प्रलंबित प्रकरणे | वसूल पात्र रक्कम | वसूल केलेली रक्कम | प्रलंबित वसुली | प्रलंबित प्रकरण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सामान्य निधी | ४ | ७६,२९६/- | १२,२३१ | ६४,०६५ | ३ |

सविस्तर तपशिल खालील प्रमाणे

| अ.क्र. | ग्रा.पं. चे नांव | जबाबदार कर्मचारी | प्रलंबित रक्कम सामान्य निधी | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | वडी | एन.पी.गोटे | ५६,१६२ | सेवेतुन बडतर्फ केले |
| २ | खडदगांव | म.वा.भेंडे | ४,६६५ | वसुली सुरु आहे |
| ३ | दादगांव | सी.ए.डाबेराव | ३,२३८ | वसुली सुरु आहे |
| | एकुण | | ६४,०६५ | |

(१) श्री.एन.पी.गोटे, ग्रामसेवक सेवेतून बडतर्फ केले आहे.
(२) खडदगांव येथील श्री. म.वा.भेंडे, सेवानिवृत्त ग्रामसेवक यांचेकडील वसुली सुरु झाली आहे.
(३) दादगांव येथील श्री. सी.ए. डाबेराव, ग्रामसेवक यांचेकडील वसुली सुरु झाली आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, बुलडाणा यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

जळगांव जामोद पंचायत समितीत अंतर्गत पशु वैद्यकीय दवाखान्याची उपरोक्त सेवा शुल्क रु. १०,४८८/- रक्कम भरण्याची वसुलीची कारवाई करण्यात आली असून सदर रक्कम खाते क्रमांक ३१५२३६२१७१८ मध्ये भरणा करण्यात आलेली आहे व बँकेत भरणा केल्याबाबतची पोच पावती उपलब्ध आहे.

सन २०११-१२ या वर्षात लेखा परिक्षण अहवालामध्ये दर्शविलेली अफरातफर प्रकरणातील प्रलंबित रक्कम रु. ३,२८,९३३/- एवढी असून चौकशी अंती प्रत्यक्षात वसुलपात्र रक्कम रु. २,८४,९२०/- एवढी असून त्यापैकी रु. ९,०३३/- एवढी वसूल करण्यात आली असून प्रलंबित रक्कम रु. २,७५,८८७/- वसुलीची कार्यवाही करण्यात येत आहे.

लेखा परिक्षण नंतर अद्ययावत केलेल्या नोंदीनुसार ज.रो.यो/ज.ग्रा.सं.यो./ सं.ग्रा.रो.यो. निधी संदर्भात ३५ प्रकरणांची अफरातफरी मध्ये रुपये ४२,९०,०२५/- एवढी रक्कम गुंतलेली असून ३५ पैकी ३३ प्रकरणांची चौकशी करण्यात आलेली आहे. चौकशी केलेल्या ३३ प्रकरणातील गुंतलेल्या रक्कमेपैकी रुपये २१,५५,१४५/- एवढी रक्कम वसुलपात्र असून रुपये १९,५५,६८०/- एवढी रक्कम वसुलपात्र ठरत नाही. वसुलपात्र रक्कमेतून आता पर्यंत रुपये ३,४४,३६१/- एवढी रक्कम वसूल करण्यात आली असून चौकशी प्रकरणातील रुपये ९,६२,३४१/- एवढी रक्कम वसूल होणे बाकी आहे व चौकशी राहिलेल्या ०३ प्रकरणातील रुपये १,७९,२००/- एवढया संशयित रक्कमेची प्राथमिक चौकशी होणे बाकी आहे,परंतु वसुली कार्यवाही सुरु आहे.

एकूण ०६ प्रकरणात समाविष्ट रक्कम रु. ५,५३,८१८/- मधील एका प्रकरणामधील रुपये ३,२४,२४०/- एवढी रक्कम चुकीने वसूल केलेल्या रक्कमेत समाविष्ट केलेली आहे, ती घेण्याची आवश्यकता नाही. उर्वरित ०५ प्रकरणांमधील समाविष्ट रु. २,२९,५७८/- ची वसुली पुर्ण झालेली आहे. तसेच संबंधित रक्कमांचा योग्य खाती भरणा केलेला आहे. संबंधित प्रकरणांचे नस्ती पडताळणी करिता उपलब्ध आहेत.

पंचायत समिती लोणार अंतर्गत सन २०११-२०१२ अखेर ४९ प्रकरणे होती. सदर प्रकरणात रुपये ४६,३३,०२८/- एवढी रक्कम गुंतलेली होती त्या सर्व प्रकरणाची प्राथमिक चौकशी झाली असून अंती रुपये ४०,८८,०८१/- एवढी रक्कम वसुलपात्र आढळून आली नाही. वसुलपात्र रुपये ५,४४,९४७/- रक्कम एवढी आढळून आली असून ती १०० % वसूल करण्यात आली आहे.

**४.३९८(११) सन २००९-१० वर्षात पंचायत समित्यांमध्ये झालेल्या इतर नियमबाहय बाबी :-**

| अ.क्र. | नियमबाहय बाबींचे स्वरुप | जि.प. चे नांव | पं.स.चे नाव | लेखापरिक्षण अहवालातील परि.क्र. | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| २२ | टँकरने पाणी पुरवठा केलेल्या अनियमिततेबाबत | बुलडाणा | शेगांव | २८ | ४,०२,४२२/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, बुलडाणा यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता नियम ४४ (१) प्रमाणे एका वर्षावरील बिलाची अदायगी करिता उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) यांची कार्योतर मंजुरीत घेण्यात आली आहे.
(२) टँकरचे सर्व लॉगबुक तपासणी करिता उपलब्ध आहेत.
(३) टँकरने पाणी पुरवठा केल्याची वेळ लॉगबुक मध्ये नोंदविली असून त्यावर सरपंच/सचिव व प्रत्यक्षात पाणी भरणा-या महिलांची स्वाक्षरी घेण्यात आलेली आहे. सरपंच व सचिव यांचे स्वाक्षरीचे पाणी पुरवठा केल्याबाबतचे प्रमाणपत्र उपलब्ध आहे.
(४) परिच्छेदामध्ये नमुद केल्याप्रमाणे क्रमांक १, ३, ४ व ६ देयकातील दर व मात्रा यांची किंमती पेक्षा जास्त प्रदान करण्यात आलेले नाही. शासकीय नियमानुसार व योग्य रितीने टँकरचे देयके प्रदान करण्यात आलेले असून कोणत्याही प्रकारची तफावत नाही.

**४.३९८(२३) सन २००९-१० वर्षात पंचायत समित्यांमध्ये झालेल्या इतर नियमबाहय बाबी :-**

| अ.क्र. | नियमबाहय बाबींचे स्वरुप | जि.प. चे नांव | पं.स.चे नाव | लेखापरिक्षण अहवालातील परि.क्र. | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| २३ | योजनेतील अनियमितता | बुलडाणा | मलकापुर | २१ | २१,६००/- |
| २३ | योजनेतील अनियमितता | बुलडाणा | मलकापुर | २८ | १,८९,९११/- |

जिल्हा परिषद बुलढाणा अंतर्गत पंचायत समिती मलकापूर येथे सन २००९-१० या वर्षात योजनेतील अनियमिततेत लेखापरिक्षण अहवालातील परि.क्र. २१ व २८ नुसार अनुक्रमे रु. २१,६००/- व रु. १,८९,९११/- रुपयांच्या रक्कमेबाबत खुलासा करण्यात आलेला नाही ?

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, बुलडाणा यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) नियोजनाप्रमाणे जनजागरण अभियानाकरिता रथ तयार करुन प्रचार प्रसिध्दी साठी अल्प दिवसांचा कालावधी शिल्लक होता, त्यामुळे दरपत्रके मागविणे शक्य झाले नाही. त्यामुळे प्रचलित बाजार भावाप्रमाणेच सदर घडी पत्रिका छपाई व वाहन भाडे यावर खर्च करण्यात आलेला आहे.

(२) साहित्याची नोंद पंचायत शाखेतील रजिस्ट्ररला घेण्यात आलेली आहे. सदर रजिस्ट्रर हे छायांकित प्रतीसह जोडले आहे. नमुना ३३ पंचायत शाखेकडे नसल्यामुळे रजिस्ट्ररला नोंद घेतली आहे.

(३) मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे पत्र क्र.१५५७, दिनांक १८.०२.२०१२ नुसार घडी पत्रिका ही प्रचार व प्रसिध्दी करिता वाटण्याचे आदेश होते, करिता ती आवश्यक बाब आहे. संबधित कालावधीत पंचायत समिती, मलकापुर व मोताळा मधील गावांमधुन रथ फिरविण्यात आला असून त्याच वेळेस घडी पत्रिका वाटप केल्या आहेत. याबाबत मूळ रजिस्ट्रर उपलब्ध आहे. त्यावर गट विकास अधिकारी यांनी प्रमाणित केले आहे, करिता वसुली केलेली नाही.

(४) संबंधित कालावधीत वाहन फिरले आहे. त्यावेळेस उपस्थित सरपंच/ग्रामसेवक/उपसरपंच/ग्राम कर्मचारी/ग्राम सदस्य यांपैकी जे हजर असतील यांची स्वाक्षरी घेतली आहे. नोंदी रजिस्ट्ररला उपलब्ध आहेत.

(५) पुरवठा आदेश तपासणीचे वेळेस सादर करावयाचे अनवधानेने राहून गेले, तो आता उपलब्ध आहे.

अ) श्री. नामदेव पुंजाजी वानखेडे, रा. माकनेर यांनी विहिरीचे काम सुरु केले होते. सदर कामाचे मुल्यांकन रु. २३,०१४/- एवढे आहे व तेवढीच रक्कम त्यांना प्रदान केलेली आहे. याबाबत मोजमाप पुस्तिका उपलब्ध आहे. त्यांचेशी या कार्यालयाने रु. १००/- चे बाँडवर करुन घेतलेल्या करारनाम्यात सदर विहिरीचे काम दिनांक ३१ मार्च, २०१२ पुर्वी करुन देण्याबाबत लिहुन घेतले आहे. त्यांना लेखीपत्र क्र. २२२३, दिनांक २१.१२.२०१२ नुसार व पत्र क्र. ०८, दिनांक १२.०१.२०१२ नुसार तसेच वारंवार तोंडी सुचना देऊन सदर विहिरीचे काम हे दिनांक ३१ मार्च, २०१२ पुर्वी करणेबाबत पत्राव्दारे सुचित केलेले आहे. तरी सुध्दा सदर लाभार्थीने विहिरीचे काम विहित मुदतीत पुर्ण केलेले नाही. संबंधित लाभार्थी यांचे निधन झालेले आहे. त्यामुळे विहीरीचे काम अपूर्ण आहे.

ब) श्री. संदिप हरी चिमकर, रा. नरवेल यांचे विहिरीचे काम पुर्ण झालेले असून त्याबाबतचे विहीर पुर्णत्वाचे प्रमाणपत्र दप्तरी उपलब्ध आहे.

क) सौ. ताईबाई भिमराव इंगळे यांना देण्यात आलेले जादा अनुदान रु. ३७९७/- रक्कम वसूल करुन शासन खाती भरणा केला आहे.

ड) सन २०१०-११ मध्ये मंजुर १७ पैकी नविन ११ विहिरींचे काम पूर्ण झालेले आहे. पुर्णत्वाचे प्रमाणपत्र व सात-बारा दप्तरी उपलब्ध आहे. ०५ विहिरीचे काम सुरु करण्यात आले नाही. याबाबत संबंधितांना पत्र व्यवहार करण्यात आलेला आहे. एक विहीर अपूर्ण अवस्थेत आहे.

इ) सन २०११-१२ मध्ये फेरबदलासह ११ नविन व ०६ विहीर दुरुस्तीची कामे मंजुर होती, पैकी १० नविन विहीर पुर्ण झालेल्या आहेत. विहिरीचे पुर्णत्वाचे प्रमाणपत्र व ७/१२ दप्तरी उपलब्ध आहे. उर्वरित एका विहिरीचे काम अद्याप सुरु झालेले नाही, तसेच ०६ जुन्या विहिरी दुरुस्तीचे कामे पुर्ण झालेली आहेत. मोजमाप पुस्तिका दप्तरी उपलब्ध आहे. तसेच श्री. संदीप बुधाजी भगत, रा. पान्हेरा, श्री. अशोक राजाराम इंगळे, रा. दाताळा व सौ. वच्छलाबाई शेगोकार, रा. हिंगणकाजी यांच्या विहिरीच्या जमिनीच्या पोताप्रमाणेच अनुदान हे खोदकामावरच खर्च झालेले आहे. सदर लाभार्थी यांची निवड होणे, अंदाजपत्रक तयार होणे व प्रत्यक्षात काम सुरु होणे या दरम्यानचे कालावधीत विहिरीचे बांधकाम केलेले होते. करिता त्यांना मंजुर असलेली रक्कम फक्त खोदकामावरच नियमानुसार खर्च करण्यात आली, त्यामुळे विहिरीच्या सिंचन क्षमतेत वाढ झाली आहे. याबाबत कृषी अधिकारी विघयो यांचे पाणी लागण्याचे प्रमाणपत्र दप्तरी उपलब्ध आहे.

ई) विघयो अंतर्गत नविन विहिरीचे लाभार्थी निवड करतांना जिल्हा स्तरीय समिती स्थापन करण्यात आलेली आहे. त्या समितीमध्ये मा. वरिष्ठ भुवैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण यंत्रणा, बुलढाणा हे सदस्य आहेत. तशी त्यांची स्वाक्षरी मंजुर झालेल्या सन २०११-१२ च्या यादीवर घेण्यात आल्या आहेत.

उ) जिल्हा कृषि अधिकारी (विघयो) यांनी सदर सन २०११-१२ मधील विहिरीची तपासणी केलेली आहे. संबंधित मोजमाप पुस्तिकेत नोंद आहे.

ऊ) पुर्ण झालेल्या विहीरीचे ७/१२ वर नोंद घेतलेली असून दप्तरी उपलब्ध आहे.

**४.३९८ (२४) सन २००९-१० वर्षात पंचायत समित्यांमध्ये झालेल्या इतर नियमबाहय बाबी :-**

| अ.क्र. | नियमबाहय बाबींचे स्वरुप | जि.प. चे नांव | पं.स.चे नाव | लेखा परिक्षण अहवालातील परि.क्र. | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| २४ | नियमबाहयपणे शासकीय अनुदानाच्या रक्कमा ठेव लेखाशिर्षाखाली ठेवणे | बुलडाणा | सिंदखेड राजा | ३० | १५,९५,०३५/- |

जिल्हा परिषद बुलडाणा अंतर्गत पंचायत समिती सिंदखेड राजा येथे सदर रक्कम नियमबाहयपणे शासकीय अनुदानाच्या रक्कमा ठेव लेखाशिर्षाखाली का ठेवण्यात आली ?

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, बुलडाणा यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सदर परिच्छेदामध्ये नमुद रक्कमेचे लेखा शिर्ष निहाय वर्गीकरण करता न आल्याने सदर रक्कम रु. १५,९५,०३५/- ठेव लेखा शिर्षाखाली ठेवण्यात आल्या.

३१ मार्च, २०१२ अखेर व्यपगत न केलेल्या ठेवी रु. ३३,०५,५८४/- पैकी मार्च, २०१५ अखेर पर्यंत रु. २३,१४,६८१/- रक्कमेचे प्रदान करण्यात आले आहे. सदर प्रदान करण्यात आलेल्या रक्कमेमध्ये परिच्छेदामध्ये नमूद १५,९५,०३५/- चे प्रदान समाविष्ट आहे.

**कळमेश्वर येथील पाणी पुरवठा व सामान्य निधी जमेतून करण्यात आलेल्या खर्चामधील गंभीर अनियमितता :- (परिच्छेद क्र. ५.२९ (सन २०११-२०१२)**

**ग्राम पंचायत, कळंबेश्वर, पंचायत समिती, मेहकर, जिल्हा बुलडाणा (परिच्छेद क्र.५) :- ग्राम पंचायतीने विविध ६३ कामांवर रुपये ३,२३,३३६/- रक्कम इतका खर्च केला आहे. याबाबत खालील प्रमाणे आक्षेप आहेत.**

१) मुंबई ग्राम पंचायत अधिनियम, १९५८ चे कलम ४५ (१) तसेच ग्राम सुची बाब क्रमांक ५४ प्रमाणे लेख्याची निगा राखणे व कलम ६२ (४) अन्वये लेखे लिहिण्याची जबाबदारी सचिवाची ठरते. अधिनियमात अंतर्गत लेखे देणे व हिशेब सादर करण्याची जबाबदारी सचिवाची आहे. ग्रामनिधीचे संरक्षण तथा विधी संमत विनियोग करण्याची अत्यंत महत्वपुर्ण जबाबदारी सचिवाची आहे.

२) ६३ कामांमध्ये नमुद बाबीनुसार कामाच्या कालावधीत निधी खर्च करीत असताना सचिवाने निष्काळजीपणा केल्याचे दिसून येत आहे, त्यामुळे संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन रक्कम रुपये ३,२३,३३६/- वसूल करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, बुलडाणा यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

ग्राम पंचायत, कळंबेश्वर, पंचायत समिती, मेहकर येथे सामान्य निधी व पाणी पुरवठा निधीचे सन २००७-०८ ते २००९-१० या आर्थिक वर्षाचे लेखा परिक्षण झालेले आहे. सदर लेखा परिक्षण अहवाल परिच्छेद क्रमांक ५ नुसार ६३ कामांमध्ये ३,२३,३३६ एवढी रक्कम संबंधित सचिवाकडून वसूल करणे नमुद आहे.

या बाबतीत अंतिम चौकशी अंती ३,२३,३३६ रुपयेपैकी ६५,०९२ एवढी रक्कम वसूल पात्र आहे. या बाबतचा सविस्तर तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | गुंतलेली रक्कम | वसूल पात्र नसलेली रक्कम | वसूल पात्र रक्कम | जबाबदार व्यक्ती | पदनाम | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३,२३,३३६ | २,५८,२४४ | ६५,०९२ | बी.के.अंभोरे | ग्रामसेवक | ५९,६८७ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | | | | एस.बी.मवाळ | ग्रामसेवक | ५५ |
| ३ | | | | बि.ई.निकम | ग्रा.प.लिपिक | २,८५० |
| ४ | | | | ए.एम.वाघमारे | पाणी पुरवठा कर्मचारी | २,५०० |
| ५ | ३,२३,३३६ | २,५८,२४४ | ६५,०९२ | | | ६५,०९२ |

वरील प्रमाणे वसूल पात्र रक्कमेचा भरणा संपुर्णपणे झालेला आहे.

**५.५०(२) ६७३, ६७४ ग्राम पंचायती मधील इतर अनियमितता :-**

| अ.क्र. | नियमबाहय बाबींचे स्वरुप | जि.प. चे नांव | पं.स.चे नाव | ग्रा.पं.चे नांव | लेखापरिक्षण अहवालातील परि.क्र. व लेखापरिक्षण अहवाल वर्ष | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | प्रमाणकाशिवाय खर्च | बुलडाणा | मेहकर | पांगरखेड तेली | परि.क्र.-४ २००७-०८ ते २००९-१० | १,२३,७८३/- |

पंचायत समिती बुलढाणा अंतर्गत ग्राम पंचायत पांगरखेड तेली, पंचायत समिती, मेहकर येथे सन २००७-०८ ते २००९-१० या आर्थिक वर्षाचे लेखा परिक्षण केले असता अहवाल मूळ परिच्छेद क्र. ४ मध्ये नमुद केल्याप्रमाणे १,२३,७८३/- रुपयाचे प्रमाणकाशिवाय खर्च का करण्यात आला आहे ?

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, बुलडाणा यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

ग्राम पंचायत पांगरखेड तेली, पंचायत समिती, मेहकर येथे सन २००७-०८ ते २००९-१० या आर्थिक वर्षाचे लेखा परिक्षण झालेले आहे. लेखा परिक्षण अहवाल मूळ परिच्छेद क्र. ४ मध्ये नमुद केल्याप्रमाणे १,२३,७८३/- रुपयाचे प्रमाणकाशिवाय खर्च केलेला असल्याचे नमुद केले आहे.

सदर बाबतीत ग्राम पंचायत, पांगरखेड येथील आवश्यक अभिलेख्यांची पडताळणी केली असता १,२३,७८३/- रुपये पैकी १,१७,०००/- रुपयाची प्रमाणके दप्तरी उपलब्ध असल्याचे आढळले आहेत. उर्वरित रक्कम ६,७८३/- रुपयांपैकी ४,८१०/- रुपये कु. एन.ए.राठोड व १९७३ रुपये श्री. एन.वाय.हिरगुडे यांच्याकडुन वसुलपात्र आहेत. सदर वसुलपात्र रक्कम संबधित जबाबदार सचिवाकडुन वसूल करण्यात आलेली आहे.

**५.५०(२) ६७३, ६७४ ग्राम पंचायती मधील इतर अनियमितता :-**

| अ.क्र. | नियम बाहय बाबींचे स्वरुप | जि.प. चे नांव | पं.स.चे नाव | ग्रा.पं.चे नांव | लेखापरिक्षण अहवालातील परि.क्र. व लेखापरिक्षण अहवाल वर्ष | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | प्रमाणकाशिवाय खर्च | बुलडाणा | मेहकर | सोनार गव्हाण | परि.क्र.-४ २००७-०८ ते २००९-१० | १,२९,१२०/- |

पंचायत समिती बुलडाणा अंतर्गत ग्राम पंचायत सोनारगव्हाण पंचायत समिती, मेहकर येथे सन २००७-०८ ते २००९-१० या आर्थिक वर्षाचे लेखा परिक्षण केले असता अहवाल मूळ परिच्छेद क्र. ४ मध्ये नमुद केल्याप्रमाणे १,२९,१२०/- रुपयाचे प्रमाणकाशिवाय खर्च का करण्यात आला आहे?

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, बुलडाणा यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

ग्राम पंचायत सोनार गव्हाण, पंचायत समिती, मेहकर येथे सन २००७-०८ ते २००९-१० या आर्थिक वर्षाचे लेखा परिक्षण झालेले आहे. लेखा परिक्षण अहवाल परिच्छेद क्र. ४ मध्ये नमुद केल्याप्रमाणे १,२९,१२०/- रुपयाचे प्रमाणकाशिवाय खर्च केलेला असल्याचे नमुद केले आहे.

सदर बाबतीत ग्राम पंचायत,सोनार गव्हाण येथील आवश्यक अभिलेख्यांची पडताळणी केली असता १,२९,१२०/- रुपये पैकी १,२१,७३०/- रुपयाची प्रमाणके दप्तरी उपलब्ध असल्याचे आढळले आहेत. उर्वरित रक्कम ७,३९०/- रुपये वसूल पात्र आहेत. सदर वसूल पात्र रक्कम संबधित जबाबदार सचिवाकडून वसूल करण्यात आलेली आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

बुलडाणा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १८ जानेवारी, २०१६ रोजी साक्ष घेतली असून त्यावेळी समितीने अशी विचारणा केली की, पंचायत समिती, मलकापूरकडे सन १९९९ ते २०१०-११ या कालावधीच्या एकूण रु.१४,५१,८३२/- इतक्या अदत्त ठेवी व्यपगत न करण्याची कारणे काय आहेत, तसेच जिल्हा सहकारी बँक बुलढाणा बंद होण्यापूर्वीची जिल्हा परिषदेकडील ठेवींची व ठेवींच्या परताव्याची स्थिती काय होती, यावर गट विकास अधिकारी, मलकापुर यांनी समितीस विदित केले की, १४ लाख ५१ हजार रुपयांपैकी ५ लाख ४५ हजार रुपये वसूल झालेले आहेत. तसेच अह.परि.क्र.४.३९८(६)/चिखली सन २०११-१२ (ठेवी व्यपगत न केल्याबाबत) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांनी समितीस विदित केले की, ठेवी व्यपगत करण्यात आलेल्या आहेत. तसेच अह.परि.क्र.४.३९८(६)/देऊळगांव राजा, ४.३९८(६)/लोणार व ४.३९८(६)/ सिंदखेड राजा यावर समितीने असे मत व्यक्त केले की, अ.क्र.७६, ७७ व ७८ हे तिन्ही मुद्दे वरील मुद्याप्रमाणेच आहेत. तसेच अह.परि.क्र.४.३९८(११) (अपहार/अफरातफर प्रकरणे) संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलडाणा यांनी समितीस विदित केले की, १६ प्रकरणांमध्ये गुंतलेली रक्कम रु.२,५७,०९५/- वसूल केलेली आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, व्याजासह रक्कम वसूल केलेली आहे काय, तसेच स्थानिक निधी लेखा अधिकारी यांनी विचारणा केली की, अफरातफर प्रकरणांचे स्वरुप काय आहे, यावर गट विकास अधिकारी, बुलडाणा यांनी समितीस विदित केले की, सामान्य निधीची ७ प्रकरणे आणि योजनांची ९ प्रकरणे अशी एकूण १६ प्रकरणे वेगवेगळ्या ग्राम पंचायती मधील आहेत. लेखा परिक्षण झाल्यापासून म्हणजे सन २०१०-११ पासून चौकशी करुन वसुली करणे चालू होते. काही प्रकरणांमधील रक्कम वसूल व्हावयाची होती. परंतु, पंचायती राज समिती येणार असल्यामुळे तत्काळ वसुली करुन ती प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. वसुली पूर्ण झाल्यानंतर संबंधित ग्रामसेवकांना माझ्या स्तरावर सक्त ताकीदची नोटीस दिलेली आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, आपण वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तसा प्रस्ताव का पाठविला नाही, अपहाराच्या प्रकरणांमध्ये गुंतलेली रक्कम व्याजासह वसूल करण्यात यावी, असा आपण निर्णय घेतलेला आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलडाणा यांनी समितीस विदित केले की, व्याजासह रक्कम वसूल केलेली आहे किंवा कसे हे तपासण्यात येईल.

नागपूर, अमरावती जिल्हा दौऱ्याच्या वेळी समितीने सूचना दिलेल्या आहेत की, ज्या प्रकरणांमध्ये रक्कम वसूल होत नाही अशा प्रकरणी संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल करावा. आपण देखील अशी कारवाई प्रस्तावित करावी. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, आपण पंचायती राज समिती येणार असल्यामुळे अपहाराच्या प्रकरणांमध्ये गुंतलेली रक्कम वसूल केलेली आहे. मग पंचायती राज समितीचा दौरा होत नाही तोपर्यंत ती रक्कम वसूल करावयाची नाही काय, यावर गट विकास अधिकारी यांनी समितीस विदित केले की, जिल्हा परिषदेचे लेखा परिक्षण झाल्यापासून सन २०१०-११ पासून वसुली करीत आहोत. काही सरपंचांना नोटीस देऊन देखील त्यांनी रक्कम भरलेली नाही. त्यांच्या तालुक्यातील अपहाराची २-३ प्रकरणे प्रलंबित आहेत. आम्ही त्याची दखल घेऊन अपहाराच्या प्रकरणांमध्ये गुंतलेली रक्कम वसूल केलेली आहे.

मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सांगितले की, व्याजासह रक्कम वसूल केलेली आहे किंवा कसे हे मी तपासून घेते. व्याजासह रक्कम वसूल केली नसेल तर संबंधितांवर कारवाई करावी. तसेच, ज्या अधिकाऱ्यांमुळे विलंब झालेला आहे त्या अधिकाऱ्यांना सुद्धा जबाबदार धरले पाहिजे. जेणेकरुन भविष्यात असे होणार नाही.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, ग्राम विकास विभागाने या विषयाच्या अनुषंगाने जो शासन निर्णय निर्गमित केलेला आहे त्यामध्ये सर्व बाबी अंतर्भूत केलेल्या आहेत. तसेच अफरातफरीच्या प्रकरणांमध्ये गुंतलेली रक्कम वसूल होत नसल्यामुळे त्या प्रकरणांचे स्वरुप पाहून संबंधितांवर फौजदारी स्वरुपाची कारवाई करावी.

परिच्छेद क्र.४.३९८ च्या अनुषंगाने पंचायत समिती बुलडाणा, नांदुरा, जळगांव-जामोद, मेहकर, मलकापूर व लोणार या पंचायत समित्यांमध्ये अहवाल वर्षात झालेल्या इतर नियमबाह्य बाबी (अपहार/अफरातफर प्रकरणे) संदर्भात माननीय समिती प्रमुखांनी अगोदर दिलेल्या निदेशानुसार कारवाई करावी.

**परि.क्र.४.३९८ (२२) (टँकरने पाणी पुरवठा केलेल्या अनियमिततेबाबत)** समितीने अशी विचारणा केली की, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची मंजुरी आवश्यक असताना एक वर्षापेक्षा जास्त कालावधीचे देयक कोणत्या प्राधिकारानुसार प्रदान करण्यात आले, तसेच लेखा परिक्षणाच्या वेळी गाडीच्या लॉगबुकची मागणी करुन सुद्धा लॉगबुक उपलब्ध करुन न देण्यास कोण जबाबदार आहे, यावर गट विकास अधिकारी, शेगांव यांनी समितीस विदित केले की, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता नियम ४४ (१) प्रमाणे एका वर्षावरील देयकाच्या अदायगीसाठी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) यांची कार्योत्तर मंजुरी घेण्यात आली. टँकर पाणी पुरवठ्याच्या नोंदी सुद्धा उपलब्ध असून सरपंच/सचिव तसेच प्रत्यक्षात पाणी भरणाऱ्या महिलांच्या स्वाक्षरी घेण्यात आलेल्या आहेत. लेखा परिक्षणाच्या वेळी अभिलेखे उपलब्ध न करुन दिल्यामुळे मुंबई स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियमाच्या मुख्य अधिनियमाच्या कलम ७ मधील पोट कलम (१) मध्ये करण्यात आलेल्या दुरुस्तीनुसार संबंधितांवर योग्य ती कारवाई करावी असे निदेश समितीने दिले.

**परि. ४.३९८ (२३)** संदर्भात समितीने अशी विचारणा केली की, एक हजारापेक्षा जास्त रकमेची खरेदी करताना दरपत्रके मागवून खरेदी करणे बंधनकारक असताना ते डावलून रु.३९,०००/- इतक्या रकमेची खरेदी कोणत्या प्राधिकारात करण्यात आली, तसेच खरेदी केलेल्या साहित्याची साठा नोंदवहीत नोंद का घेण्यात आली नाही, यावर गट विकास अधिकारी, मलकापूर यांनी समितीस विदित केले की, जनजागरण अभियानासाठी रथ तयार करुन प्रचार व प्रसिद्धी करण्यासाठी अल्प कालावधी उपलब्ध असल्यामुळे दरपत्रक मागविणे शक्य झाले नाही. त्यामुळे बाजारभावानुसार घडी पत्रिका छपाई व वाहनावर खर्च करण्यात आला. तसेच साहित्याची नोंद रजिस्ट्ररला घेण्यात आली नव्हती, ही खरोखरच चूक झाली होती, त्याची नमुना-३३ ची नोंद रजिस्टरला घेतलेली आहे. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार घडी पत्रिका ही प्रचार व प्रसिद्धी साठी वाटप करण्याचे आदेश होते. उक्त कालावधीत पंचायत समिती, मलकापूर व मोताळा येथील गावांतून रथ फिरविण्यात आला असून त्याच वेळी घडी पत्रिका वाटल्या आहेत. तसेच रथ ज्या कालावधीत फिरला त्यावेळी उपस्थित असलेले सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक, व ग्राम पंचायत कर्मचारी यांच्या स्वाक्षऱ्या घेतल्या आहेत. पुरवठा आदेश तपासणीच्या वेळी सादर करावयाचे अनवधानाने राहून गेले होते सध्या ते उपलब्ध आहे.

तसेच संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी विचारणा केली की, वाहनाचे दरपत्रक व वाहन प्रत्यक्षात किती गावांत फिरले या बाबतचे अभिलेखे लेखा परिक्षणास का दाखविण्यात आले नाहीत. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, या विषयी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी आपल्या स्तरावरुन नियमानुसार योग्य ती कारवाई करावी.

यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, विशेष घटक योजनेतील श्री.नामदेव वानखेडे यांच्या विहिरीचे काम पूर्ण झाले आहे काय, असल्यास, कोणत्या दिनांकास झाले, तसेच श्री. संदिप हरी चिमकर यांच्या कामाचे मूल्यांकन रु.९५,८९१/- होते. त्यांच्या काम पूर्णत्वाच्या प्रमाणपत्राचा दिनांक कोणता आहे, यावर गट विकास अधिकारी, मलकापूर यांनी समितीस विदित केले की, श्री.नामदेव वानखेडे यांनी आपल्या विहिरीचे काम दि.३१ मार्च, २०१२ पूर्वी करण्याबाबत वारंवार पत्राद्वारे सूचित केले होते, तरी सुद्धा त्यांनी काम पूर्ण केले नाही. त्यामुळे त्यांच्या विहिरीचे मूल्यांकन रु.२३,०१४/- इतके करण्यात आले. संबंधित लाभार्थी मयत झालेले आहेत. लाभार्थी मयत झाल्यामुळे व योजनेची मुदत संपल्यामुळे काम होऊ शकले नाही. त्यामुळे त्यांच्या विहिरीचे काम अपूर्ण आहे. या प्रकरणी मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव सादर केला आहे.

तसेच श्री.संदिप चिमकर यांच्या विहिरीचे काम पूर्ण झाले असून, पूर्णत्वाचे प्रमाणपत्र उपलब्ध आहे. यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी समितीस विदित केले की, श्रीमती ताराबाई भिमराव इंगळे यांना अतिप्रदान केलेले रु.३,७९७/- केव्हा वसूल करण्यात आले, अतिप्रदान करण्यास जबाबदार असणाऱ्यांवर कोणती प्रशासकीय कारवाई करण्यात आली, यावर गट विकास अधिकारी, मलकापूर यांनी समितीस विदित केले की, श्रीमती ताराबाई इंगळे यांना रु.३,७९७/- इतक्या रकमेचे अतिप्रदान झाले होते. परंतु सदरहू रक्कम त्यांच्याकडून वसूल करुन शासन खात्यात जमा केली आहे.

**परि. क्र.४.३९८ (२४)** : (नियमबाह्यपणे शासकीय अनुदानाच्या रकमा ठेव लेखा शीर्षाखाली ठेवणे) संदर्भात समितीने पुढे अशी विचारणा केली की, लेखा संहिता नियम २१८ (१) अन्वये शासकीय अनुदानाच्या रकमा ठेव लेखा शीर्षाखाली जमा करणे योग्य नसताना त्या ठेव लेखा शीर्षा खाली का ठेवण्यात आल्या, या अनियमिततेस कोण जबाबदार आहे, तसेच सदर रकमेमध्ये रु.१२,२९,३३२/- ही गौण खनिजा खालील रक्कम ग्राम पंचायतीला त्वरित वितरित करणे आवश्यक असताना ती ठेव लेखा शीर्षाखाली का जमा करण्यात आली, यावर गट विकास अधिकारी, सिंदखेड राजा यांनी समितीस असे विदित केले की, सदरहू रकमेचे वर्गीकरण करता न आल्यामुळे रु.१५,९५,०३५/- ही रक्कम ठेव लेखा शीर्षा खाली ठेवण्यात आली. लेखा शीर्ष बदलल्यामुळे हा प्रकार घडला आहे. असा प्रकार पुन्हा होणार नाही या बाबत खबरदारी घेण्यात येईल.

यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी समितीस पुढे विचारणा केली की, शासनाच्या कोणत्याही अनुदानाची रक्कम ठेव म्हणून ठेवता येत नाही. मूळात गौण खनिजाची रक्कम ही ग्राम पंचायतीसाठी येत असते. त्यामुळे ही रक्कम ग्रामपंचायतींना न देता

वर्षानुवर्षे विशिष्ट लेखा शीर्षा खाली ठेवणे योग्य नाही. यावर गट विकास अधिकारी, सिंदखेड राजा यांनी समितीस विदित केले की, व्यपगत न केलेल्या ठेवीपैकी माहे मार्च-२०१५ पर्यंत रु.२३,१४,६८१/- इतक्या रकमेचे प्रदान करण्यात आले. तद्नंतर रु.९,९०,०००/- व्यपगत केले आहेत. अशा प्रकारे एकूण रु.३३,०५,५८४/- इतकी रक्कम व्यपगत केली आहे. यामध्ये काही रकमा शासनाच्या अनुदानाच्या होत्या. ज्या लाभार्थ्यांना शासनाकडून अनुदान आले होते त्यांना त्या वितरित करण्यात आल्या. यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी समितीस विदित केले की, शासनाच्या कोणकोणत्या योजना होत्या, त्या अंतर्गत किती अनुदान प्राप्त झाले याबाबतचा सविस्तर तपशील लेखा संचालनालयाकडे आहे. हणवतखेड येथे पोषण भत्त्यापोटी किती रक्कम आली याचा सुद्धा तपशील आहे. या रकमा शासनाच्या असताना सुद्धा आपण त्या परत न करता विशिष्ठ लेखाशीर्षाखाली ठेव म्हणून ठेवल्या. आपण लाभार्थ्यांना अनुदान वितरित केले आहे व रु.९,९०,०००/- व्यपगत केले आहेत. त्यामुळे भविष्यात अशी चूक पून्हा होणार नाही या दृष्टिकोनातून काळजी घ्यावी.

**परिच्छेद क्र. ५.२९ :** कळमेश्वर येथील पाणी पुरवठा व सामान्य निधी जमेतून करण्यात आलेल्या खर्चामधील गंभीर अनियमितता याबाबत समितीने अशी विचारणा केली की, ग्राम पंचायत कळमेश्वर येथील खर्चातील अनियमिततेची रक्कम रु.३,२३,३३६/- पैकी किती रक्कम संबंधितांकडून वसूल करण्यात आली. झालेल्या अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन कोणती प्रशासकीय कारवाई करण्यात आली आहे. यावर गट विकास अधिकारी, मेहकर यांनी समितीस विदित केले की, सामान्य निधी व पाणी पुरवठा निधीचे लेखा परिक्षण झाले आहे. तसेच महत्त्वाची बाब म्हणजे यामध्ये ६३ कामे नसून ६३ प्रमाणके आहेत. लेखा परिक्षणात नमूद केले होते की, रु. ३,२३,३३६/- ही रक्कम संबंधित सचिवांकडून वसूल करावी. त्यानुसार अंतिम चौकशी अंती रु.३,२३,३३६/-पैकी रु. ६५,०९२/- एवढी रक्कम वसूल करण्यात आली आहे. इतर प्रमाणके दप्तरी उपलब्ध आहेत. यावर स्थानिक निधी लेखा यांनी विचारणा केली की, रु. ६५,०९२/- ही रक्कम वसूल करावी लागली याचा अर्थ या रक्कमेचा अपहार करुन संबंधित सचिवांनी ती रक्कम स्वत:कडे ठेवली होती, त्यांच्यावर कारवाई करावयास पाहिजे. यावर समितीने असे निदेश दिले की, या प्रकरणी योग्य ती चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करावी.

यावर समितीने विचारणा केली की, ग्रामपंचायत, पांगरखेड (तेली) च्या किर्दमध्ये प्रमाणकाशिवाय निनावी खर्च नोंदविल्याच्या सदर अनियमिततेबाबत ग्रामसेवकावर कोणती प्रशासकीय कारवाई करण्यात आली, यावर गट विकास अधिकारी, मेहकर यांनी समितीस विदित केले की, लेखा परिक्षणाच्या वेळी रु. १,२३,७८३/- इतक्या रक्कमेचे प्रमाणके उपलब्ध नव्हते. त्यामुळे लेखा परिक्षण अहवालात उक्त, रक्कमेचा प्रमाणकाशिवाय खर्च केल्याचे नमूद केले होते. परंतु, त्या ग्राम पंचायती मधील अभिलेख्यांची तपासणी केली असता उक्त रक्कमेपैकी रु. १,१७,०००/- इतक्या रक्कमेची प्रमाणके आढळून आलेली आहेत. संबंधित जबाबदार सचिवांकडून उर्वरित रु. ६,७८३/- इतकी रक्कम वसूल करण्यात आलेली असून निनावी दर्शविण्यात आलेली आहे. यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी विचारणा केली की, कॅश बुक खरेदी केल्याच्या नावे ही रक्कम आपण निनावी समजली आहे असे वाटते. यावर गट विकास अधिकारी, मेहकर यांनी समितीस होकारार्थी आश्वासित केले. रु. १,१७,०००/- इतक्या रक्कमेची प्रमाणके उपलब्ध आहेत. उर्वरित रु. ६,७८३/- इतक्या रक्कमेची प्रमाणके उपलब्ध नाहीत. यावर समितीने निदेश दिले की, मुख्य कार्यकारी अधिका-यांनी या संदर्भातील चौकशी करुन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र. ५.५० (२)** ग्राम पंचायती मधील इतर अनियमितता याबाबत समितीने निदेश दिले की, या मुद्यांतर्गत ग्राम पंचायत, सोनार गव्हाण यांनी ३७ बाबींवर प्रमाणकाशिवाय रुपये १,२९,१२०/- इतका निनावी खर्च नोंदविला आहे, त्यामुळे या मुद्याच्या बाबतीत सुद्धा मुख्य कार्यकारी अधिका-यांनी चौकशी करुन अहवाल सादर करावा.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

**बुलडाणा जिल्हा परिषदेमधील अपहार/अफरातफर व इतर नियमबाहय बाबी :-**

(१) परिच्छेद क्र. ४.३९८(११) संदर्भात सोळा प्रकरणांत गुंतलेली रक्कम वसूल करण्यात आली आहे, परंतु ती व्याजासह वसूल करण्यात आली नाही, तसेच अफरातफरीच्या प्रकरणात गुंतलेली रक्कम वसूल होत नसल्यामुळे प्रकरणाचे गांभिर्य पाहून संबंधितांवर फौजदारी कारवाई करावी असे समितीने निदेश दिले असून त्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली,

(२) परिच्छेद क्र. ५.२९ (२०११-१२) मधील प्रकरणात वसूलपात्र रक्कम जरी वसूल केली असली तरी अनियमितता करणा-यांवर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्याचे समितीचे निदेश असून संबंधित सचिवांवर अदयाप कोणतीही कारवाई का करण्यात आली नाही,

(३) परिच्छेद क्र. ५.५०(२) मधील अनियमितते प्रकरणी जबाबदार ग्रामसेवकांवर कारवाई करण्यात आलेली आहे. परंतु विस्तार अधिकारी तसेच इतर वरिष्ठ अधिका-यांवर कारवाई न करण्याची कारणे काय आहेत,

(४) परिच्छेद क्र. ३.२३८ (२००८-०९) मधील अनियमितते प्रकरणी चौकशी करुन कारवाई करण्याचे समितीचे निदेश असताना अपचा-यांविरुद्ध ताकिद देणे किंवा १०००/- रुपयांपर्यंत दंड करणे अशा छोटया शिक्षा करण्यात आलेल्या आहेत. त्यांच्याशी शासन समाधानी व सहमत आहे काय,

(५) शेगांव तालुक्यातील ५ ग्राम पंचायतीने ८ तत्कालिन सरपंचाकडून रुपये १,६८,२६८/- व्याजासह ४ वेळा पत्र देऊनही रक्कम भरणा केलेली नसल्यामुळे सदरहू रक्कम त्यांच्याकडून वसूल केली आहे काय, पंचायत समिती शेगांव येथील श्री. चारथळ, शाखा अभियंता यांच्याकडून रुपये २५,४२१/- वसूलपात्र रक्कम न भरल्यामुळे त्यांचेवर कोणती कारवाई करण्यात आली, तसेच मुंबई ग्राम पंचायत अधिनियम कलम १७९ नुसार केलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे. संबंधितांवर फौजदारी कारवाई न करण्याची कारणे काय आहेत,

(६) चिखली, पंचायत समिती अंतर्गत एकूण १७ प्रकरणांमध्ये वसुलीची कार्यवाही करुन त्या संबंधातील सविस्तर अहवाल पाठविण्याबाबत समितीचे निदेश असून त्या नुसार कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(७) खामगांव, पंचायत समिती अंतर्गत प्रलंबित अफरातफरीत गैरव्यवहाराची प्रकरणे निकाली काढण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली, तसेच लोखंडा, ग्राम पंचायती अंतर्गत ग्रामसेवकांनी समितीला चुकीची माहिती देणे इत्यादी बाबत त्यांचेवर कोणती कार्यवाही करण्यात आली.

(८) **उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) **पंचायत समिती बुलढाणा :-**

सन २०११-१२ मध्ये सामान्य निधीची ०७ व योजना निधीची ०९ अशी एकूण १६ प्रकरणे प्रलंबित होती. अंतिम चौकशी अहवालानुसार रुपये २,५७,०९५/- एवढी रक्कम वसुलपात्र होती. वसुलपात्र रक्कम १००% वसूल करण्यात आलेली असून १६ प्रकरणे नस्तीबद्ध झालेली आहेत. अफरातफर प्रकरणात गुंतलेली रक्कम १०० टक्के वसूल झाल्याने संबंधितांवर फौजदारी कारवाई करण्याची आवश्यकता नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ मधील ५ अन्वये अपहार प्रकरणात संबंधित कार्यरत ग्राम पंचायत, सचिव यांचेविरुद्ध प्रशासकीय कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(२) **पंचायत समिती जळगांव जामोद :-**

सन २०११-१२ या वर्षात ग्राम पंचायत अफरातफर प्रकरणे एकूण ८ असून त्यामध्ये प्रलंबित रक्कम ३,२८,९३३/- असून वसूल पात्र नसलेली रक्कम रुपये ४४,०१३/- आहे व वसूल पात्र रक्कम रुपये २,८४,९२० पैकी १) यु.टी.झाल्टे (मयत) रुपये १९,३७८/- २) ए.बी.भोसले (बडतर्फ व मयत) रुपये ७,०००/- ३) ए.बी.भोसले (बडतर्फ व मयत) रुपये ८६,८५७/- ४) एस.टी.पिंजरकर (मयत) ८२,४१६/- वरील प्रमाणे एकूण ४ प्रकरणातील मयत असल्यामुळे संबंधितांकडुन महाराष्ट्र नागरी सेवा वर्तणुक नियम १९७९ चे कलम १३ (चार) नुसार मयत कर्मचारी यांचेवर प्रशासकीय कार्यवाही करता येत नाही. तसेच महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग यांचे शासन निर्णय परिपत्रक क्र. डिइएन २०१६/प्र.क्र./५६४/ आ-१२ दिनांक ४/७/२०१६ प्रमाणे मयत कर्मचारी यांचेवर प्रशासकीय कार्यवाही करता येणार नाही त्यामुळे आदेशात नमुद मयत ग्रामसेवक यांचेवर कार्यवाही करण्यात आलेली नाही. तसेच एम.के.बंड (से.नि.ग्रा.से.) यांची रुपये ६०,८५९/- इतकी रक्कम प्रलंबित असून त्यांचे सेवानिवृत्त वेतनातुन रुपये २,०००/- प्रमाणे रुपये १,२०,०००/- वसुली करण्यात आली असून उर्वरित रक्कम रुपये ४८,८५९/- व्याजासह वसुलीची कार्यवाही सुरु आहे. तसेच श्री. सपकाळ व श्री. वडाळ यांनी पीआरसी पुर्वी रक्कम रु. २८,४११/- भरणा केली असून त्यांच्यावर मा.मु.का.अ.यांचे आदेश क्र १४१०/१६ दिनांक २९/६/२०१६ नुसार जि.प.शिस्त व अपिली नियम, १९६४ चे नियम ५ अन्वये प्रशासकीय कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(३) **पंचायत समिती, मलकापूर :-**

वसुलपात्र रक्कम रु. २,२९,५७८/- ची वसुली पुर्ण झाली आहे. याबाबत एकूण ०५ प्रकरणे संबंधित होती, पैकी ०२ प्रकरणात व्याज वसुलीची आवश्यकता होती ती केलेली आहे. संबंधित ०५ प्रकरणांमध्ये ०४ दोषी ग्रामसेवक होते. पैकी ०२ ग्रामसेवकांवर वेतनवाढ रोखण्याची प्रशासकीय कारवाई करण्यात आलेली आहे. एका ग्रामसेवकावर ठपका ठेवण्यात आलेला आहे. तसेच उर्वरित एक ग्रामसेवक हे मयत झाल्यामुळे त्यांचेवर प्रशासकीय कारवाई करण्यात आली नाही. गुंतलेली रक्कम पुर्ण वसूल झाल्यामुळे फौजदारी कारवाई करण्यात आली नाही.

(४) **पंचायत समिती नांदुरा :-**

सन २०११-१२ मधील अफरातफरीची एकूण ४ प्रकरणे प्रलंबित होती. ४ प्रकरणांची अफरातफरीमध्ये गुंतलेली रक्कम रुपये ७६,२९६/- इतकी वसूली होती. त्यापैकी तीन प्रकरणामध्ये पुर्ण वसूली करण्यात आलेली असून उर्वरित एका प्रकरणातील संबंधीत श्री.गोटे, ग्रामसेवक यांना आदेश क्रमांक बुजिप/साप्रवि/ग्रा.प./स्था-२/११२१/११, दिनांक ५ जुलै, २०११ नुसार सक्तीने सेवा निवृत्त करण्यात आलेले आहे. श्री. एन.पी.गोटे, ग्रामसेवक हे पंचायत समिती, लोणार येथून सक्तीने सेवानिवृत्त झालेले आहेत. सेवा निवृत्ती प्रकरणाची देय लाभातून त्यांच्याकडील प्रलंबित असलेली रक्कम रु. ५६,१६२/- पैकी वसूल केलेली रक्कम रु. ८,२००/- प्रलंबित रक्कम रु. ४७,९६२/- संबंधिताचे सेवा निवृत्ती प्रकरण मंजूर झाल्यावर एक रक्कमी वसूली करण्यात येईल.

(५) **पंचायत समिती लोणार :-**

सन २०११-१२ पंचायत समिती, लोणार अंतर्गत अफरातफर प्रकरणांची एकूण संख्या १११ असून त्यापैकी सामान्य निधीची ७७ प्रकरणे व ज.रा.यो. निधीची ३४ प्रकरणे होती. चौकशी अंती रु. १,००७,१८९/- वसूल पात्र रक्कम आढळून आली असून सदर रक्कम पूर्णपणे वसूल करण्यात आली आहे. उपरोक्त सर्व प्रकरणी वसूलीची कार्यवाही पूर्ण झाली असल्यामुळे संबंधितांवर फौजदारी कारवाई करण्यात आली नाही. तथापि, कार्यरत दोन ग्रामसेवकांविरुद्ध एक वार्षिक वेतनवाढ बंद करण्यात आली असून

९ ग्राम सेवकांविरुद्ध महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९६४ चे कलम ४ नुसार कारवाई करण्यात आली आहे.

ग्रामपंचायत, कंळबेश्वर पंचायत समिती, मेहकर येथे सामान्य निधी व पाणीपुरवठा निधीचे सन २००७-०८ ते २००९-१० या आर्थिक वर्षाचे लेखा परिक्षण झालेले आहे. सदर लेखा परिक्षण अहवालात परिच्छेद क्रमांक ५ नुसार ६३ कामांमध्ये रु. ३,२३,३३६/- एवढी रक्कम संबंधित सचिवांकडून वसूल करणे नमुद आहे. याबाबत अंतिम चौकशी अंती रु. ३,२३,३३६/- रुपयांपैकी रु. ६५,०९२/- एवढी रक्कम वसूल पात्र आहे. तरी संबंधित सचिवांकडून सदर संपुर्ण रक्कम वसूल करण्यात आलेली आहे.

सदर प्रकरणातील जबाबदार ग्रामसेवक, श्री.एस.बी.मवाळ यांचेवर प्रशासकीय कारवाई करण्यात आलेली आहे. तर ग्रामसेवक, श्री.बी.के.अंभोरे यांच्या महाराष्ट्र जिल्हा परिषद, जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ५ अन्वये दोन वार्षिक वेतनवाढी तात्पुरत्या स्वरुपात रोखण्यात आलेल्या आहेत.

(१) पंचायत समिती, मेहकर अंतर्गत ग्रामपंचायत, पांगरखेड तेली येथे सन २००७-०८ ते २००९-१० या आर्थिक वर्षाचे लेखा परिक्षण झालेले आहे. लेखा परिक्षण अहवाल मूळ परिच्छेद क्र. ४ मध्ये नमुद केल्याप्रमाणे रु. १,२३,७८३/- रुपयांचे प्रमाणकाशिवाय खर्च केलेला असल्याचे नमुद आहे.

सदर बाबतीत ग्राम पंचायत, पांगरखेड येथील आवश्यक अभिलेख्याची पडताळणी केली असता रु. १,२३,७८३/- रुपये पैकी रु. १,१२,२२५/- रुपयांची प्रमाणके दप्तरी उपलब्ध असल्याचे आढळत आहेत. उर्वरित रक्कम रु. ११,५५८/- रुपयांपैकी रु. ६,९७०/- रुपये कु. एन.ए.राठोड व रु. ४,५८८/- रुपये श्री. एन.वाय हिरगुडे यांचेकडून वसूल पात्र आहेत. सदर वसुलपात्र रक्कम संबंधित जबाबदार सचिवांकडुन वसूल करण्यात आलेली आहे.

कु.एन.ए.राठोड, ग्रामसेवक, पं.स. दिग्रस, जिल्हा परिषद, यवतमाळ यांची एक वार्षिक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरुपात वसुलपात्र रोखण्याची कार्यवाही केलेली आहे. तसेच श्री.एन. वाय. हिरगुडे, ग्रामसेवक हे सेवा निवृत्त झालेले असून प्रकरण गंभीर नसल्यामुळे त्यांचे विरुद्ध कारवाई केलेली नाही.

सदर प्रकरणामध्ये अपहार अल्प प्रमाणात असून सदर अपहारातील रक्कम संबंधितांकडून वसूल केलेली असल्यामुळे विस्तार अधिकारी (पंचायत) तथा पर्यवेक्षिय अधिकारी यांना समज देण्यात आलेली आहे.

पंचायत समिती, मेहकर अंतर्गत ग्रामपंचायत सोनार गव्हाण येथे सन २००७-०८ ते २००९-१० या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण अहवालातील मूळ परिच्छेद क्रमांक ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे रु. १,२९,१२०/- रुपये प्रमाणकाशिवाय खर्च केलेला असल्याचे नमुद आहे. सदर बाबतीत ग्राम पंचायत सोनार गव्हाण येथील आवश्यक अभिलेख्यांची पडताळणी केली असता रु. १,२९,१२०/- रुपयांपैकी रु. १,२१,७३०/- रुपयांची प्रमाणके दप्तरी उपलब्ध असल्याचे आढळले आहेत. वसुलपात्र रक्कमेपैकी तत्कालीन सचिव, श्री. व्ही.एस.म्हस्के यांच्याकडुन रु. ७,३९०/- संबंधित सचिवांकडून संपूर्ण रक्कम वसूल करण्यात आलेली आहे.

ग्रामसेवक, श्री. व्ही.एस.म्हस्के यांची महाराष्ट्र जिल्हा परिषद, जिल्हासेवा (शिस्त व अपील) १९६४ चे नियम ५ अन्वये एक वार्षिक वेतनवाढ रोखण्यात आली आहे.

(२) सदर प्रकरणी चौकशीअंती निदर्शनास आले की, बांधकामाकरिता विटांची लिड दूरची घेतल्यामुळे अतिप्रदान करण्यात आले होते. सदर अतिप्रदान झालेली रक्कम रु. १५,७५०/- ची वसुली करण्यात आलेली होती व त्यामुळे अपचा-याकडुन रु. १०००/- द्रव्यदंड करण्यात आलेला आहे, तरी केलेली शिक्षा संयुक्तिक असल्याचे मत आहे.

(३) शेगांव तालुक्यातील ५ ग्राम पंचायत मध्ये एकूण रु. २,७०,४४१/- एवढी रक्कम अपहारामध्ये गुंतली होती, त्यापैकी १२ ग्रामसेवकांकडून रु. १,४४,१९९/- एवढी रक्कम वसूल केलेली आहे. सदर ५ ग्राम पंचायती मध्ये ८ सरपंचांकडून रु. १,६८,२६८/- एवढी रक्कम व्याजासह गुंतलेली आहे. त्यापैकी एका सरपंचाकडून रु. २३,४२४/- रक्कम व्याजासह वसूल केलेली आहे.

पंचायत समिती, शेगाव येथील शाखा अभियंता, श्री. चारथड यांचेकडे रु. २४,४२१/- एवढी रक्कम गुंतलेली होती. त्यांचेकडुन व्याजासह रु. ४५,४२१/- एवढी रक्कम वसूल केलेली आहे. तसेच त्यांची एक वेतनवाढ रोखलेली असून तशी नोंद त्यांचे सेवा पुस्तिकेत घेतलेली आहे.

उर्वरित ७ सरपंचावर मुंबई ग्राम पंचायत अधिनियम १९५८ कलम १७९ नुसार कार्यवाहीसाठी ग्राम पंचायतीने मा. जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचेकडे प्रस्ताव सादर केलेला आहे व प्रकरण मा. जिल्हाधिकारी बुलढाणा यांचेकडे आहे. कलम १७९ नुसार प्रस्ताव सादर केला असल्याने फौजदारी कार्यवाही केलेली नाही.

(४) सामान्य निधीचे ४५ आणि योजना निधीचे ३१ असे एकूण ७६ प्रकरणे प्रलंबीत होती. त्यापैकी ५९ प्रकरणे निकाली काढण्यात आली होती व १७ प्रकरणे प्रलंबित होती. सद्य:स्थितीत सामान्य निधीचे ३७ आणि योजना निधीचे २४ प्रकरणे निकाली काढण्यात आलेली असून सामान्य निधीचे ८ आणि योजना निधीचे ७ असे एकूण १५ प्रकरणे प्रलंबित आहेत.

वरील १५ प्रकरणात गुंतलेली रक्कम व्याजासह वसूल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) सन २०१२-१३ पूर्वी उघडकीस आलेली १६ प्रकरणे असून १५ प्रकरणाची चौकशी पूर्ण करण्यात आलेली आहे. अंतिम चौकशी अहवालानुसार रु. ५,३९,५४० रक्कमेपैकी रु. २,२७,६३४ वसूल केली असून उर्वरित रक्कम ३,११,९०६/- व्याजासह वसूलीची कार्यवाही सुरु आहे. ग्राम पंचायत, वर्णा, सामान्य निधी व ग्राम पंचायत वर्णा येथील योजना या दोन्ही प्रकरणाबाबत

तत्कालीन ग्रा.से. श्री. पी.पी.डाखोले यांनी प्रभार हस्तांतरण न केल्यामुळे त्यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल केल्याने सदर अभिलेखे पोलीस स्टेशन, खामगाव (ग्रामीण) येथे जमा आहेत. त्यामुळे दोन्हीही प्रकरणाची प्राथमिक चौकशी बाकी आहे.

तसेच लोखंडा ग्रामपंचायती अंतर्गत ग्रामसेवकाने समितीला चुकीची माहिती दिल्याबाबत संबंधीत ग्रामसेवक, श्री. एस.एस.जाधव ग्राम पंचायत लोखंडा यांना सेवेतून निलंबीत करण्यात आले असून त्यांच्या विरुद्ध विभागीय चौकशी सुरु आहे.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात ग्रामविकास विभागाकडून खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषद बुलढाणा यांनी दिलेल्या अभिप्रायाशी सहमत आहे.

### विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने बुलडाणा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने दिनांक १४ नोव्हेंबर, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली असता समितीने अशी विचारणा केली की, बुलडाणा जिल्हा परिषदेतील अफरातफर व इतर नियमबाहय बाबीची १६ प्रकरणात गुंतलेली रक्कम व्याजासहित वसूल करण्यात आली नाही. अफरातफरीच्या प्रकरणात गुंतलेली रक्कम वसूल होत नसल्यामुळे प्रकरणाचे गांभीर्य पाहून संबंधितांवर फौजदारी कारवाई करावी असे समितीचे निदेश असून त्यासंबंधात कोणती कारवाई करण्यात आली, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांनी समितीस विदित केले की, यासंबंधात जिल्हापरिषदेकडून एकूण २४४ प्रकरणे होती. त्यात ३०९ ग्रामसेवक गुंतले होते. ही सर्व प्रकरणे १९९३ पासूनची आहेत. ही ३० वर्षापासूनची जुनी प्रकरणे आहेत. त्यातील ५३ ग्रामसेवक मयत आहेत. सेवानिवृत्त ग्रामसेवकांची संख्या १०४ आहे. उर्वरित ग्रामसेवकांविरुद्ध मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चांगली कामगिरी केली आहे. त्यात त्यांनी दोन वेतनवाढ, एक वेतनवाढ रोखलेली आहे. एका प्रकरणात पोलीस केस दाखल झालेली आहे. यात ४ कर्मचा-यांना बडतर्फ करण्यात आले आहे अशी माहिती समितीला देण्यात आली.

### अभिप्राय व शिफारशी

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या लेखा संहिता, १९६८ च्या नियम २१८ (१) अन्वये शासकीय अनुदानाच्या रक्कमा लेखा शिर्षाखाली जमा करणे योग्य नसतांना त्या ठेव लेखा शिर्षाखाली ठेवण्यात आल्या, तसेच सदर रक्कमेमध्ये रुपये १२,२९,३३२/- ही गौण खनिजाखालील रक्कम ग्राम पंचायतीला त्त्वरित वितरित करणे आवश्यक असतांना ती ठेव लेखा शिर्षाखाली जमा करण्यात आली असा आक्षेप स्थानिक लेखा निधी यांनी घेतला असता सदरच्या आक्षेपाच्या पृष्ठर्थ जिल्हा परिषदेने समितीला अशी माहिती दिली की, सदरहू रक्कमेचे वर्गीकरण करता न आल्यामुळे रुपये १५,९५,०३५/- ही रक्कम ठेव लेखा शिर्षाखाली ठेवण्यात आली. लेखा शिर्ष बदलल्यामुळे हा प्रकार घडला आहे. तसेच असा प्रकार पुन्हा होणार नाही याबाबत समितीला आश्वस्त केले.

उपरोक्त आक्षेप व जिल्हा परिषदेने दिलेली माहिती यातून समितीला असे निदर्शनास आले की, शासनाच्या कोणत्याही अनुदानाची रक्कम ठेव म्हणून ठेवता येत नाही. गौण खनिजाची रक्कम ही ग्राम पंचायतीच्या अधिनस्त असल्यामुळे सदर रक्कम ग्राम पंचायतींना न देता वर्षानुवर्षे (सन १९९९ ते २०१०-११ या १२ वर्षाच्या कालावधी पर्यंत) विशिष्ट लेखा शिर्षाखाली ठेवणे ही बाब गंभीर स्वरुपाची आहे.

**स्थानिक निधी लेखा यांनी जिल्हयातील एकूण १६ प्रकरणामध्ये गुंतलेली रक्कम रुपये २,५७,०९५/- व्याजासह वसूल केलेली नाही. तसेच अफरातफरीची वसूली प्रकरणे निकाली काढण्यासाठी सर्व संबंधित कर्मचाऱ्यांना नोटीस देण्यात आलेल्या नाहीत. ग्रामपंचायतींना गौण खनिजाची रक्कम अदा करताना वरिष्ठ अधिकाऱ्यांनी झालेल्या विलंबाबाबत संबंधित कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबतचा प्रस्ताव पाठविलेला नसल्याने सदरहू वरिष्ठ अधिका-यांना सुद्धा जबाबदार धरण्यात यावे व त्यांच्या सेवा पुस्तिकेत नोंद घेऊन नियमानुसार कारवाई करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

मुंबई ग्राम पंचायत अधिनियम, १९५८ चे कलम ४५ (१) तसेच ग्रामसूची बाब क्रमांक ५४ प्रमाणे लेख्याची निगा राखणे व कलम ६२ (४) अन्वये लेखे लिहिण्याची जबाबदारी सचिवांची ठरते. अधिनियम अंतर्गत लेखे देणे व हिशेब सादर करण्याची जबाबदारी सचिवाची असल्याने ग्राम निधीचे संरक्षण तथा विधी संमत विनियोग करण्याची अत्यंत महत्त्वपूर्ण जबाबदारी सचिवाची आहे. तसेच सचिवाने निष्काळजीपणा केल्याने दिसून आल्यास संबंधितांवर जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे.

पंचायत समिती मेहकर अंतर्गत ग्राम पंचायत कळंबेश्वर येथील ग्रामपंचायत पाणीपुरवठयाच्या ६३ कामाच्या खर्चातील अनियमिततेची रक्कम रुपये ३,२३,३३६/- पैकी रुपये ६५,०९२/- एवढी रक्कम संबंधित सचिवांनी स्वत:कडे ठेवून महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ अन्वये संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी आक्षेप घेतला होता. त्या अनुषंगाने समितीच्या असे निदर्शनास आले की, ज्याअर्थी, अनियमिततेच्या एकूण ३,२३,३३६/-रुपयांच्या रक्कमेपैकी रु. ६५,०९२/- एवढी रक्कम सचिवाकडून वसूल करावी लागली, याचा अर्थ या रकमेचा अपहार करुन संबंधित सचिवांनी ती रक्कम त्यांच्याकडेच ठेवली होती हे सिद्ध होते, त्यामुळे संबंधित सचिवांवर कारवाई करणे आवश्यक आहे. अत: या प्रकरणी सदर रक्कमेच्या अपहारासंदर्भातील आक्षेपाबाबत योग्य ती चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्याबाबतचे निदेश दिले होते.

समितीने दिलेल्या निदेशाच्या अनुषंगाने मंत्रालयीन सचिवांच्या घेतलेल्या साक्षीमध्ये समितीस असे आढळून आले की, बुलढाणा जिल्हा परिषदेतील अफरातफरी व इतर नियमबाहय बाबींची १६ प्रकरणे असून या सर्व प्रकरणात गुंतलेली रक्कम वसूल करण्यात आली. सदरहू रक्कम व्याजासह वसूल करणे आवश्यक असतांना तशी करण्यात आलेली नाही. अशा प्रकारची एकूण २४४ प्रकरणे असून त्यात ३०९ ग्रामसेवक गुंतले होते. ही सर्व प्रकरणे सन १९९३ पासूनची असून यातील ५३ ग्रामसेवक मयत झाले व १०४ ग्रामसेवक सेवानिवृत्त झाले, तसेच चार कर्मचाऱ्यांना बडतर्फ करण्यात आले तर काही कर्मचाऱ्यांची प्रकरण परत्त्वे एक किंवा दोन वेतनवाढ रोखलेली आहे. याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी कार्यवाही केल्याने समिती समाधान व्यक्त करते.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता नियम ४४ (१) प्रमाणे एका वर्षावरील देयकाच्या अदायगीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मंजूरी आवश्यक असतांना देयक प्रदान करण्यात आले तसेच लेखा परिक्षणाच्या वेळी गाडीच्या लॉगबुकची मागणी करुन सुद्धा लॉगबुक उपलब्ध करुन न दिल्याने त्यास जबाबदार असणाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याचे समितीने निदेशित केले होते.

स्थानिक लेखा निधी यांनी घेतलेल्या आक्षेपाच्या पृष्ठर्थ जिल्हा परिषदेने समितीला अशी माहिती दिली की, लेखा परिक्षणाच्या वेळी देयकाच्या अदायगीची मंजूरी घेतली नसल्याने उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) यांची कार्योत्तर मंजूरी घेतली आहे, तसेच टँकरने पाणीपुरवठा केलेले लॉगबुक तपासणीसाठी व पाणीपुरवठयाच्या नोंदी सुद्धा उपलब्ध असून सरपंच/सचिव तसेच प्रत्यक्षात पाणी भरणाऱ्या महिलांच्या स्वाक्षरी घेण्यात आल्या आहेत. **परंतू लेखा परिक्षणाच्या वेळी अभिलेखे उपलब्ध करुन न दिल्याने मुंबई स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियमाच्या कलम ७ मधील पोट कलम (१) मध्ये करण्यात आलेल्या दुरुस्ती नुसार संबंधितांवर योग्य ती कारवाई करावी अशी समितीची शिफारस आहे.**

समितीने सचिवांच्या घेतलेल्या साक्षीमध्ये समितीस असे आढळून आले आहे की, बुलढाणा जिल्हा परिषदेतील अफरातफरी व इतर नियमबाहय बाबींची १६ प्रकरणे असून या सर्व प्रकरणात गुंतलेली रक्कम वसूल करण्यात आली. परंतू सदरहू रक्कम व्याजासह वसूल केलेली नाही**. अत: संबंधितांकडून व्याजाची रक्कम वसूल करुन याबाबातचा अहवाल दोन महिन्यांत समितीस सादर करण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

काही प्रकरणांमध्ये वसूली होत नसल्यामुळे वसूली कर्मचाऱ्यांनी प्रयत्न न करणे ही बाब समितीला पटणारी नाही. शासनाची अपहारित रक्कम कोणलाही माफ करता येणार नाही. सदरच्या रक्कमा वेळीच वसूल करण्याची जबाबदारी संबंधित प्रशासकीय विभागाची असल्याने त्यावेळी विभागाने जर विनाविलंब कार्यवाही केली असती तर या समस्या आजच्या स्थितीत समितीसमोर उपस्थित झाल्या नसत्या, म्हणून या अफरातफरी व गैरव्यवहाराच्या प्रकरणात शासनाने या पुढील काळात कठोरपणे निर्णय घेणे आवश्यक आहे.

**विविध कामांसाठी शासनाचा निधी अनेक वर्षे वसूल होत नसल्याने ही प्रशासकीय कामातील केलेली अकार्यक्षमता आहे. याबाबत सबंधितांवर नियमानुसार कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. अफरातफर व गैरव्यवहारातील रक्कमा वसूल करण्याबाबत जे अधिकारी जबाबदार असतील अशा सर्व अधिकाऱ्यांविरुद्ध कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी कारवाई करण्यात यावी व गुंतलेल्या रक्कमा वसूल करण्यात याव्यात तसेच याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

## प्रकरण सहा

## जिल्हा परिषद, बुलडाणा

### जिल्हा परिषद हायस्कुल व प्राथमिक शाळा इमारती भाडयाने देण्याबाबत

**(परिच्छेद ३.१२७) (सन २०११-२०१२)**

जिल्हा परिषद बुलडाणा सन २०११-१२ (परिच्छेद क्रमांक ३)

जिल्हा परिषद शिक्षण समितीने ठराव घेवुन ५ उच्च विद्यालय (हायस्कुल) व १ प्राथमिक शाळेच्या २५ खोल्या भाडयाने दिल्या आहेत, याबाबत खालीलप्रमाणे आक्षेप दिले आहेत.

(१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम १२८ ब (२) प्रमाणे सक्षम अधिका-यांची मंजूरी घेण्यात आलेली नाही.

(२) वरिल प्रमाणे ठरावानुसार शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी आदेश दिलेले आहे.

(३) भाडयापोटी संबंधित संस्थांना नाममात्र रु. ५०/- प्रतिमाह भाडे आकारणी करण्यात आली आहे.

(४) संस्था चालकांकडून सुरक्षा रक्कम घेण्यात आलेली नाही.

(५) शाळा भाडयाचे निर्धारण कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग यांचेकडुन संस्थेच्या वापरात असलेल्या फर्निचर/मैदान यासह खोली भाडयाचे निर्धारण करुन आदेशाचे दिनांकापासून भाडे वसुली करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, बुलडाणा यांचेकडूनखालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) लेखा परिक्षण अहवालामध्ये ५ जिल्हा परिषद हायस्कुलच्या वर्ग खोल्या भाडयाने दिल्या असल्याचे नमुद केले आहे, परंतु जिल्हा परिषद शिक्षण समितीने ठराव घेऊन फक्त ४ जिल्हा परिषद हायस्कुलच्या वापरात नसलेल्या वर्ग खोल्या भाडयाने दिलेल्या आहेत.

(२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १२८ ब (२) अन्वये सदर प्राधिकार हे जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेस आहेत, त्यानुसार शिक्षण विषय समिती सभा दिनांक १०.५.२०१० मधील ठराव क्र. २ (५) अन्वये खाजगी शिक्षण संस्थेस चार जिल्हा परिषद हायस्कुलमधील वापरात नसलेल्या तात्पुरत्या स्वरुपात भाडेतत्वावर दिलेल्या वर्ग खोल्या या कार्यालयाचे पत्र क्र. ५३६४/१४ दिनांक ६.११.२०१५ अन्वये रिकामी करुन घेण्याबाबतचे निर्देश देण्यात आले आहेत.

(३) शिक्षण विषय समितीने घेतलेल्या ठरावानुसार शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी वर्ग खोल्या भाडयाने दिलेल्या आहेत. संबंधित शाळांनी नियमानुसार अभियंता, बांधकाम विभाग यांचेकडुन निर्धारण करुन घेतले असून त्यानुसार सबंधित संस्थांकडुन भाडे वसूल करण्यात आले आहे व सदर रक्कमेचा चलनाव्दारे शासन खाती भरणा करण्यात आला आहे.

(४) सदर संस्थांना फक्त वर्ग खोल्या देण्यात आल्या असल्याने व इतर कोणतेही मालमत्ता वापरण्यास दिलेली (फर्निचर, मैदान व इतर) नसल्याने सुरक्षा रक्कम घेण्यात आलेली नाही.

(५) सदर संस्थांना जि.प. हायस्कुलमधील फर्निचर, मैदान व इतर साहित्य दिलेले नसल्याने फक्त वर्ग खोल्यांचे भाडे निर्धारण करुन घेतलेले असून त्यानुसार भाडे वसूल केलेली रक्कम चलनाव्दारे शासन खाती जमा करण्यात आली आहे.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

बुलडाणा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १८ ते २० जानेवारी, २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, शाळा खोल्या भाड्याने देण्यासंदर्भात संबंधितांकडून सुरक्षा अनामत का घेण्यात आली नाही, या अनियमिततेमुळे होणाऱ्या आर्थिक नुकसानीस कोण जबाबदार आहे, शाळा खोल्यांचे भाडे निर्धारण कार्यकारी अभियंता यांनी केव्हा केले, भाडे निर्धारणानुसार येणारे भाडे कोणत्या दिनांकास वसूल केले आहे, शाळा खोल्या प्रति खोली मासिक रु. ५०/- या नाममात्र भाडे तत्त्वावर कोणत्या प्राधिकारान्वये दिल्या आहेत, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांनी समितीस विदित केले की, संस्थांना फक्त वर्ग खोल्या वापरण्यासाठी देण्यात आल्या होत्या. इतर कोणतीही मालमत्ता जसे की, फर्निचर, मैदान वगैरे बाबी वापरण्यास दिलेली नसल्यामुळे सुरक्षा रक्कम घेण्यात आलेली नाही. कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग यांचेकडून भाडे निर्धारण करुन घेतले असून त्यानुसार संस्थांकडून भाडे वसूल करण्यात आले आहे. आम्ही त्या खोल्या रिकामी करुन घेतल्या आहेत. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदेने फक्त ५० रुपये नाममात्र भाडे आकारले, आपणास असे भाडे आकारता येते काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बुलढाणा यांनी समितीस विदित केले की, हे नाममात्र भाडे होते. माहे नोव्हेंबर २०१५ मध्ये कार्यकारी अभियंता यांनी मूल्यांकन करुन दिल्यानंतर रुपये ५८ हजार ८९२ इतकी वसुली करुन त्या वर्ग खोल्या रिकाम्या करुन घेतलेल्या आहेत.

यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, वर्गखोल्यांचे निश्चित करण्यात आलेले भाडे योग्य होते असे आपणास वाटते काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांनी समितीस नकारार्थी उत्तर दिले. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, ज्यांनी हे भाडे निश्चित केले त्यांच्यावर कोणती कारवाई केली, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बुलढाणा यांनी समितीस विदित केले की, संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात येईल. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, त्यावेळी तत्कालिन अधिकारी कोण होते, ते आज उपस्थित आहेत काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांनी समितीस विदित केले की, तत्कालिन शिक्षणाधिकारी श्री. तेलगोटे होते. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, यामध्ये शासनाचे खूप नुकसान झालेले आहे. रुपये ५८ हजार हे कोणत्या आधारावर आकारण्यात आलेले आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांनी समितीस विदित केले की, कार्यकारी अभियंता यांनी माहे नोव्हेंबर २०१५ मध्ये स्क्वेअर मीटरवर भाडे निश्चित केले. त्यानुसार ज्या तारखेपासून वर्ग खोल्या भाड्याने देण्यात आल्या, त्या तारखेपासून भाडे निश्चित करुन रक्कम वसूल करण्यात आली. यावर पुढे समितीने अशी विचारणा केली की, आता आपण किती रुपये भाडे घेता, वर्ग खोल्या भाड्याने कशासाठी दिल्या होत्या, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांनी समितीस विदित केले की, आम्ही त्या वर्ग खोल्या रिकाम्या करुन घेतल्या आहेत. सदरहू खोल्या शाळेच्या कामकाजासाठी दिल्या होत्या. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, आपणास वर्ग खोल्या भाड्याने घ्यावयाच्या असल्यास खाजगी शाळा आपल्याकडून मोठ्या प्रमाणात भाडे वसूल करते. आपण मात्र खाजगी शाळांना नाममात्र दरात वर्गखोल्या भाड्याने दिलेल्या आहेत. आपण ज्या वर्गखोल्या भाड्याने दिल्या त्याचे बाजारभावाने किती भाडे होते, जी भाड्याची आकारणी करण्यात आलेली आहे ती योग्य नाही असे आपण सांगितले. ज्या शाळांच्या वर्गखोल्या भाड्याच्या जागेत भरतात त्यांचे भाडे शासन देते. आपण ज्या कालावधीत या वर्गखोल्या दिल्या त्या कालावधीत शासनाने भाड्याच्या जागेचे किती पैसे दिलेले आहेत, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांनी समितीस विदित केले की, माहे नोव्हेंबर २०१५ मध्ये एकूण मूल्यांकन करुन वसुली केलेली आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, आपणास ही बाब अगोदर लक्षात आली नाही काय, आक्षेप आल्यानंतर दुरुस्ती केली काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बुलढाणा यांनी समितीस विदित केले की, आक्षेप आल्यानंतर भाड्याची वसुली करुन वर्ग खोल्या रिकाम्या करुन घेण्याची कार्यवाही केलेली आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, ऑडीट आक्षेप आला त्यावेळी कार्यवाही होणे अपेक्षित होते. सन २०११-१२ मधील आक्षेप आहे. पंचायती राज समिती येणार म्हणून आपण कार्यवाही केलेली आहे. ही अतिशय गंभीर बाब आहे. आपल्या पातळीवरुन ऑडीटचे पालन होते की नाही हे पाहणे महत्त्वाचे आहे. ज्यावेळी ऑडीट पॅरा आला त्याचवेळी तो क्लिअर केला असता तर आज तो परिच्छेद समितीसमोर आला नसता. तत्कालीन अधिकारी कुठे आहेत, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बुलढाणा यांनी समितीस विदित केले की, आम्ही ऑडीट पॅरा क्लिअर करण्यासंदर्भात कॅम्प लावत होतो. या प्रकरणी दुर्लक्ष झालेले आहे, आमची चूक मान्य करण्यात यावी अशी विनंती आहे. यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र) यांनी समितीस विदित केले की, तत्कालीन अधिकारी यांना उपस्थित राहण्याबाबत कळविले होते, परंतु ते उपस्थित राहिलेले नाहीत. तत्कालीन शिक्षणाधिकारी बैठकीस उपस्थित राहणार नसतील तर त्यांनी तसे कळविणे गरजेचे होते. बैठकीस उपस्थित राहता येणार नाही याबाबत त्यांनी काही कळविले आहे काय, यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र) यांनी समितीस विदित केले की, तत्कालीन अधिकाऱ्यांना बैठकीस उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते त्यापैकी किती हजर आहेत, किती गैरहजर आहेत याची माहिती देण्यासाठी थोडा वेळ देण्यात यावा, अशी समितीला विनंती आहे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, ही समिती विधानसभेची प्रतिकृती आहे. विधानसभेला जेवढे अधिकार आहेत तेवढेच अधिकार या समितीला आहेत. समितीला योग्य माहिती मिळावी यासाठी तत्कालीन अधिकाऱ्यांना बोलाविलेले आहे. कोणाच्या तरी ओळखीच्या संस्थेला ही जागा नाममात्र भाड्याने दिलेली आहे. समितीसमोर ही परिस्थिती असेल तर जिल्हापरिषदेचा कारभार कसा चालत असेल याची कल्पना येते. या वर्गखोल्या कोणाला भाड्याने दिल्या होत्या, तत्कालीन शिक्षणाधिकारी उपस्थित आहेत काय, आपणास भाडे ठरविण्याचा अधिकार आहे काय ? आपण अधिकाराच्या बाहेर जाऊन काम केलेले आहे. या ठिकाणी चुकीच्या पद्धतीने काम झालेले आहे, या खोल्या केव्हापासून भाड्याने दिलेल्या आहेत ? किती खोल्या भाड्याने दिल्या ? यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी समितीला नकारार्थी उत्तर दिले. भाडे ठरविण्याचा अधिकार जिल्हापरिषदेच्या सर्वसाधारण सभेला आहे. आता वर्गखोल्या खाली करुन घेतल्या आहेत. दिनांक १६.११.२००९ पासून खोल्या भाड्याने दिलेल्या आहेत. याबाबत माहिती घेऊन समितीला अवगत करण्यात येईल. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, कोणत्या शाळेतील किती खोल्या भाड्याने दिल्या याची आपल्याकडे माहिती असावयास पाहिजे. जिल्हापरिषदेने जवळपास २५ वर्गखोल्या भाड्याने दिल्या ही माहिती समितीने सांगावी हे योग्य नाही. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांनी समितीस विदित केले की, प्रत्येक शाळेच्या वेगवेगळ्या वर्गखोल्या आहेत. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, देऊळगाव -५, चोथा-५, साखळी-२, धाड-५, रायपूर-५ आणि जि.प.चिखली-३ अशा एकूण २५ वर्गखोल्या भाड्याने दिल्या हे खरे आहे काय ? कोणत्या शाळेतील किती वर्गखोल्या दिल्या याची माहिती द्यावी, आक्षेपामध्ये नमूद केलेले आहे की, खोल्या भाड्याने देण्याबाबतचे शिक्षणाधिकारी यांचे आदेश लेखापरिक्षणाला आढळून आले नाहीत. मग हे आदेश कोणी दिले, एका बाजूला म्हणता शिक्षणाधिकारी यांना अधिकार आहेत आणि दुसऱ्या बाजूला त्यांना अधिकार नाहीत असे सांगता. आपण जे सांगत आहात ते देखील ऑडीटमध्ये नाही. ही किती गंभीर बाब आहे. या संदर्भात केलेल्या ॲग्रीमेंटची कॉपी समितीला सादर करावी. यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी समितीस विदित केले की, वर्गखोल्या भाड्याने द्याव्यात असा शिक्षण समितीचा ठराव आहे. ज्या वर्गखोल्या भाड्याने देण्यात आल्या त्याची कार्यकारी अभियंता यांचेकडून तपासणी करुन वाढीव रेटने रुपये ५८ हजार ५८२ जमा करुन घेतले आहेत. काही खोल्याचें दरमहा ९२ रुपये भाडे आहे, काही खोल्याचे दरमहा ९७ व १०७ रुपये असे वेगवेगळे भाडे आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, भाडे ठरविण्याचा अधिकार कोणाला आहे, शिक्षण समितीने ठराव केला असला तरी शासकीय सपंत्तीचे नुकसान करणे, किंवा मातीमोल दराने देणे योग्य नाही. कोणा जवळच्या व्यक्तीचा फायदा होण्यासाठी

हा निर्णय घेतलला आहे. आपण विभागाची प्रोसीजर फॉलो केली नाही. करारनामा केला नाही. प्रशासकीय मान्यता घेतलेली नाही. समिती येणार म्हणून आपण त्या वर्गखोल्या ताब्यात घेतल्या. अन्यथा खाजगी संस्थांनी त्यावर कब्जा केला असता. जिल्हापरिषदेच्या शाळा दुसऱ्यांच्या ताब्यात देणे योग्य नाही. भाडे ठरविताना मोकळ्या जागेचे भाडे घेतले काय, यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी समितीस विदित केले की, आपण त्यांना शाळेचे फर्निचर वापरण्यास दिलेले नाही. फक्त वर्गखोल्या वापरण्यास दिल्या होत्या. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, यात शासनाचे नुकसान झाले असल्यामुळे संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध निलंबनाची कारवाई करुन त्यासंबंधीचा प्रस्ताव शासनाकडे पाठवून द्यावा व त्याचा अहवाल समितीला सादर करावा.

सदर संस्था फर्निचरसह शाळा, खोल्या व मैदान यांचा वापर करीत आहोत असे आपण लेखी उत्तर दिलेले आहे. म्हणजे मुख्य कार्यकारी अधिकारी समितीला असत्य माहिती देत आहेत हे सिद्ध होते. समितीला असत्य स्वरुपाची माहिती देऊ नये. माहिती उपलब्ध नसल्यास वेळ मागून घ्यावा. आपण सर्वांनी असत्य स्वरुपाची माहिती देऊन समितीचा अवमान करु नये.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

**जिल्हा परिषद हायस्कुल व प्राथमिक शाळा इमारती भाडयाने देण्याबाबत :-**

(१) शाळांच्या खोल्या भाडयाने देतेवेळी अनामत रक्कम घेतलेली नसल्यामुळे झालेल्या आर्थिक नुकसानीची ज्या अधिका-यांवर जबाबदारी आहे त्यांचे निलंबन करुन चौकशी करण्याचे व अहवाल सादर करण्याचे समितीने निदेश दिलेले असून त्या संदर्भात समितीच्या निदेशानुसार कार्यवाही करण्यास टाळाटाळ करणे, त्यास विलंब करणे, अपचा-यास पाठिशी घालणे. अपचारी तत्कालिन शिक्षणाधिकारी, श्री.एस.एस.तेलगोटे सेवानिवृत्त होईपर्यंत प्रकरणांत अक्षम्य दिरंगाई करणे, निलंबित करुन चौकशी करण्याबाबत आदेश असतानाही आयुक्त शिक्षण व प्रधान सचिव शालेय शिक्षण यांच्याकडे ९ महिने विलंबाने मोघम व संदिग्ध प्रस्ताव पाठविण्याची कारणे काय आहेत. प्रस्तुत प्रकरणात अदयाप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

(२) संबंधित लेखा आक्षेपाशी संबंधित तत्कालिन अधिकारी यांना समितीच्या बैठकीची सूचना देण्यात येवूनही उपस्थित राहिले नव्हते. त्यांची एक वेतनवाढ रोखून त्याबाबतची नोंद सेवापुस्तिकेत घेण्याबाबतचे समितीचे निदेश असून त्याचे पालन केले आहे काय, नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) जिल्हा परिषद हायस्कुलच्या इमारती इतर शैक्षणिक संस्थेस भाडयाने देण्याबाबत झालेल्या अनियमिततेसंदर्भात समितीच्या निदेशानुसार संबंधीत जबाबदार अधिका-यास निलंबित करण्याबाबतचे निर्देश होते. तत्कालीन शिक्षणाधिकारी, श्री.एस.एस.तेलगोटे यांना इतर वेगळया प्रकरणात दि. २/०१/२०१५ रोजी निलंबित करण्यात आलेले आहे. समितीच्या निर्देशानुसार संबंधितास शाळा इमारत भाडयाने देणेबाबत झालेल्या अनियमितते संदर्भात कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांचेविरुद्ध पुरवणी जोडपत्र १ ते ४ मा. आयुक्त, शालेय शिक्षण विभाग पुणे यांचेकडे सादर करण्यात आले आहे.

(२) पंचायत राज समिती लेखा आक्षेपाशी संबंधीत साक्षी दरम्यान तत्कालीन अधिकारी, श्री.एस.एस. तेलगोटे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना सुचना देऊनही उपस्थित न राहिल्याबाबत त्यांची एक वेतनवाढ रोखुन ठेवण्याबाबतचे निर्देश दिले होते, परंतु संबंधित अधिकारी श्री. एस.एस.तेलगोटे यापुर्वीच निलंबित असल्याने व त्याच दरम्यान ते दिनांक ३१/५/२०१५ सेवानिवृत्त झालेले असल्याने वेतनवाढ रोखण्याबाबतची कारवाई करण्यात आली नाही.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात शालेय शिक्षण विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**शालेय शिक्षण विभागाचे अभिप्राय :-**

जिल्हा परिषद अभिप्रायास सहमती आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक १४ नोव्हेंबर, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, (१) शाळांच्या खोल्या भाडयाने देते वेळी अनामत रक्कम घेतलेली नसल्यामुळे झालेल्या आर्थिक नुकसानीची ज्या अधिका-यांवर जबाबदारी आहे त्यांचे निलंबन करुन चौकशी करण्याचे व अहवाल सादर करण्याचे समितीने निदेश दिलेले असून त्या संदर्भात समितीच्या निदेशानुसार कार्यवाही करणे टाळणे, त्यास विलंब करणे, अपचा-यास पाठिशी घालणे. अपचारी तत्कालिन शिक्षणाधिकारी, श्री. एस.एस.तेलगोटे सेवानिवृत्त होईपर्यंत प्रकरणांत अक्षम्य दिरंगाई करणे, त्यांना निलंबित करुन चौकशी करण्याबाबतचे आदेश असतानाही आयुक्त शिक्षण व प्रधान सचिव, शालेय शिक्षण यांच्याकडे ९ महिने विलंबाने मोघम व संदिग्ध प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे.

लेखा आक्षेपाशी संबंधित तत्कालिन अधिकारी यांना समितीच्या बैठकीची सूचना देण्यात येवूनही उपस्थित राहिले नव्हते. त्यांची एक वेतनवाढ रोखून त्याबाबतची नोंद सेवापुस्तिकेत घेण्याबाबतचे समितीने निदेश दिलेले आहेत. तसेच श्री. संजय तेलगोटे, तत्कालीन शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांचेवर कोणती कारवाई करण्यात आली ? यावर सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस विदित केले की, श्री. तेलगोटे हे माहे जानेवारी, २०१५ पासून निलंबित झाले होते. त्यामध्ये अधिकचे आरोपपत्र जोडलेले आहे. त्यांना

सेवानिवृत्तीनंतरचे लाभ सुरु केले आहेत का, वेतनवाढ रोखण्यात आली आहे काय, यावर सचिव, शिक्षण विभाग यांनी समितीस विदित केले की, त्यांना तात्पुरते लाभ देण्यात येत आहेत, कारण ते निलंबित झाले होतेच. विभागीय चौकशी सुरु आहे, चौकशी पूर्ण व्हायची आहे. पूर्ण लाभ देत नाही. विभागीय चौकशी सुरु असताना पूर्ण लाभ देण्यात येत नाहीत, तात्पुरते लाभ देण्यात येतात. यावर समितीने पुढे विचारणा केली की, त्यांच्या संदर्भात आज नेमके काय स्टेटस् आहे ते सांगावे आपण नेमके किती लाभदेत आहात ते रेकॉर्डवर आले पाहिजे. तुम्ही या मुद्यांना धरुन त्यांना निलंबित केले नाही का, यावर सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस विदित केले की, निलंबित आधीच होते. यावर समितीने विचारणा केली की, तुम्ही विभागीय चौकशी करताना हे मुद्दे १ ते ४ या जोडपत्रात टाकले आहेत. तुम्ही या मुद्यांना धरुन निलंबित केले नाही का, यावर सचिव, शालेय शिक्षण यांनी होकारार्थी उत्तर दिले. व ते अधिकारी आधीच निलंबित असल्याचे सांगितले. दोन वेळा निलंबित करता येत नाही. विभागीय चौकशीची सद्यःस्थिती काय आहे, यावर सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस माहिति दिली की, त्यांची फक्त ग्रॅच्युईटीची रक्कम थांबलेली आहे. तात्पुरते सेवानिवृत्ती वेतन सुरु आहे. तेही ५० टक्के असते आणि ग्रॅच्युईटी पूर्ण थांबविली जाते. विभागीय चौकशी अजून पूर्ण सुरु झालेली नाही. माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आयुक्त, पुणे यांच्याकडे पाठविली आहे. शिक्षण आयुक्तांचा मुद्दा अपूर्ण होता.त्यामुळे शिक्षण आयुक्तांनी माहिती द्यावी. यावर शिक्षण आयुक्त यांनी समितीस विदित केले की, श्री.एस.एस.तेलगोटे, तत्कालीन शिक्षण अधिकारी प्राथमिक, जिल्हा परिषद, बुलढाणा आणि श्री. खरात तत्कालीन प्रभारी शिक्षणाधिकारी, बुलढाणा यांच्या विरोधातील शिस्तभंगविषयक कारवाई पूर्ण का झाली नाही, असा विषय काल उपस्थित झालेला होता. पुणे शहरात आळंदी यात्रेच्या निमित्ताने सुट्टी असल्यामुळे कम्युनिकेशन गॅप निर्माण झालेला होता. सन २०१५ मध्ये श्री. एस.एस. तेलगोटे, तत्कालीन शिक्षण अधिकारी, प्राथमिक जिल्हा परिषद बुलढाणा हे शासकीय सेवेतुन निवृत्त झाले होते. माहे जानेवारी, २०१६ मध्ये पंचायती राजसमितीने बुलढाणा जिल्हा परिषदेस भेट दिली होती. त्यानंतर माहे २० ऑक्टोबर, २०१६ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बुलडाणा यांनी शिस्तभंगविषयक कारवाईचा प्रस्ताव शिक्षण आयुक्तालयात दाखल केला होता. सदर प्रस्तावात अनेक त्रुटी होत्या. म्हणून २० मार्च, २०१७ रोजी पत्रान्वये सदरहू प्रस्ताव दुरुस्तीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बुलढाणा यांच्याकडे पाठविला होता. तसेच सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस विदित केले की, यासंदर्भात शिक्षण आयुक्तांना माहिती दिलेली आहे. पुढील आठवडा पूर्ण होण्यापूर्वी चार्जशीट फायनल केली जाणार आहे. त्यानंतर पुढील कारवाई म्हणजे विभागीय चौकशी करण्याचे काम त्यांच्या विभागाचे असते. जोपर्यंत चार्जशीट फायनल केली जात नाही. तोपर्यंत शिक्षणाधिकारी लक्ष देणार आहेत. तसेच आवश्यक त्या त्रुटींची पूर्तता केली जाईल. पुढील आठवडा संपण्यापूर्वी विभागीय चौकशी करुन त्यासंदर्भातील अहवाल आमच्या विभागास अवगत करावा. यावर समितीने विचारणा केली की, सदरहू प्रकरण एक आठवडयात पूर्ण होईल काय, यावर सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस विदित केले की, विभागीय चौकशीचा अहवाल लवकरात लवकर पाठविला जाणार आहे. यावर समितीने असे निदेश दिले की, सदरहू प्रकरण तात्काळ निकाली काढावे अशी सुचना आहे. दोन्ही विभागांनी समन्वय ठेवून पुढील कार्यवाही करावी आणि त्यासंदर्भातील अहवाल समितीला अवगत करावा अशी समितीची सूचना आहे.

## अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषदेस आपल्या कार्यापैकी कोणत्याही कामाच्या प्रयोजनासाठी तिची स्थावर व जंगम अशा दोन्ही प्रकारच्या मालमत्ता संपादन, धारण किंवा हस्तांतरण करण्याचा अधिकार महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १२८ अन्वये आहेत. जिल्हा परिषदांच्या मालकीच्या जागा भाडयाने किंवा अन्य वापरासाठी देण्यापूर्वी अशा प्रत्येक प्रकरणी सक्षम प्राधिकारी/अधिकारी यांची त्यास मंजूरी प्राप्त करुन घेणे कायद्यानुसार बंधनकारक असतांना बुलढाणा जिल्हा परिषदेच्या संबंधित अधिकाऱ्यांनी अशी कोणतीही परवानगी न घेता नाममात्र दराने जिल्हा परिषदेच्या अखत्यारितील वेगवेगळया शाळांमधील सुमारे २५ खोल्या खाजगी शिक्षण संस्थांना रुपये ५०/- प्रति खोली प्रतिमाहे वापरण्यासाठी देऊन जिल्हा परिषदेचे आर्थिक नुकसान केल्याचे समितीच्या निदर्शनास आले. या संबंधात समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतांना उपरोक्त बाबी संदर्भात विचारणा केली असता त्यांनी सदरहू खोल्या कोणत्याही फर्निचर किंवा इतर बाबींसह संबंधितांस उपलब्ध करुन दिलेल्या नसल्याचे विदित करुन सदर खाजगी संस्थांकडून बाजारभावा ऐवजी नाममात्र दर आकारुन जिल्हा परिषदेचे आर्थिक नुकसान झाल्याची बाब मान्य केली. अशाप्रकारचे सदर खोल्यांचे वाटप नियमबाहय पद्धतीने झाल्याचे मान्य करुन समितीने दिलेल्या निदेशानुसार यास जबाबदार असलेल्या संबंधित शिक्षणाधिकाऱ्यांवर वेतनवाढ रोखीची व त्यांच्या निलंबनाची कारवाई करण्याबाबत विलंब झाल्याचेही मान्य केले. सदर प्रकरणी तत्कालीन शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांना समितीच्या बैठकीसाठी उपस्थित राहण्याबाबत जिल्हा परिषद प्रशासनाने कळविलेले असतांनाही ते समिती समोर उपस्थित न राहिल्याने व त्यांच्या निलंबनाचा प्रस्ताव आयुक्तांकडे व शालेय शिक्षण विभागाकडे पाठविण्यास झालेला विलंब तसेच त्यांच्या प्रकरणी कोणतेही विशेष कारण नसतांना प्रस्तावित विलंबनाची नस्ती संबंधित मंत्रालयीन विभागात ७-८ महिन्यापर्यंत विनाकारण प्रलंबित ठेवल्यामुळे त्यांना सेवा निवृत्तीची एक प्रकारे संधीच उपलब्ध करुन देण्यास मदतच करण्यात आल्याचेही समितीस आढळून आले आहे.

जिल्हा परिषदांच्या मालकीच्या स्थावर व जंगम मालमत्ताचे संपादन, भाडेपट्टा, विक्री किंवा अन्यथा हस्तांतरण महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम १२८ नुसार नियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा प्राधिकाऱ्याच्या किंवा अधिकाऱ्याच्या पूर्व मंजूरी वाचून विधीग्राहय असणार नाही, तसेच अशा प्रयोजनासाठी करण्यात आलेल्या नियमांद्वारे संबंधित प्राधिकारी/अधिकारी मंजूरी प्रदान करताना त्या मुल्याच्या मर्यादेतच मंजूरी देतील अशी स्पष्ट तरतूद असतांना जिल्हा परिषदेच्या सुमारे २५ खोल्या बाजारभावानुसार दर आकारणी न करता केवळ नाममात्र दराने अन्य संस्थांना वापरण्यासाठी दिल्याचे समितीला आढळून आले.

**या पुढील कालावधीत जिल्हा परिषदांच्या स्थावर व जंगम मालमत्तांचे संपादन, भाडेपट्टा विक्री व हस्तांतरण करण्यापूर्वी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमातील तरतूदींची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याबाबत शासनाच्या संबंधित विभागांनी सर्व जिल्हा परिषदांना कळविण्यात यावे व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्याच्या कालावधीत कळविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**प्रकरण सात**

**जिल्हा परिषद, बुलडाणा**

**शालेय पोषण आहार धान्यादी किराणा मालाची अदायगी १०% रक्कम राखून न ठेवता संपूर्ण रक्कम अदा करणेबाबत**

**परिच्छेद ३.१२८ (२०११-२०१२)**

जिल्हा परिषद, बुलडाणा : सन २०११-२०१२ (परिच्छेद क्रमांक ०७)

शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत धान्यादि किराणा मालाचे पुरवठ्यासंबंधी महाराष्ट्र मार्केटिंग फेडरेशन लि.मुंबई यांचेशी झालेल्या करारानुसार तसेच शिक्षण संचालक (प्राथ.) यांचे पत्र क्रमांक शासकीय पोषण आहार सुधायो/आशिस/३०३/२०११-२०१२/७१७७/(अ) दिनांक १-११-२०११ नुसार पुरवठा केलेल्या मालाच्या एकूण किंमतीपैकी ९०% रक्कम प्रथम देयकात व उर्वरित १०% रक्कम प्रयोग शाळा चाचणी अहवालानंतर देणे आवश्यक असतांना दिनांक २१.३.२०१२ व २९.३.२०१२ रोजी रुपये ५,९४,१९,२७९/- च्या मालाच्या पुरवठ्याचे १००% प्रदान करण्यात आले आहे.

पुरवठा देयकांची पडताळणी शाळाचे पोचपावत्या वरुन केली असता १ ते २ आठवडे उशिरा मालाचा पुरवठा करण्यात आला आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, बुलडाणा यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) शालेय पोषण आहार योजने अंतर्गत धान्यादी किराणा मालाची अदायगी १०% रक्कम राखुन न ठेवता संपुर्ण रक्कम अदा करणेबाबत आक्षेप नोंदविण्यात आला असून सदर आक्षेपाचा खुलासा पुढील प्रमाणे करण्यात येत आहे.

शिक्षण संचालक (प्राथ) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. शालेय पोषण आहार सुधायो/आशिस/३०३/२०११-१२/७१७७/(अ) दिनांक १.११.२०११ नुसार धान्यादी मालाची देयके अदा करण्याच्या पद्धतीनुसार मुद्दा क्र.०७ नुसार सदर धान्यादी मालाची देयकातुन प्रथम ९०% रक्कम प्रयोगशाळेचा तपासणी अहवाल समाधानकारक असल्यानंतरच अदा करावी व जिल्ह्यातील शालेय पोषण आहाराच्या पुरवठा संदर्भात काही तक्रारी असल्यास उर्वरित १०% रक्कम शिक्षण संचालक यांच्या मान्यतेने अदा करावी असे नमुद केले आहे. माहे सप्टेंबर ते डिसेंबर २०११ ची देयके या कार्यालयाकडून प्रत्यक्षात मार्च २०१२ मध्ये (३ ते ४ महिन्यानंतर) अदा करण्यात आली आहे. दरम्यान ३ ते ४ महिन्याच्या कालावधीत तालुकास्तरावरुन तसेच जिल्हास्तरावर पुरवठ्यासंदर्भात कोणतीही तक्रार या कार्यालयास प्राप्त नाही. देयक अदा करण्यास झालेल्या विलंबामुळे व्यवस्थापकीय संचालक, (आय.ए.एस.) दि.महाराष्ट्र स्टेट को.ऑप.मार्केटिंग फेडरेशन लि.,मुंबई यांचे पत्र क्र.जा.न./अन्नधान्य/शापोआ/२०११-१२/१६९७/११,दिनांक ३०.११.२०११ अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी या संदर्भात अर्धशासकीय पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने सदर देयक ३ ते ४ महिन्याच्या कालावधीनंतर माहे मार्च, २०१२ मध्ये अदा करण्यात आली आहे. काही शाळांना पुरवठा १ ते २ आठवडा विलंबाने झाल्याबद्दल प्रति आठवडा ०.५ % प्रमाणे रु. ७१,५३१/-दि.महाराष्ट्र स्टेट को.ऑप.मार्केटिंग फेडरेशन लि.मुंबई, शाखा बुलडाणा यांचेकडुन वसूल करुन शासन खाती विहित लेखाशिर्षाखाली दिनांक ७.१२.२०१५ रोजी चलनाने जमा करण्यात आली आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

बुलडाणा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १८ जानेवारी, २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, शालेय पोषण आहाराचा पुरवठा झाल्यानंतर त्याची शासकीय प्रयोग शाळेतून तपासणी का करण्यात आली नाही, पोषण आहाराची गुणवत्ता तपासणी न करता नियमबाह्यपणे संपूर्ण प्रदान करण्यास कोण जबाबदार आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांनी समितीस विदित केले की, शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या दिनांक १.११.२०११ च्या पत्रानुसार धान्यादी मालाची देयके अदा करण्याच्या पद्धतीनुसार धान्यादी मालाची देयकातून ९० टक्के रक्कम प्रयोगशाळेचा तपासणी अहवाल समाधानकारक असल्यानंतरच अदा करावी व जिल्ह्यातील शालेय पोषण आहाराच्या पुरवठा संदर्भात काही तक्रारी असल्यास उर्वरित १० टक्के रक्कम शिक्षण संचालक यांच्या मान्यतेने अदा करावी असे नमूद केले आहे. माहे सप्टेंबर ते डिसेंबर २०११ या कालावधीची देयके या कार्यालयाकडून प्रत्यक्षात माहे मार्च, २०१२ मध्ये अदा करण्यात आली आहेत. दरम्यान ३ ते ४ महिन्याच्या कालावधीत तालुका व जिल्हा स्तरावर पुरवठ्यासंदर्भात कोणतीही तक्रार या कार्यालयास प्राप्त झालेली नाही. देयक अदा करण्यास झालेल्या विलंबामुळे व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र स्टेट को.ऑ.मार्केटिंग फेडरेशन लि.यांच्या दिनांक ३०.११.२०११ च्या पत्रान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सदर देयके अदा करण्यात यावीत. असे अर्धशासकीय पत्रान्वये कळविण्यात आले असता माहे मार्च, २०१२ मध्ये सदरहू देयक अदा करण्यात आले आहे. काही शाळांना पुरवठा १ ते २ आठवडे विलंबाने झाल्याबद्दल प्रति आठवडा ०.५ टक्के प्रमाणे रुपये ७१,५३१/- महाराष्ट्र स्टेट को.ऑप.मार्केटिंग फेडरेशन लि.मुंबई, शाखा बुलडाणा यांच्याकडून वसूल करुन शासनाकडे दिनांक ७.१२.२०१५ रोजी चलनाद्वारे भरण्यात आले आहेत. यावर पुढे समितीने अशी विचारणा केली की, मुलांना पोषण आहार मिळालाच पाहिजे. परंतु, आपण त्यासंबंधातील जबाबदारी कोणावरही निश्चित केलेली दिसत नाही. जिल्हा परिषदेला दोन आठवडे माल उशिरा मिळाला असल्यामुळे आपण दोन आठवडे मुलांना उपाशी ठेवले आहे काय, मालाचा पुरवठा झालेला नाही. तेव्हा यात नेमकी चूक कोणाची आहे, मालाची ऑर्डर आपण किती दिवस आधी दिली पाहिजे, आपला स्टॉक निरंक राहता कामा नये. यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी समितीस विदित केले की, माहे सप्टेंबर आणि ऑक्टोबर २०११ मध्ये पुरवठा नव्हता. तथापि, दिनांक १९.९.२०११ मध्ये ऑर्डर दिलेली आहे.

यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, म्हणजे आपण माल संपल्यानंतर ऑर्डर दिलेली आहे. आपण मागणी कधी केली आहे त्याचा रेकॉर्ड आपल्याकडे आहे काय, ज्यांनी हा प्रकार केलेला आहे त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करावी लागेल. या प्रकरणाची जबाबदारी कोणाकडे आहे, माल पोहोचला नाही हे संबंधितांना समजले पाहिजे होते. यात निष्काळजीपणा झालेला आहे. आपण मुख्याध्यापकांना कळविले आहे काय, आपल्या घरातील धान्य संपत आल्यानंतर आपण धान्य खरेदी करतो. पण येथे आपण काहीच केलेले नाही. या प्रकरणी जे जबाबदार आहेत त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन दंडात्मक कारवाई करावी व त्यांच्या सेवापुस्तिकेमध्ये त्याची नोंद घेऊन यासंबंधीचा अहवाल समितीला पाठवून द्यावा.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

**शालेय पोषण आहार धान्यादी किराणा मालाची अदायगी १० टक्के रक्कम राखून न ठेवता अदा करणेबाबत :-**

(१) शालेय पोषण आहाराचा पुरवठा झाल्यानंतर त्याची शासकीय प्रयोगशाळेतून गुणवत्ता तपासणी न करता नियमबाहयपणे संपूर्ण निधी प्रदान करणे. काही शाळांना एक ते दोन आठवडा विलंबाने शालेय पोषण आहाराचा पुरवठा करण्यात येणे, या प्रकरणी चौकशी करुन जबाबदारी निश्चित करण्याबाबत तसेच संबंधितांवर दंडात्मक कारवाई करावी तसेच त्यांच्या सेवापुस्तिकेत नोंद घेवून अहवाल सादर करण्याबाबत समितीने निदेशित केलेले असूनही शालेय पोषण आहार योजनेत खंड पडणे या गंभीर विषयांत नाममात्र १०० रुपये दंडाची कारवाई करणे किंवा तात्पुरती वेतनवाढ रोखणे या किरकोळ शिक्षा करण्यात आल्या आहेत. जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाही बाबत शासन सहमत आहे काय,

(२) शालेय पोषण आहार पुरवठा कामी शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे व महाराष्ट्र स्टेट को ऑप. फेडरेशन, मुंबई यांच्यामध्ये माहे २३ ऑक्टोबर, २००९ मध्ये झालेला करार केव्हा संपला व त्याची मुदत वेळोवेळी केव्हा वाढविण्यात आली आहे. तसेच माहे सप्टेंबर व ऑक्टोबर, २०११ या कालावधीत करारनाम्यास मुदतवाढ न मिळाल्यामुळे जिल्हा परिषद शिक्षण विभागातून शिक्षण संचालक कार्यालयात दुरध्वनी केल्यावर शालेय पोषण आहार पुरवठयाबाबत तोंडी आदेश देण्याची कार्यपद्धती शासनाच्या नियमांशी सुसंगत आहे काय,

(३) शालेय पोषण आहार पुरवठा करण्यासंदर्भात करारनामा संपुष्टात आल्यामुळे व अशा इतर कारणांमुळे राज्यात शालेय पोषण आहारात खंड पडल्याचे बुलढाणा जिल्हा परिषदेला भेट दिली असता समितीच्या निदर्शनास आले असून इतर जिल्हयांमधील पोषण आहार पुरवठयासंदर्भात खंड पडणे इत्यादीचा शासनाने आढावा घेतला आहे काय, त्यात सुधारणा करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे,

(४) पंचायत समिती, संग्रामपूर अंतर्गत दिनांक १ ते १८ जानेवारी, २०१६ या कालावधीत १६ शाळांना शालेय पोषण आहाराचे धान्य प्राप्त झालेले नसल्याची बाब समितीच्या निदर्शनास आली असता शिक्षण विभागातील अधिकारी श्रीमती ठग यांनी समितीसमोर १६ शाळांना १८ दिवस पोषण आहारात खंड पडल्याचे कबूल केले असून दिनांक २८ डिसेंबर, २०१५ रोजी गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, संग्रामपूर यांनी मुख्यालयी पत्र लिहून १६ शाळांना तांदुळ व धान्यादी माल संपल्याचे कळविले या बाबींचा समितीस पाठविलेल्या चौकशी अहवालात उल्लेख करण्यात आलेला नाही. याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय तसेच जिल्हा परिषद स्तरावर झालेल्या चौकशीशी शासन सहमत आहे काय,

(५) शालेय पोषण आहार योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणे, मालाचा वेळेवर पुरवठा करणे, मालाचा योग्य दर्जा व स्वच्छतेची सुविधा तसेच बोगस विदयार्थी संख्येवरुन गैरव्यवहार, अनियमितता थांबविणे इ. संदर्भात विभागाकडून कोणती कार्यवाही करण्यात येत आहे.

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) समितीचे निर्देशानुसार चौकशी करण्यात आली असून चौकशी अंती निदर्शनास आलेल्या बाबींच्या अनुषंगाने खालील प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

माहे सप्टेंबर ते डिसेंबर, २०११ या कालावधीत प्राप्त झालेल्या धान्यादी मालाचे नमुने त्या त्या वेळी प्रयोगशाळेकडे पाठविण्यात आलेले आहेत.

माहे सप्टेंबर, व ऑक्टोबर, २०११ या महिन्याचे प्रयोगशाळेकडुन तपासणी अहवाल माहे नोव्हेंबर व डिसेंबर, २०११ मध्ये प्राप्त झालेले असून आहे.धान्यादी मालांचे तपासणी अहवाल माहे फेब्रुवारी, २०१२ मध्ये प्राप्त झालेले आहे.

पुरवठादारास माहे सप्टेंबर, व ऑक्टोबर, २०११ चे धान्यादी मालाचे देयक दि. २१ मार्च, २०१२ तसेच माहे नोव्हेंबर, व डिसेंबर, २०११ या महिन्याचे धान्यादी मालाचे देयक दिनांक ३१ मार्च, २०१२ रोजी अदा करण्यात आले आहे म्हणजेच पुरवठादाराचे देयक अदा करण्यापूर्वी प्रयोगशाळा तपासणी अहवाल कार्यालयाला प्राप्त होते. त्यामुळे पुरवठयासंदर्भात त्या कालावधीत धान्यादी मालाबद्दल कोणतीही तक्रार नसणे व प्रयोगशाळा तपासणी अहवाल उपलब्ध असल्याने पुरवठादाराची १० % रक्कम राखुन न ठेवता सबंधितास १००% रक्कम अदा करण्यात आलेली आहे. काही शाळांना धान्यादी मालाचा पुरवठा एक ते दोन आठवडे विलंबाने केल्याबद्दल संबंधीत पुरवठादार दि. महाराष्ट्र स्टेट को.ऑप मार्केटिंग फेडरेशन लि. मुंबई, शाखा बुलढाणा यांना प्रती आठवडा ०.५% याप्रमाणे रु. ७१,५३१/- दंड आकारुन सदर रक्कम त्यांच्याकडुन वसूल करुन दि. ०७/१२/२०१५ रोजी चलानाव्दारे शासनखाती जमा करण्यात आलेले आहे. उपरोक्त अनियमिततेबाबत खालील प्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.

(अ) श्री. एस.एस.तेलगोटे, तत्कालीन शिक्षणाधिकारी (यापुर्वीच) दि. २/१/२०१५ रोजी निलंबित झालेले आहे. तथापि उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधीतांविरुद्ध उपरोक्त मुद्दयाच्या अनुषंगाने पुरवणी जोडपत्र १ ते ४ मा. शिक्षण आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे सादर करण्यात आलेले आहे.

(ब) तत्कालीन लेखाधिकारी श्रीमती लोथे या सेवानिवृत्त झालेल्या असल्याने त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन १०००/- रु. दंडात्मक कार्यवाही करण्यात आली आहे.

(क) श्री. सोनपसारे (तत्कालीन कनिष्ठ सहाय्यक) यांची एक वार्षिक वेतनवाढ बंद करुन त्यांच्या सेवापुस्तिकेत नोंद घेण्यात आली आहे.

(२) शालेय पोषण आहार पुरवठा कामी दि. २३ ऑक्टोबर, २००९ मध्ये झालेल्या करारनाम्याची मुदत एक वर्षासाठी होती, परंतु शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रक क्र.शापोआ/३०३/२०१०-११/२१८२ दि. २५/०५/२०१० नुसार महाराष्ट्र स्टेट को.ऑप मार्केटिंग फेडरेशन लि. मुंबई यांनी शैक्षणिक सत्र २०१०-२०११ मधील मालाचा पुरवठा दि. २३ ऑक्टोबर २००९ च्या करारनाम्यानुसार जुन २०११ पर्यंत अथवा शासनाचे पुढील आदेशापर्यंत करण्याबाबत नमुद केला आहे. त्या पुढील पुरवठा आदेश संचालकाचे पत्र दि. १०/०६/२०११ व दि. ३०/०९/२०११ अन्वये देण्यात आलेले असून मौखिक किंवा दुरध्वनी संदेशानुसार आदेश देण्यात आलेले नाहीत.

(३) शालेय पोषण आहारामध्ये खंड पडू नये तसेच विलंबाने मालाचा पुरवठा होऊ नये याबाबत बुलढाणा जिल्हापरिषदेअंतर्गत सर्व शाळांना मालाचा पुरवठा पुढील साठा शिल्लक असतानाच २० दिवस अगोदर करण्याबाबत उपाययोजना केलेली आहे (बफर स्टॉक)

(४) पंचायत समिती, संग्रामपूर अंतर्गत दिनांक ०१ ते १६ जानेवारी, २०१६ या कालावधीत १६ शाळांना शालेय पोषण आहाराचे धान्य प्राप्त झालेले नसल्याची बाब निदर्शनास आली आहे. याबाबत खालील प्रमाणे खुलासा सादर करण्यात येत आहे. शिक्षण संचालक, (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रक दि. ११/०६/२०१४ अन्वये पुरवठादाराशी झालेला करारनामा हा एक वर्षासाठी असल्याने त्याची मुदत दि. १०/०६/२०१५ ला समाप्त झालेली आहे. सन २०१५-१६ मध्ये निविदा प्रक्रिया व्दारे नव्याने पुरवठादार निश्चित होण्यास काही कालावधी लागणार असल्याने मा. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडुन पत्र क्र.शापोआ पुरवठा मुदतवाढ/२५१५/दि. १६ जून, २०१५ अन्वये मुदतवाढ देण्यात येऊन त्यासाठी दोन महिन्याकरिता पुरवठा करण्यात आला होता. पुढील मुदतवाढ नसल्याने या कार्यालयाचे पत्र क्र.बुजिप/ शिप्रा/ शसवसेअस/३८७४ /दिनांक ०२/०९/२०१५ अन्वये मुदतवाढ देणेबाबत या कार्यालयाकडून शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना विनंती करण्यात आली होती. त्यानुसार शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.पुरवठा/मुदतवाढ/४२९१ दि. ०४/०६/२०१५ अन्वये शालेय पोषण आहारामध्ये खंड पडु नये म्हणून मुदतवाढ देण्यात आली होती. तसेच पुढील पुरवठयासंदर्भात मुदतवाढ नसल्याने या कार्यालयाचे पत्र क्र.बुजिप/शिप्रा/शापोआ/५९४९ दि. ०४/१२/२०१५ अन्वये मुदतवाढ देणेबाबत या कार्यालयाकडून शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना विनंती करण्यात आली होती. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडुन दि. १५ डिसेंबर, २०१५ रोजी मुदतवाढ दिल्याने जिल्हा मार्केटिंग अधिकारी, दि. महाराष्ट्र स्टेट को.ऑप.मार्केटिंग फेडरेशन लि. मुंबई, शाखा बुलढाणा यांना दि. २८/१२/२०१५ ला पुरवठा आदेश देण्यात येऊन तात्काळ पुरवठा करणेबाबत आदेशित करण्यात आले होते, त्यामुळे संग्रामपुर तालुक्यांतील १६ शाळांना विलंबाने पुरवठा झालेला आहे.

(५) शालेय पोषण आहार योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणे, मालाचा वेळेवर पुरवठा करणे, मालाचा दर्जा योग्य असणे व अस्वच्छतेची सुविधा तसेच बोगस विद्यार्थी संख्येवरुन गैरव्यवहार, अनियमितता थांबविणे इ. संदर्भात शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दि. ३१/०७/२०१३ अन्वये सर्व जिल्हा परिषदांना सुचना देण्यात आलेल्या आहे. तसेच शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने मा.जिल्हाधिकारी, बुलढाणा व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांच्या संयुक्त स्वाक्षरीने या कार्यालयाचे पत्र क्र. बुजिप/शिप्रा/शापोआ/६१९७/२०१३ दि. ०६/०८/२०१३ मा. मुख्य कार्यकारी अधिकारी व मा. शिक्षणाधिकारी यांच्या संयुक्त स्वाक्षरीने दि. २५/०३/ २०१५ अन्वये मालाच्या पुरवठयाबाबत मालाचा योग्य दर्जा तपासुन घेणे, या कार्यालयाकडून सर्व गट शिक्षणाधिकारी यांना लेखी सुचना देण्यात आलेल्या आहे. बोगस विदयार्थी संख्येवरुन गैरव्यवहार, अनियमितता थांबविणे तसेच शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत मोबाईल ॲप व्दारे दररोज सरल डाटा ऐंट्री शाळा स्तरावर करणे बंधनकारक केले आहे.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात शालेय शिक्षण विभागाकडून खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**शालेय शिक्षण विभागाचे अभिप्राय :-**

याबाबत जिल्हा परिषद बुलडाणा यांनी दिलेल्या अभिप्रायाशी सहमत आहे.

दि. ०२/०२/२०१६ च्या शासन निर्णयातील केंद्र शासनाच्या मध्यान्ह भोजन योजना (शालेय पोषण आहार) नियमावली २०१५ नुसार शालेय पोषण आहार योजना सुरळितपणे चालु राहण्यासाठी योजनेत खंड पडू नये म्हणून शाळा स्तरावर कोणत्याही बाबीसाठी उपलब्ध असलेला निधी आवश्यकतेनुसार तात्पुरत्या स्वरुपात मध्यान्ह भोजन योजनेसाठी वापरण्याचे अधिकार शाळेच्या मुख्याध्यापकास/मुख्याध्यापिकेस देण्यात आले आहेत.

१) याबाबत जिल्हा परिषद, बुलडाणा यांनी दिलेल्या अभिप्रायाशी सहमत आहे.

२) शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत काही कारणामुळे शाळांना तांदुळ आणि इतर धान्यादी मालाचा पुरवठा करणे शक्य नसल्यास खुल्या बाजारातुन धान्य खरेदी करुन विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार शिजवुन देण्याचे संबंधीत शाळांच्या मुख्याध्यापकांना शिक्षण संचालक (प्राथमिक) यांच्या स्तरावरुन वेळोवेळी सुचना दिल्या जातात.

३) दि. ०२/०२/२०१६ च्या शासन निर्णयातील केंद्र शासनाच्या मध्यान्ह भोजन योजना (शालेय पोषण आहार) नियमावली २०१५ नुसार शालेय पोषण आहार योजना सुरळितपणे चालु राहण्यासाठी योजनेत खंड पडु नये म्हणून शाळा स्तरावर कोणत्याही बाबीसाठी उपलब्ध असलेला निधी आवश्यकतेनुसार तात्पुरत्या स्वरुपात मध्यान्ह भोजन योजनेसाठी वापरण्याचे अधिकार शाळेच्या मुख्याध्यापकास/मुख्याध्यापिकेस देण्यात आले आहेत. शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत काही कारणामुळे शाळांना तांदुळ आणि इतर धान्यादी मालाचा पुरवठा करणे शक्य नसल्यास खुल्या बाजारातुन धान्य खरेदी करुन विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार शिजवून देण्याचे संबंधित शाळांच्या मुख्याध्यापकांना शिक्षण संचालक (प्राथ.) यांच्या स्तरावरुन वेळोवेळी सुचना दिल्या जातात.

४) शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत विदयार्थ्यांना चांगल्या दर्जाचा आहार मिळावा यासाठी तांदुळ व धान्यादी मालाची साठवणुक, आहार शिजविताना घ्यावयाची काळजी, परिसरातील स्वच्छता इ. बाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत. याशिवाय, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (SCERT) पुणे यांचेमार्फत स्वयंपाकी तथा मदतनिस यांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. शाळांना धान्य साठविण्यासाठी कोठया उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. योजनेबाबत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार दररोज दोन पालकांनी शाळेत उपस्थित राहुन शालेय पोषण आहाराच्या दर्जाबाबत पाहणी करुन चव घ्यावी व त्याची नोंद चव रजिस्टरवर घेण्यात यावी अशी तरतुद आहे. यासोबत पुरवठयासंदर्भात अथवा आहाराच्या दर्जाबाबत काही तक्रार असल्यास पालकांनी त्याबाबत गटशिक्षणाधिकारी यांना SMS व्दारे माहिती दयावी व त्यासाठी प्रत्येक शाळेने तालुक्यातील गटशिक्षणाधिकारी यांचा मोबाईल नंबर स्पष्ट दिसु शकेल अशा रितीने शाळेच्या दर्शनी भागात लिहावा असे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत पुरविण्यात येणा-या अन्नाचा दर्जा शासन मान्य प्रयोगशाळेतुन तपासुन घेण्याच्या सुचना दिलेल्या आहेत.

### विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने बुलडाणा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक १४ नोव्हेंबर, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, शालेय पोषण आहार संदर्भात समितीला माहिती देण्यात यावी, यासंदर्भात कारवाई करण्यात आलेली आहे काय, यावर सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस विदित केले की, या प्रकरणी देखील श्री.तेलगोटे यांचा संबंध येत आहे. याबाबत समितीने ठीक आहे असे म्हटले.

### अभिप्राय व शिफारशी

बुलडाणा जिल्हयातील पंचायत समितीतील मुद्ये आहेत. बालकांना शालेय पोषण आहार नियमितपणे व चांगल्या दर्जाचा मिळावा हा शासनाचा हेतू आहे. धान्यादी माल वेळेत मिळावा या करिता अधिकाऱ्यांना कामाच्या जबाबदाऱ्या नेमून दिलेल्या आहेत. ठेकेदाराने मालाचा पुरवठा केल्यानंतर धान्यादी मालाची देयके प्रथम ९०% रक्कम प्रयोगशाळेचा तपासणी अहवाल समाधानकारक असल्यास अदा करावे असे शिक्षण संचालक (प्राथ.) यांनी दिनांक १/११/२०११ रोजीच्या पत्रानुसार निदेश दिले आहेत. पालकांच्या तक्रारी असल्यास उर्वरित १०% रक्कम राखून ठेवण्यात येते, परंतु या प्रकरणात त्यांना दिनांक २१ व २९ मार्च, २०१२ रोजीच १००% रक्कम रु. ५,९४,१९,२०९/- अदा केलेली आहे. माल १/२ आठवडे उशिराने पुरविल्यामुळे ०.५% प्रमाणे रुपये ७१,५३१/- दंड आकारणी केलेली आहे. तसेच तालुक्यातील काही शाळांना धान्यादी मालाचा पुरवठा १/२ आठवडे विलंबाने झाल्यामुळे मुलांना आहाराअभावी उपाशी राहावे लागले.

सदरहू योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी व्हावी, मालाचा पुरवठा वेळेत व्हावा व त्याचा दर्जा योग्य असावा, बोगस विद्यार्थी संख्येच्या गैरव्यवहारास सध्याच्या आधुनिक मोबाईल ॲपद्वारे दैनंदिन सरल डाटा ऐंट्री शाळा स्तरावर बंधनकारक करणे आवश्यक आहे. शालेय पोषण आहाराचा पुरवठा झाल्यानंतर शासकीय प्रयोगशाळेतून गुणवत्ता न तपासता नियमबाहयपणे निधी प्रदान करण्यात आलेला आहे. पुरवठा देयकांची पडताळणी केली असता शाळेच्या पोच पावत्या एक-दोन आठवडे मालाचा उशिरा पुरवठा केल्याचे आढळले आहे. पंचायत समिती संग्रामपूर येथे दिनांक १ ते १६ जानेवारी, २०१६ या कालावधीत १६ शाळांचा तांदूळ व धान्यादी माल

संपल्याचे कळविले होते. तसेच दोन पालकांनी शाळेत उपस्थित राहून शालेय पोषण आहाराच्या बनविलेल्या अन्न पदार्थाची पाहणी करुन चव घ्यावी व त्याची नोंद चव नोंदवहीत करण्यात यावी अशी तरतूद असून ही त्याचे पालन होताना आढळून येत नाही.

**याप्रकरणी यथायोग्य चौकशी करण्यात यावी व व सर्व संबंधित जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्यात यावी, याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

## प्रकरण आठ

## जिल्हा परिषद, बुलडाणा

## जलंब-खेर्डा शेगांव रस्ता बांधकामातील अनियमितता

**(परिच्छेद ३.२४९) (सन २०११-२०१२)**

जिल्हा परिषद, बुलढाणा सन २०११-२०१२ (परिच्छेद क्र.१६ )-

लेखाशिर्ष ४ इमारत व दळणवळण ३०५४ मार्ग व पुल या लेखाशिर्षाखालील बांधकाम विभागातील रस्त्याच्या बांधकामाबाबत याबाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत :-

(१) महाराष्ट्र जिल्हा व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ नियम १४६ अन्वये कामाचा आदेश देण्यापुर्वी करारनामा करुन घेणे आवश्यक आहे, परंतु करारनाम्यावर कार्यकारी अभियंता यांची स्विकृतीची स्वाक्षरी दिनांक नाही.

(२) मौजमाप पुस्तिकाची तपासणी केली असता बाब क्रमांक १ मधील काम दिनांक २०.३.२०१२ ला केल्याचे दिसते. परंतु प्रत्यक्ष कामाचा आदेश हा दिनांक २६.३.२०१२ रोजीचा आहे. त्यामुळे सदरचे काम हे आदेशापूर्वी झाल्याचे दिसुन येते.

(३) वरील प्रमाणे कामात प्रकालनापेक्षा जास्त कामे करुन मंजुरी न घेता १ X१००X३ = ३०० sqm काम जास्त दर्शवुन रुपये १८९४५/- चे अतिप्रदान झालेले आहे. सदरची रक्कम वसूल करणे आवश्यक आहे.

(४) कामाचा कालावधी हा ६० दिवसांचा असतांना हे काम ०४ दिवसात पुर्ण केले आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, बुलडाणा यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) सदर करारनामाच्या मुद्रांक पेपरवर करारनामा केल्याबाबत कार्यकारी अभियंता यांची दिनांकित स्वाक्षरी साक्षीदाराचे स्वाक्षरीसह करण्यात आली आहे. सदर कामाचा करारनामा कामाचा आदेश देण्यापूर्वी करुन घेण्यात आला आहे, व तशी तारीख करारपत्रावर नमुद करण्यात आली आहे.

(२) या कामाचे वाटप सहकारी संस्थेस पत्र क्र. ६३२, दिनांक २७.०५.२०११ अन्वये करण्यात आले होते व तद्नंतर कंत्राटदाराने कामाची पुर्व तयारी केली. प्रत्यक्षात कामाचे कागदपत्रे संस्थेची सुरक्षा रक्कम भरणा केल्यानंतर दिनांक २६.०३.२०१२ रोजी कार्यारंभ आदेश वितरित करण्यात आले. नजरचुकीने मोजमाप पुस्तिकेवर दि. २६.३.२०१२ चे ऐवजी २०.०३.२०१२ ही नोंदविण्यात आलेली होती. ती दुरुस्ती करुन २६.३.२०१२ अशी दुरुस्त करण्यात आलेली आहे. याबाबत संबंधित शाखा अभियंता यांना ताकीद देण्यात आलेली आहे.

(३) सदर रस्त्याचे काम कि.मी.२ मध्ये ४०० मी. लांबीचे २० mm कारपेट तसेच सीलकोटचे काम प्राकलनानुसार १२०० sqm प्रस्तावित होते. त्याप्रमाणे १X३००X३.००= ९००.०० sqm तसेच १X१००X३=३००.०० sqm असे एकूण ९००.०० sqm +३००.०० sqm= १२००.०० sqm प्राकलनाप्रमाणे प्रत्यक्षात काम करण्यात आलेले असून त्याप्रमाणे मोजमाप पुस्तिकेमध्ये नोंद घेण्यात आलेली आहे व कंत्राटदारास देयक अदा करण्यात आलेले आहे. रु. १८,९४५/- चे अतिप्रदान झालेले नसल्यामुळे वसूल करण्यात आलेले नाही.

(४) सदर कामाचा कालावधी हा ६० दिवसाचा होता मात्र सदर काम हे फक्त ४०० मीटर लांबीचे आहे. विहित निकषानुसार बी.बी.एम.चे काम दर दिवशी २०० मीटर लांबी आहे. ३.७५ मीटर रुंदीचे = ७५०.०० चौ.मीटरचे काम १ दिवसात पुर्ण करावे लागते, तसेच २० मी.मी. कारपेट व सिलकोटचे काम सुद्धा ७५० चौ.मी. एक दिवसात पुर्ण करणे विहित निकषाप्रमाणे आहे. त्यामुळे सदर निकष लक्षात घेता संबधित कंत्राटदारास आवश्यक निर्देश देण्यात आले व काम चार दिवसात पुर्ण करण्यात आले सदर रस्ता हा पुरहानीमुळे क्षतीग्रस्त झाला असल्याने व वाहतुक सुरळीत राहण्याकरिता तातडीने काम करणे आवश्यक होते. त्यानुसार ४ दिवसात काम पुर्ण करण्यात आले आहे. काम सुस्थितीत आहे.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

बुलडाणा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १८ जानेवारी, २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, उपरोक्त रस्त्याच्या कामाच्या करारनाम्यावर कार्यकारी अभियंता यांनी दिनांकित स्वाक्षरी केव्हा केली. कार्यारंभ आदेश दि.२६/०३/२०१२ रोजीचा आहे. तथापि, मोजमाप पुस्तिकेमध्ये बाब क्र.१ providing laying ५० mm. BBM road surface हे काम दि.२०/०३/२०१२ रोजी केल्याची नोंद आहे. त्यावर उपरी लेखन करुन दि.२६/०३/२०१२ ही तारीख नमूद केल्याचे आढळते. या अनियमिततेबाबत संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली, तसेच सदर रस्त्याचे काम केवळ ४ दिवसांमध्ये गुणवत्तापूर्णरित्या कसे पूर्ण केले, तसेच रस्त्याच्या गुणवत्तेची खात्री कोणी केली यावर कार्यकारी अभियंता, बांधकाम यांनी समितीस विदित केले की, जिल्हापरिषदेकडे जी कागदपत्रे आहेत, त्यावर कार्यकारी अभियंता यांनी स्वाक्षरी केल्याची नोंद आहे. त्यांनी दि.२६/०३/२०१२ ही तारीख नमूद केली आहे. हे खरे आहे की, तारखेमध्ये खाडाखोड झालेली आहे. यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी विचारणा केली की, तारखेमध्ये खाडाखोड करण्याची कारणे काय आहेत, या कामाची वर्क ऑर्डर कधी झाली आणि काम कधी पूर्ण करण्यात आले, यावर कार्यकारी अभियंता, बांधकाम यांनी समितीस विदित केले की, दिनांक २६/०३/२०१२ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले आणि दि.३०/०३/२०१२ रोजी काम पूर्ण झाले. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, मूळात कार्यारंभ आदेश दि.२६/०३/२०१२ रोजी देण्यात आले व या रस्त्याचे काम

६० दिवसांत पूर्ण करावयाचे होते. परंतु ठेकेदाराने ६० दिवसांत करावयाचे काम अवघ्या ४ दिवसांत पूर्ण केले. हे काम जवळजवळ १० लाख रुपयांचे होते. एवढ्या मोठ्या रकमेचे काम केवळ ४ दिवसांत पूर्ण होऊ शकत नाही. कामाच्या बाबतीत क्वॉलिटी कंट्रोलचा रिपोर्ट घेतला आहे काय, यावर कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी होकारार्थी उत्तर दिले. दिनांक २६/०३/२०१२ रोजी कार्यारंभ आदेश दिल्यानंतर सदरहू काम दि.३०/०३/२०१२ रोजी पूर्ण झाले. अध्यक्ष, अजित मजूर कामगार सहकारी संस्थेला दिले होते. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, दि.३१/०३/२०१२ रोजी ठेकेदाराला रु.८,५७,२४०/- इतक्या रकमेचे प्रदान केले आहे. हे काम कार्यकारी अभियंत्यांच्या कालावधीतील नसल्याने तत्कालीन कार्यकारी अभियंता दि.२६/०३/२०१२ रोजी कार्यारंभ आदेश दिले. आणि सदरहू काम पूर्ण केले आणि अंतिम देयक दि.३१/०३/२०१२ रोजी अदा करण्यात आले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलडाणा यांनी समितीला विदित केले की, दि.२७/०५/२०११ रोजी कामांचे वाटप करण्यात आले. हे काम मजूर संस्थेचे असल्यामुळे त्यांना माहित असते की, हे काम आपल्याला करावयाचे आहे. असे असताना सुद्धा या कार्यालयातून सदरहू कामाची वर्क ऑर्डर मार्च महिन्यात देण्यात आली. वास्तविक पाहता कामाचे वाटप केल्यानंतर ५-७ दिवसांत वर्क ऑर्डर देणे अपेक्षित होते, परंतु त्यांनी वर्क ऑर्डर विलंबाने दिली. या कामाचे देयक अदा करण्यात आले आहे काय, यावर प्रभारी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी समितीस होकारार्थी आश्वासित केले की, एमबी रेकॉर्ड झाले असून कामाचे पेमेंट करण्यात आले आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, हे काम कोणत्या योजनेंतर्गत घेण्यात आलेले आहे, यावर कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी समितीस विदित केले की, लेखाशीर्ष-३०५४, मार्ग व पूल या लेखाशीर्षाखालील हे काम आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, लेखाशीर्ष २५१५ किंवा ३०५४ या अंतर्गत आमदार विकास निधी किंवा खासदार विकास निधीतून करण्यात येतात. इतर कामांच्या बाबतीत प्रशासकीय मान्यता लागते. नियोजन विभागाकडून निधी आल्यानंतर तो खर्च करण्याबाबतचे सर्व अधिकार जिल्हा परिषदेला असतात. जिल्हा परिषदेने दिलेल्या लेखी उत्तरात नमूद केले आहे की, हा रस्ता पूरहानीमुळे क्षतीग्रस्त झाला असल्याने व वाहतूक सुरळीत राहण्याकरिता तातडीने काम करणे आवश्यक होते. त्यानुसार ४ दिवसांत काम पूर्ण करण्यात आले आहे. सदरहू काम मार्च महिन्यात पूर्ण करण्यात आले. मार्च महिन्यात पूरहानी होते काय, यावर समितीला कोणतेही उत्तर प्राप्त झाले नाही. समिती निदेश देत आहे की, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी या संपूर्ण कामाची चौकशी करावी. ज्याप्रमाणे लेखा परिक्षकांच्या निदर्शनास हा संपूर्ण विषय आला त्याच प्रमाणे मुख्य लेखा व वित्त अधिकाऱ्यांच्या सुद्धा निदर्शनास येणे आवश्यक होते. तसेच ज्यांनी या संपूर्ण कामाकडे दुर्लक्ष केले त्यांची सुद्धा चौकशी करावी. तसेच समिती या विषयाच्या बाबतीत विभागीय सचिवांची साक्ष घेईल व मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सदरहू कामाच्या चौकशीचा अहवाल समितीला सादर करावा. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस होकारार्थी आश्वासित केले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

**जलंब- खेर्डा-शेगांव रस्ता बांधकामातील अनियमितता :-**

तत्कालीन कार्यकारी अभियंता यांनी सदरहू कामाचे दिनांक २६ मार्च, २०१२ रोजी कार्यारंभ आदेश देऊन दिनांक ३० मार्च, २०१२ रोजी काम पूर्ण करुन कामाचे अंतिम देयक दिनांक ३१ मार्च, २०१२ रोजी अदा करण्यात आले. कार्यारंभ आदेश दिल्यानंतर ६० दिवसात पूर्ण करावयाचे काम अवघ्या ४ दिवसांत पूर्ण करण्यात आल्याचे समितीस माहिती देण्यात आली. या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, यावर अधिकचा खुलासा करावा.

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सदर रस्त्याची चौकशी करण्यात आली.

(१) प्रशासकीय मान्यता दिनांक ३०.०३.२०११ रु. १०.०० लक्ष
(२) तांत्रिक मान्यता क्र.८२/अ.अ./११-१२/रु.९.९१ लक्ष
(३) काम वाटप दिनांक २७/०५/२०११
(४) कामाचा आदेश दिनांक २६.०३.२०१२

तांत्रिक मान्यतेनुसार खालील प्रमाणे कामाची व्याप्ती आहे.

अ) एकूण लांबी १४००.०० मीटर व रुंदी ३.०० मीटर
ब) ५० मीमी बीबीएम (पॅचवर्क) २१०.०० चौ.मी.
क) २० मीमी प्रिमिक्स कारपेट ४५३६.०० चौ.मी.
ड) लिक्वीड सिलकोट ४२००.०० चौ.मी.

प्रत्यक्षात काम करताना खालील प्रमाणे कार्यान्वित करण्यात आले.

(१) ५० मीमी बीबीएम (पॅचेस) ६३५.७२ चौ.मी.(किमी १ मध्ये ४८४.९३ चौ.मी. व किमी २ मध्ये १५०.८६ चौ.मी.

(२) २० मीमी प्रिमिक्स कारपेट ४०८६.०० चौ.मी. (किमी १ मध्ये ३११४.९० चौ.मी. व किमी २ मध्ये १२००.०० चौ.मी.) व लिक्विड सिलकोट ४२००.०० चौ.मी.)

(३) हॉट मिक्स प्लॅट मधून २० ते ३० मे.टन प्रति तास यानुसार किमान १२०.०० मे.टनचे मिक्स उपलब्ध होते. या कामास कारपेटकरिता २३५.२० मे.टनचे मिक्स उपलब्ध होते. या कामास कारपेटकरिता २३५.२० मे.टन मिक्स आवश्यक होते. तसेच बीबीएम पॅचेसचे परिमाण अत्यल्प असल्यामुळे एक दिवसात पूर्ण करणे शक्य झाले. तसेच लिक्विड सिलकोटचे काम सुद्धा एक दिवसात करणे शक्य आहे. सदर रस्ता हा पूरहानी अंतर्गत क्षतीग्रस्त असल्यामुळे वाहतूक सुरक्षित होण्याकरिता काम

तातडीने पूर्ण करण्यात आले कामाची गुणवत्ता अबाधित असल्यामुळे व अनियमितता न झाल्यामुळे कार्यवाही प्रस्तावित करण्यात आलेली नाही. सदर रस्ता सुस्थितीत असल्यामुळे आज रोजी कार्यवाही करणे उचित वाटत नाही.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात ग्राम विकास विभागाकडून खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सदर कामाची सविस्तर चौकशी करण्याबाबत उपआयुक्त (विकास) यांना कळविण्यात आले आहे.

**चौकशी अहवाल**

उपरोक्त विषयी संदर्भिय कामाची चौकशी करण्यात आली. चौकशीच्या वेळेस तत्कालीन का.अ. श्री.एम.डी.तवर, उप अभियंता श्री. ए. ओ. निकम, शा.अ, श्री. एस.एम.इंगळे व निविदा लिपिक श्री. बी.जी.बळी हजर होते.

सदरील काम ३०५४ मार्ग व पूरहानी अंतर्गत गट ई कार्यक्रमास शासनाकडून मंजूर करण्यात आले होते. या कामास प्रशासकीय मान्यता अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आदेश क्र.बुजिप/बावि/शा.अ./रो.ह.यो./७९३४/१० दिनांक ३०.०३.११ रोजी रु. १० लक्ष किंमतीस मंजुरी प्रदान करण्यात आली. तदनंतर का.अ, जि.प, बांधकाम विभाग, बुलढाणा यांनी या कामास ८२/अ.अ./११-१२ अन्वये रु. ९.९१४ लक्ष रुपयास तांत्रिक मान्यता प्रदान केली. सदर काम पत्र क्र. ब-४२१/११-१२ दिनांक २६/०३/२०१२ अन्वये अध्यक्ष अजित मजूर कामगार सहकारी संस्था, पिंपाळा ता.खामगांव यांना देण्यात आले. या कामाची मुदत दोन महिन्याची होती म्हणजे दिनांक २५/०५/२०१२ पर्यंत होती या कामाच्या अंदाजपत्रकामध्ये खालील बाबींचा समावेश करण्यात आला होता.

(१) ५० मी.मी.बी.बी. एम. (पॅच वर्क) २१० चौ.मी.
(२) हॉट मिक्स हॉट लेड २० मी.मी. प्रिमीक्स कारपेट-४५३६ चौ.मी.
(३) लिक्विड सिलकोट ४२०० चौ.मी.

प्रत्यक्षात काम करतांना खालील प्रमाणे काम कार्यान्वित करण्यात आले.

(१) ५० मी.मी. बी.बी.एम (पॅचेस)-६३५-७८ चौमी (किमी १ मध्ये ४८४.९३ चौ.मी. व कि.मी. २ मध्ये १५०.८६ चौ.मी.)

(२) हॉटमिक्स हॉटलेट-२० मीमी प्रिमिक्स कारपेट-४०८६.०० चौ.मी. (कि.मी. १ मध्ये ३११४.९० चौ.मी. व कि.मी. २ मध्ये ९७२.०० चौ.मी.

(३) लिक्विड सिलकोट- ४२००.०० चौ.मी. (कि.मी. १ मध्ये ३०००.०० चौ.मी. कि.मी. २ मध्ये १२००.०० चौ मी.) रस्त्याचे कामाची प्रशासकीय मान्यता व कार्यारंभ आदेशाच्या दरम्यान खड्डे पडल्यामुळे ५० मी .मी.बी.बी.एम. च्या बाबीमध्ये मूळ मंजूर परिमाणात वाढ झाली ५० बी.बी.एम च्या कामाकरिता विनिनिर्देशानुसार (specification) नुसार ४० मी.मौखडी ०.४२ m /sqmX ६३५.७८ sqm = २६.७०.m व सी.बी. मेटल- ०.०३६/sqm x ६३५.७८ sqm= २२.८९m एवढया खडीची दबाई टप्याटप्याने करावी लागते. त्यामुळे ६३५.७८ sqm चे ५० मी.मी. बी. बी.एमचे काम १ दिवसात पूर्ण करण्यात आले.

२० मी.मी. Hot mix Hot lead चे काम करताना plant मधून उपलब्ध होणाऱ्या मिक्स नुसार व आवश्यकतेनुसार रोलर व मजूर लावून काम करण्यात येते. एका दिवसामध्ये Hot mix plant (२०-३० ton/ha) मधून १२०.०० tonnes चे मिक्स उपलब्ध होते. ४२००.०० चौ.मी. करिता x ०.०२mts X१.४० (loose factor)= ११७.६० m एकूण वजन = ११७.६०x२.०० (T/M Density)=२३५.२० चे काम आहे. अर्थातच फक्त २ दिवसात २० मी.मी. carpet चे काम होणे अपेक्षित आहे. सोबत Liquid Seal coat चे काम असल्यामुळे त्याकरिता ४ दिवसात सदर काम करण्यात आलेले आहे. सोबत सा.बां.प्रा.वि.नागपूर यांच्या दरसूची सन १९९८-९९ मधील पान क्र. ९५१ व ९५२ ची प्रत सोबत जोडलेली आहे. त्यामध्ये Medicine चे output नमूद केले आहे. कारपेट व लिक्विड सिलकोट चे काम विनिनिर्देशानुसार व विहित कालावधीतच करण्यात आले, प्रत्यक्षात साहित्याची जमवाजमव करुन कामास प्रारंभ केल्यानंतर फक्त ५ ते ६ दिवसाच्या कालावधीमध्ये सदर काम करणे शक्य आहे.

सदर कामाचे वाटप दिनांक २७/०५/२०११ रोजी झालेले असल्यामुळे कंत्राटदाराने दि. २७/०५/२०११ ते २६/०३/२०१२ पर्यंत आवश्यक सर्व तयारी करुन .कामास सुरुवात केली. सदर रस्ता हा पूरहानी अंतर्गत क्षतीग्रस्त झालेला असल्यामुळे वाहतूक सुरक्षित राहण्याकरीता काम तातडीने पूर्ण करण्यात आले.

दि. २६/०३/२०१२ ते ३०/०३/२०१२ या ५ दिवसात काम पूर्ण करण्यात आले. सदर कामावर जि.प.लेखासंहिता १९६८ परिच्छेद क्र. १५३ मधील तरतूदीनुसार संबंधित उपअभियंता व शाखा अभियंता यांनी कामावर भेटी दिलेल्या आहेत. संबंधित शा.अ. श्री.इंगळे यांची दौरा दैनंदिनीची प्रत सोबत जोडलेली आहे.

वापरलेल्या डांबराच्या गुणवत्तेबाबत Penetration Test] Ductility Test व खडीचे Selve Analysis & Aggregate Impact Value या चाचण्या घेण्यात आलेल्या आहेत.

जिल्हा प्रयोग शाळा (PMGSY) बुलढाणा यांच्याकडुन साहित्याची तपासणी करण्यात आलेली असून त्यानुसार गुणवत्ता राखण्यात आली आहे. त्याची प्रत सोबत जोडलेली आहे.

सोबत तत्कालीन कार्यकारी अभियंता, उपअभियंता, शाखा अभियंता तसेच निविदा लिपीक यांचे लेखी जबाब घेण्यात येऊन त्याची प्रत सोबत जोडलेली आहे.

संक्षिप्तपणे असे सादर करण्यात येते की, Hot mix Hot lead चे काम असल्यामुळे ५ दिवसाच्या कालावधी ते करणे शक्य आहे. तसेच कामाची गुणवत्ता राखण्यात आलेली आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने बुलडाणा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक १४ नोव्हेंबर,२०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, तत्कालीन कार्यकारी अभियंता यांनी सदरहू कामाचे दिनांक २६ मार्च, २०१२ रोजी कामाचे कार्यारंभ आदेश घेऊन दिनांक ३० मार्च, २०१२ रोजी काम पूर्ण करुन कामाचे अंतिम देयक दिनांक ३१ मार्च, २०१२ रोजी अदा करण्यात आले. कार्यारंभ आदेश दिल्यानंतर ६० दिवसात पूर्ण करावयाचे काम अवघ्या ४ दिवसात पूर्ण करण्यात आल्याची माहिती समितीस देण्यात आली. याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, यावरील अधिकचा खुलासा करण्यात यावा. यावर सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी समितीस विदित केले की, यामध्ये चौकशी करण्यात आली असून त्यानुसार असे दिसते की, जी प्रशासकीय मान्यता होती ती एक वर्षापूर्वीची म्हणजे दिनांक ३० मार्च, २०११ रोजीची होती. तांत्रिक मान्यता ९ लाख ९१ हजार रुपये ही सन २०११-१२ मधील होती. कामाचे वाटप दिनांक २७ मे, २०११ रोजी आणि कामाचा आदेश दिनांक २६ मार्च, २०१२ रोजी झाले. त्यांनी हे काम ४ दिवसात पूर्ण केले. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, यामध्ये प्रश्न असा नमूद केला की, कामाचा कालावधी किती होता, यावर सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी समितीस विदित केले की, यामध्ये वर्क ऑर्डर पासून बघितले तर ४ दिवस आहेत. यावर समितीने अशी विचारणा केली की, त्यांना ६० दिवस दिले आहेत. यावर सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी समितीस विदित केले की, यामध्ये समितीने विचारलेल्या वस्तुस्थिती संबंधी असे दिसते की, त्यांना कामाचे वाटप पूर्वी झाले होते. म्हणजे त्यांची निविदा निश्चित झाली होती. मात्र त्याने जी सुरक्षा ठेव रक्कम भरावयाची होती की, ज्याच्याशिवाय आपण त्याला वर्क ऑर्डर देत नाही. त्यांनी जवळपास दिनांक १३ मार्च, २०१२ रोजी ही सुरक्षाठेव रक्कम सरकारला दिली. त्यानंतर आपण त्यांना दिनांक २६ मार्च, २०१२ रोजी कार्यारंभ आदेश दिला व त्यानंतर त्याने ४ दिवसात काम पूर्ण केले आहे. यावर समितीने अशी विचारणा केली आहे. विभागाने असे उत्तर देणे सुद्धा संयुक्तिक नाही कारण यामध्ये ६० दिवसांचा वर्क ऑर्डरचा कामाचा कालावधी यासाठी दिला आहे की, तांत्रिकदृष्टया त्या ६० दिवसात ते कामच पूर्ण होऊ शकत नाही. प्रत्येक काम करण्यासाठी त्यानुसार आवश्यक तेवढा कालावधी द्यावाच लागतो. यावर सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी समितीस विदित केले की, त्या कामाची गुणवत्ता आणि एम.डी. रेकॉर्डमध्ये कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार दिसला नाही. फक्त ४ दिवसात त्याने काम पूर्ण केले आणि त्याला त्याचे देयक देण्यात आले. कारण त्या ४ दिवसांनंतर तो निधी व्यपगत होणार होता. यावर समितीने अशी विचारणा केली की, त्या कंत्राटदाराने ४ दिवसात काम पूर्ण केले व त्याबद्दल विभाग त्याचे समर्थन करीत आहे हे चुकीचे आहे. कारण ४ दिवसात हे काम होऊच शकत नाही. कारण डी.बी.एम. ला वेळ लागतो आणि त्यानंतर सरळ सरळ प्रिमिक्स कार्पेट करण्याचे जे अपेक्षित असते त्यासाठी काही कालावधी जाऊ द्यावा लागतो. यामध्ये भलेही सिलकोट तातडीने करणे आपण समजू शकतो. डी.बी.एम. नंतर लगेच दुस-याच दिवशी लगेच प्रिमिक्स कार्पेटचे काम केले तर ते डी.बी.एम. टिकणार नाही त्याचे रोलींग होणार नाही आणि ते अपेक्षित नाही. त्यामुळे त्याचे समर्थन करणे योग्य नाही. हे काम ४ दिवसात होऊ शकत नाही. कशा परिस्थितीत ते काम पूर्ण केले हे समजू शकतो. समितीने यासंबंधी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांकडून उत्तर अपेक्षित ठेवले आहे. सचिव, ग्रामविकास विभाग याचा यामध्ये विषय येत नाही. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, उपायुक्त, विकास हे असतात. यामध्ये कामाचा कालावधी वेगळा असेल त्यामुळे कागदावर जे दिसते त्यासंबंधी उपायुक्त, विकास यांना चौकशी करण्यासाठी ग्राम विकास विभागाकडून सूचना दिल्या आहेत. इतर बाबातीत सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी माहिती देऊ शकतील पण याचे कोणीही समर्थन करु शकत नाही. यामध्ये प्रोसेसची अनियमितता आहे असे सकृतदर्शनी दिसते. यावर समितीने अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदांमध्ये असेच काम चालते. या कामाचे वाटप दिनांक २७.५.२०११ रोजी झाले आहे. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, ते कदाचित ३१ मार्च, २०१७ अखेरपर्यंत करायचे असावे. समितीचे म्हणणे बरोबर आहे परंतु त्या कंत्राटदाराने सुरक्षा ठेव रक्कम दिनांक १३ मार्च, २०१२ रोजी शासनाकडे जमा केली आहे आणि त्याला वर्कऑर्डर दिनांक २६ मार्च, २०१२ रोजी देण्यात आली होती. यावर समितीने पुढे विचारणा केली की, जिल्हापरिषदेने त्याला ८ महिन्याचा कालावधी सुरक्षा ठेव भरण्यासाठी का दिले. जर त्याने एका महिन्यात ही रक्कम भरणा केली नसती तर त्याला आपल्याला काढून टाकता आले असते. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, म्हणूनच ग्रामविकास विभागाने उपायुक्त, विकास यांना यासंबंधी चौकशी करण्याच्या सूचना दिल्या आहेत. सदर रस्त्याचे काम ग्रामविकास खात्यातर्फे, जिल्हा परिषदेच्या यंत्रणेतर्फे कार्यान्वित करण्यात आले. २६ ते ३० मार्च या कालावधीत हे काम पूर्ण झाले म्हणजेच ४ दिवसात हे काम पूर्ण झाले. १४०० मीटर लांबी आहे आणि २१० चौ.मी. पॅचवर्क एरिया आहे पॅचवर्कचे पर डे तास म्हणतो, साधारणतः एक फर्लांग किंवा २०० मीटर लांबीचे डिगबिल काम १ दिवसात केले जाते. कारपेटचा आयटम सुद्धा हॉटमिक्सच्या तरतुदीप्रमाणे आहे. हॉटमिक्सच्य तरतुदीप्रमाणे १ कि.मी.चे काम १ दिवसात केले जाते या अनुषगाने बीबीएम पॅचवर्कचे काम १ दिवसात झाले असल्याचे दिसत आहे आणि कारपेटचे काम २ दिवसात झाले असल्याचे दिसत आहे. यावर समितीने विचारणा केली की, इतक्या कमीकालावधीत टेक्निकली हे काम करु शकतो काय, यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, होय, १०० मिटरचे नॉम्स आहेत. यावर समितीने विचारणा केली की, १४०० मिटरची लांबी आहे. बीबीएम केल्यावर व्यवस्थित कसे आहे हे पाहिले पाहिजे, दबाई व्यवस्थित झाली आहे की नाही, बीबीएम आणि बाकीचे कारपेट असे सुरु केले तर एका वेळी ते क्रॅश होते. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, बीबीएम पूर्ण झाल्यानंतर त्याला रोलिंग करायचे आहे रोलिंग

झाल्यानंतर याला स्वतंत्रपणे कारपेट झालेले दिसत आहे. टेक्निकली त्यांच्या दर्जामध्ये आणि इतर गोष्टीमध्ये कोणत्याही प्रकारचे कॉम्प्रमाईज दिसलेले नाही शक्यता आहे की, प्रोसिजर राहिली असेल. १३ तारखेला एसडी भरली होती असे होऊ शकते की, एसडी भरली आणि वर्क ऑर्डर मिळाल्यानंतर एसडी भरली आहे ऑलरेडी अलॉट झाले आहे म्हणून कदाचित काम सुरु केले असेल अणि नंतर वर्क ऑर्डर मिळाली असेल २६ तारीख दिसत आहे. ३० तारखेपर्यंत काम केले. एस.डी.भरल्याशिवाय वर्क ऑडर देता येत नाही. यावर समितीने असे निदेश दिले की, जिल्हयात अशा अनेक घटना आहेत ४-५ दिवसापूर्वी वर्क ऑडर दिली जाते व नंतर शेवटच्या दिवशी बिल काढले जाते. अशी काही प्रकरणे असल्यास ती तपासावीत व त्याचा अहवाल समितीला कळवावा. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, अशी प्रकरणे पुन्हा उद्‌भवू नयेत म्हणून नवीन यंत्रणा सुरु करणार आहे. नवीन यंत्रणेनुसार निधी अशा प्रकारे रिलीज करणार नाही. संगणकामध्ये नोद करणार की, अमुक निधी अमुक कामासाठी उपलब्ध आहेत. त्या आधारे वर्क ऑडर द्यावी. टेंडर काढावे. तीर्थक्षेत्रासाठी या महिन्यापासून अंमलबजावणी सुरु होईल वर्क ऑडर संगणकाव्दारे तपासली जाईल. काम करुन एमबी रेकॉर्ड तयार करावे व बिल पास केल्यानंतर विभागाच्या संगाकात त्याची नोंद करावी की, बिल पास झालेले आहे. संगणक त्यानुसार बेरीज करेल व बँकेकडून कंत्राटदाराच्या खात्यात पैसे जमा होतील.

## अभिप्राय व शिफारशी

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलडाणा यांनी दिनांक २७.५.२०११ रोजी अध्यक्ष, अजित मजूर कामगार सहकारी संस्था, पिंपळा, तालुका खामगाव यांना जलंब खेर्डा -शेगांव रस्त्यांच्या बांधकामाचे वाटप केले. कंत्राटदाराने जिल्हा परिषदेला सुमारे आठ महिन्याच्या कालावधी नंतर सुरक्षा ठेव रक्कम रुपये १०,०००/- दिनांक १३ मार्च, २०१२ रोजी सुमारे ८ महिन्यांच्या विलंबाने भरणा केली. अध्यक्ष तथा सदस्य सचिव, काम वाटप समिती, जिल्हा परिषद, बुलडाणा यांनी दिनांक २६ मार्च, २०१२ रोजी कंत्राटदारास कार्यारंभ आदेश देण्याबाबत सूचित केले होते.दिनांक ३० मार्च, २०१२ रोजी काम पूर्ण केल्याचे दिसते. दिनांक ३१ मार्च, २०१२ रोजी ठेकेदारास रुपये ८,५७,२४०/- रक्कम प्रदान केलेली आहे. पूरहानीचे दिलेले कारण सांगून काम पूर्ण करण्यात आले हे संयुक्तीक वाटत नाही. चार दिवसांत काम पूर्ण केल्याबाबत लेखा परिक्षकांच्या आक्षेपाप्रमाणे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या सुद्धा निदर्शनास ही बाब येणे आवश्यक होती, परंतु त्यांनी सदरहू बाबतीत दुर्लक्ष केलेले आहे.

सदरहू रस्त्याचे ६० दिवसात पूर्ण करावयाचे काम केवळ चार दिवसात पूर्ण करण्यात आल्यामुळे त्या कामाचा कार्यकारी अभियंता, दक्षता व गुणनियंत्रक यांचेकडून अहवाल प्राप्त होणे आवश्यक होते. तसेच ज्यांनी या कामात दुर्लक्ष केले त्यांची सुद्धा चौकशी करण्यात यावी असे समितीने निदेश दिलेले आहेत.

सदर रस्त्याचे काम चार दिवसात पूर्ण होऊ शकत नाही. कारण डी.बी.एम. ला वेळ लागतो आणि प्रिमिक्स कार्पेट करणे अपेक्षित असल्याने काही कालावधी लागतो. डी.बी.एम. नंतर लगेच दुसऱ्याच दिवशी प्रिमिक्स कार्पेटचे काम केल्यास ते डी.बी.एम. टिकत नाही व त्याचे रोलिंगही होत नसल्याचे समितीने सचिवांच्या निदर्शनास आणून दिले. याबाबत समितीने ग्राम विकास विभागाच्या सचिवांना सूचना केल्या असता त्यांनी विकास उपायुक्त यांना चौकशी करण्याचे निदेश देण्यात आले आहेत.

**सदर गंभीर बाबी विचारात घेता जिल्हा परिषद, बुलडाणा येथील अशा प्रकारच्या सर्वच कामांबाबत तातडीने निर्णय घेऊन प्रकरण निहाय दोषी आढळणाऱ्या व्यक्तींना नैसर्गिक न्याय तत्वानुसार त्यांचे म्हणणे विचारात घेऊन व त्याची विहित कालावधीत चौकशी करुन सर्व संबंधित जबाबदार असणाऱ्या अधिकारी/कर्मचारी/कंत्राटदार इत्यादींवर कठोर स्वरुपाची कारवाई करण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

## प्रकरण नऊ

## जिल्हा परिषद, बुलडाणा

### श्री क्षेत्र रामलिंग संस्थान माटरगांव येथील भक्त निवासस्थानातील बांधकामातील अनियमितता

**(परिच्छेद ३.२५०) (सन २०११-२०१२)**

जिल्हा परिषद, बुलडाणा, सन २०११-१२ (परिच्छेद क्र. १८) :- जिल्हा परिषद, बुलढाणा येथील सन २०११-१२ च्या बांधकाम विभागातील विकास कामाबद्दल खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक गौखनि-१०/१००९/प्र.क्र. ३०९/ख, दिनांक १०.२.२०१० अन्वये बांधकामावर वापरलेल्या गौण खनिज करिता स्वामित्व धनाची वसुली करणे आवश्यक आहे. त्यानुसार या कामासाठी ७१.१० घ.मी.गौण खनिज (मेटल) वापरले असल्याने त्यावरील स्वामित्वधन रु.४५१८/- वसूल करणे आवश्यक आहे.

(२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम ८६ नुसार बांधकामावर साहित्य वापरण्यापुर्वी त्याचा चाचणी अहवाल शासकीय प्रयोगशाळेकडुन घेणे अपेक्षित असताना चाचणी अहवाल घेतलेला नाही.

(३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम १०६ नुसार करारनामा केलेल्या मुद्रांक पेपरवर कंत्राटदार, कार्यकारी अभियंता व साक्षीदारांच्या स्वाक्ष-या घेणे आवश्यक असते. या करारमान्यावर कार्यकारी अभियंता व साक्षीदाराच्या दिनांकित स्वाक्ष-या नाहीत.

(४) कामाचा आदेश देण्यापूर्वी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम १४६ अन्वये करारनामा करणे गरजेचे आहे. करारनामा करण्यात आलेला आहे. तथापि करारनाम्यावर तारीख नमुद केलेली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, बुलडाणा यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) सदर कामावर वापरलेल्या गौण खनिजाच्या स्वामित्व धनाची रक्कम रु.४५१८/- वसूल करण्यात आली आहे. कामाच्या नस्ती सोबत छायांकित प्रत जोडलेली आहे.

(२) शासकिय प्रयोग शाळेत चाचणी करण्यात आली असून साहित्य चाचणी अहवाल उपलब्ध आहे.

(३) सदर कंत्राट करारनाम्याच्या मुद्रांक पेपरवर करारनामा केल्याबाबत कार्यकारी अभियंता यांची दिनांकित स्वाक्षरी साक्षीदाराचे स्वाक्षरीसह करण्यात आली आहे.

(४) सदर कामाचा करारनामा कामाचा आदेश देण्यापुर्वी करुन घेण्यात आला आहे, व तशी तारीख करारपत्रावर नमुद करण्यात आली आहे.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

बुलडाणा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १८ जानेवारी, २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की भक्त निवास बांधकामासाठी वापरण्यात आलेल्या गौण खनिजाचे स्वामित्वधन का वसूल करण्यात आले नाही, या अनियमिततेस कोण जबाबदार आहे, सदर बांधकामासाठी वापरण्यात आलेल्या साहित्याचे चाचणी अहवाल कोणत्या दिनांकास प्राप्त झाले व हे काम कोणत्या दिनांकास पूर्ण करण्यात आले, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांनी समितीस विदित केले की, या कामावर वापरलेल्या गौण खनिजाच्या स्वामित्व धनाची रक्कम वसूल करण्यात आली आहे. तसेच या कामावर वापरण्यात आलेल्या साहित्यांची शासकीय प्रयोग शाळेत चाचणी करण्यात आली असून, साहित्य चाचणी अहवाल उपलब्ध आहे. सदरहू अहवाल सन २०१२ या वर्षातील आहे. तसेच कंत्राट करारनाम्याच्या मुद्रांक पेपरवर करारनामा केल्याबाबत कार्यकारी अभियंता यांची दिनांकित स्वाक्षरी साक्षीदाराच्या स्वाक्षरीसह करण्यात आली असून सदरहू काम दि.३०/०३/२०१२ रोजी पूर्ण झाले आहे. यावर पुढे समितीने अशी विचारणा केली की, यातील जवळजवळ ८० टक्के कामे ही मार्च अखेर पूर्ण झाल्याचे दिसते.

अहवाल वर्षात बांधकाम विभागात कार्यरत असलेले संबंधित अधिकारी आजच्या बैठकीला उपस्थित आहेत काय, यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.) यांनी समितीस विदित केले की, दोन्ही तत्कालीन अधिकारी आजच्या बैठकीला उपस्थित नाहीत. यावर समितीने अशी विचारणा केली की, आपण किती तत्कालीन अधिकाऱ्यांना बैठकीसाठी बोलाविले होते, त्यापैकी किती उपस्थित आहेत, यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.) यांनी समितीस विदित केले की, सन २०११-२०१२ आणि सन २००८-२००९ या वर्षाच्या लेखापरीक्षण अहवालासाठी एकूण १०४ तत्कालीन अधिकाऱ्यांना बैठकीसाठी बोलाविले होते, त्यापैकी ९ अधिकारी गैरहजर आहेत. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, जर अधिकारी अनुपस्थितीत राहणार असतील तर त्याचे कारण देणे आवश्यक आहे. समितीच्या माहिती प्रमाणे एकूण ३८ तत्कालीन अधिकारी गैरहजर आहेत. यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.) यांनी समितीस माहिती दिली की, यातील काही अधिकाऱ्यांकडे दोन-दोन विभागांचा कार्यभार होता. ज्या तत्कालीन अधिकाऱ्यांना बैठकीसाठी हजर राहण्याबाबत कळवूनही ते गैरहजर राहिले असतील तर ते चुकीचे आहे. यावर समितीने असे निदेश दिले की, समितीने बैठकीसाठी बोलाविल्यानंतरही जे अधिकारी गैरहजर राहिले त्यांची वेतनवाढ रोखण्यात यावी तसेच त्यांच्या सेवापुस्तिकेमध्ये तशी नोंद घेण्यात यावी. आपण केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांनी समितीला होकारार्थी आश्वासित केले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

**समितीच्या भेटीच्या वेळेस अधिका-यांच्या अनुपस्थितीबाबत :-**

(१) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) यांना समितीने वारंवार निदेश देऊनही त्यांनी समितीच्या साक्षीकरीता समितीच्या बैठकीस उपस्थित व अनुपस्थित राहिलेल्या अधिका-यांची माहिती/यादी समितीस योग्य रितीने सादर केली नाही. यासंदर्भात समितीच्या निदेशानुसार उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) यांच्यावर कोणती कारवाई केली आहे ?

(२) समितीसमोर अनुपस्थित राहणा-या तत्कालीन अधिका-यांवर समितीच्या निदेशानुसार एक वेतनवाढ रोखणे तसेच त्याबाबत त्यांच्या सेवापुस्तिकेत नोंद घेण्याचे समितीने निदेशित केलेले आहे. त्यानुसार कारवाई केली आहे काय, सदरची माहिती समितीसमोर न पाठविण्याची कारणे काय आहेत ?

(३) मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदरहू प्रकरणी कारवाई करण्यास विलंब का केला ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हापरिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) मा. समितीच्या निदेशानुसार श्री. आर.पी.पाटील, तत्कालीन उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) यांची बदलीने पदस्थापना उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं) जि.प.) नाशिक येथे झाल्यामुळे त्यांना पत्र क्रमांक ४६७८, दिनांक १४.१२.२०१६ नुसार कारणे दाखवा नोटीस देवून खुलासा मागविण्यात आला. त्यांनी दिलेल्या खुलाशानुसार समितीला त्याच वेळी पत्र क्रमांक २९७/दि. १८/१/२०१६ व पत्र क्रमांक ३१७ दिनांक २०/१/२०१६ अन्वये समितीच्या साक्ष आणि बैठकीस उपस्थित व अनुपस्थित राहिलेल्या अधिका-यांची माहिती/यादी सादर केल्याचा खुलासा सादर केला. सदरील खुलाशाच्या अनुषंगाने कार्यालयीन दस्तऐवज तपासून खात्री करण्यात आली आहे व त्यांनी बैठकीचे वेळी उक्त पत्रान्वये माहिती सादर केल्याची बाब निदर्शनास आणल्याने त्यांचा खुलासा ग्राहय धरुन त्यांचेवर कारवाई करण्यात आलेली नाही.

(२) समितीसमोर दि. १८/१/२०१६ रोजी अनुपस्थित राहिलेल्या ९ अधिकाऱ्यांपैकी ४ अधिकारी सेवानिवृत्त झालेले आहेत व उर्वरीत ५ अधिका-यांची विविध ठिकाणी बदलीने पदस्थापना झालेली असून सेवानिवृत्त अधिका-यांच्या विरुद्ध सदरील शिक्षेचे अंमलबजावणी करता येणार नाही. बदलीने इतरत्र पदस्थापना मिळालेल्या एकूण ५ अधिका-यांची वेतनवाढ रोखणे व त्यांचे सेवापुस्तिकेत नोंद घेणे यासंबंधाने संबंधित कार्यालय प्रमुखांना या कार्यालयाचे पत्र क्रमांक ४६७८ दिनांक १४.१२.२०१६ नुसार कळविले आहे.

वरील कार्यरत ५ अधिका-यांपैकी (१) श्री.ए.आर.पवार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं) जि.प.उस्मानाबाद येथे कार्यरत असून ते सदर कालावधीत वैद्यकीय कारणास्तव रजेवर असल्यामुळे हजर राहु शकले नसल्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.उस्मानाबाद यांनी कळविले आहे. (२) श्री. वाय.यु.होले, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी सध्या पुणे महानगर परिवहन महामंडळ येथे कार्यरत असून त्यांचेकडुन प्राप्त झालेल्या माहीतीनुसार त्यांचेविरुद्ध समज देण्यात आल्याची कारवाई करण्यात असली आहे. सदरहू कारवाई समितीने दिलेल्या निदेशानुसार नसल्याने अध्यक्ष, पुणे महानगर परिवहन महामंडळ यांना त्यांचे वेतनवाढ रोखुन कारवाई करणेबाबत कळविले आहे. (३) श्री. एस.एन. महागांवकर ग.वि.अ. सध्या कार्यरत जि.प.वाशिम येथे कार्यरत असून त्यांचेवर वेतनवाढ रोखणे यासाठी शिस्तभंग विषयक कारवाईचा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. वाशिम यांचेमार्फत विभागीय आयुक्त, अमरावती यांना सादर करण्यात आला आहे. (४) श्री. एम.डी. तवर हे दि. १८.१.१६ रोजी वैद्यकीय कारणास्तव हजर राहू शकले नाही. तथापी ते दि. १९ व २० जानेवारी, २०१६ रोजी ते उपस्थित होते त्यामुळे त्यांचेवर कारवाई करण्यात आली नाही. (५) श्री. पी.आर.जनबंधु, तत्कालीन कार्यकारी अभियंता (बांधकाम) सध्या कार्यरत आदिवासी विकास मंडळ नाशिक येथे कार्यरत असल्यामुळे त्यांनासमिती निदेशानुसारकारवाईसाठी कळविले होते परंतु त्यांची आस्थापना सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडे असल्यामुळे त्यांना समिती निदेशानुसार कारवाई करण्यासाठी कळविले आहे.

(३) मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदरहु प्रकरणी विलंब केला नाही. मा.समितीचे बैठकीचे इतिवृत्त प्राप्त झाल्यानंतर प्रस्तुत मुद्याक्रमांक १ मधील अधिकारी श्री. आर.पी.पाटील यांना कारणे दाखवा नोटीस देवुन खुलासा मागीतला. मुद्या क्रमांक २ नुसार अनुपस्थित अधिका-यांवर समिती निदेशाप्रमाणे कारवाई करण्यासाठी संबंधित विभागप्रमुखांना पत्र क्रमांक ४६७८ दि. १४.१२.२०१६ कळविले आहे.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात ग्रामविकास विभागाकडून खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-**

जिल्हा परिषद अभिप्रायास सहमती आहे.

**अभिप्राय व शिफारशी**

शासनाच्या दिनांक १० फेब्रुवारी, २०१० रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे ७१.१० घन मीटर गौण खनिजाची सुधारित दराने वसूली करणे आवश्यक होते. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम १०६ नुसार करारनामा केलेल्या मुद्रांक पेपरवर कंत्राटदार, कार्यकारी अभियंता व साक्षीदार यांचा करारनामा छापील स्वरुपात समितीस जिल्हापरिषद प्रशासनाव्दारे उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही. लेखा परिक्षकांनी परिच्छेद निकाली काढण्यासाठी जिल्हा परिषदेला तीन वेळा भेटी देऊनही त्यांना आवश्यक असलेली कागदपत्रे वेळेत सादर केलेली नव्हती. सदरहू प्रकरणी कामात दुर्लक्ष करणे, विचारलेल्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे न देणे याबाबत समिती नापसंती व्यक्त करते. श्री क्षेत्र रामलिंग येथील भक्त निवासाच्या बांधकामामध्ये अनियमितता झालेली आहे. भाविक दर्शनासाठी राज्यात कोणत्याही तीर्थस्थळांना भेटी देत असतांना लांबून येणाऱ्या भाविकांना निवासाची सोय चांगल्याप्रकारे व्हावी या हेतूने शासन निधी उपलब्ध करुन देत असते, तथापि सदर प्रकरणी या निधीचा योग्य वापर करण्यात आलेला असल्याचे आढळून आले नाही.

**अत: महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील तरतूदींचे उल्लंघन करणे, गौण खनिजाच्या स्वामित्व धनाची वसूली न करणे, साहित्य वापरण्यापूर्वी त्याचा प्रयोगशाळेतून चाचणी अहवाल न घेणे, अशाप्रकारच्या सकृतदर्शनी चुका आणि अनियमितता भविष्यात जिल्हा परिषदांकडून होऊ नयेत यासाठी ग्राम विकास विभागाने वेळोवेळी आढावा बैठका घेऊन सुधारित परिपत्रक निर्गमित करुन व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.**

समितीच्या निदेशानुसार तत्कालिन अधिकारी यांना बैठकीच्या वेळी उपस्थित राहण्यास सांगितले असता १०४ तत्कालीन अधिका-यांपैकी ०९ तत्कालीन अधिकारी गैरहजर असल्याचे समितीला सांगण्यात आले, परंतु समितीच्या माहिती प्रमाणे एकूण ३८ तत्कालिन अधिकारी गैरहजर असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. समिती जिल्हा परिषदांना भेटी देत असतांना अनेक वेळा काही अधिकारी नुकतेच रुजू झालेले असतात, काही अधिकाऱ्यांनी नस्त्या हाताळलेल्या नसतात, काहींना राबविलेल्या विकास कामांच्या योजनांबाबत माहिती नसल्यामुळे समितीसमोर लेखा आक्षेपातील खुलाशाकरिता तत्कालिन अधिका-यांनी उपस्थित राहणे आवश्यक असते. यासंदर्भात शासनाचे परिपत्रक वारंवार निर्गमित करण्यात येत असतांना देखील काही अधिकारी जाणीवपूर्वक समितीसमोर उपस्थित राहण्यास टाळाटाळ करीत असतात व साक्षीपासून दूर राहण्याचा प्रयत्न करतात.

**समितीने निदेश देऊनही जे तत्कालिन अधिकारी समितीच्या बैठकीस साक्षीसाठी अनुपस्थित राहतात आणि ज्यांचा अनुपस्थिती बाबतचा खुलासा समाधानकारक आढळून येत नाही, अशा सर्व तत्कालिन अधिकाऱ्यांविरुद्ध तात्पुरत्या स्वरुपात एक वेतनवाढ रोखण्याबाबत कार्यवाही करुन त्या संबंधीची नोंद संबंधित अधिका-यांच्या सेवा पुस्तिकेत घेण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला दोन महिन्यात सादर करावी अशीही समिती शिफारस करीत आहे.**

**प्रकरण दहा**

**जिल्हा परिषद, बुलडाणा**

**सन २०१०-११ या वर्षात जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमध्ये झालेल्या इतर नियमबाहय बाबी**

**(परिच्छेद क्र.३.८१५/२४) (सन २०११-२०१२)**

| अ.क्र. | नियमबाहय बाबींचे स्वरुप | जि.प. चे नांव व विभाग | लेखापरिक्षण अहवालातील परि.क्र. | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| २४ | प्राप्त पोषण आहरणाच्या वितरणेत झालेली अनियमितता | शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, बुलडाणा | १८ | १७,९५९/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, बुलडाणा यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत एकूण ०७ शाळांनी पुरवठादाराकडुन मिळालेल्या पोच पावत्यामध्ये पुरवठादार यांनी खाडातोड करुन परिणाम वाढविल्याचे निदर्शनास आल्याने दि. महाराष्ट्र स्टेट मार्केटींग फेडरेशन लि. मुंबई, शाखा बुलढाणा यांच्याकडुन वसूल करुन रक्कम रु. १७,९६९/- चलन क्रमांक १८२ दि. ०७.१२.२०१५ अन्वये शासनखाती जमा करण्यात आले.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

बुलडाणा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १८ जानेवारी, २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, शालेय पोषण आहाराची वसूलपात्र रक्कम रुपये १७,९५९/- तीन वर्षे विलंबाने वसूल करण्याची कारणे काय आहेत, सदर प्रकरणी नियमबाह्यपणे झालेल्या जादा प्रदानास कोण जबाबदार आहे, संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे,यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांनी समितीस विदित केले की, या प्रकरणात गुंतलेली रक्कम रुपये १७९५९/- असून ती वसूल करण्यात आलेली आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, तूरडाळ, मिरची, मोहरी, जिरे, हळद, मीठ, तेल इत्यादीच्या पुरवठा पावत्यांमध्ये खाडाखोड करुन परिमाण वाढविल्याचे दिसून येत आहे. खाडाखोड करुन संख्या वाढविणे हे बरोबर नाही. यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी विचारणा केली की, खाडाखोड झाल्याचे आपणास मान्य आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांनी समितीस होकारार्थी आश्वासित केले. त्यानंतर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी समितीस विदित केले की, असा प्रकार एकूण ७ शाळांमध्ये झालेला आहे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, ही गंभीर बाब आहे. गरीबांची मुले सक्षम व्हावी म्हणून आपण सर्व काही करीत असतो. आजही अशी अनेक घरे आहेत की, त्यांना एक वेळ अन्न जेवणासाठी मिळत नाही. यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी समितीस असे विदित केले की, जिल्हा परिषदेच्या १४४९ शाळा आहेत, तर खाजगी २३९४ शाळा आहेत. इयत्ता पहिली ते पाचवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना १०० ग्रॅम, तर इयत्ता सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना १५० ग्रॅम पोषण आहार देण्यात येतो. यावर समितीने अशी विचारणा केली की, हे ऑब्जेक्शन कधी आलेले आहे, सन २०१२ मध्ये ऑडिट ऑब्जेक्शन आल्यानंतर आपण पुढील कारवाई का केलेली नाही, आपण याकडे गांभीर्याने का पाहिले नाही ? आपण महिला अधिकारी आहात. मुलांना अन्न कमी देणे हे योग्य नाही, तक्रार केल्यानंतर त्याची दखल घेतली जात नाही. या मुद्यासंबंधी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात येईल. सन २००८-२००९, २००९-२०१०, २०११-२०१२ चे आक्षेप आपल्याला बघावे लागतील. पावत्यांमध्ये खाडाखोड करण्यात आली आहे. प्रत्यक्ष डाळी आलेल्या नसतील. यासंबंधी आपण आपल्या अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेतली होती काय, यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी समितीस विदित केले की, यापूर्वी बैठक घेतली होती. त्यामध्ये ब्लॉक ऑफिसरना सूचना दिल्या होत्या. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, आज तरी चांगले चालले आहे काय, आजपण खाडाखेड सुरूआहे. पोषण आहाराचा विषय जिल्ह्यामध्ये गंभीर झालेला आहे, खाडाखोड करण्याचे कारण काय आहे, यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी विचारणा केली की, खाडाखोड केली आहे हे आपणास मान्य आहे काय, खाडाखोड होऊ नये या दृष्टीने आपण पावले टाकली पाहिजे होती. यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी समितीस विदित केले की, आपल्या सूचनेनुसार कारवाई प्रस्तावित करतो. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, आपण यातील गुन्हेगार का शोधून काढले नाही, अमरावतीला काय प्रकार घडला हे आपल्याला माहीत असेल, यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी समितीस होकारार्थी उत्तर दिले. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, धान्याचे रेकॉर्डवर वजन एक होते आणि प्रत्यक्षात वेगळे वजन होते. जवळ जवळ पाच गोण्यांमध्ये ३० किलो धान्य कमी होते. आम्ही फक्त पाच गोण्या चेक केल्या होत्या. त्यात आम्हाला तांदूळ कमी आढळून आले होते. हा विषय खूप गंभीर आहे. पुरवठ्याच्या प्रत्येक पावतीमध्ये खाडाखोड केलेली आहे. सन २०११-१२ मध्ये खाडाखोड केल्याचे निदर्शनास आल्यानंतर सुद्धा या संदर्भात कारवाई केलेली नाही. सदरहू विषय सचिवांच्या साक्षीसाठी घेण्यात यावा असे समितीने निदेश दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

सन २०१०-११ या वर्षात जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमध्ये झालेल्या इतर नियमबाहय बाबी :-

१) सन २०११-१२ मध्ये शालेय पोषण आहाराच्या पुरवठयाच्या प्रत्येक पावतीमध्ये खाडाखोड करुन परिमाण वाढविल्याचे निदर्शनास आल्यानंतर सुद्धा या संदर्भात अदयापही कारवाई का करण्यात आली नाही. याप्रकरणी चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत समितीने निर्देशित केलेले असून सदरहू चौकशीत काय आढळून आले व दोषींविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली ?

२) सदरहू प्रकरणांत कोणकोणते मुख्याध्यापक, गट शिक्षणाधिकारी, अधिक्षक, शिक्षणाधिकारी यांच्यावर जबाबदारी केव्हा निश्चित करण्यात आली आहे किंवा अद्याप जबाबदारी निश्चित केली नसल्यास त्यास कोण जबाबदार आहे ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) सन २०११-१२ मध्ये शालेय पोषण आहाराच्या पुरवठयाच्या उपप्रमाणकामध्ये आढळून आलेल्या खाडाखोडी बाबत जिल्हा परिषद स्तरावर चौकशी करण्यात आली आहे. त्यामध्ये खालील शाळांच्या शालेय पोषण आहार पुरवठयाच्या पावत्यामध्ये खाडाखोड/उपरी लेखन केल्याचे आढळून आले आहे. जि.प. प्राथमिक शाळा पिंप्री आढाव, जि.प. प्राथमिक शाळा पिं.धांडे, जि.प.प्राथमिक शाळा भोटा, जि.प. प्राथमिक शाळा सावरगाव नेहु, मो.नि.कळसकर विद्यालय तिकोडी, पाई विद्यालय जलंब व जनता विद्यालय पिंपळगाव सराई उपरोक्त शाळांच्या शालेय स्तरावर उपलब्ध असलेल्या मुळ पावत्या यावर उपरी लेखन केल्याचे दिसुन आले आहे. तथापि, उपरी लेखनानंतर नमुद परिमाणाचीच नोंद मूळ साठा नोंदवही वर घेण्यात आली आहे व तेवढयाच परिमाणाचे देयक देखील अदा झालेले आहे. त्यामुळे धान्यादी मालाच्या पुरवठयाबाबत जादा अदायगी झालेली नाही. तथापि, उपरोक्त प्रकरणी झालेल्या निष्काळजीपणा बद्दल दोषींविरुद्ध खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

(२) ज्या शाळेच्या उपप्रमाणकामध्ये उपरी लेखन आढळून आलेले आहे त्या जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापकांच्या विरुद्ध शिस्तभंगविषयक कारवाई म्हणून प्रत्येकाची एक वार्षिक वेतनवाढ एक वर्षासाठी बंद करण्यात आलेली असून सेवापुस्तिकेत त्याची नोंद घेण्यात आली आहे. खाजगी व्यवस्थापनाच्या ०३ शाळांच्या मुख्याध्यापकांविरुद्ध शिस्तभंगविषयक कारवाई म्हणून एक वार्षिक वेतनवाढ बंद करुन त्याची नोंद संबंधीतांच्या सेवापुस्तिकेत घेणेबाबत संबंधीत व्यवस्थापनाला कळविण्यात आलेले आहे.

(३) ज्या पावत्यांमध्ये पुरवठादाराकडुन उपरी लेखन केल्याचे आढळून आले आहे त्या पावत्याबाबत लेखापरिक्षणातील गणनेनुसार त्यापोटी अदा झालेल्या देयकांची एकूण रक्कम रु. १७,९५९/- पुरवठादार यांचेकडून वसूल करण्यात आली असून शासन खाती भरणा केलेली आहे.

(४) तसेच या प्रकरणी दोषी असलेल्या तत्कालीन संबधीत अधिक्षक वर्ग-२ तथा प्रभारी लेखाधिकारी श्रीमती लोथे या सेवानिवृत्त झालेल्या असल्याने त्यांचेविरुद्ध रु. १०००/- ची दंडात्मक कार्यवाही करण्यात आली आहे. या प्रकरणी दोषी असलेले तत्कालीन कनिष्ठ सहाय्यक, श्री. सोनपसारे यांची एक वार्षिक वेतनवाढ बंद करण्यात आली असून सेवापुस्तिकेत नोंद घेण्यात आलेली आहे.

सदरहू प्रकरणात दोषी असलेले तत्कालीन शिक्षणाधिकारी, श्री. एस.एस.तेलगोटे, यांना एका वेगळया प्रकरणात अगोदरच दि.०२/०१/२०१५ रोजी निलंबित करण्यात आले आहे. सदर प्रकरणाबाबत श्री. एस.एस.तेलगोटे यांना कारणे दाखवा नोटीस देऊन त्यांचेविरुद्ध पुरवणी दोषारोप पत्र तयार करुन मा. आयुक्त शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे सादर करण्यात आलेले आहे.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात शालेय शिक्षण विभागाकडून खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**शालेय शिक्षण विभागाचे अभिप्राय :-**

याबाबत जिल्हा परिषद, बुलडाणा यांनी दिलेल्या अभिप्रायाशी सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने बुलडाणा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक १४ नोव्हेंबर, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की सन २०११-१२ मध्ये शालेय पोषण आहाराच्या पुरवठयाच्या प्रत्येक पावतीमध्ये खाडाखोड करुन परिमाण वाढविल्याचे निदर्शनास आल्यानंतर सुद्धा या संदर्भात अद्यापही कारवाई का करण्यात आली नाही. याप्रकरणी चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत समितीने निर्देशित केलेले असून सदरहू चौकशीत काय आढळून आले व दोषींविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली ? सदरहू प्रकरणांत कोणकोणते मुख्याध्यापक, गट शिक्षणाधिकारी, अधिक्षक, शिक्षणाधिकारी यांच्यावर जबाबदारी केव्हा निश्चित करण्यात आली आहे किंवा अद्याप जबाबदारी निश्चित केली नसल्यास त्यास कोण जबाबदार आहे ? यावर सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस विदित केले की, यामध्ये खाडाखोड केलेली आहे. यामध्ये संबंधितांवर कारवाई केलेली आहे. राज्यस्तरावर दोन मुद्दे दुरुस्त केले आहेत. यावर समितीने विचारणा केली की, सदरहू दोन मुद्दे कोणते आहेत यावर सचिव शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस विदित केले की, दिनांक २ फेब्रुवारी, २०१६ रोजी निर्णय घेतलेला आहे. जेव्हा धान्याचा पुरवठा कमी होत आहे असे वाटत असल्यास अशा वेळी मुख्याध्यापकांनी बाजारातून धान्य खरेदी करावे आणि त्यासाठी शासनाकडून पैसा दिला जाणार आहे, सध्या

कंत्राटदाराकडून कोणतीही कार्यवाही होत नाही. मुख्याध्यापकांमार्फत सर्व कार्यवाही केली जात आहे. त्यासाठी मुख्याध्यापकांना शासनाकडून निधी दिला जात आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, यापूर्वी कंत्राटदाराकडून अनियमितता झालेल्या आहेत. हे प्रकरण मागील आहे. त्यावेळी कंत्राटदार होता किंवा कसे यावर सचिव शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस विदित केले की, सचिव स्तरीय समिती निर्माण केली, त्यामध्ये अडथळे निर्माण झाले आहेत. यावर समितीने अशी विचारणा केली की, सद्यस्थितीत समिती तयार केली आहे का, यावर सचिव शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस विदित केले की, मागील वर्षी २०१५ मध्ये समिती तयार केली. पण हे तेव्हाचे प्रकरण आहे, आधीचे त्यामध्ये कॉन्ट्रॅक्शन्स होतात. त्यामध्ये मुद्दे येतात. यावर समितीने पुढे विचारणा केली की, ते पुरवठादारासंदर्भात होते. माल तेथे जात असताना त्यांना तपासून त्याच्या अहवालानंतर त्या ठिकाणी वितरित करायचे होते. पण असे कधीही करीत नव्हते. तपासणीनंतरच बिल पेमेंट केलेले आहे. त्याच्या तारखा समितीकडे आहेत. त्यांची जी चूक झाली, मध्ये मध्ये जो खंड पडला, त्यावर कारवाई होणार आहे. बिल पेमेंटच्या प्रक्रियेमध्ये चूक झाली नाही.

**अभिप्राय व शिफारशी**

सन २०११-१२ च्या शालेय पोषण आहारातील जिल्हा परिषदेच्या एकूण सात प्राथमिक शाळांमध्ये शालेय पोषण आहाराच्या पुरवठयाच्या मूळ पावत्या मधील तूरडाळ, मिरची, मोहरी, जिरे,हळद, मीठ व तेल इत्यादी पावत्यांमध्ये खाडाखोड व उपरी लेखन केल्याचे दिनांक १३.५.२०१६ रोजी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना आढळून आले, लेखनानंतर नमूद परिणामाचीच नोंद मूळ साठा नोंदवहीत घेऊन तेवढयाच परिमाणाचे देयक अदा करणे आवश्यक होते. त्यानुसार धान्यादी मालाच्या पावत्यामध्ये खाडाखोड करुन परिमाण वाढविल्यामुळे अनियमितता झालेली असल्याने गैरकारभार व निष्काळजीपणाबद्दल प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापकांविरुद्ध महाराष्ट्र जिल्हा परिषद (वर्तणुक) नियम १९६७ मधील नियम (०३) भंग केल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषदा (शिस्त व अपिल) नियम १९६४ मधील तरतुदींनुसार प्रत्येकाची एक वर्षासाठी एक वेतनवाढ रोखून त्यांच्या सेवा पुस्तिकेत त्यांची नोंद घेण्याबाबतचा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांचेकडे सादर करण्यात आल्याची माहिती समितीस प्राप्त झाली.

शासनाने दिनांक ०२ फेब्रुवारी, २०१६ रोजी घेतलेल्या निर्णयानुसार धान्याचा पुरवठा कमी झाल्यास मुख्याध्यापकांनी बाजारातून धान्य खरेदी केल्यास त्यासाठी शासनाकडून रक्कम अदा करण्याचा निर्णय शासनाने घेण्याची माहिती समितीस प्राप्त झाली. तसेच सदरहू प्रकरणात दोषी असलेले तत्कालीन शिक्षणाधिकारी यांना सदर प्रकरणाबाबत कारणे दाखवा नोटीस देऊन त्यांचेविरुद्ध पुरवणी दोषारोप पत्र तयार करुन आयुक्त शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात आल्याची माहिती समितीस प्राप्त झाली.

**शालेय पोषण आहार योजनेबाबत शाळांसाठी जिल्हा पातळी वरील निविदा प्रक्रिया अवलंबिण्याच्या शासनाच्या विचाराधीन असलेल्या प्रस्तावावर तातडीने निर्णय घेऊन अंमलबजावणी करावी तसेच वितरण व्यवस्थेमध्ये मालाची गुणवत्ता राखण्यासाठी जिल्हावार प्रयोगशाळांमधून नियमितपणे तपासण्या करुन त्याबाबतचे प्रमाणपत्र घेणे अनिवार्य करावे व अशी तपासणी करण्यास हेतुपुर:स्सरपणे टाळाटाळ करणाऱ्या संबंधितांवर नियमानुसार कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत कळवावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

## प्रकरण अकरा

## जिल्हा परिषद, बुलडाणा

## सन २०१०-११ या वर्षात जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमध्ये झालेल्या इतर नियमबाहय बाबी

**(मागासवर्गीय मुलांच्या वसतीगृहाबाबत) (परिच्छेद ३.८१५(३०) (सन २०११-२०१२)**

| अ. क्र. | नियमबाहय बाबींचे स्वरुप | जि.प. चे नाव व विभाग | लेखा परिक्षण अहवालातील परि.क्र. | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ३० | मागासवर्गीय मुलींच्या वसतीगृहाबाबत | समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद बुलडाणा | १० | ४२,६५१/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, बुलडाणा यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

संत सेवालाल मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह देऊळगांव राजा यांना परिपोषण अनुदानाच्या जादा प्रदानाची रक्कम रु. ४२६५१/- वसूल करुन चलनाव्दारे शासन खाती भरणा करण्यात आलेली आहे.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

बुलडाणा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १८ ते २० जानेवारी, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, संत सेवालाल मागासवर्गीय मुलांच्या वसतिगृहास नियमबाह्यपणे रुपये ४२,६५१/- इतक्या जादा अनुदान प्रदानास कोण जबाबदार आहे, या अनियमिततेबाबत संबंधितांवर कोणती प्रशासकीय कारवाई करण्यात आली, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बुलढाणा यांनी समितीस विदित केले की, वसुली झालेली आहे. यावर तत्कालीन समाज कल्याण अधिकारी यांनी समितीस माहिती दिली की, समाज कल्याण निरीक्षक श्रीमती केदार यांनी दिनांक २३.०९.२०११ रोजी वसतिगृहाला भेट दिली होती. यावर समितीने अशी विचारणा केली की, रक्कम केव्हा वसूल केलेली आहे, यावर प्रभारी समाज कल्याण अधिकारी यांनी समितीस विदित केले की, याच महिन्यात रक्कम वसूल केलेली आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, जादा रक्कम दिलेली असल्यामुळे जबाबदारी निश्चित करावी लागेल. यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी समितीस विचारणा केली की, समाज कल्याण निरीक्षक यांनी दिनांक २३.०९.२०११ रोजी भेट दिली आणि वसतिगृहात केवळ ३ विद्यार्थी असल्याचा अहवाल दिला. असे असताना आपण त्या संस्थेला पात्र ठरवून अनुदान दिलेले आहे, हे चुकीचे आहे. यावर तत्कालीन समाज कल्याण अधिकारी यांनी समितीस विदित केले की, संस्थेने त्यांच्या हजेरी पत्रकात २१ विद्यार्थ्यांची नोंद घेऊन अहवाल सादर केला होता. त्या अनुषंगाने त्यांना अनुदान दिलेले आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, त्या संस्थेला जे अनुदान दिले ते योग्य आहे असे आपले म्हणणे आहे काय ? यावर तत्कालीन समाज कल्याण अधिकारी यांनी समितीस विदित केले की, संस्थेने २८ विद्यार्थ्यांपैकी २१ विद्यार्थी उपस्थित असल्याचे दाखविले होते, त्यामुळे त्यांना जादा पेमेंट झाले होते. आपण त्या पेमेंटची वसुली केलेली आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, भेटीच्या वेळी ३ विद्यार्थी आढळून आले होते तरी देखील त्या संस्थेला अनुदान दिलेले आहे. यावेळी संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी समितीस माहिती दिली की, श्रीमती केदार, समाज कल्याण निरीक्षक यांनी तपासणी करुन अहवाल दिलेला आहे. यावर यावर तत्कालीन समाज कल्याण अधिकारी यांनी समितीस विदित केले की, श्रीमती केदार मॅडम सहायक आयुक्त पदावर कार्यरत आहेत. यावर समितीने पुढे विचारणा केली की, त्याना पदोन्नती मिळालेली आहे काय ? यावर यावर तत्कालीन समाज कल्याण अधिकारी यांनी समितीस विदित केले की, ते या संबंधातील माहिती घेणार आहेत. यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी विचारणा केली की, समाज कल्याण निरीक्षक यांनी अहवाल देऊन सुद्धा संस्थेला जादा रक्कम प्रदान केलेली आहे, ही गंभीर बाब आहे. या प्रकरणाची चौकशी केली पाहिजे. यावर समितीने अशी विचारणा केली की, संस्थेची तपासणी करण्याची जबाबदारी आपल्याकडे आहे काय ? यावर तत्कालीन समाज कल्याण अधिकारी यांनी समितीस विदित केले की, आपण सुरुवातीला ४० टक्के ॲडव्हान्स देतो. यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी विचारणा केली की, समाज कल्याण निरीक्षकांनी दिलेल्या अहवालानुसार हा परिच्छेद काढण्यात आलेला आहे. सदर संस्थेला आपण जादा प्रदान कसे काय दिले ? यावर तत्कालीन समाज कल्याण अधिकारी यांनी समितीस विदित केले की, संस्थेने २१ विद्यार्थी असल्याचा अहवाल सादर केला होता. यावर पुढे समितीने अशी विचारणा केली की, जिल्हा परिषद संस्थेने दिलेला अहवाल ग्राह्य मानून संस्थेला अनुदान देता काय, यावर समितीने असे निदेश दिले की, समाज कल्याण निरीक्षकांनी अहवाल देऊनही आपण कारवाई प्रस्तावित केलेली नाही. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी या विषयाची सखोल चौकशी करुन संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी. समिती हा विषय सचिवांच्या साक्षीसाठी घेत असल्याचे सांगितले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

**सन २०१०-११ या वर्षात जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमध्ये झालेल्या इतर नियमबाहय बाबी :- (मागासवर्गीय मुलांच्या वसतीगृहाबाबत)**

(१) संत सेवालाल मागासवर्गीय मुलांच्या वसतीगृहास समाजकल्याण निरीक्षकांनी दिनांक २३ सप्टेंबर, २०११ रोजी भेट दिली असता वसतिगृहात केवळ ३ विद्यार्थी असल्याचे नोंदविले असतानाही सदर संस्थेला जादाचे अनुदान देण्यात आले आहे. प्रस्तुत प्रकरणात शासनाच्या समाजकल्याण सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीएच १०९७/प्र.क्र.१०७/मावक-४ दिनांक १६ मार्च, १९९८ च्या शासन निर्णयातील तरतुदीं प्रमाणे व समाजकल्याण निरिक्षकांनी अहवाल देऊनही कारवाई प्रस्तावित का करण्यात आली नाही. तसेच याप्रकरणी चौकशी करुन संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत समितीने निर्देशित केल्याप्रमाणे त्यानुसार कारवाई का करण्यात आली नाही ?

(२) समाज कल्याण निरिक्षक, श्रीमती केदार यांनी केवळ ३ विद्यार्थी उपस्थित असल्याची नोंद केली असता तत्कालिन समाज कल्याण अधिकारी, श्री. एम.एम.चव्हाण यांनी श्रीमती केदार यांचे गोपनिय अहवाल प्रतिकुल लिहिण्याची धमकी देवून विद्यार्थ्यांची वाढीव संख्या दर्शविण्याचा दबाव आणला असल्याचे चौकशी अहवालात नमूद केलेले आहे. तरी समितीच्या निदेशानुसार शासनाने यासंदर्भात सखोल चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) संत सेवालाल मागासवर्गीय मुलांच्या वसतीगृहास समाज कल्याण निरिक्षकांनी दिनांक २३ सप्टेंबर, २०११ रोजी भेट दिली असता २८ पैकी केवळ ३ विद्यार्थी वसतीगृहात हजर असल्याचे दर्शविण्यात आले असतांना परिपोषण प्रस्तावासोबत जोडलेल्या वसतीगृहाचे भेट नोंदवही वरील भेटीनुसार याच दिवशी २८ पैकी २१ विदयार्थी हजर दर्शवुन स्वाक्षरी करण्यात आली. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात शासनाच्या समाजकल्याण सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीएच १०९७/प्रकप १०७/ मावक-४ दिनांक १६ मार्च, १९९८ च्या शासन निर्णयातील तरतुदी प्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(२) प्रस्तुत प्रकरणी श्रीमती केदार, समाज कल्याण निरीक्षक हया राज्य शासकीय कर्मचारी असल्याने त्यांच्यावर कार्यवाही करण्याचा प्रस्ताव सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, बुलढाणा यांचे कार्यालयास कार्यवाही करण्याबाबत खालील प्रमाणे पत्र पाठविण्यात आलेले आहे.

(१) या कार्यालयाचे पत्र क्र. बुजिप/सकावि/आस्था/PRC/-----/दि.८/८/२०१६
(२) या कार्यालयाचे पत्र क्र. बुजिप/सकावि/आस्था/PRC/५४४/दि.२५/८/२०१६
(३) या कार्यालयाचे पत्र क्र. बुजिप/सकावि/आस्था/PRC/६२४/दि.८/९/२०१६
(४) या कार्यालयाचे पत्र क्र. बुजिप/सकावि/आस्था/PRC/६३५/दि.९/९/२०१६
(५) या कार्यालयाचे पत्र क्र. बुजिप/सकावि/आस्था/PRC/८३८/दि.१९/१०/२०१६
(६) या कार्यालयाचे पत्र क्र. बुजिप/सकावि/आस्था/PRC/९२६/दि.४/७/२०१६

(३) या प्रकरणी तत्कालीन जि.स.क.अ. श्री. एम.एम. चव्हाण यांनी चौकशी केली असता त्यांनी त्यांच्या जबाबात श्रीमती केदार सकनि यांचे गोपनिय अहवाल प्रतिकुल लिहीण्याची धमकी व वाढीव संख्या दर्शविण्याचा दबावाबाबत कोणत्याही प्रकारची धमकी किंवा दबाव आणला नाही असा लेखी खुलासा सादर केलेला आहे. मा. मु.का.अ. जि.प. बुलढाणा यांनी नेमलेल्या चौकशी समितीचा अहवाल पुढील कार्यवाहीसाठी सहाय्यक आयुक्त समाजकल्याण बुलढाणा यांनी प्रादेशिक उपआयुक्त यांचे मार्फत मा.आयुक्त समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना त्यांचे कार्यालयाचे पत्र क्र. २०१७ /सआसकबु/आस्था/परास/ /२६/१२/२०१७/बुलढाणा, दिनांक /११/०७/२०१७ अन्वये सादर केलेला आहे.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे अभिप्राय :-** शासन सहमत आहे.

### विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने बुलडाणा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक १४ नोव्हेंबर, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली असता समितीने विचारणा केली की, संत सेवालाल मागासवर्गीय मुलांचे वसतीगृहास समाज कल्याण निरीक्षकांनी दिनांक २३ एप्रिल, २०११ रोजी भेट दिली असता वसतीगृहात २८ विद्यार्थ्यांपैकी केवळ तीन विद्यार्थी उपस्थित असल्याची नोंद समाज कल्याण निरिक्षक, श्रीमती केदार यांनी केलेली आहे. असे असताना परिपोषण प्रस्तावासोबत जोडलेल्या वसतीगृहाच्या भेट नोंदी नुसार याच दिवशी २८ पैकी २१ विद्यार्थी हजर दर्शवून स्वाक्षरी घेतल्याचे श्री. चव्हाण, तत्कालीन समाजकल्याण अधिकारी यांनी दर्शविण्यात आलेले आहे. सदरील प्रकरणी अंतिमत: काय कार्यवाही करण्यात आलेली आहे, यावर सचिव, समाजकल्याण विभाग यांनी समितीस विदित केले की, सदरील वसतीगृहास भेट देण्यात आली, त्या दिवशी २८ पैकी २१ विद्यार्थी हजर दाखविण्यात आलेले आहेत. पण प्रत्यक्षात तीनच विद्यार्थी हजर होते. या संदर्भात समितीने जी वसूली सूचविली होती त्याप्रमाणे संबंधित संस्थेला जादा प्रदान झालेली रक्कम रुपये ४२,६५१/- ही वसूल

करण्यात आलेली आहे. श्रीमती केदार यांना श्री. चव्हाण यांनी गोपनीय अहवाल प्रतिकूल लिहिण्याची धमकी दिली. सदरील प्रकरणी विभागाचे जे क्षेत्रीय कार्यालय आहे तेथून सदरील प्रस्ताव माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये आयुक्त कार्यालयात पाठविण्यात आला आहे. विभागाला दिनांक १६ ऑक्टोबर, २०१७ रोजी अहवाल प्राप्त झालेला आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, सदरील प्रकरणी २८ पैकी तीन विद्यार्थी हजर होते म्हणून जिल्हा परिषदेने त्याबाबत वसुलीची कार्यवाही करुन रुपये ४२,६५१/- रक्कम वसूल केलेली आहे. याबाबत जिल्हा परिषदेच्या अभिप्रायाशी शासन सहमत आहे.

समितीने विचारणा केली की, शासन निर्णयामध्ये जे काही नियम असतील त्यानुसार संबंधितांवर तात्काळ कार्यवाही होणे अपेक्षित होती ती करण्यात आलेली नाही, यावर सचिव, समाज कल्याण विभाग यांनी समितीस विदित केलें की, श्रीमती केदार यांच्यावर जिल्हा परिषद समाज कल्याण अधिकारी यांनी दबाव आणून २१ ही संख्या दर्शवावयास लावली आहे. त्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याबाबतची चौकशी केली असता श्रीमती केदार यांनी केलेल्या आरोपात काहीही तथ्य आढळून आले नाही, म्हणून त्यांच्या विरुध्द कार्यवाही करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला. यावर समितीने पुढे असे मत व्यक्त केले की, सदरील प्रकरणी दिनांक १६ मार्च, १९९८ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदी प्रमाणे FIR दाखल करणे आवश्ययक होते. याबाबत कनिष्ठ अधिका-यावर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्यात यावी.

समितीने पुढे विचारणा केली की, ही बाब लेखा परिक्षण आणि समितीच्या निदर्शनास आली, परंतु ही बाब शाळा किंवा वसतीगृह तपासणी करणा-या अधिका-याच्या लक्षात का आली नाही, त्यास तपासणी करणारे अधिकारी जबाबदार आहेत. याबाबत विभागाने अभिप्रायाशी सहमत असल्याचे मत व्यक्त केले आहे. कार्यवाही न करता आक्षेप निकाली काढण्यात येईल असे उत्तर विभागाने दिले आहे. ही बाब सन २०११ मधील आहे व सध्या २०१७-२०१८ हे वर्ष सुरु आहे. या बाबीला एवढा विलंब लागण्याचे काय कारण आहे, यावर सचिव, समाजकल्याण विभाग यांनी समितीस विदित केले की, श्री. चव्हाण हे त्यावेळी जिल्हा समाज कल्याण अधिकारी सेवेत कार्यरत होते. यावर समितीने अशी विचारणा केली की, यासंदर्भातील तपासणी करण्याची जबाबदारी त्यांची नव्हती काय, जिल्हयाच्या प्रमुखाने त्या त्या वसतीगृहामध्ये जाऊन भेटी देणे व तपासणी करणे हे त्यांचे काम आहे.

२८ ऐवजी ०३ विद्यार्थ्यांसंदर्भात दोन्ही अधिका-यांची जबाबदारी होती व संबंधित दोन्ही अधिकारी कार्यवाहीसाठी पात्र आहेत. यावर समितीने अशी विचारणा केली की, वसूली अधिक्षकांवर कार्यवाही होऊ शकते, ज्यांनी शाळा तपासणी केली आणि ज्या अधिका-यांनी वसतीगृहाचे काम समाधानकारक आहे अशी नस्ती सादर केली. सदरहू गैरप्रकार दिसून आला नाही, त्या अधिका-यांवर जबाबदारी का निश्चित करण्यात येऊ नये, यावर सचिव, समाज कल्याण अधिकारी यांनी समितीस विदित केले की, सदरहू वसतीगृहाची तपासणी समाज कल्याण निरिक्षकांनीच केलेली आहे. त्यामुळे याबाबत दोन्ही अधिकारी दोषी आहेत सदरहू अधिका-यांनी लेखा परिक्षण परिच्छेद पाहणे गरजेचे होते. तसेच त्याबाबत टिप्पणी दिली असताना यामध्ये अनियमितता झालेली आहे. त्यामुळे दोषी असलेले दोन्ही अधिकारी कार्यवाहीसाठी पात्र आहेत.

याबाबत सचिव, समाज कल्याण विभाग यांनी समितीस विदित केले की, समाजकल्याण अधिकारी, श्री. चव्हाण यांनी योग्य तपासणी करण्याची जबाबदारी तसेच स्वाक्षरी करताना तपासून करुन पाहणे आवश्यक होते. यावर समितीने विचारणा केली की, समाज कल्याण निरिक्षक, श्रीमती केदार यांनी असा आरोप केलेला आहे की, त्यांच्यावर दबाव आणला होता. लेखा परिक्षणात स्पष्ट असताना त्यांनी ही बाब का दिसून आली नाही, तसेच खालील अधिका-यांनेही सांगितले की त्यांच्यावर देखील दबाव होता व ते त्यांचे स्पष्ट मत नोंदवित असताना वरिष्ठ अधिका-यांनी जाणीवपूर्वक त्यांचे मत खोडून काढले असे असताना जिल्हा परिषदेतील चौकशी करणा-या अधिका-याला संबंधित अधिकारी दोषी असल्याचे का आढळून आले नाही, तसेच वरील अधिका-यांनाही त्या अधिका-यांमध्ये दोष का आढळून आला नाही. यामधील दोषी अधिका-यांना वाचविण्याचा हेतू काय आहे, यावर सचिव, समाज कल्याण विभाग यांनी समितीस विदित केले की, याबाबींची मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यावेळी चौकशी करुन त्याचा अहवाल दिनांक ०३ ऑगस्ट, २०१६ रोजी विभागाकडे आलेला आहे.

यामध्ये असे म्हटलेले आहे की, चौकशीच्या वेळी श्री. मालेगावकर, कक्ष सहाय्यक यांना उपस्थित राहण्याबाबत सूचना दिल्यानंतर त्यांनी चौकशी समितीला खुलासा सादर केलेला आहे. सदर वसतीगृहाच्या मुल्य निर्धारणाबाबत दिनांक ६ जून, २०१३ रोजी नस्ती सादर केली असता, सदर संस्थेकडे स्थानिक निधी लेखा आक्षेपातील ४४ हजार ६५९ रुपये वसुली दर्शविण्यात आलेली होती. त्यासंदर्भात वसतीगृह चालकाने तत्कालीन समाज कल्याण अधिकारी यांच्याशी चर्चा करुन वसुली संदर्भात १०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर हमी पत्र लिहून दिलेले होते. सदर हमीपत्रात लेखा परिक्षण परिच्छेदात दुरुस्ती झाली नाही तर आम्ही सदर रक्कम पुढील सत्रात भरणा करणार असल्याचे उल्लेख टिप्पणीमध्ये केले आहेत. सदर रक्कम तत्कालीन समाज कल्याण अधिकारी यांनी मान्य केल्यामुळे रक्कम अदा करण्यात आलेली आहे.

वस्तीगृहातील विद्यार्थी शनिवार आणि रविवार या दिवशी गावी जातात, परंतु त्या दोन दिवसाचे जेवणाचा खर्च काढला जातो. सर्वच वस्तीगृहामध्ये असे प्रकार सर्रास सुरु आहेत, त्यामुळे या संदर्भात एखादी केस सापडल्यावर विभागाकडून ०६ वर्षे फौजदारी गुन्हयासारखी कार्यवाही केली जात नाही, ही आपल्या विभागाची चूक आहे. श्रीमती केदार यांचे म्हणणे आहे की, तत्कालीन समाजकल्याण अधिकारी यांनी त्यांनी बोगस हजेरी पत्रक भरण्यासाठी दबाव आणला होता. यामध्ये मुख्य आरोपी कोण आहे याचे उत्तर मिळालेले आहे. संस्थाचालकाकडून वसुली होण्यापेक्षा या दोन जबाबदार मुख्य आरोपीकडूनच वसूली होणे आवश्यक आहे.

याबाबत सचिव, समाज कल्याण विभाग यांनी समितीस विदित केले की, श्रीमती केदार यांच्या समोर त्याच दिवसाचे दोन रेकॉर्ड आले आणि त्यांनी एका रेकॉर्ड मध्ये २८ विद्यार्थी आणि दुसऱ्या रेकॉर्डमध्ये ०३ विद्यार्थी असल्याची माहिती दोन वेगवेगळे आकडे त्यांनी

भेटी मध्ये लिहिले आहे. यावर समितीने पुढे विचारणा केली की, श्री.चव्हाण यांच्या टिप्पणी मध्ये कोणता उल्लेख करण्यात आलेला आहे, यावर सचिव, समाज कल्याण यांनी समितीस विदित केले की, त्यामुळेच त्यांना ही बाब सापडली. त्या दिवशी ते लेखाधिकारी समोर नव्हते. त्यांच्या समोर त्याच दिवसाचे दोन रेकॉर्ड आले आणि त्यांनी एका रेकॉर्डमध्ये २८ विद्यार्थी असल्याची माहिती लिहिली आणि एका रेकॉर्डमध्ये ०३ विद्यार्थी असल्याची माहिती लिहीली होती.

समितीने विचारलेला प्रश्न फार महत्त्वाचा होता. दोन वेगवेगळे रिपोर्ट का करण्यात आले हा देखील महत्त्वाचा मुद्दा आहे. यामध्ये सिस्टीमचे इंम्प्रुव्हमेंट करणे शक्य आहे की, जर एकाच दिवशी एकाच अधिका-याने दोन रेकॉर्ड तयार केले हे त्याचे क्रक्स आणि ती व्यक्ती श्रीमती केदार होती. आपण काही म्हटले तरी हे सिद्ध होणे आवश्यक होते, रेकॉर्डवर वेगवेगळे फिगर्स दिसत असतील तर यामध्ये सिस्टीमचे इंम्प्रुव्हमेंट शक्य आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, लेखा परिक्षण परिच्छेद येण्यापूर्वी समाज कल्याण अधिकारी यांच्या निदर्शनास का आला नाही, त्यासंदर्भातील माहिती असणे आवश्यक होते. तसेच वसतिगृहांना अनुदान देताना वर्षभरामध्ये जेवढया तपासण्या करण्यात आल्या त्यांच्या सरासरी नुसार विद्यार्थ्यांना पैसे देण्यात आले.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, ज्यांनी दबाव टाकला त्यांनी एक वर्षात त्या वसतिगृहाला किती भेटी दिल्या, त्याची तपासणीच करण्यात आली नाही, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तपासणी केलीच नाही, यावर सचिव, समाज कल्याण विभाग यांनी समितीस विदित केले की, दोन वेगवेगळया नोंदवहया आहेत, त्यामध्ये एक नोंदवही भेटीची आहे. यावर समितीने पुढे विचारणा केली की, पडताळणी करण्यासाठी भेटींची तपासणी केली पाहिजे. आपण एका वर्षाची वसूली केली आहे. भेटीच्या वेळी कागदोपत्री मुलांची एकूण संख्या, उपस्थित मुलांची संख्या व वस्तुस्थिती योग्य सांगितली असेल व तो मुद्दा लेखा परिक्षकाच्या लक्षात आला व आल्यानंतर दबाव टाकला हे सिद्ध होते. सदरहू प्रकरणी वसूली करण्यात आलेली रक्कम कोणाकडून वसूल केली हे नमूद करण्यात आले नाही. यावर सचिव, समाज कल्याण विभाग यांनी समितीस विदित केले की, उक्त प्रकरणी अधिक पैसे दिल्यामुळे संस्था चालकांकडून वसूली करण्यात आली आहे.

तसेच समितीने अशी विचारणा केली की, सदरहू प्रकरणी फौजदारी गुन्हा किती दिवसांमध्ये दाखल करण्यात येईल, यावर सचिव, समाज कल्याण विभाग यांनी समितीस गुन्हा दाखल करण्यात येईल अशी माहिती दिली. मागासवर्गीय वसतिगृहाच्या संदर्भातील हा विषय आहे. सदरहू प्रकरणी चौकशी करुन दोन्ही संबंधितांविरुद्ध किती दिवसांमध्ये कारवाई करण्यात येईल. यावर सचिव, समाज कल्याण विभाग यांनी समितीस विदित केले की, श्रीमती केदार, समाज कल्याण निरिक्षक यांचेविरुद्ध शिस्तभंग विषयक कारवाई करण्यासंदर्भातील प्रस्ताव आयुक्त महोदयांना सादर करण्यात आला आहे.

समितीच्या निदेशानुसार उक्त प्रकरणी आयुक्त, समाज कल्याण यांचे व्दारे एका महिन्याच्या आत चौकशी करुन कारवाई करण्यात येईल असे सांगितले असता त्यावर समितीने पुढे विचारणा केली की, या प्रकरणी समाज कल्याण आयुक्त यांना आणखी चौकशी करण्याची आवश्यकता आहे काय, सदरहू बाब उघडकीस येण्याकरिता ५-६ वर्षाचा कालावधी गेला असून पुन्हा चौकशी करण्यात येणार आहे काय, यावर सचिव, समाज कल्याण विभाग यांनी समितीस विदित केले की, श्रीमती केदार यांचेविरुद्ध कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे. यावर सचिव, समाज कल्याण विभाग यांनी समितीस विदित केले की, उक्त प्रकरणी ३० दिवसांमध्ये कारवाई करण्यात येईल. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, श्रीमती केदार याच केवळ उक्त प्रकरणी दोषी आहेत, ही बाब समितीला मान्य नाही. श्री. चव्हाण, समाज कल्याण अधिकारी यांचेविरुद्ध तातडीने चौकशी करुन त्यांचेवर कारवाई कधी पर्यंत करण्यात येईल, यावर सचिव, समाज कल्याण विभाग यांनी समितीस विदित केले की, एक महिन्याच्या कालावधीत शासन निर्णयानुसार कारवाई करुन त्यासंदर्भात माहिती समितीला अवगत करावी असे सांगण्यात आले.

**अभिप्राय व शिफारशी**

संत सेवालाल हे देऊळगाव राजा येथील मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह आहे. दिनांक २३.९.२०११ रोजी श्रीमती केदार, समाजकल्याण निरिक्षक यांनी वसतिगृहास भेट दिली असता त्यांना २८ विद्यार्थ्यांपैकी केवळ ३ विद्यार्थी उपस्थित असल्याचे आढळल्याने त्यांनी नोंदवहीत लिहिले. समाज कल्याण विभागाच्या दि.१६.३.१९९८ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार कारवाई प्रस्तावित करण्यात यावी असे निदेश समितीने दिले आहेत. विद्यार्थी वसतीगृह परिपोषण प्रस्तावास २१ विद्यार्थ्यांची स्वाक्षरी दर्शवून रु. ४२,६५१/- रक्कमेचे जादा अनुदान प्रदान करण्यात आले. विभागीय क्षेत्रीय कार्यालयात माहे सप्टेंबर, २०१७ रोजीचा अहवाल ५/६ वर्षे विलंबाने पाठविल्याने तत्कालीन समाज कल्याण अधिकारी, श्री.एम.एम.चव्हाण यांच्या चौकशीत तथ्य नसल्याचे व श्रीमती केदार यांच्या कारवाईचा चौकशी अहवाल दिनांक १६.१०.२०१४ रोजी सचिव, समाजकल्याण अधिकारी यांच्याकडे पाठविला असल्याची माहिती दिली. वाढीव विद्यार्थी संख्या दर्शवून शासनाचे अनुदान हडप करण्याचा गैरप्रकार झालेला आहे. जादा अनुदान रक्कम वसुली केल्याने संबंधात अधिकारी कारवाईस पात्र असताना अद्यापपर्यंत कार्यवाही केलेली नाही माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये विभागीय आयुक्तांकडून अहवाल विलंबाने प्राप्त झालेला आहे. संबंधित अधिकाऱ्यांच्या चौकशीचा प्रस्ताव शिक्षण विभागाकडे पाठिविला असताना त्यांनी अभिप्राय देऊन समाज कल्याण यांच्या आस्थापना शाखेत १० तारखेला प्राप्त झाल्याचे सांगितले. जिल्हा परिषदेच्या अभिप्रायाशी शासन सहमत आहे एवढेच नमूद करण्यात आले असून या प्रकरणात संबंधितांकडून रक्कम वसूल केली असल्याने कामात अनियमितता झालेली असल्याने त्यांच्याविरुद्ध एफ.आय.आर. (F.I.R) दाखल केला नाही. शाळा किंवा वसतीगृह तपासणी करणा-या अधिका-याच्या लक्षात सदरहू बाब का आली नाही याबाबत त्यांचेविरुद्ध जबाबदारी निश्चित करावी. कार्यवाही न करता आक्षेप निकाली काढण्यात यावेत असे उत्तर विभागाने दिले आहे. अधिक्षकांवर गैरप्रकाराबाबत जबाबदारी निश्चित करुन कारवाई करावी असे समितीने सूचित केले. प्रकरण तपासून रक्कम देण्याची आवश्यकता नव्हती असे लेखा परिक्षकांचे आक्षेप आहेत. या प्रकरणी दोषींना वाचविण्याचे कारण व दिनांक ३ ऑगस्ट,

२०१६ रोजीच्या चौकशी अहवालात कक्ष सहाय्यक श्री.मालेगावकर यांना उपस्थित राहण्याबाबत सूचना दिल्या नंतर त्यांनी चौकशी समितीला खुलासा सादर केलेला आहे. दिनांक ६ जून, २०१३ रोजी स्थानिक लेखा निधी यांनी वसतिगृहाचे मुल्य निर्धारण रु. ४४,६५९/- वसुली केल्याचे दर्शविण्यात आलेले असून १०० रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर हमीपत्र लिहून दिले आहे. तसेच वसतिगृहातील विद्यार्थी शनिवार व रविवार या सुट्टीच्या दिवशी गावी जात असल्यामुळे दोन दिवसाच्या जेवणाचा खर्च काढला जातो अशीही बाब समितीच्या निदर्शनास आली आहे.

श्रीमती केदार यांनी दोन वेगवेगळे आकडे नोंदवहीत लिहिलेले आहेत. एका नोंदवहीत २८ विद्यार्थी आणि दुसऱ्या नोंदवहीत ३ विद्यार्थी असल्याची असल्याची माहिती सचिव, समाज कल्याण विभाग समितीला दिली. उक्त प्रकरणी अधिक पैसे दिल्यामुळे संस्था चालकांकडून वसूली करण्यात आली असे सचिव,समाज कल्याण यांनी समितीला माहिती विदित केली. सदरहू प्रकरणी फौजदारी गुन्हा किती दिवसात दाखल करण्यात येईल असे समितीने विचारणा केली केली, यावर सचिव, समाज कल्याण विभाग यांनी गुन्हा दाखल करण्यात येईल असे सांगितले.

श्रीमती केदार यांचेविरुद्ध शिस्तभंग विषयक कारवाई करण्यासंदर्भातील प्रस्ताव, आयुक्त, समाजकल्याण यांना सादर करण्यात आला असल्याचे सचिव, समाज कल्याण यांनी समितीस माहिती दिली असता एका महिन्याच्या आत चौकशी करुन करावाई करण्यात येईल असे सांगितले.

**समाज कल्याण निरिक्षक, श्रीमती केदार याच केवळ उक्त प्रकरणी दोषी आहेत ही बाब समितीला मान्य नाही. तत्कालिन समाज कल्याण अधिकारी, श्री. चव्हाण यांचेविरुद्ध तातडीने चौकशी करुन एक महिन्याच्या आत शासन निर्णयानुसार कारवाई करुन त्याबाबतची माहिती समितीला अवगत करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केल्यानुसार कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला दोन महिन्यात पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

## प्रकरण बारा

## जिल्हा परिषद, बुलडाणा

### बांधकामाच्या ठिकाणी पाहणी न करता १०० टक्के तपासणी व काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र देणेबाबत (पंचायत समिती मेहकर)

**(परिच्छेद ४.८१) (सन २०११-२०१२)**

जिल्हा परिषद, बुलडाणा : (परिच्छेद क्रमांक २)

बांधकामाचे ठिकाणी पाहणी न करता १००% तपासणी व काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र देणेबाबत :-

पंचायत समिती मेहकर, जिल्हा बुलढाणा, सन २०११-२०१२ (परिच्छेद क्रमांक-०३) :- मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेश क्रमांक बुजिप/जा.क्र./वित्त अंकेक्षण/१७२७/०८/दि. ३१.१०.२००८ नुसार विविध योजनेतून पुर्ण होणाऱ्या १००% कामाची तपासणी करणे आवश्यक असताना उप अभियंता यांनी मोजमाप पुस्तिकेत १००% तपासणी दर्शविली, परंतू वाहनाचे लॉगबुक नुसार प्रत्यक्षात कामाचे ठिकाणी दौरे दिसून आले नाहीत.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, बुलडाणा यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेश क्र.बुजिप/जा.क्र./वित्त/अंकेक्षण/१७२७/०८, दिनांक ३१.१०.२००८ नुसार पंचायत समिती स्तरावर विविध योजनेतून पुर्ण होणाऱ्या कामाची १००% तपासणी प्रत्यक्ष मोका तपासणी वारंवार करुनच मोजमाप पुस्तिका व पुर्णत्वाचे प्रमाणपत्रावर स्वाक्षरी करण्यात येते, त्यासाठी सरकारी जिल्हा परिषदेतूनच नाही तर वेळेनुसार व गरजेनुसार खाजगी वाहनाद्वारे सुद्धा तपासणी केली जाते.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

बुलडाणा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १८ जानेवारी, २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, पंचायत समिती, मेहकर अंतर्गत विविध योजनांच्या कामांची १०० टक्के तपासणी उप अभियंता (बांधकाम) यांनी मोजमाप पुस्तिकेत दर्शविली आहे. मात्र वाहनाच्या लॉगबुक वरुन कामाच्या ठिकाणी दौरे केल्याचे आढळत नाही. सदर तपासणी योग्य असल्याची खात्री खात्याने कशी केली, संबंधित उप अभियंता यांनी त्यांच्या दैनंदिन दौऱ्यामध्ये या कामांच्या ठिकाणी भेट/दौरा केल्याचे दिसून येते काय, यावर गट विकास अधिकारी, पंचायत समिती मेहकर यांनी समितीस विदित केले की, लॉगबुकच्या नोंदीवरुन उप अभियंत्यांनी सरकारी वाहनाद्वारे तीन कामांची तपासणी केल्याचे दिसून येते. त्या नोंदीनुसार उप अभियंत्यांनी दि.१२ मार्च, २०१२ रोजी दोन वेगवेगळ्या कामाचे पूर्णत्वाचे प्रमाणपत्र दिले. तसेच २३ फेब्रुवारी, २०१२ रोजी एका कामाचे पूर्णत्वाचे प्रमाणपत्र उपलब्ध आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, लेखा परिक्षणाच्या वेळी मोजमाप पुस्तिकेतील नोंदीनुसार उप अभियंत्यांनी ३ कामांना पूर्णत्वाचे प्रमाणपत्र दिले. परंतु वाहनाच्या लॉगबुक मधील नोंदीमध्ये उप अभियंता उक्त तिन्ही दिवस पंचायत समितीच्या आमसभेस उपस्थित होते, असे नमूद केले आहे. अशाप्रकारे चुकीची नोंद करणाऱ्यांवर कारवाई करावयास पाहिजे. तसेच दुसरी बाब अशी की, मोहदरी येथील शाळेत बोअरवेल पंप बसविणे हे काम दि.१२/०३/२०१२ रोजी पूर्ण झाल्याचे दर्शविले आहे. सदर कामाच्या प्रमाणकाची तपासणी केली असता दि.१०/०५/२०१२ रोजी रु.१९,४१२/- रोजीचे साहित्य खरेदी केल्याचे आढळते. तसेच दि.३१/०३/२०१२ रोजी रु.१९,९५०/- चे प्रदान केल्याचे आढळते. तसेच अन्य एका प्रकरणात एकाच दिवशी उप अभियंत्यांनी दोन कामांचे पूर्णत्वाचे प्रमाणपत्र दिल्याची नोंद मोजमाप पुस्तिकेत आहे व त्याच दिवशी ते पंचायत समितीच्या आमसभेस उपस्थित असल्याचे लॉगबुक वरुन दिसून आले आहे. तसेच परिच्छेद क्र. ४.८१ च्या बाबतीत असे दिसून येते की, काम पूर्ण झाल्यानंतर साहित्य खरेदी करण्यात आलेले आहे. यावर समितीने पुढे विचारणा केली की, आपणास हे खरे वाटत असेल तर आपण कोणती कारवाई करणार, पुस्तकात जे उत्तर दिलेले आहे ते कोणी दिलेले आहे. यावर गट विकास अधिकारी (मेहकर) यांनी समितीस विदित केले की, ते उत्तर उप अभियंता यांनी दिलेले आहे. यावर पुढे समितीने अशी विचारणा केली की, मोका तपासणी म्हणजे काय ? यावर गट विकास अधिकारी, (मेहकर) यांनी समितीस विदित केले की, प्रत्यक्ष स्थळ पाहणी करणे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, जिल्हापरिषदेने स्पष्टीकरणात नमूद केले आहे की, "मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेश दिनांक ३१.१०.२००८ नुसार पंचायत समिती स्तरावर विविध योजनेतून पूर्ण होणाऱ्या कामाची १०० टक्के तपासणी प्रत्यक्ष मोका तपासणी वारंवार करुनच मोजमाप पुस्तिका पूर्णत्वाचे प्रमाणपत्रावर स्वाक्षरी करण्यात येते. त्यासाठी सरकारी जीपचाच नाही तर वेळेनुसार व गरजेनुसार खाजगी वाहनाद्वारे सुद्धा तपासणी केली जाते." आपण खाजगी वाहनाद्वारे तपासणी केली असेल तर त्याचे देयक असेल, ते तपासणीसाठी दिले पाहिजे. कारण नसताना हे लिहिण्याची गरज होती काय, यावर समितीने असे निदेश दिले की, या विषयाची सखोल चौकशी करुन समितीला अहवाल सादर करावा तसेच खर्चाविषयी देखील तपासणी करावी. समितीच्या असे निदर्शनास आले की, तत्कालीन नऊ अधिकारी हे जाणूनबुजून समितीसमोर माहिती देण्यासाठी गैरहजर राहिलेले आहेत. तत्कालीन अधिकाऱ्यांनी येथे उपस्थित रहायचे आणि बोलाविल्यानंतही समितीसमोर यायचे नाही ही गंभीर बाब आहे. हा समितीचा अवमान आहे. याची नोंद घेऊन संबंधितांवर शिस्तभंगाची कारवाई करावी.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

पंचायत समिती, मेहकर अंतर्गत विविध योजनांच्या कामाची १००% तपासणी उप अभियंता यांनी मोजमाप पुस्तिकेत दर्शविली आहे. परंतु वाहनांच्या लॉग बुकमध्ये कामाच्या ठिकाणी दौरे केलेले आढळलेले नसणे. मौजे मोहदरी शाळेत बोअरवेल पंप बसविण्याचे काम पूर्ण झाल्याच्या दिनांकानंतर साहित्य खरेदी केल्याचे आढळून येणे या व इतर गंभीर बाबीची सखोल चौकशी करण्याचे व तत्संबंधित अहवाल सादर करण्याचे समितीचे निदेश असूनही साक्षीच्या वेळी समोर आलेली बाबच चौकशी अहवाल म्हणून समितीला पाठविण्यात आली आहे. मौजे मोहदरी शाळेत बोअरवेल पंप बसविण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर साहित्य खरेदी झालेली आहे. या बाबीचा चौकशी अहवालात समावेश नाही. समितीस पाठविण्यात आलेल्या माहितीस मुख्य कार्यकारी अधिकारी/ शासनाची मान्यता का घेण्यात आलेली नाही. समितीस सादर झालेल्या माहितीशी शासन सहमत आहे काय, सदर प्रकरणी समितीने निदेश देवूनही चौकशी केली नसल्यास चौकशी न केल्याप्रकरणी शासनाने जबाबदारी निश्चित केली आहे काय ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सदर प्रकरणी चौकशी करुन तत्कालीन उप विभागीय अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा, उपविभाग मेहकर, श्री.अ.ना.लव्हाळे यांचा खुलासा व चौकशी अहवाल सादर करण्यात आला आहे. त्यानुसार दि.१२/०५/२०१२ ला शिवाजीनगर, मोहदरी, कळपविहीर येथील प्राथमिक शाळेत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत घेतलेल्या बोअरवेलच्या कामाची पाहणी त्या शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक यांच्यासह खाजगी वाहनाने केली व कामाचे पुर्णत्वाचे प्रमाणपत्र सादर केले. त्यामुळे वाहनाने दौरा केल्याचा लॉगबुक मध्ये नोंद नाही. सदरचा चौकशी अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावरुन समितीस पत्र क्रमांक १७७३ दि. २९/५/२०१७ नुसार सादर केला आहे.

मूळ आक्षेप दौ-यासंबंधी असल्याने चौकशी अहवाल दौ-याचे अनुषंगाने सादर करण्यात आला आहे. त्यामुळे मौजे मोहदरी ता. मेहकर येथील शाळेत बोअरवेल बाबत चौकशी अहवाल सादर करण्यात आला नाही. यासंबंधीची वस्तुस्थिती पुढील प्रमाणे : बोअरवेलच्या कामास मुल्यांकना नुसारच रक्कम अदा करण्यात आली आहे. सदर काम ग्राम शिक्षण समिती मोहदरी यांनी केलेले असून काम पुर्ण झाल्यानंतर साहित्य खरेदी झाल्याची बाब स्पष्ट झाल्याने या अनियमिततेस जबाबदार असणारे तत्कालीन मुख्याध्यापक श्री. समाधान भगवान मगर यांचेविरुद्ध शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात आली आहे.

**मोहदरी येथील शाळेच्या बोअरवेल संबंधातील मुद्या संदर्भात पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली. जिल्हा परिषद, बुलडाणा यांचे अभिप्रायाशी सहमत असल्याचे नमूद केले आहे.**

**चौकशी अहवाल**

चौकशी करुन तत्कालीन उप विभागीय अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, मेहकर श्री.अ.ना.लव्हाळे यांचा खुलासा व चौकशी अहवाल सादर करण्यात आला असता श्री.अ.ना.लव्हाळे यांनी असे नमूद केले आहे की त्यांनी सदर दौरा हा मोटार सायकलवर केलेला असल्यामुळे त्याची नोंद शासकीय वाहनाच्या लॉगबुक मध्ये आलेली नाही.

मौजे मोहदरी ता. मेहकर येथील शाळेत बोअरवेलचे कामास तांत्रिक मान्यता प्रदान केली असून त्यास दि. २४/०७/२०११ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. सदर कामाची किंमत ४८,२५०/- इतकी असून सदर कामास रु. ६,०००/- लोकवर्गणी व काम पुर्ण केल्यानंतर त्यांची मोजमाप पुस्तिकेत ४८२ पान क्रमांक ७७ ते ७९ वर नोंद घेवुन २५,१५०/-देयकातून रु. १९,१५०/- अदा केले आहे. सदर मुख्याध्यापकाने दुकानदारामार्फत उधारीवर साहित्य खरेदी करुन मोटारपंप बोअरवेल मध्ये बसवुन घेतल्यानंतर त्यांचे अंतिम देयक ३१/०३/२०१२ प्रमाणपत्र क्र. ८७२ नुसार अदा केले आहे. त्यानंतर दुकानदाराचे देयक अदा करण्यात आले म्हणून बिला वरील दिनांक देयक अदा केल्यानंतरची दिसत आहे. सोबत पुर्णत्वाचे प्रमाणपत्र मोजमाप पुस्तिकेची झेरॉक्स प्रत व अंतिम देयकाची प्रत जोडण्यात येत आहे वरील प्रमाणे चौकशी अहवाल सादर.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने बुलढाणा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक १५ नोव्हेंबर, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीस अशी माहिती प्राप्त झाली की, पंचायत समिती मेहकर येथे बांधकामाच्या ठिकाणी पाहणी न करता १०० टक्के तपासणी केल्याचे प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

**अभिप्राय व शिफारशी**

दिनांक ३१.१०.२००८ नुसार विविध योजनेतून पूर्ण होणाऱ्या १००% कामाची तपासणी करणे आवश्यक असतांना उप अभियंता यांना मोजमाप पुस्तिकेत १००% तपासणी दर्शविली, परंतु वाहनाचे लॉगबुक नुसार प्रत्यक्षात संपूर्णपणे कामाची तपासणी करणे आवश्यक होते. त्यांनी तसे न केल्याने दर्शविलेली बाब आक्षेपार्ह असून वाहनाचे लॉगबुक नुसार प्रत्यक्षात कामाचे ठिकाणी दौरे दिसून आले नाहीत. दिनांक १२/०५/२०१२ रोजी शिवाजीनगर, मोहदरी व कळपविहीर येथील प्राथमिक शाळेत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत घेतलेल्या बोअरवेलच्या कामाची पाहणी त्या शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक यांच्यासह खाजगी वाहनाने दौरा केल्याचा लॉगबुक मध्ये नोंद नसल्याचे दिसून येते.

प्रस्तुत प्रकरणात काम पूर्ण झाल्यानंतर साहित्य खरेदी करण्यात आलेले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेश दिनांक ३१.१०.२००८ नुसार पंचायत समिती स्तरावर विविध योजनेतून पूर्ण होणाऱ्या कामाची १०० टक्के तपासणी प्रत्यक्ष मोका तपासणी वारंवार करुनच मोजमाप पुस्तिका पूर्णत्वाचे प्रमाणपत्रावर स्वाक्षरी करण्यात येते. त्यासाठी सरकारी जीपचाच नाही तर वेळेनुसार व गरजेनुसार खाजगी वाहनाद्वारे सुद्धा तपासणी करण्यात येते हा खुलासा समिती मान्य करु शकत नाही.

**शासनाच्या विविध योजनेतून पूर्ण होणाऱ्या १००% कामाची तपासणी संबंधित अधिकारी यांनी करणे आवश्यक आहे असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे दिनांक ३१.१०.२००८ रोजीचे आदेश आहेत. सदरहू आदेशाचा भंग झालेला आहे. याप्रकरणी बांधकामाची तपासणी न करता १०० टक्के तपासणी केल्याचे प्रमाणपत्र सर्व संबंधितांनी दिले असल्याचे विभागीय सचिवांनी समितीच्या साक्षीच्या वेळी सांगितले. जिल्हा परिषदेच्या बांधकामाची पाहणी करण्यास दुर्लक्ष करण्यात आले हे यावरुन सिद्ध होत आहे. याप्रकरणी चौकशी अधिकाऱ्यांनी चौकशी करण्यास अक्षम्य दुर्लक्ष करुन समितीस चुकीचा अहवाल पाठविला असल्याने संबधित चौकशी अधिकाऱ्यांवर तसेच कामाची पाहणी न करता १००% तपासणी केल्याचे प्रमाणपत्र देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस दोन महिन्यांत पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

## परिशिष्ट

## समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

**सोमवार, दिनांक १८ जानेवारी, २०१६**
**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, बुलडाणा**

**उपस्थिती**

१. श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.तथा समिती प्रमुख.
२. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
३. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
४. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.
५. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
६. श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.
७. श्री. अमित झनक, वि.स.स.
८. श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.
९. ॲड.रामहरी रुपनवर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**
श्री. विलास आठवले, उप सचिव
श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

**स्थानिक लोकप्रतिनिधी / पदाधिकारी**
१) डॉ. संजय कुटे, वि.स.स.
२) श्री. शशिकांत खेडेकर, वि.स.स.
३) श्रीमती अलका खंडारे, अध्यक्षा, जि.प.बुलढाणा
४) श्री. पांडुरंग खेडकर, उपाध्यक्ष, जि.प. बुलढाणा
५) श्री. अंकुशराव वाघ, सभापती, अर्थ व बांधकाम समिती
६) श्रीमती सुलोचना पाटील, सभापती, कृषी व पशुसंवर्धन समिती
७) श्रीमती आशाताई झोरे, सभापती, महिला व बालकल्याण समिती
८) श्री. गणेश बस्सी, सभापती, समाजकल्याण समिती
९) श्रीमती रेखा जाधव, सदस्या, जि. प., बुलढाणा
१०) श्रीमती प्रभावती अघाव, सभापती, पं.स., बुलढाणा
११) श्रीमती सत्यभामा डहाके, सभापती, पं.स., चिखली
१२) श्रीमती अनिता झोटे, सभापती, पं.स., देऊळगांव राजा
१३) श्रीमती मित्रवृंदा फुंडकर, सभापती, पं.स., शेगांव
१४) श्री. अनिल इंगळे, सभापती, पं.स., नांदुरा
१५) श्रीमती विद्या नारखेडे, सभापती, पं.स., मलकापूर.
१६) श्री. संजय भगवान किनगे, सभापती, पं.स, मोताळा
१७) श्री. विजय काळे, उप सभापती, जळगांव-जामोद
१८) श्री. रामेश्वर पाटील, उप सभापती, पं.स., बुलढाणा
१९) श्री. अशोक इंगळे, विरोधी पक्ष नेता

**संचालक, स्थानिक निधी लेखा**
श्री. का.मा.विधाते, संचालक

**ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय**
श्री. रा.म. गेंगजे, अवर सचिव

**विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती**
श्री. हेमंत ठाकरे, सहाय्यक संचालक लेखा

**जिल्हा परिषद, बुलढाणा**
श्रीमती दिपा मुधोळ, मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री. बप्पासाहेब नेमाने, अति. मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री. अनुप शेंगुलवार, प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं.
श्री. सचिन इगे, प्रभारी मुख्य लेखा व वित्त अधिकारी
श्री. राजेंद्र पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन)
श्री. विलास पुजारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत)
श्री. रामचंद्र चंदन, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण)
श्री. विजय यादव, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी पुरवठा व स्वच्छता)
श्रीमती वैशाली ठग, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
श्री. अशोक सोनवणे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
श्री. अनिल तिजारे, शिक्षणाधिकारी (निरंतर)
श्री. रमेश भराड, कृषी विकास अधिकारी
डॉ.शिवाजी पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी
श्री नरेश शेगोकार, कार्यकारी अभियंता (बांधकाम)
श्री. सुधीर सोळंके, कार्यकारी अभियंता (लघुसिंचन)
श्री. संतोषसिंह राजपूत, प्रभारी कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु.)
डॉ.सुनील पसरटे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
श्री. मनोजकुमार मेरत, प्रभारी समाज कल्याण अधिकारी
श्री. मोहन भट, उपअभियंता, (यांत्रिकी)
श्री. राजू लोखंडे, गट विकास अधिकारी, बुलढाणा
श्री. ओमप्रकाश रामावत, गट विकास अधिकारी, चिखली
श्री. रविकांत पवार, गट विकास अधिकारी, मेहकर
श्री. ओमप्रकाश यादव, गट विकास अधिकारी, लोणार
श्री. ज्ञानोबा मोकाटे, गट विकास अधिकारी, देऊळगांव राजा
श्री. निलेश पाटील, प्रभारी गट विकास अधिकारी, सिंदखेड राजा
श्री. प्रशांत राऊत, गट विकास अधिकारी, खामगांव
श्री. श्रीकृष्ण सावळे, गट विकास अधिकारी, शेगांव
श्री. संजय चोपडे, गट विकास अधिकारी, जळगांव जामोद
श्री. दिलीप हिरोळे, गट विकास अधिकारी, संग्रामपूर
श्री. सुरेश मारकड, गट विकास अधिकारी, नांदुरा
श्री. अशोक तायडे, गट विकास अधिकारी, मलकापूर
श्री. संजय पाटील, गट विकास अधिकारी, मोताळा

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने बुलडाणा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २००८-२००९ व २०११-१२ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील बुलडाणा जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक १९ जानेवारी, २०१६**
**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, बुलडाणा**

**उपस्थिती**

१. श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.तथा समिती प्रमुख.
२. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
३. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
४. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.
५. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.
६. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
७. श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.
८. श्री. अमित झनक, वि.स.स.
९. श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.
१०. ॲड.रामहरी रुपनवर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. विलास आठवले, उप सचिव
श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

**ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय**

श्री. रा.म. गेंगजे, अवर सचिव

**विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती**

श्री. हेमंत ठाकरे, सहाय्यक संचालक लेखा

**जिल्हा परिषद, बुलढाणा**

श्रीमती दिपा मुधोळ, मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री. बप्पासाहेब नेमाने, अति. मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री. अनुप शेंगुलवार, प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं.
श्री. सचिन इगे, प्रभारी मुख्य लेखा व वित्त अधिकारी
श्री. राजेंद्र पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन)
श्री. विलास पुजारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत)
श्री. रामचंद्र चंदन, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण)
श्री. विजय यादव, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी पुरवठा व स्वच्छता)
श्रीमती वैशाली ठग, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
श्री. अशोक सोनवणे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
श्री. अनिल तिजारे, शिक्षणाधिकारी (निरंतर)
श्री. रमेश भराड, कृषी विकास अधिकारी
डॉ.शिवाजी पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी
श्री नरेश शेगोकार, कार्यकारी अभियंता (बांधकाम)
श्री. सुधीर सोळंके, कार्यकारी अभियंता (लघुसिंचन)
श्री. संतोषसिंह राजपूत, प्रभारी कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु.)
डॉ.सुनील पसरटे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
श्री. मनोजकुमार मेरत, प्रभारी समाज कल्याण अधिकारी
श्री. मोहन भट, उपअभियंता, (यांत्रिकी)
श्री. राजू लोखंडे, गट विकास अधिकारी, बुलढाणा
श्री. ओमप्रकाश रामावत, गट विकास अधिकारी, चिखली

श्री. रविकांत पवार, गट विकास अधिकारी, मेहकर
श्री. ओमप्रकाश यादव, गट विकास अधिकारी, लोणार
श्री. ज्ञानोबा मोकाटे, गट विकास अधिकारी, देऊळगांव राजा
श्री. निलेश पाटील, प्रभारी गट विकास अधिकारी, सिंदखेड राजा
श्री. प्रशांत राऊत, गट विकास अधिकारी, खामगांव
श्री. श्रीकृष्ण सावळे, गट विकास अधिकारी, शेगांव
श्री. संजय चोपडे, गट विकास अधिकारी, जळगांव जामोद
श्री. दिलीप हिरोळे, गट विकास अधिकारी, संग्रामपूर
श्री. सुरेश मारकड, गट विकास अधिकारी, नांदुरा
श्री. अशोक तायडे, गट विकास अधिकारी, मलकापूर
श्री. संजय पाटील, गट विकास अधिकारी, मोताळा

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने बुलडाणा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधति अधिकारी तसेच गटविकास अधिकारी यांची सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक २ संदर्भात बुलडाणा जिल्हा परिषदेच्या पंचायत समितीनिहाय संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**बुधवार, दिनांक २० जानेवारी, २०१६**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, बुलडाणा**

**उपस्थिती**

१. श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स. तथा समिती प्रमुख.
२. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
३. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
४. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.
५. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
६. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.
७. श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.
८. श्री. अमित झनक, वि.स.स.
९. श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.
१०. ॲड. रामहरी रुपनवर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. विलास आठवले, उप सचिव

श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

**संचालक, स्थानिक निधी लेखा**

श्री. का. मा. विधाते, संचालक

**ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय**

श्री. रा. म. गेंगजे, अवर सचिव

**विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती**

श्री. हेमंत ठाकरे, सहाय्यक संचालक लेखा

**जिल्हा परिषद, बुलढाणा**

श्रीमती दिपा मुधोळ, मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री. बप्पासाहेब नेमाने, अति. मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री. अनुप शेंगुलवार, प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं.

श्री. सचिन इगे, प्रभारी मुख्य लेखा व वित्त अधिकारी

श्री. राजेंद्र पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन)

श्री. विलास पुजारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत)

श्री. रामचंद्र चंदन, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण)

श्री. विजय यादव, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी पुरवठा व स्वच्छता)

श्रीमती वैशाली ठग, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

श्री. अशोक सोनवणे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

श्री. अनिल तिजारे, शिक्षणाधिकारी (निरंतर)

श्री. रमेश भराड, कृषी विकास अधिकारी

डॉ. शिवाजी पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी

श्री नरेश शेगोकार, कार्यकारी अभियंता (बांधकाम)

श्री. सुधीर सोळंके, कार्यकारी अभियंता (लघुसिंचन)

श्री. संतोषसिंह राजपूत, प्रभारी कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु.)

डॉ. सुनील पसरटे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

श्री. मनोजकुमार मेरत, प्रभारी समाज कल्याण अधिकारी

श्री. मोहन भट, उपअभियंता, (यांत्रिकी)

श्री. राजू लोखंडे, गट विकास अधिकारी, बुलढाणा

श्री. ओमप्रकाश रामावत, गट विकास अधिकारी, चिखली
श्री. रविकांत पवार, गट विकास अधिकारी, मेहकर
श्री. ओमप्रकाश यादव, गट विकास अधिकारी, लोणार
श्री.  ज्ञानोबा मोकाटे, गट विकास अधिकारी, देऊळगांव राजा
श्री. निलेश पाटील, प्रभारी गट विकास अधिकारी, सिंदखेड राजा
श्री. प्रशांत राऊत, गट विकास अधिकारी, खामगांव
श्री. श्रीकृष्ण सावळे, गट विकास अधिकारी, शेगांव
श्री. संजय चोपडे, गट विकास अधिकारी, जळगांव जामोद
श्री. दिलीप हिरोळे, गट विकास अधिकारी, संग्रामपूर
श्री. सुरेश मारकड, गट विकास अधिकारी, नांदुरा
श्री. अशोक तायडे, गट विकास अधिकारी, मलकापूर
श्री. संजय पाटील, गट विकास अधिकारी, मोताळा

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने बुलडाणा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २००८-२००९ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील व सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील बुलडाणा जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक १४ नोव्हेंबर, २०१७**
**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

१. श्री. सुधीर पारवे, वि.स.स.तथा समिती प्रमुख.
२. श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.
३. श्री. चरण वाघमारे, वि.स.स.
४. श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
५. श्री. आर.टी.देशमुख, वि.स.स.
६. डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.
७. श्री. तुकाराम काते, वि.स.स.
८. श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.
९. प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
१०. श्री. तानाजी सावंत, वि.प.स.
११. श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य :**

१. श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.
२. श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.
३. श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री. विलास आठवले, उप सचिव
श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी
श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय**

श्री. प्रताप मोहिते, संचालक

**विभागीय सचिव**

श्री. विजय कुमार, प्रधान सचिव, कृषी व पणन विभाग,
श्री. नंद कुमार, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग
श्री. असिमकुमार गुप्ता, सचिव, ग्रामविकास विभाग,
श्रीमती विनिता वेद सिंगल, सचिव, महिला व बालविकास विभाग
श्री. दिनेश वाघमारे, सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
श्री. र. प्र. आटे, सह सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,
श्री. ना. भा. रिंगणे, उप सचिव, ग्रामविकास विभाग,
श्री. संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग,
श्री. प्रकाश वळवी, उप सचिव, ग्रामविकास विभाग,
श्रीमती सु. मो. महाडीक, उप सचिव, वित्त विभाग
श्री. मिलिंद शंभरकर, आयुक्त, समाजकल्याण विभाग

**जिल्हा परिषद, बुलढाणा**

श्री. शन्मुगराजन, मुख्य कार्यकारी अधिकारी, बुलडाणा

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००८-२००९ व २०११-२०१२ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात बुलडाणा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रधान सचिव, कृषी व पणन (कृषी) विभाग, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, सचिव, ग्रामविकास विभाग, सचिव, महिला व बालविकास विभाग, सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सह सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, उप सचिव, वित्त विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, आयुक्त, समालकल्याण विभाग, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलडाणा यांची साक्ष घेतली.

**बुधवार, दिनांक १५ नोव्हेंबर, २०१७**
**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

१. श्री. सुधीर पारवे, वि.स.स.तथा समिती प्रमुख.

२. श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

३. डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.

४. श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

५. श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.

६. श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

७. श्री. राहुल मोटे, वि.स.स.

८. श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.

९. श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य :**

१. श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. विलास आठवले, उप सचिव

श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

श्री. ह.वि.तामोरे, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय**

श्री. प्रताप मोहिते, संचालक

**विभागीय सचिव**

श्री. श्यामलाल गोयल, अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,

श्री. नंद कुमार, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग

डॉ. प्रदिप व्यास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग

श्री. असिमकुमार गुप्ता, सचिव, ग्रामविकास विभाग,

श्री. दिनेश वाघमारे, सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,

श्री. अ.अ. सगणे, सचिव, सार्वजनिक बांधकाम (बांधकाम) विभाग,

श्री. जे.पी.गुप्ता, सचिव, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग

श्री. र.प्र.आटे, सह सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,

श्री. वि.सी. वखारे, सह सचिव, जलसंधारण विभाग,

श्री. य.टे. पाडवी, उप सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,

डॉ. सतिश उमरीकर, संचालक, पाणीपुरवठा व स्वच्छता सं.

श्री. राजेंद्र गोधवे, सहसंचालक, आयुक्त शिक्षण कार्यालय, पुणे

**जिल्हा परिषद, बुलढाणा**

श्री. शन्मुगराजन, मुख्य कार्यकारी अधिकारी, बुलढाणा

श्रीमती शिल्पा पवार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, बुलडाणा

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००८-२००९ व २०११-२०१२ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात बुलडाणा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, सचिव, ग्रामविकास विभाग, सचिव, सार्वजनिक बांधकाम (बांधकाम) विभाग, सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सचिव, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग, सह सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, सह सचिव, जलसंधारण विभाग, उप सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, संचालक, पाणीपुरवठा व स्वच्छता सं., सहसंचालक, आयुक्त शिक्षण कार्यालय, पुणे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलडाणा, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, बुलडाणा यांची साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक २७ मार्च, २०१८**
**स्थळ : विधान भवन, मुंबई.**

१. श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
२. श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.
३. श्री. चरण वाघमारे, वि.स.स.
४. श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
५. श्री. आर.टी.देशमुख, वि.स.स.
६. डॉ. सुरेश खाडे, वि.स.स.
७. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
८. प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
९. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
१०. श्री. विक्रम काळे, वि.प.स.
११. श्री. सतीश चव्हाण, वि.प.स.

**विशेष निमंत्रित सदस्य :**

१२. श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.
१३. श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. विलास आठवले, उप सचिव
श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी
श्री. ह.वि.तामोरे, कक्ष अधिकारी

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने बैठकीत बाराव्या व तेराव्या अहवालाच्या प्रारुपावर विचार करुन ते किरकोळ सुधारणांसह संमत केले.